# पैंजण

( पेशवेकालीन सहा प्रमुख शाहिरांच्या
निवडक कवनांचा संग्रह )

१९५४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७२९५

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

संपादक

प्रा. म. ना. अदवंत, एम्. ए.

REFBK-0008360
REFBK-0008360

चित्रशाळा प्रकाशन, पुणें-२.

# पैंजण

(पेशवेकालीन सहा प्रमुख शाहिरांच्या
निवडक कवनांचा संग्रह)

संपादक

प्रा. म. ना. अदवंत, एम्. ए.

REFBK-0008360

किंमत चार रुपये

चित्रशाळा प्रकाशन, पुणें-२.

मुद्रक व प्रकाशक
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस, १०२६
सदाशिव पेठ, पुणें २

आवृत्ति पहिली
ऑगस्ट १९५४

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# भूमिका

रामजोशी, अनंतफंदी, होनाजी बाळ, परशराम, प्रभाकर व सगन या सहा शाहिरांच्या निवडक कवनांचा संग्रह आज रसिकांच्या हातीं देतांना मला अतिशय आनंद होत आहे. अशा प्रकारचा प्रातिनिधिक स्वरूपाचा संग्रह तयार करून शाहिरांच्या प्रतिभेचे विविध पैलू मराठी वाचकांसमोर ठेवावेत अशी माझी फार दिवसांपासून इच्छा होती. शाहिरी काव्य आणि विशेषतः लावणी वाङ्मय यासंबंधीं सामान्य वाचकांचे फार चमत्कारिक पूर्वग्रह आहेत. शाहिरांच्या संपूर्ण काव्याचें दर्शन त्यांना न घडल्याने अनेक वेळां कांही विशिष्ट कवनांवरूनच ते त्या त्या शाहिरांच्या प्रतिभेची व त्यांच्या काव्याच्या स्वरूपाची कल्पना करून घेत असतांना आढळतात. उदाहरणार्थ, 'भला जन्म हा तुला लाभला' या लावणीवरून रामजोशांची, फटक्यांवरून अनंतफंदीची, 'घनःशाम सुंदरा' या भूपाळीवरून होनाजी बाळची व 'रंगाचा दरबार' वरून प्रभाकराची ओळख त्यांना झालेली असते. पण त्याबरोबरच त्यांच्या काव्यांत विविध भावनांचा मनोरम आविष्कार होत असतो ही कल्पना पुष्कळांना नसते. त्यामुळे "लावण्या" हा शब्द उच्चारला कीं, नाक मुरडावयाचें, व पोवाडा म्हटला कीं, वीररसप्रधान युद्धाचें वर्णन करणारें कवन डोळ्यांसमोर आणावयाचें अशी स्थूलमानाने शाहिरी वाङ्मयासंबंधीं त्यांची प्रतिक्रिया असते. शाहिरी वाङ्मयाचें स्वरूप किती विविध आहे व त्या शाहिरांच्या प्रतिभेचें स्वरूपहि कसें उज्ज्वल आहे हें दाखविण्यासाठी शाहिरांच्या उत्कृष्ट व प्रातिनिधिक कवनांचा हा संग्रह

मुद्रक व प्रकाशक
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस, १०२६
सदाशिव पेठ, पुणें २

आवृत्ति पहिली
ऑगस्ट १९५४

अनुक्रम ७.८.८.४२
दिनांक २४.०९.४२
क्र. ७२८५
नों. दि. २०/५

# भूमिका

रामजोशी, अनंतफंदी, होनाजी बाळ, परशराम, प्रभाकर व सगन या सहा शाहिरांच्या निवडक कवनांचा संग्रह आज रसिकांच्या हातीं देतांना मला अतिशय आनंद होत आहे. अशा प्रकारचा प्रातिनिधिक स्वरूपाचा संग्रह तयार करून शाहिरांच्या प्रतिभेचे विविध पैलू मराठी वाचकांसमोर ठेवावेत अशी माझी फार दिवसांपासून इच्छा होती. शाहिरी काव्य आणि विशेषतः लावणी वाङ्मय यासंबंधीं सामान्य वाचकांचे फार चमत्कारिक पूर्वग्रह आहेत. शाहिरांच्या संपूर्ण काव्याचें दर्शन त्यांना न घडल्याने अनेक वेळां कांही विशिष्ट कवनांवरूनच ते त्या त्या शाहिरांच्या प्रतिभेची व त्यांच्या काव्याच्या स्वरूपाची कल्पना करून घेत असतांना आढळतात. उदाहरणार्थ, ‘भला जन्म हा तुला लाभला’ या लावणीवरून रामजोशांची, फटक्यांवरून अनंतफंदीची, ‘घनःशाम सुंदरा’ या भूपाळीवरून होनाजी बाळची व ‘रंगाचा दरबार’ वरून प्रभाकराची ओळख त्यांना झालेली असते. पण त्याबरोबरच त्यांच्या काव्यांत विविध भावनांचा मनोरम आविष्कार होत असतो ही कल्पना पुष्कळांना नसते. त्यामुळे “लावण्या” हा शब्द उच्चारला कीं, नाक मुरडावयाचें, व पोवाडा म्हटला कीं, वीररसप्रधान युद्धाचें वर्णन करणारें कवन डोळ्यांसमोर आणावयाचें अशी स्थूलमानाने शाहिरी वाङ्मयासंबंधीं त्यांची प्रतिक्रिया असते. शाहिरी वाङ्मयाचें स्वरूप किती विविध आहे व त्या शाहिरांच्या प्रतिभेचें स्वरूपहि कसें उज्ज्वल आहे हें दाखविण्यासाठी शाहिरांच्या उत्कृष्ट व प्रातिनिधिक कवनांचा हा संग्रह

मीं संपादित केला आहे. त्यासाठी ज्या सहा शाहिरांची मीं निवड केली आहे ते सहाहि शाहीर पेशवाईच्या उत्तर-काळांत गाजलेले होते. इतरहि अनेक शाहिरांनी या काळांत कवनें लिहिलीं. पण आज तीं उपलब्ध तरी नाहीत किंवा इतक्या थोड्या प्रमाणांत उपलब्ध आहेत कीं त्यावरून त्यांच्या प्रतिभेचें स्वरूप निश्चित करणें कठीण जातें. या सहा शाहिरांच्या कवनांतून निवड करतांना ऐतिहासिक विषयावरील पोवाडे, पौराणिक स्वरूपाच्या लावण्या व लौकिक विषयावरील लावण्या हे तीनहि प्रकार त्यांत येतील अशी शक्य तों काळजी घेतली आहे.

हा माझा प्रयत्न अत्यंत अल्प व मर्यादित आहे. याच क्षेत्रांत श्री. ऑक्वर्थ, श्री. शाळिग्राम, श्री. शितुत, श्री. अधिकारी, श्री. य. न. केळकर इत्यादि विद्वान् संशोधकांनी जें कार्य केलें–ज्या परिश्रमाने शाहिरांचीं कवनें रसिकांना त्यांनी उपलब्ध करून दिलीं त्याचें मोल करणें कठीण आहे. त्यांनी परिश्रमपूर्वक संशोधन करून प्रसिद्ध केलेल्या कवनांपैकी निवडक कवनें रसिकांच्यापुढे ठेवण्याची अतिशय मर्यादित अशी माझी भूमिका आहे. या संग्रहाचें दुसरें प्रयोजन असें कीं रामजोशी तें सगनभाऊपर्यंत या सहा शाहिरांची जी कविता पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आहे त्यांत शाहिरांच्या चांगल्या गीतांबरोबरच उत्तान व क्वचित् सदभिरुचीला सोडून असलेल्या कवनांचाहि त्यांत समावेश करण्यांत आला आहे. त्यांच्या प्रतिभेचें हें कांहीसें डागाळलेलें स्वरूप आपल्या रसिक बुद्धीला पटत नाही. अशीं कवनें गाळून त्यांची उत्कृष्ट समजली जाणारी कविता एकत्र स्वरूपांत रसिकांच्या पुढे आली तर शाहिरांविषयींचे पूर्वग्रह दूर होण्यालाहि बरीच मदत होईल असें वाटतें. अर्थात् कसोशीने निवड करूनहि कांही उत्तान भाग राहणें अपरिहार्य आहे. आणि तो गाळला तर शाहिरी वाङ्मयाचें वैशिष्ट्यच नाहीसें केल्यासारखें होईल. शाहिरी वाङ्मय वाचतांना वाचकांनीहि फाजील सोवळेपणा ठेवणें इष्ट होणार नाहीं.

या संग्रहांतील रामजोशी ते प्रभाकर यांच्या कवनासाठी चित्रशाळेने

प्रसिद्ध केलेल्या व शाळिग्रामांनी संपादित केलेल्या त्या त्या शाहिरांच्या लावण्या व पोवाडे यांच्या संग्रहाच्या प्रतींतील पाठ घेण्यांत आले आहेत. सगनभाऊचीं कवनें श्री. गो. गो. अधिकारी व श्री. जहागिरदार यांनी संपादित केलेल्या पुस्तकांतून निवडलीं आहेत. ‘दुसरे बाजीराव’ हा सगनचा पोवाडा व ‘पेशव्यांचा शुक्रवारवाडा’ हा रामजोशीचा पोवाडा हे श्री. य. न. केळकर यांच्या ‘ऐतिहासिक पोवाडे’ या पुस्तकांतून घेतले आहेत. व ‘सुभद्रा म्हणे–’ ही रामजोशी यांची लावणी त्यांच्याच ‘तन्तकवि’ या पुस्तकांतून घेतली आहे. या सर्वांचा अत्यंत कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावयास हवा.

शाहिरी वाङ्मयाच्या श्री. शाळिग्रामाने केलेल्या संपादनांत अशुद्धें बरींच आहेत. त्या अशुद्धाचा बारसा बऱ्याच प्रमाणांत पाठान्तराने परंपरा जिवंत ठेवणाऱ्या गोंधळ्याकडे जातो. शिक्षणाचा संस्कार नसल्याने अनेक ठिकाणीं त्यांनी अर्थाचा अनर्थ केलेला आढळेल, तर कांही ठिकाणीं मूळ शब्दांना विकृत स्वरूप दिलेलें आढळेल. संपादन करतांनाहि मोडी वाचनाच्या चुकां-मुळे, ऐतिहासिक नांवागांवाच्या अज्ञानामुळे किंवा शब्दाच्या वा अक्षराच्या केलेल्या तोडजोडीमुळे संपादकांच्या हातून बऱ्याच चुका झालेल्या आहेत. श्री. य. न. केळकर यांनी ‘ऐतिहासिक पोवाडे’ या संग्रहाला जी विद्वत्ता-पूर्ण प्रस्तावना लिहिली आहे त्यांत त्यांनी अशा अनेक चुका दाखविल्या आहेत. त्यामुळे कांही लावण्यांतून वा पोवाड्यांतून अर्थ स्पष्ट होणें अतिशय कठीण जातें. या संग्रहांत शाळिग्रामाचे पाठ घेतले असले तरी ज्या ज्या ठिकाणीं उपलब्ध होतील त्या त्या ठिकाणीं दुसरे चांगले पाठ निवडले आहेत. कांही पाठभेदांचा टीपांमध्ये उल्लेख केला आहे. पण प्रयत्न करूनहि अनेक लावण्याचे दुसरे पाठ उपलब्ध होऊं शकले नाहीत. अशा ठिकाणीं अर्थाभिव्यक्ति नीट होत नसली तरी शाळिग्रामांचेच पाठ निवडले आहेत.

शाहिरी वाङ्मयाकडे अलीकडे लोकांचें अधिकाधिक लक्ष जात आहे ही मोठी चांगली गोष्ट आहे. या वाङ्मयाचा परिचय करून देणारीं श्री. श्री.

म. वर्दे यांचें ' मराठी शाहीर ' व श्री. य. न. केळकर यांचें ' तन्तकवि ' हीं दोन स्वतंत्र पुस्तकें उल्लेखनीय आहेत. त्याबरोबरच अनेक स्फुट लेख लिहून बारामतीचे श्री. म. ना. सहस्रबुद्धे यांनी लावणी वाङ्मयांतील अनेक प्रकारांवर प्रकाश टाकला आहे. कै. न. चिं. केळकर, कै. अ. ब. कोल्हटकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, महाराष्ट्र सारस्वतकार भावे इत्यादि अनेक लेखकांनी शाहिरी वाङ्मयावर प्रसंगोपात्त निरनिराळे स्फुट लेख लिहिले आहेत. पुणें नभोवाणी केन्द्रावर लावणी वाङ्मयाचीं वैशिष्ट्यें प्रात्यक्षिकासह प्रगट करणारी अनेक विद्वानांची भाषणमाला नुकतीच गुंफली गेली. अनंतफंदीचे स्मृतिदिनहि ठिकठिकाणीं साजरे केले गेले. आजच्या पिढींतहि श्री. अनंतफंदी ( अनंतफंदी या शाहिरांचे पणतू ), प्रा. धोंड इत्यादि अनेक विद्वानांचा या वाङ्मयावर अभ्यास चालू आहे. शाहिरी वाङ्मयाकडे लोकांचें अधिकाधिक लक्ष वेधण्यासाठीं चालू असलेले हे प्रयत्न निःसंशय अभिनंदनीय आहेत.

त्यांतीलच आतिशय अल्पसा हा प्रयत्न केवळ चित्रशाळेच्या उत्तेजनानेच पार पडत आहे. अनेक शाहिरांचे काव्यसंग्रह संपूर्ण स्वरूपांत काढण्याचें श्रेय ज्याप्रमाणें ' चित्रशाळे ' ला द्यावयास हवें, त्याप्रमाणें शाहिरांच्या प्रातिनिधिक कवनांचा संग्रह काढण्यास उत्तेजन देण्याचें श्रेयहि 'चित्रशाळे'ला द्यावयास हवें. शाहिरी वाङ्मय प्रकाशित करून ' चित्रशाळे ' नेहि फार भरीव कामगिरी केली यांत शंकाच नाहीं. प्रस्तुत संग्रह त्यांच्याच उत्तेजनाचें फळ आहे. श्री. दामुअण्णा रानडे यांनी जर नेट धरला नसता तर माझ्या हातून हें काम कितपत झालें असतें कोण जाणे. आभार मानण्याचा औपचारिकपणा स्नेहभावामुळे मला दाखवितां येत नाही. पण या संग्रहाची कल्पना सांगितल्याबरोबर ज्या तत्परतेने त्यांनी ती उचलून धरली व त्यासाठी जे परिश्रम केले ते सर्व लक्षांत घेतां त्यांच्यामुळेच हा संग्रह प्रकाशित होऊं शकला असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. याशिवाय प्रा. रा. श्री. जोग, प्रा. म. वि. फाटक, डॉ. वि. म. कुलकर्णी, डॉ. शं. गो. तुळपुळे

यांचें मला वेळोवेळीं मार्गदर्शन झालें. माझा विद्यार्थि-मित्र श्री. ज. वि. महाजन यानेहि शब्दकोश वगैरे करण्याबाबत वेळोवेळीं मदत केली. श्री. दलाल यांनी आकर्षक मुखपृष्ठ दिलें. या सर्वांचे आभार मानणें औपचारिकपणाचें दिसेल. पण या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्याशिवाय राहावत नाहीं.

शेवटीं ज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दांत

‘ तऱ्हीं न्यून तें पुरतें । अधिकहि सरतें ।
करूनि घेयावें हें तुमतें । विनविलें मियां ॥

अशी रसिकांची विनवणी करून हा संग्रह त्यांच्या स्वाधीन करतों.

—म. ना. अदवंत.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. 1360
अनुक्रम ७५०७५२
विभाग २१:८२१०२
क्र. १२८५
नों. दि. २०।५।५

# पैंजणाच्या नादांतून—

## [ शाहिरी काव्याचें रसग्रहण ]

शाहिरी वाङ्मयाला ‘ मराठी काव्याची प्रभात ’ असें अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी संबोधिलें आहे. प्राचीन कवि हे कवि नव्हते कारण ते श्रेष्ठ तत्त्वज्ञानी होते आणि अर्वाचीन कवि हे कवि नाहीत कारण कवि म्हणण्याइतकी त्यांची स्फूर्तिच नाही; पण ‘ शाहिरी कवींचा जो काळ तोच मराठी काव्याची प्रभात होय ’ असा एक सिद्धान्त त्यांनी प्रतिपादन केला. त्यांतील अतिशयोक्तीचा भाग सोडून दिला तरी शाहिरी काव्य हें मराठी साहित्याच्या इतिहासांत अगदी स्वतंत्र वळणाचें काव्य आहे. त्याची प्रेरणा अगदी स्वतंत्र आहे व आविष्कार अगदी नावीन्यपूर्ण आहे हें नाकारून चालावयाचें नाही. स्थूलमानाने पाहतां शाहिरी काव्य हें शिवकालापासून सुरू झालें व पेशवाईबरोबरच तें विराम पावलें असें म्हणतां येईल. त्या दृष्टीने पाहतां शाहिरी काव्य हें मराठेशाहीचें स्वतंत्र स्फुरण आहे असेंच म्हणावें लागेल. त्या वेळीं व त्यापूर्वीं काव्याचे जे प्रवाह साहित्यांत सुरू होते त्यापेक्षा हें काव्य अगदींच भिन्न होतें. शिवाजी महाराजांच्या शिवशाहीशीं शाहिरी काव्य एकजीव झालें होतें. त्या काळांतील मराठ्यांच्या पराक्रमाचें व शृंगाराचें, सामाजिक चालीरीतींचें व राजकीय घडामोडीचें जिवंत चित्रण शाहिरी काव्यांत आपणाला आढळतें. मराठी मन त्यांत प्रतिबिंबित झालेलें आढळतें आणि हाच तर त्या वेळच्या व त्यापूर्वींच्या पारंपारिक मराठी काव्यापेक्षा ह्यांत दिसून येणारा विशेष आहे. सन्त-कवि व पंडित-कवि अशा दोन कवींच्या परंपरा

या काळांत होत्या. त्यांपैकीं संतकवींच्या काव्याचें स्वरूप भक्तिपर व निवृत्तिपर अशा प्रकारचें आहे. ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यन्त महाराष्ट्रांत निर्माण झालेल्या सन्तपरंपरेने आध्यात्मिक क्षेत्रांत फार मोठें कार्य केलें यांत शंकाच नाही. पण ऐहिक जीवन जगण्याचा आनंद त्यांत प्रतिबिंबित होत नव्हता. संसारापासून पराङ्मुख होण्याचा व परमेश्वराला अनन्य-भावानें शरण जाण्याचाच उपदेश प्रत्येकाने केला आहे. त्यामुळे भौतिक जीवनाचें प्रतिबिंब त्यांत पडत नाहीं. मोठमोठ्या राज्यक्रान्त्या झाल्या. राष्ट्राचें सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवन अगदी ढवळून निघालें तरी त्याचे पडसाद संतवाङ्मयांत पडत असतांना आपणाला आढळत नाहीत. आणि पडलेच तर ते किती अस्पष्ट! कळतील न कळतील इतपतच. रामदासांचें काव्य थोडेंफार याला अपवाद होतें, पण त्यांच्याहि काव्यांतून निवृत्तीचा सूरच अधिक प्रमाणांत येत असलेला आढळतो. संतांची शिकवण एकंदरींत निवृत्ति-मार्गाला उत्तेजन देणारीच होती. पंडित-कवींच्या काव्याकडे आपण वळलों तरी सामाजिक जीवनाविषयीं तीच उपेक्षा आपणाला आढळेल. मुक्तेश्वरापासून मोरोपंतापर्यंत निरनिराळ्या पंडित-कवींची कविता आपण तपासून पाहिली, तरी महाभारत, रामायण व भागवत यांतील कथानकांचें मराठींत रूपान्तर करण्यापलीकडे त्यांनी कांहीं केलें नाही. तीं रूपान्तरें उत्कृष्ट असतील पण त्यांत तत्कालीन जीवनाचा प्रत्यय नाही—सामाजिक स्थितीचें दर्शन नाही किंवा भोंवतालीं घडत असलेल्या पराक्रमांची साक्ष नाहीं. पेशव्यांचे पराक्रम भोंवतालीं प्रत्यहीं दिसत असतांना मोरोपंतांना वीर-रसासाठीं महाभारताकडे धाव घ्यावी लागावी यासारखी विसंगति कोणती? त्यांच्या कल्पना व त्यांची प्रतिभा संस्कृत काव्याच्या तालावर नाचत होती व त्यांच्या तत्त्वज्ञानावर संत-कवींच्या निवृत्तिवादाचीच छाप पडली होती.

शाहिरी काव्याची गोष्ट अगदीच निराळी आहे. तिचीं स्फूर्तिस्थानें

महाभारत-रामायणांत नाहींत तर तीं त्यांच्या भोंवतालच्या जीवनांत आहेत. त्यांत निवृत्ति नसून जीवन जगण्याची प्रबळ इच्छा आहे; प्रपंचाला त्यांनी निःसार ठरविलें नाहीं किंवा स्त्रियांना व मुलांना 'रांडापोरें' अशी संज्ञा देऊन आपल्या मार्गांतील धोंड ठरविलें नाहीं; उलट संसाराची उत्कट लालसा, अनुरागाचा रंगेलपणाचा व पराक्रमाची बेहोषी आपणांला त्यांत आढळेल. श्री. वर्दे म्हणतात त्याप्रमाणे मराठी राज्याची चढती उतरती कळा त्यांत प्रतिबिंबित झाली आहे. आणि त्यामुळेच शाहिरी कवितेच्या गुणदोषांत मराठ्यांच्या गुणदोषांचें प्रतिबिंब दिसून येतें असें जें ते म्हणतात त्याची साक्ष शाहिरी काव्य वाचतांना पदोपदीं पटल्या-वाचून राहात नाही. थोडक्यांत म्हणजे संतकाव्य महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचें प्रतिबिंब असलें तर शाहिरी काव्य महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनाचें प्रतिबिंब आहे. म्हणूनच ते मराठेशाहीच्या उदया-बरोबर उदयाला झालें व मराठेशाही विलयाला गेल्यावर तेंहि अन्तर्धान पावलें.

शाहिरी वाङ्मयाचे महत्त्वाचे भाग दोन. लावण्या व पोवाडे. पोवाडे हे तत्कालीन महाराष्ट्राच्या–मराठेशाहीच्या–राजकीय जीवनाची साक्ष देणारे आहेत, तर लावण्या ह्या त्या काळच्या सामाजिक व लौकिक जीवनांतून निघाल्या आहेत. दोन्हींतहि जिवंतपणाचा प्रत्यय येतो. शाहिरांनी जें जें कांही पाहिलें, जें जें अनुभवलें, ज्या भावनांत ते रंगले–ज्या पराक्रमाच्या बेहोषीचा त्यांनी प्रत्यय घेतला त्या त्या सर्वांचें दर्शन अतिशय उत्कटतेने त्यांनी घडविलें. पण त्याबरोबर हेंहि तितकेंच खरें कीं त्यांच्या प्रतिमेला कांही मर्यादा पडलेल्या होत्या. आणि त्यामुळे 'मराठेशाहीं'तील राजकीय व सामाजिक जीवनाचें यथार्थ दर्शन आपणाला शाहिरी काव्यांतून घडतें या विधानालाहि थोडी मुरड घालावयास हवी. तत्कालीन पंडित–कवींच्या किंवा संत-कवींच्या काव्यांत जें आढळत नाही किंवा फार अल्प प्रमाणांत आढळतें, तें राजकीय व सामाजिक जीवन त्यापेक्षा कितीतरी

पटीने अधिक शाहिरी वाङ्मयांत दिसतें, हें खरें असलें तरी तत्कालीन जीवनाची संपूर्ण कल्पना या शाहिरी काव्यांत येत नाहीं. जीवनाच्या कांही विशिष्ट अंगाचाच प्रत्यय त्यांत येतो. आणि तोहि कांहीशा भडक स्वरूपांत. अतिशयोक्ति, कल्पनाविलास, दन्तकथा इत्यादि अनेक गोष्टी-मुळे जीवनाचें यथार्थ दर्शन त्यांतून घडणें कांहीसें कठीणच जातें.

पोवाडयांच्या बाबतींत त्याचा प्रत्यय अधिक येतो. वास्तविक पोवाडे म्हणजे मराठ्यांचा काव्यमय इतिहास ! पण इतिहासाला लागणारें प्रामाण्य फार कमी प्रमाणांत पोवाडयांत आढळेल. इतिहासाचें साधन म्हणूनसुद्धा मर्यादित प्रमाणांतच पोवाडयांचा उपयोग होतो. त्यांतूनहि मराठेशाहीचा सर्व सुसंगत इतिहास त्यांत दिसतोच असें नाही. आतापर्यंत उपलब्ध असलेल्या जवळ जवळ ३०० पोवाडयांचें कालदृष्टया वर्गीकरण करून पाहिलें तर याची नीट कल्पना येईल. या पोवाडयांत शिवाजी महा-राजांपासून पहिल्या शाहू महाराजांपर्यंतच्या काळावर सात पोवाडे आहेत. पेशवे-कालावर दीडशें आहेत आणि बाकीचे अव्वल इंग्रजीच्या काळांतील आहेत. पेशवे-कालांतील पोवाडयांतहि सवाई माधवराव आणि दुसरे बाजीराव यांच्याच कालावर बहुसंख्य पोवाडे आहेत. शिव–कालांतील अफझलखान-वध व तानाजीचा पोवाडा हे पोवाडे सोडून दिले तर त्या काळावर पोवाडा तरी लिहिला गेला नसावा किंवा काळाच्या उदरांत ते लुप्त झाले असावेत. कांही असलें तरी मराठेशाहींतील अत्यंत पराक्रमाचे व रोमहर्षक अनेक प्रसंग पोवाडयांत येऊं शकले नाहीत आणि ज्या लढाईपासून मराठेशाहीला उतरती कळा लागली त्या खडर्याच्या लढाईवर मात्र जास्तींत जास्त पोवाडे झाले. संभाजी–राजाराम–पहिला बाजीराव यांच्या जीवनाकडे तर शाहिरांचें फारसें लक्षहि गेलेलें दिसत नाही. त्यामुळे मराठेशाहीचें राजकारण पोवाडयांतून प्रतिबिंबित होतें असें म्हणणें धाडसाचें ठरेल. शिवाय जे पोवाडे लिहिले गेले आहेत त्यांत तरी तत्कालीन राजकारणाचें संपूर्ण दर्शन होतें असें म्हणावें तर तेंहि

तितकेसें खरें नाहीं. त्यांनी पोवाडयांतून वीर-रसाचा आविष्कार केला असेल, मराठ्यांच्या मर्दुमकीला उठाव दिला असेल, पण श्री. वर्दे म्हणतात त्याप्रमाणे राजकारणी उलाढालींचा इतिहास त्यांत दिसत नाही. जें कांही राजकारण असतें तें अगदीं वरवरचें असतें. याचें कारण अगदीं उघड आहे. राजकारणाचा रुक्ष तपशील हा कवनाचा केव्हाहि विषय होऊं शकत नाही. भावनांना उद्दीपित करणारा जो भाग तोच नेमका उचलून, त्यांत ऐकीव माहितीची, कल्पना-विलासाची, आतिशयोक्तीची भर घालून तो पोवाडा सजविणें हें जें शाहिरांचें महत्त्वाचें कार्य तें त्यांनी बरेचसें प्रामाणिकपणें केलें आहे. अर्थात् ज्या वेळीं राष्ट्रांतील पराक्रमच संपला त्या वेळीं त्यांच्या वाणींतील ओजहि सरला आणि किरकोळ सरदारांचीं पोटासाठीं स्तुतिस्तोत्रें गाण्याचें त्यांच्या नशिबीं आलें. पोवाडयांतून त्यामुळे संपूर्ण ऐतिहासिक सत्य असतेंच असें म्हणणें कठीण आहे. त्यांतील ऐतिहासिक सत्य पारखूनच घ्यावयास हवें. आतिशयोक्ति, पाल्हाळ, दंतकथा आणि विभूतिपूजा यांतून नेमकें सत्य निवडणें अवघड आहे. आणि शाहीरहि कसोशीने सर्व घटना सत्याच्या निकषावर पारखून घेत असेल थोडाच? शिवाय ज्याच्यावर पोवाडा रचावयाचा त्याच्याविषयी वाटणाऱ्या आत्यंतिक आदराने, क्वचित् आंधळ्या स्वामिनिष्ठेने सत्याचा विपर्यास होण्याचाच संभव जास्त. त्यामुळे इतिहासाचीं साधनें म्हणून कांही एका विशिष्ट मर्यादेपलीकडे पोवाडयाचें महत्त्व नाही. आणि आज उपलब्ध असलेल्या पोवाडयांचा विचार केला तर त्याला 'मराठ्यांचा काव्यमय इतिहास' असें तरी कितपत म्हणतां येईल कोण जाणें!

जी गोष्ट राजकीय जीवनाविषयी तीच गोष्ट सामाजिक जीवनाविषयी. राजकीय जीवनाप्रमाणेच शाहिरी कवनांतून आविष्कृत झालेल्या सामाजिक जीवनांतहि अपुरेपणा जाणवतो-एकांगीपणा जाणवतो. शाहिरांच्या लावण्या वाचूं लागलों म्हणजे पेशवेकाळाच्या अखेर अखेर आढळणाऱ्या रंगेलपणाचें, सुखविलासी वृत्तीचें, बेफिकीरपणाचें दर्शन आपणाला

अधिक होतें. लावण्यांमधून तर विलासी वृत्तीवरच अधिक भर दिला आहे. त्यामुळे त्यांत व्यक्त झालेल्या जीवनांत एकेरीपणा आला आहे. त्या काळांतील वैभव तुम्हांला यांत दिसेल, सामाजिक चालीरीति दिसतील, पोषाखांच्या तऱ्हा दिसतील, अलंकारांचे नमुने आढळतील, शकुनापशकुनांच्या कल्पना आढळतील, पण हें सर्व शृंगार-रसाच्या पार्श्वभूमीवर! शृंगार हाच लावण्यांतून रसराज म्हणून वावरत असल्यामुळे सजण व साजणी यांचीं मनाला धुंद करणारीं चित्रें यांत आढळावींत यांत नवल नाहीं. पण हें संपूर्ण जीवन नव्हे. क्वचित् दुष्काळावरील लावण्यांतून किंवा 'देशस्थिति'पर लावण्यांतून जीवनाच्या विराट स्वरूपाचा प्रत्यय येतो. पण फार थोडया लावण्यांतून अशा जीवनाचें दर्शन होतें. बहुसंख्य लावण्यांतून सजण व साजणी यांचा उत्तान शृंगार वर्णन केला असल्याने त्यांतून व्यक्त होणाऱ्या जीवनाला स्वाभाविकच मर्यादा पडलेल्या आहेत. किंबहुना सवाई माधवराव व विशेषतः दुसरा बाजीराव यांच्या कारकीर्दींत जें विलासी व सुखवस्तु जीवन भोंवतालीं दिसत होतें त्याचेंच सम्यक् प्रतिबिंब त्यांच्या लावण्यांत आढळलें तर नवल नाहीं. त्यामुळे सर्वसाधारण जनतेपेक्षा शाहिराचें लक्ष वेधतें त्या काळांतील शूर पण विलासी व रंगेल अशा सरदारांनीं आणि त्यांच्याच प्रणयाचीं चित्रें लावण्यांतून अधिक प्रमाणांत दिसूं लागलीं. प्रभाकराने व होनाजी बाळाने तर अनेक लावण्या दुसऱ्या बाजीरावाच्या विलासी जीवनावर रचल्या आहेत. या शाहिरांचे सजण व साजणी यांच्यापुढे प्रणयपूर्तीखेरीज दुसरे प्रश्न नाहींत. स्वारी मोहिमेवर गेली आहे—विरहाग्नि उभयतांना भाजून काढतो आहे, अशा स्थितींत परस्परांचें मीलन केव्हा होईल हीच त्यांच्या जीवनांतील प्रमुख समस्या. दारिद्र्य हें त्यांच्या वांट्याला फारसें आलें नाहीं. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींतील अस्थिर जीवनाचाहि फारसा परिणाम त्यांच्यावर झालेला दिसत नाहीं. त्या काळच्या विलासी व सुखलोलुप वृत्तीचा मात्र अधिक परिणाम त्यांच्या

लावण्यांवर झालेला दिसतो. त्यामुळे पोवाड्यांतील वीररस मागे पडला आणि ' रुंद छातिवर बुंद गेंद जणुं गुलाब बहरामधिं फुलती ॥ ' अशीं विलासी वर्णनें कवनांतून ऐकूं येऊं लागलीं. पेशवाईच्या उत्तरकाळांतील जीवनाचें कांहीं अंशीं प्रातिनिधिक असलेलें चित्र या लावण्यांतून आपणाला दिसतें हें खरें. पण ही जीवनाची एक बाजू झाली. अतिरिक्त शृंगार व विलास यांखेरीज त्या काळच्या सामाजिक जीवनांत ज्या विविध समस्या होत्या त्यांकडे शाहिरांचें लक्ष गेलेलें नाही. एका मर्यादित वर्तुळांत त्यांची प्रतिभा फिरत राहिली. "शृंगार हें वीररसाचेंच एक अंग आहे, आणि ज्या राष्ट्राच्या अंगांत सामर्थ्य व वीररस दोन्ही खेळत असतील त्यांनाच हीं दोन्ही तऱ्हेचीं कवनें सुचतील", हें महाराष्ट्र सारस्वतकारांचें म्हणणें मान्य करूनहि असें म्हणावेसें वाटतें कीं या काळांत वीररस मागे पडला व केवळ शृंगाराचीच अधिक कास धरली गेली. ' यथा राजा तथा प्रजा ' या न्यायानेच केवळ त्याचें समर्थन होण्यासारखें आहे.

पण हा एकांगीपणा सोडला तर या ' लौकिक ' जीवनावर लिहिलेल्या लावण्यांतून अस्सल मराठी मन प्रतिबिंबित होतें यांत मात्र शंका नाही. मराठमोळा तरुणतरुणींचा हा शृंगार आहे आणि त्यांत आविष्कृत होणारें जीवन हें त्या काळांतील वरच्या वर्गातील शिपाईगड्याचें प्रातिनिधिक जीवन आहे. त्यांचा शिपाई गडी " नाजुक बांधा सडक आकृति ठेंगणी गोजिरी । कंगणीदार पगडी शिरीं ॥ कंठीदार अंगरखा, दुपेटा भरनक्षी भरजरी । मस्तकीं गंध केशरी । सुवर्ण तोडे सुबक हिऱ्याच्या मुद्या चमकती करीं । खुब डौल दिसे अंबरीं ॥ गळ्यांत कंठी कानीं भिगबाळी शोभती ॥ " अशा ऐटींत आपणासमोर येतो आणि " बांधीव बुचड्याची लबक, पदर अति सुबक खोविला तिपदरी वेणीचा । चंदन डहाळीस जसा लपेटा काळे नागिणीचा । मुलतानी भुवया कशा कमाना जशा, बहार मधीं कुंकवाचे टिकलीचा । नरम ओठ पोवळे, तुझा नासाग्रीं झोंक नथणीचा ॥ " अशा थाटांत नायिका प्रवेश करते.

हें सारें वर्णन तत्कालीन मराठा वीराचें किंवा मराठमोळा तरुणीचें चित्र आपणापुढे आणण्यास मदत करतें. त्यांचा पोषाख, त्यांनी घातलेले अलंकार, त्यांची प्रसाधनसाधना हीच केवळ अस्सल मराठी आहे असें नाही, तर त्यांचें अंतरंगहि पूर्णपणें मराठी आहे. शकुन-अपशकुन, नवस-सायास इत्यादींवर त्यांचा विश्वास आहे, त्यांची चालचलणूकहि मराठमोळा वृत्तीशीं साजेशी आहे. बेफाम उच्छृंखल वृत्ति क्वचित् आढळते—नाही असें नाही. पण 'अन्य पुरुष चंद्रवरद चतुर्थीप्रमाणेच' मानण्याची त्यांची एकंदर प्रवृत्ति दिसते. शाहिरांच्या लावण्यांतील नायिकांची शालीनता व सात्त्विक वृत्ति खरोखर विलोभनीय वाटते. पुरुष त्या मानाने अधिक उच्छृंखल आहेत—नैतिक बंधनें त्यांच्या बाबतींत अधिक शिथिल झालेलीं दिसतात. रावबाजीच्या कारकीर्दींतील विलासी वृत्तीचा समाजावर पडलेला हा प्रभाव असावा.

सामाजिक व राजकीय स्वरूपाच्या कवनांबरोबरच आणखीहि एक विभाग आपणाला शाहिरी कवनांत आढळतो. तो म्हणजे त्यांच्या पौराणिक आणि उपदेशपर लावण्यांचा. देवतांचीं व तीर्थांचीं वर्णनें अनेक शाहिरांनी केलीं आहेत. पंढरपूरचा 'विठोबा,' तुळजापूरची 'भवानी,' बार्शीचा 'भगवंत' इत्यादि अनेक तीर्थक्षेत्रांवर त्यांनी लावण्या केल्या आहेत. पण त्यांत वैशिष्टय असें आढळत नाही. तीच गोष्ट पौराणिक कथा घेऊन त्यावर केलेल्या कवनांची. अहिल्येचें आख्यान, उषास्वप्न, सुलोचनेचें आख्यान किंवा गणपति, विष्णु, शंकर इत्यादि देवतांच्या स्तुतिपर केलेलीं कवनें यांतहि शाहिरांची प्रतिभा विशेष रंगलेली आढळत नाही. हीं आख्यानें त्यांनी सरळ साध्या भाषेंत सांगितलेलीं आहेत—त्यांत उत्कट रसाविष्कार कुठेहि नाही. प्रभाकराच्या 'लक्ष्मी-पार्वती संवादांत किंवा 'भाळलोचना नागभूषणा' या होनाजी बाळच्या कवनांत कल्पना-विलास थोडाफार आढळतो, नाही असें नाही. पण त्यापुढे त्यांची

प्रतिभा जात नाही. पण ती अधिक रंगते ती कृष्णाच्या चारित्रांत. कृष्ण-लीलांचें वर्णन करतांना, राधा-कृष्णाच्या प्रेमाचें वर्णन करतांना किंवा अक्रूराने कृष्णाला मथुरेंत नेल्यानंतर गोपींची झालेली अवस्था वर्णन करतांना त्यांची प्रतिमा विशेष रंगते. होनाजी बाळची 'घनःश्याम सुंदरा' ही, परशरामाची 'ऊठ झाला प्रातःकाळ' ही किंवा प्रभाकराची 'ऊठ ऊठ झडकरी' ह्या भूपाळ्या कृष्णचरित्रांतूनच निर्माण झाल्या आहेत. त्यांतील कोमलता, वत्सलभाव व शब्दचित्रें निर्माण करण्याचें सामर्थ्य पाहिलें म्हणजे कृष्णाचें चरित्र संतकवि व पंडितकवीप्रमाणेच शाहिरांनासुद्धा स्फूर्तिदायी कसें झालें आहे याची कल्पना येते. राम-जोशींनी तर कृष्णचरित्राचा शृंगाररसाच्या आविष्कारासाठीं फारच चांगला उपयोग करून घेतला आहे. 'कृष्णलीला' वर्णन करतांना ते अगदी रंगून गेलेले दिसतात. कृष्णाच्या खोड्या, गोपींनी यशोदेकडे आणलेल्या कृष्णाविषयींच्या तक्रारी, राधा-कृष्णाचा शृंगार, रासक्रीडा, कृष्णवियोगामुळे गोपींची झालेली स्थिति इत्यादि अनेक प्रसंगांतून त्यांनी कृष्ण-चरित्र वर्णन केलें आहे. आणि त्यांतील विशेष असा कीं हें सगळें वर्णन करीत असतांना त्यांनी कृष्ण आणि गोपी यांच्यावर महाराष्ट्रीय साज चढविला आहे. त्यांचा कृष्ण व त्यांच्या गोपी पूर्णपणें मराठा वळणाच्या वाटतात. त्यांचा पेहेराव, त्यांची भाषा, इतकेंच काय पण त्यांच्या तोंडच्या शिव्या देखील अस्सल मराठी वळणाच्या आहेत. कृष्ण-चरित्रांतील प्रसंग अनेक संत-कवींनी व पंडित-कवींनी रंगविले. पण त्यांचा कृष्ण हा अवतारी होता—त्याच्या पाठीमागे अध्यात्म होतें. या शाहिरांचा कृष्ण म्हणजे अगदी पूर्ण मराठमोळा वळणाचा असल्याने व तुमच्या आमच्याप्रमाणेच लौकिक भावना असलेला दाखविल्याने तो आपणाला अधिक जवळचा वाटतो.

पौराणिक कथांबरोबर शाहिरी वाङ्मयांत अनेक वेळां अध्यात्महि डोकावतांना आढळतें. शाहिरी फडांतील कलगी-तुरा हा काव्यप्रकार तर

पुष्कळ अंशाने अध्यात्मिकच आहे. कारण यांतील सवाल–जबाब अत्यंत खोल अशा तत्त्वज्ञानावर आधारलेले असतात. पण त्याशिवाय ' मानवी जीवनाची कहाणी ', ' काळी–गोरीचें भांडण ' यासारख्या अध्यात्मिक स्वरूपाच्या लावण्याहि मधून मधून आढळतात. रामजोशांच्या उपदेशपर लावण्या आणि अनंतफंदीचे फटके यांमध्ये तर उघड उघड उपदेश आहे. पण त्याशिवाय देवाच्या स्तुतिपर ज्या लावण्या लिहिल्या आहेत त्याही-मध्ये अध्यात्म व भक्ति कांहीं प्रमाणांत आढळते. पण अध्यात्म किंवा भक्ति हे कांही शाहिरी प्रतिभेचे विशेष नव्हेत हें लक्षांत ठेवावयास हवें. त्या काळांतील संत-कवि किंवा पंडित-कवि यांच्या काव्याचें शाहिरी काव्यांत पडलेलें पुसट प्रतिबिंब आहे. निवृत्ति हा शाहिरी काव्याचा विषय कधीच नव्हता. त्यामुळे हें प्रतिबिंब सुद्धा अगदी पुसट व अस्पष्ट आहे हें विसरून चालावयाचें नाही.

शाहिरी काव्याचा आशय ज्याप्रमाणे पारंपारिक संत किंवा पंडित–कवींच्या काव्याच्या आशयापेक्षा निराळा आहे, त्याप्रमाणे त्या काव्याचा आविष्कारहि अगदी स्वतंत्र आहे. विशेषतः रसाविष्कार, अलंकार-सृष्टि व शैली या तीनहि बाबतींत शाहिरी काव्याने अगदी निराळें असें वैशिष्टय प्रगट केलें आहे. रसाविष्कार, कल्पनाविलास इत्यादि बाबतींत पंडित-कवींच्या काव्यावर संस्कृत महाकाव्यांचा परिणाम झालेला स्पष्ट दिसतो. पण शाहिरी काव्याचें स्फुरण अगदी स्वतंत्र आहे. त्यांनी आपल्या डोळ्यांसमोर उभा केलेला वीररस किंवा शृंगाररस अगदी पूर्णपणें त्यांच्या जीवनांतून निर्माण झाला आहे. या रसाविष्काराला अनुभूतीची जोड आहे. म्हणून जिवंतपणा त्यांत अधिक जाणवतो. शाहिरांची अलंकारसृष्टि स्वतंत्र त्यांची अशीच आहे. त्यांच्या जीवनांतूनच ती निर्माण झाली आहे. मराठेशाहीच्या वैभवकाळाचे गहिरे रंग तिच्यावर चढले आहेत. आणि या सर्वांच्या जोडीला त्यांची अशी स्वतंत्र भाषाशैली, डफ आणि तुणतुणें यांच्या साथीवर म्हटली जाणारी शाहिरांची कडकडीत जडण घडण

पाहिली–आणि विशेषतः ऐकली–म्हणजे शाहिरी काव्यांतील सौंदर्य त्यांतील आशयाइतकें त्या आशयाच्या आविष्कारांत कसें आहे याची आपणाला कल्पना येते.

वीर, व शृंगार हे दोन रस शाहिरी वाङ्मयाचे स्थायीरस आहेत असें समजलें जातें. वीररसाचा आविष्कार पोवाडयांतून झाला आहे तर शृंगार-रस शाहिरांनी लावणी वाङ्मयांतून खेळविला आहे. पण या दोन रसांच्या जोडीला शाहिरांनी अनेक रसांचें साहाय्य घेतलें आहे, हें आपणाला विसरून चालावयाचें नाहीं. वीराच्या जोडीला अनेकदां अद्भुत–रस आला आहे तर कांही वेळां करुण-रसहि आला आहे. शृंगाररसांत तर खरोखर त्यांनी इतक्या सूक्ष्म छटा आणल्या आहेत कीं त्यांतील विविधता पाहून मन थक्क होतें. शिवाय शृंगाराच्या जोडीला कधी करुण, कधी वत्सल, कधी हास्य अशा रसांचें साहाय्यहि अनेक वेळां शाहीर घेतांना आढळतात. त्यामुळेच वीर व शृंगार या दोन्ही रसांचा शाहिरी वाङ्मयांतील आविष्कार मोठा विलोभनीय झाला आहे.

वीररस हा मुख्यतः पोवाड्यांतून आविष्कृत होतो. अर्थात् सर्वच पोवाडयांतून त्याचें उत्कट स्वरूप दिसतें असें नाहीं. पेशवाई बुडाल्यानंतर आंग्लशाहींत जे पोवाडे शाहिरांनी लिहिले ते निःसत्त्व होते–पराक्रमाचें अधिष्ठानच जेथे नाहीसें झालें होतें तेथें पोवाड्यांतून तरी अस्सल वीर-रसाची प्रचीति कोठून येणार ? पण पेशवे कालखंडामध्ये खडर्याच्या लढाईवर जे पोवाडे लिहिले गेले किंवा पानपतच्या युद्धावर जे पोवाडे रचले गेले त्यांमध्ये वीर-रसाचा खरा प्रत्यय आपणाला येतो. पोवाडयांच्या निर्मितीची पार्श्वभूमीच लक्षांत घेतली तर त्यांत इतका जिवंतपणा कां वाटतो हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. आपल्या डोळ्यांसमोर घडलेल्या पराक्रमाचें वर्णन डफ–तुणतुण्याच्या साहाय्याने शाहीर मोठ्या आवेशाने करीत असतांना ऐकणाऱ्या श्रोत्यांना खरोखरच विलक्षण स्फुरण येत असलें पाहिजे. पोवाडे हें एकट्यानें वाचण्यासाठी नाहीत–शाहिरांच्या

फडांत समुदायाबरोबर ऐकण्यासाठी ते आहेत. त्यांची खरी रंगत तेथे कळते. उदाहरण म्हणून खालील दोन वर्णनें वाचण्यासारखीं आहेत. एक सगनच्या 'पानपतच्या पोवाड्यां'तून घेतलें आहे, आणि दुसरें प्रभाकराच्या 'खर्ड्याच्या लढाई'तून घेतलें आहे.

पानपतच्या युद्धाच्या ऐन धुमश्चक्रीचें वर्णन सगनने खालील उताऱ्यांत केलें आहे.

" गिलच्यांनीं रणखांब पुजिला । भाऊशीं वर्तमान कळला । काय पाहतां गलीम सांपडला । एकदांच हरहर केला । रोखिले आघाडी जेजाला । कडाबीन सूत्रनाला । ऐंशी हजार होळकर भाला । शिंद्यांनीं मार खूप दिला । बाण सुटती तीर कमानीला । अरब हपशी तो रोहिला । गोसांवी धुंदकत चालला । करवलानें घोडा चमकाविला । भाऊसाहेब अंबारींत दुल्ला । दादु महाताने हत्ती पुढें नेला । तीरकमान हत्ती धरला । पांडवदळीं भीमसेन आला । कीं पार्थवीर खवळिला । दिली सरबत्ती तोफेला । नऊ हजार गोळा उडाला ॥

किंवा ' खर्ड्याची लढाई ' या प्रभाकराच्या पोवाड्यांतील खालील उतारा पाहा.

" काय पलटणाच्या फैरा झडती । पर्जन्यापरि गोळ्या पडती । शिर-कमळें कंदुकवत् उडती । छिन्नभिन्न किति होउनि रडती । कितीक पाण्याविण तडफडती । कितीक प्रेतामधीच दडती । वीर विराशीं निसंग भिडती । सतीसारखे विडे उचलती । पाउल पाउल पुढें सरकती । घाव चुकवुन शूर धडकती । सपुत वाघापरी गुरकती । हत्यार लावुन मागें मुरकती । खुणेनें शत्रुवर्म तडकती । मोंगलबच्चे मागें सरकती । जिवबादादा मनीं चरकती ॥

हीं वर्णनें वाचतांना सुद्धा त्यांतील शब्द-सामर्थ्याची प्रचीति येते. प्रत्यक्ष डफ-तुणतुण्यावर शाहिरांच्या आवेशपूर्ण वाणीने ऐकतांना हीं किती परिणामकारक होत असतील याची सहज कल्पना येते.

अनेक ठिकाणीं नाद निर्माण करून परिणाम साधण्याची कलाहि शाहिरांना साधली आहे. प्रभाकराच्या 'खर्ड्याच्या लढाई' वरील पोवाड्यांतच आलेलें खालील वर्णन पाहा—

सुटती तोफा धुंद दणाणण
गुंगत गोळे येति छणाणण
सों सों करिती बाण सणासण
खालेल घोडे उडति टणाटण
टापा हाणिती दुरुन ठणाठण
वाजति पट्टे खांडे खणाखण
नौबती झांजा झडती झणाणण
एकाचि गर्दी झाली धुराची.

या वर्णनांत त्या वेळीं लढाईच्या गर्दींत उठणारे अनेक आवाज जणूं शब्दांत पकडून ठेवण्याचा प्रयत्न चालला आहे असें वाटल्यावांचून राहात नाही.

युद्धाच्या वेळचे निरनिराळे प्रसंग वर्णन करतांना ते प्रसंग डोळ्यांसमोर उभें करण्याचें कसब शाहिरांच्या वाणीला साधलें आहे. त्यासाठी त्यांना अनेक ठिकाणीं भडक रंग वापरावे लागले. कित्येक ठिकाणीं कल्पनाशक्तीवर अधिक भर द्यावा लागला. कांही ठिकाणीं कपोलकल्पित किंवा तत्कालीन लोकवार्तांवर आधारलेल्या तपशीलांचा त्यांना आश्रय करावा लागला. ऐतिहासिक सत्याचा कांटेकोरपणा त्यांत कदाचित् नसेल–पण सर्वसामान्य श्रोत्यांच्या अंन्तःकरणाची पकड घेण्याचें सामर्थ्य त्यांत आहे हें खास. शाहीर बाळा लक्ष्मण याने रचलेल्या खडर्याच्या लढाईवरील पोवाड्यांतील खालील वर्णन पाहाः—

'मंगळवारीं नबाबांनीं पुढें धाडिले सैनेस ।
कळलें श्रीमंताला बोलून नेले आपुल्या सरदारांस !

"कशी करावी मसलत नबाब जाईन म्हणतो पुण्यास!"
परशुरामभाऊ म्हणे किं "मारूं मरूं जाई या समयास!"
नाना फडणिस सखारामबापू पुसती जिववादादास।
जिवबा बोले गर्जुन मोंगल काय आणिला जिन्नस।
उडविन बाविस टोप्या झेंडे नेउन लाविन आकाशास॥
केली वस्त्रें पांचजणाशीं दिली आज्ञा झुंजावयास."

वरील तपशील त्यावेळच्या लोकवार्तेवर तरी अवलंबून असावा किंवा शाहिराच्या कपोलकल्पित असावा. पण इष्ट परिणाम साधण्याचें कार्य त्या तपशीलाने साधलें आहे हें नाकारून चालावयाचें नाही.

युद्धाचें वर्णन करतांना सैन्याच्या रचनेचें सूक्ष्म वर्णनहि शाहीर करतांना आढळतात. आणि तें करतांना अनेक सरदारांची सूक्ष्म नांव-निशीवार यादीहि पण त्यांत आढळते. हा जो सरदारांच्या नांवाचा तपशील तो आज कदाचित् आपणाला पाल्हाळिक वाटत असेल. त्याला ऐतिहासिक दृष्टया थोडेसें महत्त्व आहे—पण त्याहीपेक्षां तत्कालीन भावनांच्या दृष्टीने अधिक महत्त्व आहे. त्या त्या लढाया त्या शाहिरांच्या काळांतच लढल्या गेल्या होत्या व त्यांत पराक्रम केलेल्या अनेक सरदारांची स्मृति लोकांत ताजी होती. त्यामुळे पोवाडा म्हणतांना त्या त्या सरदारांच्या नांवाचा उल्लेख आला कीं त्यांनी केलेला पराक्रम आठवून लोकांना विलक्षण स्फुरण येत असलें पाहिजे. त्यामुळे जो नांवाचा तपशील आज आपणाला अनावश्यक व रस—विघातक वाटतो तो त्या वेळीं उलट भावना उद्दीपित करणारा आणि म्हणून वीर—रसाला पोषक असाच असावा. शाहिरांनी पोवाडे रचले ते तत्कालीन जनतेकरिता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. शिवाय अनेकदां दरबारांतहि हे पोवाडे म्हणण्याचा प्रसंग येत असेल. त्या वेळीं सर्व सरदार हजर असतांना जो पोवाडा म्हटला जाईल त्यांत सर्व सरदारांचा उल्लेख असावयासच हवा. अनुल्लेखाने आजसुद्धा मोठ्या मोठ्या व्यक्तींना किती राग येतो हें आपणाला माहीत का नाही?

मोहिमांचीं व पराक्रमांचीं वर्णनें हा शाहिरी पोवाडयाचा एक महत्त्वाचा भाग असला तरी इतरहि अनेक घटना पोवाडयाचे विषय झाले आहेत, व त्या त्या विषयाप्रमाणे रसाविष्कारांतहि बदल झाला आहे. शाहीर लहरी मुकुंदा यांचा 'नारायणरावाच्या वधाचा पोवाडा' किंवा प्रभाकरचा 'सवाई माधवरावाच्या मृत्यूचा पोवाडा' अशासारख्या पोवाड्यांतून करुण-रसाची झाक दिसते. 'सवाई माधवरावांच्या मृत्यूचा पोवाडा' हा पोवाडा तर रसाविष्काराच्या दृष्टीने उत्कृष्टच आहे. सवाई माधवरावाच्या मृत्यूने राजधानीवर कशी अवकळा पसरली, बाईसाहेबांनी किती आकान्त केला, पशुपक्ष्यांमध्येसुद्धा किती हाहाःकार उडाला वगैरेचें वर्णन प्रभाकरांनी अत्यंत उत्कट केलें आहे. सवाई माधवरावाच्या विषण्ण मनःस्थितीचें वर्णनसुद्धा परिणामकारक आहे. 'नारायणरावाचा वध' या लहरी मुकुंदाच्या पोवाड्यांत आनंदीबाईच्या कारस्थानाचा तपशील फार चांगल्या रीतीने वर्णन केला आहे. याशिवाय दुसऱ्या बाजीरावावर जे पोवाडे रचले गेले त्यांतहि करुणरसाचा आविष्कार आढळतो. दुसरा बाजीराव कितीहि नालायक असला तरी त्या काळच्या सर्व शाहिरांचा तो आश्रयदाता होता. आणि त्यामुळे पेशवाईच्या अखेरच्या काळांत त्याची झालेली दैना पाहून, व पेशवाई नष्ट झाल्यानंतर त्यांची झालेली अवस्था पाहून शाहिरांच्या अन्तःकरणाला ज्या व्यथा झाल्या त्याचें चित्र दुसऱ्या बाजीरावावरील अनेक पोवाड्यांतून दिसतें. त्यांतहि प्रभाकराचा पोवाडा विशेष उल्लेखनीय आहे. खडकीची लढाई होऊन बाजीरावाच्या कपाळीं जो वनवास लागला—रानावनांतून त्यांना भटकण्याची जी पाळी आली—आणि शेवटीं पेशवाईला मुकण्याची जी आपत्ति आली त्या सर्व प्रसंगांचें वर्णन करतांना प्रभाकर—होनाजी—मोतीराव व सगनभाऊ या चारहि शाहिरांचीं अन्तःकरणें हालून गेलीं—'लक्षाचें अन्न गेलें' असें त्यांना वाटलें. त्यामुळेच 'दिन असतां अंधार आकाशतळीं पडला बाई ॥ असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले. पुणें शहर तर बाजीरावावांचून शून्य दिसूं लागलें. 'दक्षिणचें मंगळसूत्र'च जणू कुठें दडलें' असें त्यांना वाटलें.

"विपरीत आला काळ मेरुला गिळलें मुंग्यांनीं
पंडितास जिंकिलें सभामध्यें मदांध मंग्यांनीं
भीमास आणिलें हारीस रणांगणीं अशक्त लुंग्यांनीं"

अशी स्थिति झाल्याने 'कोणास जावें शरण ?' असा प्रश्न त्यांच्यापुढे पडला. बाजीरावाविषयींचे हे पोवाडे वाचतांना अन्तःकरणांतील सर्व वेदना शाहीर शब्दरूपाने साकार करीत आहेत असें वाटतें.

याशिवाय देशस्थितीबद्दलचें जे पोवाडे आहेत ते सर्व उद्वेगांतून निर्माण झालेले आहेत. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत झालेलीं अंदाधुंदी—त्या सुमारास पडलेला दुष्काळ आणि पेंढाऱ्यांच्या लुटालुटीमुळे व पेशवाईंतील अन्तर्गत यादवीमुळे लोकांची झालेली दैना यांचें वर्णन अनेक पोवाड्यांतून व लावण्यांतून आढळतें. रामजोशांची 'उगा भ्रमसी वाउगा कशाला युगांत खळ हा कली ।' ही लावणी, अनंतफंदीची बाजीरावाच्या कारकीर्दीची लावणी किंवा 'परशरामाच्या देशस्थितिपर लावण्या व पोवाडे' यांतून त्या काळांत चाललेल्या अंदाधुंदीचें यथार्थ चित्रण केलेलें आढळतें. पेशवाई बुडून इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर लोकांची काय अवस्था झाली याचें वर्णन परशरामाने 'देशस्थितीच्या पोवाड्यां'त फार परिणामकारक रीतीने केलें आहे. त्या काळच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रांत माजलेल्या अराजकाची या पोवाडयांवरूनच चांगली कल्पना येते. एकप्रकारचा विषण्ण सूर या पोवाडयांतून वाहात असल्याची साक्ष पोवाडे वाचतांना आपणांला पटते.

व्यक्तींवर लिहिल्या गेलेल्या पोवाडयांत 'पहिले बाजीरावाचा पोवाडा,' 'छत्रपति शाहू महाराजांचा पोवाडा,' 'नानासाहेबांच्या मृत्यूचा पोवाडा,' 'महादजी शिंद्यांचा पोवाडा,' नाना फडणविसांचा पोवाडा' अशासारख्या पोवाडयांचा उल्लेख करावा लागेल. रसाविष्काराच्या दृष्टीने या पोवाडयांना तत्कालीन महत्त्व असलें तरी आज विभूति-पूजेखेरीज निराळें

वैशिष्ट्य त्यांतून आढळत नाही. आणि पेशवाई बुडाल्यावर तर लुंग्यासुंग्या व्यक्तींवर पोवाडे रचण्याची आपत्ति शाहिरांवर आली. पोवाडयांतील वीररस गेला आणि लाचारी राहिली. म्हणूनच पोवाड्यांचा मराठेशाहीबरोबरच अंत झाला हें विधान यथार्थ आहेसें वाटूं लागतें.

पोवाडयासंबंधीं विचार करतांना आणखी एक गोष्ट आपणाला खटकते. ज्या काळांत मोठमोठ्या लढाया झाल्या, पराक्रमांचे उच्चांक गांठले गेले, अटकेपार झेंडे लावले गेले त्या काळावर व त्या पराक्रमांवर लिहिल्या गेलेल्या पोवाडयांची संख्या अत्यंत मर्यादित असावी याचें आपणाला नवल वाटतें. याची कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न श्री. य. न. केळकर व श्री. श्री. म. वर्दे यांनी आपापल्या परीने केला. 'आपणासमोर प्रत्यहीं नवे पराक्रम घडत असलेले दिसत असतांना शाहिरांना गतेतिहासाकडे जाण्याचें काय कारण ?'—असें. य. न. केळकर म्हणतात, तर ' पेशवाईच्या वैभवापुढे शिवशाहीची आठवण बुजावी हाच मराठ्यांच्या स्वभावांतील मोठा दोष, ' असें श्री. म. वर्दे यांना वाटतें. कोणतेंहि समर्थन बरोबर असलें तरी त्याचा परिणाम एकच झाला. जुन्या शिवकालावरील प्रसंगाच्या किंवा पेशवाईच्या पूर्वकालांतील पराक्रमावरच्या पोवाडयांना आपण मुकलों. मग ते काळाच्या ओघांत नष्ट झालेले असावेत किंवा त्या काळांत फारसे पोवाडे रचले गेले नसावेत. अत्यंत धांदलीच्या व गडबडीच्या त्या काळांत कदाचित् शाहिरांचीं कवनें ऐकण्याइतकें स्वास्थ्य तरी लोकांच्या जीवनांत कुठे होतें ? तें ज्या वेळीं आलें त्या वेळीं शाहिरांची वाणी रंगली.

आणि ती खऱ्या अर्थाने रंगली कारण वीर-रसाच्या जोडीला या काळांत शृंगार-रस येऊं लागला आणि हळू हळू वीर-रसाला मागे टाकून शृंगारानेच महत्त्वाचें स्थान मिळविलें. त्या काळांतील सुखासीन व विलासी वृत्तींतून लावणीची लकेर बाहेर पडूं लागली, आणि त्यांतील शृंगाराने सर्व काव्य व्यापून टाकलें. अनेक ठिकाणीं त्याचा अतिरेक झाला व सदाभि-

रुचीच्या मर्यादाहि ओलांडल्या गेल्या. त्यामुळेच लावणी-वाङ्मयासंबंधीं शिष्ट जनांत एक प्रकारचा गैरसमज निर्माण झाला.

लावणी वाङ्मयांतील शृंगार-रसाचें स्वरूप पंडित-कवींच्या काव्यांत येणाऱ्या शृंगार-रसापेक्षा भिन्न आहे. पंडित-कवींच्या काव्यांतील शृंगार-रस हा संस्कृत साहित्यांतून मराठींत आला आहे. त्यामुळे त्याचें स्वरूप सांकेतिक झालें आहे. स्त्रीसौंदर्याचीं कल्पनाप्रचुर वर्णनें व विरहाचीं वर्णनें, व विरहवर्णनांताहि उपचाराच्या तपशीलावर भर, असें परंपरागत स्वरूप शृंगार-रसाला प्राप्त झालें होतें. मानवी मनाचीं सूक्ष्म कोडीं उलगडण्याचा त्यांत प्रयत्न नव्हता किंवा भावनेची उत्कटता दाखविण्याचा प्रयत्नहि फारसा आढळत नव्हता. शिवाय ज्यांचा शृंगार वर्णन करावयाचा त्या व्यक्ती फार वरच्या पातळींतील होत्या. शाहिरी काव्याने लौकिक जीवनांतील सामान्य व्यक्तींचा शृंगार वर्णन करून काव्यविषय आपल्या अगदी जवळ आणला आणि शृंगार-रसाच्या वर्णनांत पूर्वींचे सर्व संकेत झुगारून देऊन स्वतंत्र व निराळी अशी आविष्काराची पद्धति अवलंबली. स्त्रीपुरुषांच्या प्रेमभावनांचे अनेक सूक्ष्म बारकावे त्यांनी काव्यांत रंगवावयास सुरुवात केली. प्रेमभावनांची अभिव्यक्ति सरळ व उत्कट शब्दांत होऊं लागली. विरहाच्या वर्णनांत भावनेच्या उत्कटतेवर अधिक भर देण्यांत येऊं लागला. मीलनाची अधीरता, पति दूर देशीं गेला म्हणून वाटणारी हुरहूर, प्रेमळ रुसवा, पति येणार असें कळतांच झालेली तारांबळ व आनंद, पति मोहिमेवर जाणार म्हणून भावि वियोगकल्पनेनें झालेलें दुःख-वगैरे प्रेमभावनेच्या कितीतरी सूक्ष्म छटा शाहिरांनी काव्यांत रंगविल्या आहेत. त्यामुळेंच शृंगार-रसाच्या आविष्कारांत विविधता व जिवंतपणा आल्याचा प्रत्यय आपणाला आल्यावाचून राहात नाही.

शृंगाराच्या दोन प्रकारांपैकीं संभोग-शृंगार रंगवितांना अनेक शाहिरांचा तोल जरा सुटल्यासारखा वाटतो आणि याच प्रकारच्या काव्यामुळे शाहिरी काव्यासंबंधीं अधिक गैरसमज पसरले आहेत. मीलनाचीं वर्णनें

करतांना कांही वेळां शाहिरांकडून वर्णनाचा अतिरेक होतो, सूचकता झुगारून दिली जाते आणि उत्तान व भडक वर्णनें करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते. नको ते शब्द अनेकदां लावण्यांतून येतात व ग्राम्य शब्द-रचनेपासूनहि त्या लावण्या अलिप्त राहात नाहीत. स्त्रीने कामातुर होऊन स्वतःच्या कामभावनेचें रसभरित वर्णन करावें व पतीला उत्तेजित करण्याचा प्रयत्न करावा किंवा कामातुर पतीच्या विलासाचें व अतिरेकाचें भडक वर्णन करावें—असे उत्तान व सदभिरुचीची मर्यादा ओलांडणारे प्रसंग बहुधा सर्व शाहिरांच्या कवनांतून थोड्याफार प्रमाणांत आढळून येतात. हा विलास पतिपत्नीचाच असतो असें नाही; अनेकदां अनैतिक प्रकारांचाहि उल्लेख त्यांत असतो. त्यामुळे विलासाचीं हीं उघडीं नागडीं वर्णनें कांहीशीं बीभत्स वाटतात. शाहिरांना या बाबतींत संयम राखतां आला नाही असें नाइलाजाने म्हणावेसें वाटतें. पण हा दोष त्यांचा नाहीं. ज्या काळांत ते वावरत होते, त्या काळाचा हा दोष आहे. रावबाजीची कारकीर्द जिथे विलासी वृत्तीनेच नटली होती त्या ठिकाणीं त्यांचे आश्रित असलेल्या शाहिरांकडून असा अतिरेक झाला तर तो क्षम्य आहे.

सुदैवाने अशा वर्णनांतसुद्धा अनेक ठिकाणीं सुंदर काव्य आढळतें. वर्णनांतील हा अतिरेक अनेक वेळीं कल्पना-विलासाने व भावोत्कटतेने त्यांनी भरून काढला असल्याचें दिसून येतें. विशेषतः शृंगार-रसाला उठाव देणारीं सुंदर वर्णनें तर ठिकठिकाणीं विखुरलेलीं आहेत. रंगमहालाचें किंवा उद्यानाचें वर्णन करतांना शाहिरांची प्रतिभा विशेष फुलते. प्रभाकराच्याच एका लावणींतील खालील वर्णन पाहा:—

“ बहार हा झाला रात्रीं मोतीया फुलला
द्राक्षीचे मंडप बाई छाया अति दाट ग
पांचव्या मजल्यावरती सफेतीचा थाट ग
पडदे चिकाचे भंवते मधीं चोरवाट ग

कांचेची कारंजी कंदील शोभती
घोस फुलांचे वरुनि सुगंधित लोंबती
खुशालित मजला स्वामी घेउनि बैसती
तेव्हां असें वाटे अधीं म्यां ईश्वर पूजिला
झुळझुळ वारा वाहातो चांदणें थंड ग
झगमग तारे करिती आकाशीं उदंड ग
पाहतां आनंद वाटे मनाला अखंड ग
लावुनि रुपेरी हल्के हिंदोळे बांधले
खांब सुरूचे सूत्रे नकासून साधले
तऱ्हतऱ्हेचे रंग छताप्रती दीधले
इंद्रभुवन भासे पाहुनिया मजला ''

शृंगार-रसाला उठाव आणणारीं अशीं काव्यमयवर्णनें अनेक कवनांतून आढळतील. कधी कधी प्रियतमेने पिवळा साज केलेला असेल, तर कधी कधी हिरवा साज केलेला असेल—त्या शृंगाराचीं वर्णनेंहि मोठीं काव्यमय आहेत. वसंत ऋतु हा तर कामी जनांना उत्तेजित करणारा ऋतु; तेव्हा त्याचीं वर्णनें अनेक ठिकाणीं यावीत यांत नवल नाही. या सर्व काव्यमय वर्णनांनी शृंगार-रसाला वेगळाच उठाव मिळाल्याचें आढळेल.

शृंगार-रसाच्या या प्रकारांत प्रेमळ रुसव्यांचीं वर्णनें अनेक ठिकाणीं केलेलीं आढळतील. सजण रुसला आहे आणि साजणी त्याची समजूत करते आहे अशीं चित्रें अनेक ठिकाणीं रंगविलीं आहेत. त्यांतील भावनांची कोमलता मोठी मोहक आहे. उलट कांही ठिकाणीं साजणी रुसली आहे, व सजण तिचीं आर्जवें करतो आहे असेंहि चित्र दिसेल. हा प्रेमळ रुसवा शृंगार-रसाला पोषकच आहे.

एका लावणींत साजणी सजणाची कशी समजूत करीत आहे तें पाहा--

तुम्ही सजणा–सुजणा–घ्या आदराचें पान ।
मज दुबळीचा राखा स्वाभिमान ।
तुम्ही का रुसलां काय चुकलें सेवेला ।
प्रतिपाळ आजवर तुम्हि माझा कां केला ।
नाहीं कधीं मला शब्द दुःखाचा दिला ।
एकाएकी निष्ठुर कां हो झाला ॥
म्यां धीर धरला कंठीं प्राण उरला ।
ह्या प्रीतीचें दुःख सांगूं कोणाला ॥
तुजसाठीं सख्या करीन जिवाचें रान ।

या मधील भावनांची कोमलता किती रम्य आहे ! प्रियकर रुसून बसल्यामुळे प्रियतमेला लागलेली हुरहूरहि कांहीं ठिकाणीं कशी व्यक्त झाली आहे तें पाहा—

" या प्राणविसाव्या वांचून हा जीव पिसा ।
रुसला साजण समजेल आतां ग बाइ कसा ॥

या ठिकाणीं रुसलेल्या साजणाचें चित्र तितकेंच मोहक आहे. रागावलेल्या साजणाची परोपरीने विनवणी करणाऱ्या साजणीचें चित्र प्रभाकराच्या व होनाजीच्या अनेक लावण्यांतून सांपडेल. त्याउलट साजणी रुसली आहे व साजण तिची समजूत घालतो आहे असा प्रसंग क्वचितच वर्णनांत येतो. श्री. वर्दे म्हणतात त्याप्रमाणे 'पुरुषाने रुसावें मुरकावें आणि स्त्रीने समजावणी आणि मनधरणी करावी असा प्रघात रावबाजीच्या काळांत पडूं लागला." हें विधान अगदी खरें वाटूं लागतें.

चतुरसंवाद हाहि शृंगाररसाच्या या प्रकाराला पोषक असा भाग आला आहे. प्रियकर व प्रियतमा यांच्या उत्तर-प्रत्युत्तरामध्ये अनेक ठिकाणीं बुद्धिविलास आढळतो. पण त्याचें स्वरूप प्रेमभावनेला पोषक असेंच असतें.

"चंद्राचें चांदणें सितळ का उष्ण प्राणपती
तें सांगा मजप्रती कल्पना डोळ्यामध्यें खुपत ॥"

असा प्रश्न करणारी सगनची नायिका मोठी चतुर असली पाहिजे.

"घडी घडी अरे मनमोहना हासून गुणीजना देखतां
नको रे बोलूं मशी"

या होनाजीच्या लावणींतील संवाद मोठे मार्मिक वाटतात. अशीं जीं द्वंद्वगीतें शाहिरी वाङ्मयांतून आढळतात त्यांत आढळणारें वैचित्र्य मोठें विलोभनीय वाटतें. रामजोशीची 'छेकापह्नुति' वर आधारलेली लावणी याची साक्ष आपणांला देईल.

शाहिरी वाङ्मयांतील संभोग-शृंगाराचें स्वरूप असें विविध आहे. त्यांत अतिरेक आहे, सदभिरुचीच्या मर्यादा ओलांडल्या गेल्या आहेत—वगैरे आक्षेप कांहीं मर्यादेपर्यंत खरे आहेत. पण हा थोडा अतिरेक—त्या काळाचा परिणाम म्हणून—आपण सहन केला तर त्यांतील उत्कट भावना, उत्कृष्ट कल्पनाविलास व वातावरणाचा उठाव करणारी शृंगार-रसाला पोषक अशीं वर्णनें निःसंशय आपल्या मनाला मोह पाडतील.

संभोग-शृंगाराकडून विप्रलंभ शृंगाराकडे आपण वळलों तर मात्र शाहिरी प्रतिभेचा मोठा रम्य विलास आपणाला तेथे दिसेल. वियोगाने व्याकुळ झालेल्या स्त्री-पुरुषांच्या भावनांचें वर्णन शाहिरांच्या इतके उत्कटतेने कुणीहि केलें नसेल. त्यामुळे हीं सर्व कवनें उत्कृष्ट नाट्यगीतें आहेत असें म्हणावें लागेल. विरहाने व्याकुळ झालेल्या स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणांत ते शिरतात व त्यांचीं दुःखें, त्यांच्या यातना अत्यंत उत्कट रीतीने त्यांच्याच शब्दांत ते मांडतात. त्यामुळे विप्रलंभ-शृंगाराचा उत्कट आविष्कार या कवनांतून होत असल्यामुळे काव्यदृष्टया हीं कवनें अत्यंत श्रेष्ठ प्रतीचीं ठरावींत यांत नवल नाही.

विरहावस्थेने पोळलेल्या या नायिकांच्या चित्रणांतसुद्धा विविधता आहे. पति हौस न पुरवतां प्रवासाला गेला म्हणून तक्रार करणाऱ्या नव-

विवाहित तरुणीपासून ते पतिवियोगाने अन्नपाण्याचा त्याग करून झुरून झुरून शरीराचे पांजर करणाऱ्या नायिकापर्यंत विरहाच्या अनेक छटा त्यांनी अत्यंत सूक्ष्मपणें रंगविल्या आहेत. विरहाचें हें दुःख म्हणजे त्यांना थोर दुःख वाटतें आणि त्या दुःखांत लोटणारा आपला प्रियकर म्हणजे आपला दुश्मन् आहे असें त्यांना वाटूं लागतें. 'आपल्या प्रियकरांना आपली ही अवस्था कळवा आणि त्याला परत आपणापाशीं बोलवा' अशीहि त्या आपल्या सखीजवळ विनवणी करतांना आढळतात. क्वचित् घरावर पिंगळा बसलेला पाहून त्यांना तो शुभशकुन वाटतो आणि आपला पति घरीं येणार अशी मनोमय खात्रीहि वाटूं लागते. वसंतऋतूचें आगमन झालें आहे आणि पति घरीं नाही त्यामुळे कित्येक नायिका व्याकुळ झालेल्या आढळतात. कांहींचा प्रियकर मोहिमेवर निघणार असतो व त्यांच्या भावी विरहाच्या कल्पनेने त्या विकल झालेल्या आढळतात, तर कांहींना आपल्या प्रियकराच्या छावणीचा तळ नदी-अलीकडे पडल्याचें कळल्याने आपली व त्याची गाठ पडणार या कल्पनेने विलक्षण आनंद झालेला असतो. अशा एक ना दोन—अनेक सूक्ष्म छटा शाहिरांनी आपल्या कवनांत रंगविल्या आहेत. प्रत्येक भावनेच्या आविष्कारांत नावीन्य आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. खालील कांही उदाहरणें सहजच याची साक्ष देतील.

एका कवनांत—

"नूतन वय दोघांचें सारखा जोडा गे बाई
पति प्रवासा जाती हौस मनची पुरली नाहीं"

म्हणून तक्रार करणारी नायिका आहे. ती आपल्या सखीला सांगते:—

"कोण उपाय करावा मी घरची सासुरवासी
दर्द जिवांतील माझा मी तरी सांगूं कोणापाशीं
दोन गोष्टी समजावून सखये सांग भ्रताराशीं
येथेंच ईश्वर देईल म्हणावें द्रव्याच्या राशी

" चंद्राचें चांदणें सितळ का उष्ण प्राणपती
तें सांगा मजप्रती कल्पना डोळ्यामध्यें खुपत ॥ "

असा प्रश्न करणारी सगनची नायिका मोठी चतुर असली पाहिजे.

" घडी घडी अरे मनमोहना हासून गुणीजना देखतां
नको रे बोलूं मशी "

या होनाजीच्या लावणींतील संवाद मोठे मार्मिक वाटतात. अशीं जीं द्वंद्वगीतें शाहिरी वाङ्मयांतून आढळतात त्यांत आढळणारें वैचित्र्य मोठें विलोभनीय वाटतें. रामजोशीची 'छेकापह्नुति' वर आधारलेली लावणी याची साक्ष आपणांला देईल.

शाहिरी वाङ्मयांतील संभोग-शृंगाराचें स्वरूप असें विविध आहे. त्यांत अतिरेक आहे, सदभिरुचीच्या मर्यादा ओलांडल्या गेल्या आहेत–वगैरे आक्षेप कांही मर्यादेपर्यंत खरे आहेत. पण हा थोडा अतिरेक–त्या काळाचा परिणाम म्हणून–आपण सहन केला तर त्यांतील उत्कट भावना, उत्कृष्ट कल्पनाविलास व वातावरणाचा उठाव करणारी शृंगार-रसाला पोषक अशीं वर्णनें निःसंशय आपल्या मनाला मोह पाडतील.

संभोग-शृंगाराकडून विप्रलंभ शृंगाराकडे आपण वळलों तर मात्र शाहिरी प्रतिभेचा मोठा रम्य विलास आपणाला तेथे दिसेल. वियोगाने व्याकुळ झालेल्या स्त्री-पुरुषांच्या भावनांचें वर्णन शाहिरांच्या इतके उत्कटतेने कुणीहि केलें नसेल. त्यामुळे हीं सर्व कवनें उत्कृष्ट नाट्यगीतें आहेत असें म्हणावें लागेल. विरहाने व्याकुळ झालेल्या स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणांत ते शिरतात व त्यांचीं दुःखें, त्यांच्या यातना अत्यंत उत्कट रीतीने त्यांच्याच शब्दांत ते मांडतात. त्यामुळे विप्रलंभ-शृंगाराचा उत्कट आविष्कार या कवनांतून होत असल्यामुळे काव्यदृष्ट्या हीं कवनें अत्यंत श्रेष्ठ प्रतीचीं ठरावींत यांत नवल नाही.

विरहावस्थेने पोळलेल्या या नायिकांच्या चित्रणांतसुद्धा विविधता आहे. पति हौस न पुरवतां प्रवासाला गेला म्हणून तक्रार करणाऱ्या नव-

विवाहित तरुणीपासून ते पतिवियोगाने अन्नपाण्याचा त्याग करून झुरून झुरून शरीराचे पांजर करणाऱ्या नायिकापर्यंत विरहाच्या अनेक छटा त्यांनी अत्यंत सूक्ष्मपणें रंगविल्या आहेत. विरहाचें हें दुःख म्हणजे त्यांना थोर दुःख वाटतें आणि त्या दुःखांत लोटणारा आपला प्रियकर म्हणजे आपला दुश्मन् आहे असें त्यांना वाटूं लागतें. 'आपल्या प्रियकरांना आपली ही अवस्था कळवा आणि त्याला परत आपणापाशीं बोलवा' अशीहि त्या आपल्या सखीजवळ विनवणी करतांना आढळतात. क्वचित् घरावर पिंगळा बसलेला पाहून त्यांना तो शुभशकुन वाटतो आणि आपला पति घरीं येणार अशी मनोमय खात्रीहि वाटूं लागते. वसंतऋतूचें आगमन झालें आहे आणि पति घरीं नाही त्यामुळे कित्येक नायिका व्याकुळ झालेल्या आढळतात. कांहींचा प्रियकर मोहिमेवर निघणार असतो व त्यांच्या भावी विरहाच्या कल्पनेने त्या विकल झालेल्या आढळतात, तर कांहींना आपल्या प्रियकराच्या छावणीचा तळ नदी-अलीकडे पडल्याचें कळल्याने आपली व त्याची गाठ पडणार या कल्पनेने विलक्षण आनंद झालेला असतो. अशा एक ना दोन—अनेक सूक्ष्म छटा शाहिरांनी आपल्या कवनांत रंगविल्या आहेत. प्रत्येक भावनेच्या आविष्कारांत नावीन्य आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. खालील कांही उदाहरणें सहजच याची साक्ष देतील.

एका कवनांत—

"नूतन वय दोघांचें सारखा जोडा गे बाई
पति प्रवासा जाती हौस मनची पुरली नाहीं"

म्हणून तक्रार करणारी नायिका आहे. ती आपल्या सखीला सांगतेः—

"कोण उपाय करावा मी घरची सासुरवासी
दर्द जिवांतील माझा मी तरी सांगू कोणापाशीं
दोन गोष्टी समजावून सखये सांग भ्रताराशीं
येथेंच ईश्वर देईल म्हणावें द्रव्याच्या राशी

नित्य उठुनि अंतरीं प्रार्थना करितें देवासी
पति घरीं राहतील असा कधीं पावल नवसासी. ”

दुसऱ्या नायिकेची अवस्था अधिक करुणाजनक आहे. तिचाहि पति प्रवासाला गेला आहे. ती म्हणतेः—

पति प्रवासामध्यें सखे मी येकली मंदिरीं ।
कंठूं कोणाच्या बळें पाठवा पत्र लिहुन या तरी ॥

नंतर ती आपली अवस्था वर्णन करतेः—

झुरझुरुन पांजर झालें शरीर निपट राहिलीं हाडें ।
रात्रंदिवस घोकणी पतीच्या लक्ष वाटेकडे ॥
अन्नपाणी वर्जिलें सखे मज नित्य उपोषण घडे ॥

सुखोपभोगहि आपणाला कसे दुःसह झाले आहेत याचें वर्णन करतांना ती म्हणतेः—

“ जागोजागीं कारंजी बैठका त्या उदास दिसती ।
न ये नरम मखमाली बिछान्यावर निद्रा मजप्रती ।
गळा फुलांचे हार सर्पासारिखे भासती ॥

एका नायिकेला पतीवियोग हें थोर दुःख वाटतें–पण पतीवरील तिची निष्ठा कायम दिसते. ती म्हणतेः—

“ निजघर सोडुनि सखे पारखे घरीं ।
जावें वाटे पद ठेवणें अहिफणावरी ॥
अन्य पुरुष चंद्रवरद चतुर्थीपरी ।
न पाहतां जन तद्वत मनवृत्त हे सुंदरी ॥ ”

नैतिक मर्यादेची व एकनिष्ठेची तिला जाणीव आहे असें यावरून स्पष्ट दिसतें.

त्याहिपेक्षा परिणामकारक वर्णन आणखी एका कवनामध्ये आलेलें आहे. विरहाने तडफडणारी ती नायिका म्हणतेः—

" हार नव्हता मधिं सहात सहज कसें संकट वडवडलें।
संसार भट पडों दोघांमधि आड पर्वत पडले ॥ "

आणि नंतर तिला आपल्या पतीच्या सहवासांत घालविलेल्या वियोगाच्या आधल्या रात्रीची स्मृति होते व ती जास्तच व्याकुळ होते. शिवाय प्रवासांत त्याजवर काय संकटें ओढवलीं असतील या कल्पनेनेहि ती चिंताग्रस्त होते. पण सुदैवाने काग व पिंगळे दाराजवळील वृक्षावर भिण-भिण करूं लागतात, डावा डोळा लवूं लागतो आणि हे सर्व शकुन खरे करण्यासाठी पतीची स्वारी मोहिमेवरून विजयी होऊन परत येते. या कवनांत भावनांची एकामागून एक होणारीं स्थित्यंतरें अतिशय चांगल्या रीतीने दाखविलीं आहेत.

विरहाकुल एक नायिका अधिक सुदैवी आहे. स्वामीची एकान्तांत गांठ कधी पडेल असें सहज तिच्या मनामध्ये आलें न आलें, तोंच गंगेअलीकडे स्वारीचा मुक्काम असल्याचें जासुदाने येऊन सांगितलें. आणि मग तिच्या मनाला झालेला हर्ष–तिची उडालेली धांदल या सर्वांचें वर्णन होनाजीने अगदी कलात्मक रीतीने केलेलें आढळतें.

आपल्या पतीने आपणाला सोडून जाऊं नये म्हणून त्याची मनधरणी करणाऱ्या अनेक नायिका आपणाला या कवनांतून आढळतील प्रभा-कराची एक नायिका आपल्या प्रियकराला सांगतेः—

" नका जाउं दूर देशीं घरीं काय धनद्रव्याला कमी।
आली हो वर्षाची नागपंचमी ॥

अशा या नागपंचमीच्या सणाला आपल्या पतीने घर सोडून जाऊं नये म्हणून तिने परोपरीने विनवणी केली आणि शेवटीं साजणाला माघारा फिरविला. त्याच्या उलट प्रभाकराचीच एक नायिका–

" उठा उठा हलवितें आतां पहा पहा पहाट फारच झाली।
व्हा जागृत प्रियकरा, कुचाची खरी नौबत वाजुन राहिली ॥ "

असें म्हणून मोहिमेवर जाण्यासाठी आपल्या प्रियकराला जागे करतांना आढळते. ती म्हणते:—

‘ पहाटेची झोप अति गोड केवळ शरकरा ।
उठूं नये वाटतें खरेंच किं हो प्रियकरा ।
सुखरूप शयन मजलिस गेल्यावर करा ’ ॥

अशी चतुर सुगर कान्ताहि कवनांतून कांही ठिकाणीं आढळते. आपण मोहिमेवर स्वारीबरोबर येणार असा हट्ट घेणारी नायिकाहि क्वचित् दिसते व

“ परम परदेश काठिण कान्ते
कसें ग तुज न्यावें सगुण शान्ते
नाहीं पाहिलें उष्ण कधिं ग तूं आजवर सुकान्ते ॥

अशी पतीला तिची समजूत घालावी लागते.

पण एकंदरींत अशा धीरोदात्त नायिका कमीच. बहुतेक विरहानें तळमळणाऱ्या व पति जवळ नाहीं म्हणून झुरणाऱ्याच नायिका आढळतात. त्यांतील कांही तर

“ भ्रतार नव्हे हा दुस्मन पुरा
देऊन मला विश्वास प्रवासीं गेला निघून चांडाळ खरा ” ॥

असें म्हणण्यासहि कमी करीत नाहीत.

“ झाली तरुणपणाची धूळ ।
पति नाहीं सेजेवरी सुंदरा रडे मुळमूळ ॥
हा वसंतऋतु अनिवार । करि मदनशराचा मार बहुत बेजार ॥
आतां काय करूं मी संसार । सर्पापरि गमती गडे गळ्यामधिं हार ॥”

अशीच अवस्था शाहिरांनी रंगविलेल्या नायिकांपैकीं बहुतेक नायिकांची झालेली आढळते. म्हणून ‘ तुझ्या प्रीतीचें दुःख मला दावुं नको रे ” अशी प्रेमळ तक्रार त्यांनी केली तर नवल नाही.

‘ विप्रलंभ-शृंगारा’चें लावण्यांतून व्यक्त होणारें हें स्वरूप पाहिलें

म्हणजे शाहिरांच्या अवलोकनाची व परमन-प्रवेशाच्या सामर्थ्याची साक्ष आपणाला पटते. बहुतेक सर्व शाहिरांच्या कवनांतून नायिकाच विरहाने विकल झालेल्या आहेत–तें स्वाभाविकहि आहे. मोहिमेसाठी वीरगडी घरांतून बाहेर पडण्याचा तो काळ होता आणि त्यामुळे विरहोत्कंठ वृत्तीने काळ कंठण्याची पाळी नायिकावरच येणें स्वाभाविक होतें. पण या विरही नायिकांची वृत्तिसुद्धा शुद्ध व सात्त्विक आहे हें मुद्दाम लक्षांत घेतलें पाहिजे. पति परदेशाला गेल्यावर त्या सुखोपभोग वर्ज्य करतात.

‘ विलासिक जिनसांच्या संदुका झाकल्या जशा।
पति गेल्यापासुन सखे मी नाहीं उघडल्या तशा ॥ ’

अशा निष्ठेने त्या वागतात. ‘ पतिव्रतेचा धर्म पतीची सेवा करावी तिने ’ अशी त्यांना जाणीव आहे; निजघर सोडून परके घरीं जाणें म्हणजे अहिफणावर पाय ठेवल्यासारखें त्यांना वाटतें. या त्यांच्या निष्ठेमुळे व प्रेमामुळे त्यांच्या विरहभावनेला सात्त्विकपणाचें तेज चढलें आहे. क्वचित् कांही नायिका उच्छृंखल झालेल्या दिसतात पण अनीतीच्या मार्गाने जाणाऱ्या फार थोडया. ‘ दुधखुळा बुळा पति ’ आवडेनासा झाला व परपुरुषावर प्रीत जडली तर—

‘ पुढले जन्मीं खचित आर्या । भार्या होईन तुझी ’ ॥

असें आश्वासन देणाऱ्या, कदाचित् याहिपुढे जाऊन

“ घरीं भ्रतार आहे बिजवर । कोण सवत एक पकडली,
तो लंपट तिजवर । मी म्हणुन खूष तुजवर ”

अशा रीतीने जशास तसें म्हणून वाममार्गाने जाणाऱ्या किंवा संक्रान्तीला तिळगूळ देण्याच्या निमित्ताने परपुरुषाला घरांत बोलविणाऱ्या कांही नायिका शाहिरांच्या कवनांतून आपणाला सांपडतील, नाही असें नाही. जिथे सर्व समाजच अवनतीच्या मार्गाने जात होता तिथे स्त्रियांनाहि त्याची थोडी झळ लागावी यांत आश्चर्य नाही. पण सुदैवाने अशा नायिका फार थोडया. पतीविषयींच्या उत्कट प्रेमामुळे त्यांच्या वियोगाने

झुरणाऱ्या नायिकांचीच संख्या अधिक आहे. म्हणूनच या प्रकारच्या सर्व लावण्यांतून दिसून येणारा भावनाविलास मनाची पकड घेतल्याशिवाय राहात नाही.

'विप्रलंभ–शृंगारा'लाच अनेक ठिकाणीं करुण-रसाची जोड मिळाली आहे. विशेषतः पतिवियोगाने स्त्रियांची झालेली विकल अवस्था हा करुण-रसाचाहि विषय आहे. त्यामुळे विप्रलंभ-शृंगाराच्या साहाय्याने करुण-रस अनेक ठिकाणीं येतो. पण त्या रसाचा स्वतंत्रपणें आविष्कारहि कांही कवनांतून झाला आहे. 'अक्रूर'विषयक ज्या लावण्या आहेत त्यांत करुण-रसाचा विलास विशेषत्वाने आढळतो.

"हरि वंचुनि नेला बाई । आतां करूं मी काई । अक्रूर कशाचा मेला । त्यानें घातची केला ।" ही रामजोशाची लावणी, 'अक्रूर हें नामाभिधान सांगून पाहीं । अक्रुरें निष्ठुरपणें केलि गोकुळांत आसाई । मंदिरामाजि मोहिली यशोदाबाई ।" ही होनाजी बाळची लावणी किंवा 'कोण आला रथवाला न कळे कपटी त्या रुपाचाई ॥' ही परशरामाची लावणी वाचली तर श्रीकृष्णाला अक्रूराने मथुरेंत नेल्यानंतर त्याच्या वियोगाने गोकुळांतील सर्व गोकुळवासियांची झालेली विकलावस्था अत्यंत परिणामकारक शब्दांत वर्णन केलेली आढळेल. कदाचित् कृष्णाने गोकुळ सोडल्याच्या घटनेंत त्यांना बाजीरावाने पुणें कायमचें सोडल्याची घटना दिसत असावी आणि म्हणून त्यांतील करुण-रस विशेष प्रभावी झालेला असावा. याशिवाय निपुत्रिकेच्या अन्तःकरणांतील व्यथा वर्णन करतांना केलेला करुण–रसाचा आविष्कार तर अतिशयच परिणामकारक आहे. होनाजी, परशराम, प्रभाकर या तिघांनी निपुत्रिकेच्या अन्तःकरणाचा कानोसा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांत आणलेला तपशील तर इतका स्त्रीस्वभाव-सुलभ आहे कीं तो वाचतांना शाहिराच्या प्रतिभेचें खरोखर कौतुक करावेसें वाटतें. होनाजीची निपुत्रिक नायिका काय म्हणते तें पाहा—

‘ हिण माझें प्रारब्ध वांझपण कधीं फिटेल बाई ।
एक बाळक पोटीं नाहीं ॥
सर्व गोष्टी अनुकूल कृपा परिपूर्ण ईश्वराची ।
नसे घरीं न्यूनता मला बाई कोण्या पदार्थाची ।
काया वाचा मनें भुकेली एक्या बाळकाची ॥
आपापल्या घरीं नारी मूल घेऊनिया कडे
हौसेनें उभ्या राहतात भ्रतारापुढें ।
बोलविती मुलापासून वेडेवाकडें ।
हासविती पतीला अशा प्रकारें करून ।
रिझविती पतीचें मन एका बाळावरून ।
घडी घडीं बोलतो एकान्तीं सखा मुख भरून ॥
धिग् धिग् हें माझें जिणें । बाई एका बाळाविणें ।
मंदीर घर दिसतें सुनें ॥ ”

त्यानंतर मूल होण्यासाठी कोणकोणते उपाय केले हें वर्णन करून शेवटीं ती म्हणते:—

“ माझेंच मज भासते पतीची मीच आहे वैरीण
नाहीं पुत्रफळ पोटीं म्हणून बाई अगदींच झालें लिन
वाळवंटीं तळमळी जसा ग बाइ पाण्यावांचून मिन
त्यापरि रात्रंदिस बाई झुरतें मी मनीं
वाटते चोरट्यावाणीं वर्ततां जनीं
भासते जिवा वाटून घ्यावी हिरकणी
लौकिकांत वाईट दिसेल म्हणून सांगतें
संसारीं दृष्टि ठेवून जनांत वागतें
हें पूर्व-जन्मींचें फळ आपुलें भोगितें ॥ ”

या कवनांतील भावना किती उत्कट व पटणाऱ्या आहेत, व या निपुत्रिकेचें अन्तःकरण कसें आपणापुढें स्पष्ट प्रगट केलें आहे याची

वाचतांना सुद्धा आपणाला कल्पना येते. परशराम व प्रभाकराच्या विषयावरील कवनांतहि अशीच उत्कटता आहे. एकांत पुत्र-प्राप्तीसाठी केलेले नाना उपाय दिले असून शेवटीं तिची अगतिक अवस्था वर्णन केली आहे. या कवनांत पुत्रप्राप्तीसाठी कराव्या लागणाऱ्या उपायांत तत्कालीन लोकसमजुतींचें चित्र स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेलें आढळतें. ‘ कधिं ग होइन लेकुरवाळी ’ म्हणून विंवचना करणाऱ्या प्रभाकराची नायिकासुद्धा असेच अनेक उपचार करतांना आढळते. या लावणी बरोबरच गर्भवतीचा आनंदहि या शाहिरांनी रंगविला आहे. ‘ कधिं ग होइन लेकुरवाळी ’ अशी विंवचना करणाऱ्या नायिकेला जेव्हा गर्भ राहतो तेव्हा तिचा आनंद प्रभाकराने—

“ सकल दिवस दुःखाचे भासती आज सखे सरले ।
आज सखे सरले, मनोरथ पुत्राचे पुरले ॥ ”

या लावणींत अतिशय चांगला व्यक्त केला आहे. परशरामाने तर गर्भधारणेनंतर प्रत्येक महिन्याला तिला कोणकोणत्या भावना होतात याचेंच चित्र काढलें आहे, आणि तेंहि कोणत्याहि गर्भवासिनी स्त्रीला सहज पटण्यासारखें. शाहिरांच्या अवलोकनाचा पल्ला किती दूरवर गेला होता याची यावरून सहज कल्पना येते. परशरामाने त्याबरोबर लेकुरवाळ्या स्त्रीचेंहि चित्र मनोज्ञ रीतीने काढले आहे. नवानवसाने झालेला एकुलता एक पुत्र आजारी पडल्यावर मातेची काय अवस्था होते याचें इतकें परिणामकारक चित्रण इतरत्र क्वचितच असेल. वत्सलरसाचें तें मूर्तिमंत उदाहरणच म्हणतां येईल. वत्सल रसाचीं आणखीं उदाहरणें अनेक कवनांतून आढळतात. ‘ घनःश्याम सुंदरा ’ ही होनाजीची भूपाळी व तत्सदृश इतर शाहिरांच्या भूपाळ्या यांत तर मूर्तिमंत वत्सल-रस ओथंबतांना आढळेल. त्याचप्रमाणे रामजोशीच्या कृष्ण व गोपी यांच्यासंबंधींच्या लावण्यांतहि वत्सलरसाची प्रतीति येते. गोपींच्या कृष्णाविषयींच्या लटक्या तक्रारी वात्सल्यांतूनच निर्माण झाल्या आहेत. पण एकंदरींत करुण काय

किंवा वत्सल काय–या रसांना शाहिरांच्या कवनांत तितकासा वाव नाही. शृंगार व वीर या रसांना मिळालेलें प्राधान्य विचारांत घेतांना करुण व वत्सल या रसांना एक कोपरा मिळाला आहे असें फारतर म्हणतां येईल.

असाच एक कोपरा हास्य–रसाला सुद्धा मिळाला आहे. ज्या ज्या ठिकाणीं सामाजिक जीवनांत विसंगतीचें दर्शन घडलें त्या त्या वेळीं ती विसंगति आपल्या कवनांत आणण्याचा प्रयत्न शाहिरांनी–विशेषतः परशराम या शाहिराने–केला. परशरामाचें अवलोकन मोठें सूक्ष्म व प्रतिभा मोठी तल्लख असली पाहिजे. सामाजिक जीवनांतील अनेक विसंगतीचें दर्शन त्यानें मोठ्या कुशलतेने घडविलेलें आढळेल. त्याचे ' देशस्थिती-वरील पोवाडे ' किंवा ' समाजस्थितीवरील पोवाडे ' आपणाला सूक्ष्म अवलोकनाची तर साक्ष देतातच, पण त्याबरोबरच त्याची विनोददृष्टीहि उल्लेखनीय आहे यांत शंका नाहीं. ' दोन बायकांच्या दादल्याची कथा ' ' ऐतखाऊ नवऱ्याची कथा, ' ' सतीची कथा ' ' नवऱ्याला वेगळें होऊन संसार करायला सांगणाऱ्या दुघड नारीची कथा ' अशा किती तरी लावण्या त्याच्या अवलोकनाची व विनोददृष्टीची साक्ष म्हणून देतां येतील.

सवती–सवतीचें भांडण हा परशरामाच्या लावणीचा एक आवडता विषय दिसतो. त्याच्या तीन-चार लावण्या या विषयावर आहेत व त्या सर्व लावण्यांतून दोन बायकांनी ' हारीस आणलेल्या ' नवऱ्याचें चित्र चांगलें रेखाटलें आहे. एकांत थोरली व धाकटी निरनिराळीं प्रमाणें देऊन नवऱ्या-वर आपलाच हक्क कसा आहे हें सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात, तर दुसऱ्या लावणींत सवतींनी नवऱ्याची विभागणी करून कशी घेतली व त्याचे हाल कसे केलें याचें वर्णन केलें आहे. त्यामुळे—

' खर्चून पैका दोघी बायका केल्या सुखासाठीं ।  
सुख नाहीं पर दुःख लागलें नित्य आमच्या पाठीं ॥

अशी त्या नवऱ्याची स्थिति होऊन गेली. ऐतखाऊ नवऱ्याचें चित्रहि त्याने मोठ्या विनोदी रीतीने वर्णन केलें आहे. त्याच्या बायकोनें त्याचें वर्णन कसें केलें आहे पहा:—

"सांड गांवामधीं फिरतो भांड रिकामटेकडा असून
इकडिल काडी तिकडे करीना घर कसें चालेल वसून
तीन तुकड्यांचें एक मुंडासें तिनदां बांधी कसून
डावे कानावर ठेवून पागोटें वर तीन पानें खोचून."

पण या सर्व लावण्यांत 'लष्करचें सुख' व 'सतीची कथा' या दोन लावण्या परशरामाच्या विनोदी लावण्यांत उत्कृष्ट वाटतील. 'लष्करचें सुख'-मधील लष्करांतून पळून आलेला शिपाई आपल्या पराक्रमाचें खोटेंच वर्णन करतो. त्याच्या बायकोला त्याच्या विषयीं मोठा आदर वाटूं लागतो आणि शेवटीं त्याच लष्करांत असलेल्या दुसऱ्या शिपायाकडून तिला कळतें कीं लष्करांत हा साधा पाणक्या होता आणि सतत लाथाबुक्क्यांचा प्रसाद त्याला मिळत असे. 'सतीच्या कथें'तहि सतीची नक्कल करूं जाणाऱ्या एका दुघड नारीला मुसळ कपाळावर पडून कसें प्रायश्चित्त मिळालें याचें वर्णन केलें आहे. या सर्व कवनांतून परशरामाच्या अवलोकन-शक्तीचा व विनोद-दृष्टीचा प्रत्यय आल्यावाचून राहात नाहीं.

प्रभाकरच्या 'लक्ष्मी-पार्वती' संवादांतील विनोदहि मोठा मार्मिक आहे. दोन बायकांनी आपापल्या नवऱ्याचा श्रेष्ठपणा प्रस्थापित करण्यासाठी दुसरीच्या नवऱ्याचें उणें काढावें असा प्रकार या कवनांत आहे. दोघींचे पति श्रेष्ठ; पण शंकराचें वर्णन करतांना लक्ष्मी 'शंकर भणंग भिकारी, जिवंत पाहातां मुत' असें म्हणते, तर पार्वती विष्णूची 'वक्रदंत शिशु-पाल कीटकां कपटें मर्दुन बका। प्रताप मुखें वर्णितां कशा भाळल्यात गोरक्षका' अशी संभावना करते. अर्थात् शेवटीं 'एकस्वरूप शिव-विष्णु', लक्ष्मी-गौरी एक स्मरा' अशी तडजोड करण्यांत येते. पण लक्ष्मी-पार्वतीचें हें भांडण दोन शेजारिणीच्या भांडणाप्रमाणे प्रभाकराने रंगविलें

९५५
अनुक्रम
विभाग

आहे. यांत शंका नाही. होनाजीच्या 'भाळलोचना नागभूषणा' या शंकरपार्वतीच्या संवादांतहि असाच विनोद आहे. शंकराच्या जटेंत असणाऱ्या गंगेविषयीं पार्वतीला असूया निर्माण झाली आहे व ती त्याला तिच्याबद्दल विचारत आहे व शंकर कांहीं तरी उत्तर देऊन तिला लपविण्याचा प्रयत्न करीत आहेत. यामधील संवादांतहि पार्वतीची शंका व शंकरांची उत्तर देतांना उडालेली तारांबळ होनाजीने चांगल्या रीतीने वर्णन केली आहे. प्रासंगिक विनोदाचा नमुना म्हणून 'श्रीकृष्ण–तुला' या लावणीकडेहि बोट दाखवितां येईल. अनंतफंदीची 'चंद्रावळ' हि याच नमुन्याची आहे. रामजोशीच्या 'छेकापन्हुति' मध्ये शब्दनिष्ठ विनोदाचें दर्शन आपणाला होतें. राधासखीच्या संवादांत किंवा कृष्ण व त्याचा सखा यांच्या संवादांत द्व्यर्थी शब्दयोजना करून चमत्कृति चांगली साधली आहे. हास्यरस हा असा मर्यादित स्वरूपांत शाहिरी काव्यांत आढळतो. परशरामाखेरीज इतर शाहिरांच्या ठिकाणीं विनोद-दृष्टि तितक्या प्रमाणांत नव्हती. परशरामाचा विनोद मात्र प्रसन्न व मनोज्ञ असा आहे.

'भक्ति' हा रस शाहिरी वाङ्मयांत अभावानेच आढळतो. देवादिकांच्या लावण्यांतून पंढरपूर, व तुळजापूर इत्यादि तीर्थक्षेत्रांच्या वर्णनांतून जरी त्यांची परमेश्वरविषयक भक्ति दिसत असली तरी तो त्यांच्या वाङ्मयाचा स्थायीभाव नाही. पौराणिक लावण्यांतून तर केवळ आख्यानपरता दिसते. क्षेत्रवर्णनांत सुद्धा संतांच्या वाङ्मयांतूनच दिसून येणारा भक्तिभावनेचा उमाळा त्यांत दिसत नाही. तपशीलावरच अधिक भर दिला आहे. तात्त्विक म्हणून समजल्या गेलेल्या रामजोशांच्या–' भला जन्म हा तुला लाधला–' अशा सारख्या लावण्यांतून किंवा अनंतफंदीच्या फटक्यांतून 'निवृत्ती' चा उपदेश असला तरी तो तात्कालिक स्वरूपाचा आहे. भोंवतालच्या निवृत्तिपर तत्त्वज्ञानाचा थोड्या प्रमाणांत त्यांच्या मनावर झालेला परिणाम त्यांत आविष्कृत झाला आहे. विशेषतः कथा–कीर्तनाचा

पेशा पतकरल्यामुळे अपरिहार्यपणेंच रामजोशी व अनंतफंदी यांच्या कवनावर ही निवृत्तीची छटा आलेली दिसते. पण ती सुद्धा किती थोड्या प्रमाणांत !

भक्तिरस किंवा निवृत्तिपरता हा शाहिरांच्या काव्यांचा केव्हाहि विषय बनला नाही. वीर व शृंगार हे दोनच शाहिरी वाङ्मयांतील महत्त्वाचे रस व त्यांचाच आविष्कार त्यांच्या वाङ्मयांत प्राधान्याने आला आहे. इतर रस आले आहेत पण ते केवळ आनुषंगिक म्हणूनच.

तत्कालीन पारंपारिक कवितेपेक्षा शाहिरी काव्याच्या रसाविष्काराचें स्वरूप ज्याप्रमाणें निराळें आहे त्याचप्रमाणें शाहिरी काव्यांतील कल्पना-विलासाचें स्वरूपसुद्धा अगदी निराळे आहे. त्यांची अलंकारसृष्टि त्यांची अशी स्वतंत्र आहे. त्यांच्या उपमा, उत्प्रेक्षा, रूपकें इत्यादि अलंकारांवर त्यांच्या व्यक्तित्वाचा व तत्कालीन वातावरणाचा छाप उमटलेला स्पष्ट दिसतो. त्यामुळे ती सृष्टि कांही अंशीं अभिनव वाटते. स्त्री-सौंदर्याचें वर्णन करतांना किंवा शृंगाराचें वर्णन करतांना त्यांनीं वापरलेले दृष्टान्त, उपमा किंवा उत्प्रेक्षा अगदी वेगळ्या स्वरूपाच्या आहेत. सामान्य जनतेला सहज पटतील, त्यांच्या हृदयाला भिडतील व त्यांच्या डोळ्यांसमोर प्रसंग साकार करतील अशा उपमा, उत्प्रेक्षा शाहिरी काव्यांत सहजतेने येतात. अनंतफंदीच्या काव्याचें वर्णन करतांना होनाजीने ‘कवन बहुत उदरामधि भरले, फणस जसा मोठा कापा ” असे जे उद्गार काढले आहे ते इतर शाहिरांच्या काव्याला तितकेच लागू पडतात. कापा फणसांतील गऱ्या-प्रमाणें रसाळ अलंकार त्यांच्या काव्यांत चोहींकडे विखुरलेले आढळतील. त्याचे कांही नमुने पाहतांच या अलंकारसृष्टीच्या निराळेपणाची आपणाला सहज कल्पना येईल.

नायिकेचें वर्णन करीत असतांना तिच्या सौंदर्याचें किती तऱ्हेने वर्णन केलें आहे पाहा—

" गगनांत चांदणी ठळक मारिशी झळक उभी ग आंगणीं ।
किती नटुन थटुन मारिशिल छनाछन नयनाच्या संगिनी ॥
× × ×
गौरवर्ण तिची कांचन कांति जशी हवई सुटली ।
उंच मोलाचें तेल उदेलें सर्वांगीं उटली ॥
× × ×
धन्य तुझें लावण्य प्रीतीचे बाण जसे सणाणी ।
× × ×
नार नवी तरणी काय सांगु रमणी जशी नागिण ।
देवाघरची ॥

त्यापेक्षाहि रामजोशांनीं 'सुंदरा मनामधें भरली,' या कवनांत केलेलें स्त्री-सौंदर्याचें वर्णन व त्यांतील उत्प्रेक्षा पाहा...
जशी कळी सोनचांफ्याची न पडुं पाण्याची दृष्टि सोन्याची ती नार ॥
अति नाजुक तनु देखणी गुणाची खाणी उभी नवखणी चढुन सुकुमार ॥
जशि मन्मय रति धाकटी सिंहसम कटी उभी एकटी गळ्यामधें हार ।"

होनाजीने खालील उताऱ्यांत केलेलें वर्णनहि तितकेंच चमत्कृतिमय आहे.

" गोल तुझा शरीराचा डौल वर गोरा रंग नौती कवळी ।
वय नूतन हातीं निऱ्या चालणें चपळ जशीं नागीण गव्हळी ।
अधरपुटी बत्तीस हिरकण्या एक वळीनें विराजती ।
ओठ शुद्ध पवळ्याचा रंग नासाग्रीं पाहुनि रावे रिझती
कुच संगिन पाहून परस्परें चक्रवाक पक्षी थिजती ।
मंजुळ स्वर ऐकून कोकिळा वृक्षिं बसुन मनीं गजबजती ॥
कटि पाहुनिया सिंह राहुनी वनीं मनीं आपुल्या तुज भजती
स्थिरगमनीं गज मस्तकांत धूळ घालितसें पाहुनि धजती ।
जानु जंघ सुकुमार पोटऱ्या अति नाजुक कर्दळी ॥

हें सर्व वर्णन वाचत असतांना शाहिरांनी अलंकाराच्या साहाय्याने सारें स्त्री-सौंदर्य आपणापुढे उभें केलें आहे असें वाटतें. स्त्रीला उपमा देतांना नागिणीची—विशेषतः गव्हळ्या नागिणीची तिला दिलेली उपमा विशेष सार्थ आहे. कारण त्यांत गतीचा डौल, गहिरें सौंदर्य, आणि जिवघेणी मोह या सर्वांचा प्रत्यय येतो. अनंत—फंदीनें चंद्रावळीचें वर्णन करतांना—

" भर सव्वाशेर वजन चंद्रावळ
नार फारच हलकी जसें तुंबिनी फळ '

असा सौंदर्याचा निराळाच विशेष सांगितला आहे. शिवाय ' कंठांतून पिक दिसे अशी वेल्हाळ ' असें वर्णन करून मस्तानीचीहि आठवण करून दिली आहे. स्त्रीच्या गोड गळ्याचें वर्णन करतांना ' सजीव सारंगी ' ' आवाज विण्याची तार ' ' मंजुळ स्वर जशि राहो करिती कोयाळ ' अशा अनेक उत्प्रेक्षा वापरल्या आहेत. प्रभाकराने ' कंठ तुझा मंजूळ सुसंगित, फिरक स्वरामधिं स्वर फिरती ' या लावणींत नायिकेच्या मंजुळ आवाजाचें केलेलें वर्णनहि मार्मिक आहे. स्त्रीला उपमा देतांना ' मदनाच्या समशेरीची तिला दिलेली उपमा ' हि मोठी साभिप्राय वाटते.

विरहाचें किंवा प्रीतीचें वर्णन करतांना अनेक सुंदर उत्प्रेक्षा शाहिरी कवनांत आल्याने त्यांतील भावना-सौंदर्याला निराळाच साज चढतो.

' तुझ्या प्रीतीचें दुःख मला दावुं नको रे ' या होनाजीच्या लावणींतील नायिकेनें काढलेले

' जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी
झड घालुन प्राण देतो दीपकाचे वरी '

हे उद्गार तर प्रसिद्धच आहेत. पण दुसऱ्या एका लावणींत नायिका पतीला म्हणतेः—

अशा कोठें असतात सख्या उभय स्नेहाच्या रीती
एक लुब्ध एक निष्ठुर चित्तीं ।
प्रीतरसें तो पतंग जळे दीपक ज्योतीवरी
दीपक न जळे; प्रीत नसे अंतरीं

भ्रमरचींत कमळिणीपाशीं; नसे कमळिणीचें मानसीं
ही प्रीत एकान्तिक कशी'

एकपक्षी प्रीतीचें वर्णन करतांना पतंग व दीप, आणि भ्रमर व कमळिणी यांचे घेतलेले दृष्टान्तहि अभिनव असे आहेत. विरही स्त्रीला गळ्यांतील फुलांचे हार सापाप्रमाणें वाटत असल्याची कल्पनाहि अनेक ठिकाणीं आली आहे. त्याचप्रमाणें 'मदन-विंचु झोंबला' यामध्ये मदनाला विंचवाची उपमा देण्यांतहि वैशिष्ट्य दाखविलें आहे.

एखाद्याविषयीं मनांत मोठ्या अपेक्षा निर्माण व्हाव्यात आणि तो जसा आपणाला वाटला तसा नाही हें कळून अपेक्षाभंग व्हावा—अशा वेळीं अपेक्षा-भंग झालेली नायिका नायकाचें वर्णन कसें करतें तें पाहण्यासारखें आहे.

म्यां म्हटलें हा चक रुपया दिसतो माल खरा.
वाजून जो पाहतों तों आंत तांब्याचा भुरभुरा
म्यां म्हटलें हा सुरेख उमदा अंगठीवरला हिरा
बसतां घन मस्तकीं भोगितां कस्त जाहला पुरा ॥

नालायक पुरुषाचें वर्णन आणखी एका लावणींत निराळ्या तऱ्हेने आलें आहे—

हेल्यावर जरि दिली अंबारी, मट्‌कन्‌ बसेल भारानं
उदंड झाला ताजा गधडा, शोभेल काय तरी त्यास जीन.

× × ×

मखमाली पैजार चांगली उदंड जरी झाली
पायाची पायामधिं शोभल कुणी बांधिली शिरीं

× × ×

उभा दंड जर एकच पाणी एरंडा आणि उसा
आपआपल्या मोलाने विकतिल खुण चतुराला पुसा

× × ×

या सर्व वर्णनांत आलेल्या उत्प्रेक्षा मोठ्या नावीन्यपूर्ण आहेत.

पण शाहिरांचा हा कल्पनाविलास पाहतांना दुसरी एक गोष्ट सहज लक्षांत येते. त्यांनी अलंकारासाठीं अलंकार वापरले नाहीत–तर आशयाशीं ते अलंकार एकजीव झाले आहेत. कुठे ते रसाची उत्कटता वाढवितात तर कुठे त्या व्यक्तीचें व प्रसंगाचें चित्र आपणासमोर स्पष्ट उभें करण्यास मदत करतात, तर कुठे वातावरणाला उठाव देतात. त्यामुळे त्यांच्या अलंकारसृष्टीला अभिनव सौंदर्य प्राप्त झालें आहे.

'सरळ चिरी कुंकाची कपाळीं लाल जशी पिकली मिर्ची' असें आपण वाचल्याबरोबर त्या कुंकवाची आडवी चिरी लावलेल्या मराठमोळा स्त्रीचें चित्र आपणापुढें स्पष्ट उभें राहतें. 'वाट पाहतां हातपायाच्या फुल झाल्या वाती' असें वाचतांच विरहामुळे हातापायाच्या काडया झालेल्या विरहिणीचें चित्र आपल्या डोळ्यांसमोर येतें. 'लखलखाट चकचकाट जैसें दुकान बोहऱ्याचें' असें वर्णन कानावर आलें कीं लावण्याची तर कल्पना येतेच पण त्याबरोबर त्या वेळच्या समाजस्थितीचेंहि दर्शन होतें. युद्धवर्णनांत तर 'पर्जन्यापरि गोळ्या पडती । शिरकमळें कंदुकवत् उडती ।....सपुत बाघापरी गुरकती ॥" इत्यादि वर्णनाने वीर-रसाला चांगलाच उठाव येतो. विशेषतः तत्कालीन वातावरणाशीं एकजीव करण्याचें शाहिरांच्या कल्पना-वैभवाचें सामर्थ्य विशेष उल्लेखनीय आहे. अनेकदा तपशील अतिशय बारीक असतो, पण त्यायोगानेच पेशवे-कालीन वातावरणांचीं वैशिष्ट्यें उजळलीं जातात. त्या काळचें वैभव, त्या काळची सुखलोलुप वृत्ति, त्या काळच्या चालीरीति इत्यादींवर त्यामुळे प्रकाश पडतो. त्यामुळे शाहिरांच्या काव्यांत पंडित-कवींच्या किंवा संत-कवींच्या पारंपारिक काव्यापेक्षा एकदम निराळेपणा आढळून येतो असें जें विधान केलें त्याची प्रचीति येते.

कल्पनाविलास हा भाषाशैलीचा एक भाग झाला. पण त्याबरोबरच वर्णनशैली हाहि एक महत्त्वाचा भाग विचारांत घेतला पाहिजे. शाहि-रांच्या भाषाशैलींत वर्ण्य-वस्तूला सांकार करण्याचें आणि विलक्षण परिणाम-

कारक स्वरूपांत श्रोत्यांच्या नजरेसमोर वर्ण्य-विषय उभें करण्याचें सामर्थ्य आहे. आणि हें भाषेंतील सामर्थ्य त्यांतील आशयाशीं एकरूप झालें आहे. शाहिरांच्या भाषेवर-रामजोशीच्या थोड्या कवितांचा अपवाद सोडला-तर संस्कृतची छाप पडली नाही, किंवा जुन्या कोणत्याहि कवीच्या शैलीचा परिणाम त्यांच्यावर झाला नाही. शब्दाची जी कांहीं जडण घडण आहे ती त्यांची स्वतःची आहे. त्यांत रेखीवपणा नसेल, पण सामर्थ्य आहे. व्युत्पन्नता नसेल, पण कलात्मकता आहे. थोडया शब्दांच्या साहाय्यानें एखाद्या चित्रकाराच्या ऐटीनें शब्दचित्र डोळ्यांसमोर उभें करण्याचें कौशल्य त्यांत आहे. शिवाय भाषेंत जोर आहे—शब्दांत नाद आहे आणि अर्थांत सौंदर्य आहे. रसाप्रमाणें त्यांची शैलीहि बदलती असते. वीर-रसाच्या वेळेला कडकडीत रूप धारण करणारी शैली शृंगार-रसाच्या आविष्कारांत पैंजणाच्या नादाप्रमाणें मधुर बनते. क्वचित् रचना ओबडधोबड असेल, पण त्यांत ओज आहे. डफ तुणतुण्यावर म्हणण्यासाठीं ती रचली गेली असल्यानें त्यांच्या भाषाशैलीला विलक्षण गतिहि पण आहे. शाहिरांच्या भाषाशैलीचीं हीं सर्व वैशिष्टयें थोडयाफार प्रमाणांत सर्व प्रमुख शाहिरांच्या काव्यांतून आढळतात.

थोड्या शब्दांच्या साहाय्यानें व्यक्तिरेखा रेखाटणें हा तर शाहिरांच्या भाषाशैलीचा महत्त्वाचा विशेष. विशेषतः स्त्रीसौंदर्याचीं वर्णनें शाहिरांच्या लावण्यांतून पुष्कळच आलीं आहेत. त्यांपैकी 'कोणतेंहि वर्णन पाहिलें तरी त्यांच्या सामर्थ्याची साक्ष पटेल. त्या स्त्रीच्या सौंदर्य-वर्णनांत बारीकसारीक तपशील घालून ती तिची मूर्ति आपणापुढे उभीं करतात. रामजोशांचें खालील वर्णन तर प्रसिद्धच आहे.

" सुंदरा मनामधें भरली जरा नाहीं ठरली हवेलिंत शिरली
मोत्याचा भांग ।
अरे गड्या ! हौस नाहिं पुरली म्हणोनी विरली पुन्हा नाहीं
फिरली कुणाची सांग ।

जशि कळी सोनचांफ्याची न पडु पाण्याची दृष्टि सोन्याची
ती नार ।
अति नाजुक तनु देखणी गुणाची खाणी उभी नवखणी
चढुन सुकुमार ॥

हें वर्णन वाचतांना विजेच्या वेगानें झटकन् ती सुंदरी आपल्या डोळ्यांसमोरून जात असल्याचा आपणाला भास होत नाही काय?

' लटपट लटपट तुझें चालणें मोठ्या नखऱ्याचें ।
बोलणें मंजुळ मैनाचें ॥

या दोनच ओळींत होनाजींनी त्या स्त्रीचें जिवंत चित्र आपणापुढे उभें केलें आहे. अनेक वेळां पोषाखाचा व अलंकाराचा सूक्ष्म तपशील देऊन त्या व्यक्तिरेखा डोळ्यांसमोर उभ्या केल्या जातात. होनाजीच्या कवितेंतील खालील वर्णन पाहा:—

" बांधीव बुचड्याची लबक पदर अतिसुबक खोविला
तिपदरी वेणीचा ॥
चंदन डहाळीस जसा लपेटा काळे नागिणीचा ॥
मुलतानी भुंवया कशा कमाना जशा, बहार मधीं कुंकवाचे
टिकलीचा ।
नरम ओठ पोकळे, तुझ्या नासाग्री झोक नथणीचा ॥
कंबर बारीकशी बुंद, छाती रुंद, सडक बांधा नाजुक देहीचा ॥
लाजून बसशील दूर, पदर शिरी सरसाउनि युक्तिचा ।
नयनाचा कैरी झोंक, जराशी नोक, कळे न कळे फिरविशी पटा ।

या वर्णनांतील तपशील त्या स्त्रीचें संपूर्ण चित्र श्रोत्याच्या किंवा वाचकांच्या नजरेसमोर उभे करतो. अनंतफंदी, प्रभाकर, परशराम वगैरे इतर शाहिरांच्या काव्यांत स्त्री-सौंदर्य वर्णनाची हीच कलात्मकता आहे. जनानी सौंदर्य हा तर लावणीचा मुख्य विषय. त्यामुळें प्रत्येक शाहीर

असें वर्णन करीत असतांना दुसऱ्यावर मात करण्याचा प्रयत्न करतो आहे कीं काय असें वाटूं लागतें.

जनानी सौंदर्य वर्णन करण्याच्या भरांत मर्दानी सौंदर्याकडे दुर्लक्ष झालें आहे असें नाहीं. त्या वेळच्या मराठा सरदाराचें मोठें रुबाबदार वर्णन अनेकांच्या कवनांतून आलेलें आढळेल. होनाजीने केलेलें खालील वर्णन पाहा:—

तुम्ही दिसतां उमेदवार थोर सरदार फार सुकुमार शिपाईबाणा जी
नांव गांव सांगा कांहो ओळख द्याना जी ।
शिरीं पगडी कंगणीदार आंगावर ज्वाहार कुठील राहणार
कोण परगणा जी ।
तुमचा वारू बहुरंगी चतुर शहाणा जी ॥
वर खड्या पट्याचा जीन कलगी संगीन हातामधें
आणिन राजसबाणा जी
तुमचें रूप जसें हुरमुजी दाणा जी !!
डोईस बांधला चिरा झळकतो हिरा तुऱ्याशेजारीं
शिरपंच कंठी चौकडा पदक तळवटीं गळा माझारीं
मुद्रिके पवित्रे करीं सख्याचें शिरीं शोभे अब्दागिरी ॥

हें सर्व वर्णन वाचतांना त्या वेळचा मराठा सरदार त्याच्या वैभवानिशीं आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. शाहिरांनी वर्णन केलेल्या या सर्व स्त्रिया किंवा पुरुष मराठमोळे आहेत हें विसरून चालावयाचें नाहीं. प्रादेशिक सौंदर्याचे ते प्रतिनिधि आहेत. दक्षिणेकडील नोकझोक व रुबाब त्यांच्या वर्णनांतून ओसंडतो आहे. पंडित–कवींच्या काव्यांत स्त्री–सौंदर्याचीं किंवा पुरुष-सौंदर्याचीं वर्णनें नाहीत असें नाहीं. पण ती पारंपारिक स्वरूपाची आहे. ठराविक उपमा–उत्प्रेक्षांच्या साहाय्याने केलेलीं तीं वर्णनें कोणत्याहि देशांतील सुंदर स्त्री-पुरुषाला लागू व्हावींत. शाहिरांच्या काव्यांत तसें नाहीं. त्यांची चंद्रावळसुद्धा पूर्णपणें मराठमोळा झाली आहे.

महाराष्ट्रीय वेषभूषा, समजुती, मनोवृत्ति, व सौंदर्य शाहिरांच्या स्त्री-पुरुषांच्या वर्णनांतून ठसठशीतपणें दिसतात. म्हणून पंडित-कवींच्या काव्यांतील स्त्री-पुरुषांपेक्षा शाहिरांनी रंगविलेले स्त्री-पुरुष हे आपणाला आपल्यापैकी वाटतात.

व्यक्तिवर्णनांतील त्यांचें हें कौशल्य प्रसंगरेखाटणामध्येहि आढळतें. शाहिरांच्या बहुतेक लावण्या हीं नाट्यगीतें आहेत. स्त्री किंवा पुरुषाच्या तोंडचे उद्‌गार त्यांनी त्या कवनांतून रंगविले आहेत. त्यामुळे त्यांची भाषा रसाप्रमाणें बदलते. विरहिणीच्या दुःखाचें वर्णन करतांना ती कोमल बनेल, रंगेल शृंगाराचें वर्णन करतांना ती उत्तान बनेल, उपरोधाच्या प्रसंगीं ती क्वचित् धारदार बनेल तर वीर-रसाच्या आविष्काराच्या प्रसंगीं ती ओजस्वी बनेल. शाहिरांच्या भाषेंतील हा लवचिकपणा विशेष उल्लेखनीय आहे.

त्याबरोबरच कल्पना परिणामकारक रीतीने व्यक्त करण्यासाठी त्या कल्पनेचा अर्क ज्यामध्ये सामावला असेल असा नेमका शब्द त्या त्या ठिकाणीं वापरण्यांत शाहिरांची कलात्मक दृष्टि चांगली व्यक्त होते. विशेषतः अर्थानुसारी नादमय शब्द निवडण्यांत त्यांनी विशेष कौशल्य दाखविलें आहे. शब्दाच्या केवळ नादांतून त्या त्या शब्दांचा अर्थ आपणापुढे साकार होतो व तीं तीं दृश्यें आपल्या कल्पनाचक्षूसमोर तरळूं लागतात.

" लटपट लटपट तुझें चालणें मोठ्या नखऱ्याचें "

या ओळींत लटपट लटपट हा शब्द किती अन्वर्थक व वेचक आहे याची आपणाला सहज कल्पना येईल.

त्याचप्रमाणें 'डुलत खुलत चाले, झुलत झुलत बोलतां हले हलकडी' यांतील शब्दांची योजनाहि गतीची यथायोग्य कल्पना देणारी आहे. याशिवाय खालील उदाहरणें अर्थानुकूल, नादमय शब्द वापरण्याच्या त्यांच्या सामर्थ्याची चांगली साक्ष देतील.

" झुरझुरून पांजर झालें शरीर निपट "

× × ×

नूतन नारंगी, सजीव सारंगी,
फिरवी गर गर गर गर नयन पटे फांकडी ॥
× × ×
झिर मिर झिर मिर पर्जन्य वरसे मर महिना श्रावण
" श्रवण फुलें श्रवणांत सुढाळित मुक्त घोस ते घवघवती
× × ×
लखलखाट, चकचकाट जैसें दुकान बोहऱ्यांचें ।
× × ×
तथै तथै तननन तननन वेणुरव किंकणी ।
× × ×
चट उठावल्या घनघटा, पडति पटपटा बिंदु कटितटासि बळकट धरा ॥
× × ×
साखळ्यांची खुळखुळ, तोरड्यांची घुळरुळ, मंजुळ छुछुमके ॥
जोडव्यांची सणसण, मासोळ्यांची झणणण, दणणण पाय दमके ॥
हातीं हिऱ्यांच्या मुद्या चमाचम जसे चांदणें फटफटलें ॥

याशिवाय, खड्यांच्या लढाईवरील प्रभाकरच्या पोवाड्यांत आलेले 'झणाझण– टणाटण,ठणाठण' इत्यादि नादयुक्त शब्द युद्धाचें वातावरण निर्माण करण्यास कशी मदत करतात हें आपण पाहिलेंच. अर्थ व ध्वनि यांचा मिलाफ घडवून आणणारे किती तरी शब्द मोठ्या कौशल्याने शाहिरांनी वापरले आहेत. 'कडकडाट, घमघमाट, लखलखाट थरथरले, बडबडले' असे द्विरुक्त शब्द त्या त्या भावनांना विलक्षण उठाव देतात यांत शंका नाही.

नादमय शब्द–रचनेबरोबरच अनुप्रासाचाहि विचार करावयास हवा. अनुप्रास हा शब्दालंकार शाहिरांचा विलक्षण आवडता दिसतो. रामजोशींनी तर अनुप्रासाच्या बाबतींत उच्चांकच गांठला आहे. अर्थ-हानीचा किंवा क्वचित् क्लिष्ट शब्दरचनेचा दोषहि त्यांनी त्यासाठी पतकरला आहे. रामजोशांच्या एका लावणींतील खालील वर्णन वाचाः—

श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि करि रंग हरी हा बाई ।
कुंजांत मातला वसंत सांगुं मी काई ॥

तो कुंजरसाचा पुंज बांधिला गुंज तशामधिं मुरली ।
अति मंजुळ हरिनें वदन सरोजीं धरली ।
थयिंथयिं नूपुरें वाजतीं चरणीं झणत्कृति भरली ।
त्या रासिक व्रजांतील सुंदर तिनुकी सरली ॥

हें एक उदाहरण झालें. पण रामजोशींच्या कोणत्याहि कवनांत तुम्हांला अनुप्रासाचा अतिरेक आढळेल 'सुंदरा मनामध्यें भरली' 'कुंजांत मधुप गुंजारव' किंवा 'साजणी समयिं घरधणी नसत किति उणी' अशासारख्या अनेक लावणींतून अनुप्रास फार चांगला साधला आहे. अनुप्रासाचें हें कौशल्य इतरहि शाहिरांच्या कवनांत थोड्याफार प्रमाणांत आढळतें. होनाजीची 'घडि घडि अरे मनमोहना हांसून गुणीजना देखतां नको बोलूं मशीं" ही लावणी, 'डुलत खुलत चाले, झुलत झुलत बोलतां हाले हलकडी" ही प्रभाकरची लावणी किंवा 'दुमदार कुणाची छान । नवती भरज्वान पुसा रे आली कुठून ॥' ही परशरामाची लावणी पाहिली तर इतर शाहिरांना सुद्धा अनुप्रासाचा तितकाच मोह पडलेला आढळेल अनुप्रासामुळें लावणीला विलक्षण गति येते. त्यांत एक प्रकारचा अंतर्लय साधला जातो. हा या अनुप्रासाचा विशेष आहे. एखाद्या चलच्चित्रपटा-प्रमाणें झर्कन सर्व क्रिया आपणासमोर निघून जातात. हा अनुप्रास बहुधा लावणीचा यति जेथें साधलेला असतो त्या ठिकाणीं बरोबर यावा अशी योजना शाहीर करीत असतात. त्यामुळे शाहीर किंवा तमासगीर ती लावणी डफ-तुणतुण्यावर म्हणत असतांना प्रत्येक यतीच्या ठिकाणीं येणारा तोच वर्ण अतिशय कर्णमधुर व परिणामकारक वाटत असेल यांत शंका नाहीं.

शाहिरी कवनांत—विशेषतः लावण्यांतून—नाम कधी सहसा एकटें येत नाहीं. कोणतें तरी डौलदार विशेषण सोबतीला घेऊन येतें. कित्येक वेळां विशेषणांचा तांडाच नामाच्या जोडीला असतो, त्यामुळे वर्ण्य-विषयाला एकदम उठाव येतो. या विशेषण—विशेष्य जोडीचें आणखी

एक वैशिष्टय असें कीं फारशीचा परिणाम झाल्यामुळे कीं काय अनेकदां विशेष्य प्रथम येतें व विशेषण नंतर येतें. विशेषण–विशेष्यांची ही उलटा-पालट वर्ण्य वस्तूला जास्तच उठाव देते. खालील उदाहरणें याची सहज साक्ष देतील.

"नार नवी तरणी', 'ब्राह्मणी राज्य जोरदार', 'नौति कवळी', 'वय नुतन–नागीण गऱ्हळी' 'पगडी कंगणीदार' 'छबीदार सुरत साजरी', 'नाजुक रुपडें', 'बुंद मुखोटा', 'सुरत पाक देखणा पुरुष' 'नाकीं नथनी झुमकेदार', 'गुलजार नार', 'रुंद छातीवर बुंद गेंद', 'छबीदार सुरत फाकडी', इत्यादि अनेक जोड्या सहज डोळ्यांसमोर येतात. परिणामाच्या दृष्टीने विशेषणाची निवड किती रसिकपणाने केली आहे हें वाचतांनासुद्धा लक्षांत येईल. या जोड्यांतील आणखी एक विशेष म्हणजे विशेषण अनेकदां फारशी आहे व विशेष्य प्राकृत किंवा अनेकदां संस्कृत भाषेंतील आहे. ही मिश्र जोडी मोठी मजेदार वाटते.

फारशी भाषेचा परिणाम तत्कालीन भाषेवर फार मोठया प्रमाणावर झाला होता. शाहिरी कवनांताहि त्यामुळें फारशी शब्द पुष्कळ प्रमाणांत सांपडतात. या शब्दांनी त्यांच्या भाषेला निराळेंच गाहिरें स्वरूप प्राप्त झालें आहे. 'जबर सद्दी', 'फंद–बेबंद', 'आल–बेली', 'फाकडे', 'इष्काची चटक', 'छेल छबेली', 'दर्द', 'छबीदार सुरत–साजरी', 'गुलजार नार', इत्यादि शब्दांमुळे शैलींत चटकदारपणा आलेला आढळेल. भाषाशैलीचा विचार करतांना संस्कृत व फारशी या दोन्ही भाषांचा त्यांच्यावर परिणाम झालेला आढळतो. रामजोशींची भाषा तर संस्कृतप्रचुरच आहे. 'अंबरगतपरि पयोधर' 'पटविघटित कुचतट' 'भवांबुधिपार' 'भूयिष्ठ सुकृत करि पुष्ट'–अशा सारखी संस्कृत शब्द-रचना अनेक ठिकाणीं आढळते. अनंतफंदी, होनाजी व प्रभाकर यांच्या कवनांतून हा संस्कृत भाषेचा पगडा कमी झालेला आढळतो व फारशी भाषेची शब्दसंपत्ति अधिक प्रमाणांत कवनांत शिरूं लागलेली

दिसते. तरी संस्कृत शब्दरचना मधून मधून डोकावतेच. ' पदारविंदा ', ' श्रीमनःकमलशृंगा ', ' दध्योदन ', ' प्रक्षाळण ', अशासारखे शब्द होनाजीच्या लावणींतून येतात. पण त्याचें प्रमाण अल्प आहे. परशराम व सगन यांच्या शैलींत त्यामानानें साधेपणा आहे. पण रामजोशींखेरीज इतर कुणाहि कवीच्या काव्यांत संस्कृत वा फारशी शब्द-योजनेने दुर्बोधता आली नाही. रामजोशींच्यासुद्धा कांहींच कवनांतून थोडाफार दुर्बोधता आली आहे. पण या दुहेरी शब्द योजनेने शाहिरांच्या शैलींत ढंगदारपणा मात्र निश्चित आला आहे. खालील उदाहरण पाहा—

" दिसतसे चटकचांदणी अंगे साजणी मनीं तूं ठसली आमच्या गडे।
छंद लागला तुझा आम्हाला रात्रंदिवस फाकडे ॥

यांतील चटकचांदणी, फाकडे, साजणी इत्यादि शब्दयोजनेमुळे शैलींत एक प्रकारचा डौल आल्यासारखा वाटतो.

रंगाची आसक्ति हाहि शाहिरी प्रतिभेचा एक विशेष दिसतो. निर-निराळ्या रंगांचा त्यांच्या कवनांतून अनेक वेळां उल्लेख येतो. त्यांच्या कांहीं नायिकांना तर एकाच रंगाचा सर्व साज चढवून शृंगार करण्याची हौस आहे. होनाजीची एक नायिका हिरवा साजशृंगार करते, तर दुसरी नायिका लाल रंगाचा साजशृंगार करते. प्रभाकराची एक नायिका पिवळ्या रंगाचा साज-शृंगार करते. मग केवळ वेषभूषाच पिवळी नसते तर दिवाणखाना, पलंग, त्यावरील बिछाना, इतकेंच नव्हे तर झोपाळ्याचे फाणसहि पिवळेच असतात. असा एकरंगी शृंगार करण्याची हौस शाहिरांच्या कांहीं नायिकांत आढळते.

शाहिरी लावण्यांतून रचनेच्या दृष्टीनेहि एक महत्त्वाची गोष्ट आढळते. त्यांची सुरुवात मोठी ठसकेबाज आणि मनाची पकड घेणारी असते. ज्याला आपण ध्रुपद म्हणतो—किंवा लावणीचें तोंड म्हणतो—त्यांतच इतका ठसका असतो कीं त्यावरच श्रोत्यांनी खूण होऊन एकदम माना डुलवाव्या.

आकर्षक व दिलखेचक सुरुवात यावर तर शाहिरांच्या लावणींचें निम्में यश अवलंबून असतें.

" नाजुक रुपडे बुंद मुखोटा नवतीची लाली ।
पदरांतुन वर नजर पाहातीस सात्त्विकपणें खालीं ॥

× × ×

कोण्या ग सुभगाची मदनमंजरी

× × ×

सुंदरा मनामध्यें भरली जरा नाहीं ठरली हवेलिंत शिरली मोत्याचा भांग

× × ×

सोनार शिक्का नवा निघाला पंधरा आणे जरी बट्टा

× × ×

अशा कुठें असतात सखे उभय स्नेहाच्या रीती
एक लुब्ध एक निष्ठुर चित्तीं ।

× × ×

अशी एक ना दोन ! किती तरी ठाशीव व ठसठशीत अशी ' अक्कड कडव्या ' चीं उदाहरणें दाखवितां येतील. डफावर थाप पडली, तुणतुणें सुरू झाले आणि शाहिराच्या तोंडून पहिली ओळ बाहेर पडली कीं ' वाहवा ' म्हणून सर्व श्रोत्यांच्या माना डोलायला लागल्या पाहिजेत, त्यांची वृत्ति बेहोष व्हावयास हवी, असें सामर्थ्य शाहिरांच्या लावण्यांच्या सुरुवातीच्या ' तोंडांत ' असते. आज भावगीतांत जशा पहिल्या दोन ओळींत सर्व भावना एकवटून बाहेर पडलेल्या दिसतात, त्याचप्रमाणें लावणीच्या तोंडांत पुढील सर्व लावणीचा जणूं अर्कच असतो.

या लावण्या किंवा पोवाडे यासाठी त्यांनी वापरलेलीं वृत्तेंहि स्वतंत्र आहेत. पूर्व-परंपरागत चालत आलेल्या वृत्तांचा त्यांनी स्वीकार केला नाही. त्यांचीं अशीं स्वतःचीं नवीन वृत्तें–नवे छंद–त्यांनी निर्माण केले. गेयता हा त्या वृत्तांचा आत्मा आहे आणि त्यांत एक विशिष्ट अन्तर्लय सारखा साधलेला असतो. डफ व तुणतुण्याच्या साथीवर हीं कवनें म्हणावयाचीं असल्याने त्याला तालबद्धता हवीच. त्यांत नियमितपणा

आहे–एक विशिष्ट लय आहे. प्रत्येक ओळींत ठराविक ठिकाणीं थांबण्याच्या जागा आहेत व ज्या ज्या ठिकाणीं असा यति येतो त्या त्या ठिकाणीं अनुप्रासहि साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. पण प्रत्येक ओळीच्या विशिष्ट तुकडयांत अक्षरें बसवितांना शाहिरांनी शब्दांची ओढाताण मात्र पुष्कळ केली आहे. ऱ्हस्व–दीर्घाचा विधि निषेध पाळला नाही.— वाजवीपेक्षा अधिक अक्षरें तुकडयांत कोंबून त्याचा जलद उच्चार करण्यास भाग पाडलें आहे–तर कधी आवश्यक अक्षरांपेक्षा कमी अक्षरें वापरून दीर्घ उच्चार करावयास भाग पाडलें आहे. या कवनांच्या चाली त्यांच्या त्यांनीच निर्माण केल्या आहेत. त्यामुळे या कवनांतील चालींत विविधता खूपच आहे. गेयता हाच मुख्य निकष शाहिरांनी हीं कवनें रचतांना आपल्या डोळ्यांसमोर ठेवला असावा. स्वाभाविकच त्यांत लयबद्धता आलीच. शाहिरांनी शब्दांच्या ऱ्हस्वदीर्घाची किंमत देऊन ती साधली आहे हें खास. शिवाय या चालींत विविधता असल्याने त्यांच्या वृत्तांचें शास्त्र बनविणेंहि कठीण आहे. मात्र हे छंद एके ठिकाणीं शाहिरानेच वर्णन केल्याप्रमाणें अति गोड व गुणीजनांना प्रिय वाटणारे असावेत हें निश्चित. आजहि योग्य चालीवर म्हटलें गेलें तर त्याची गोडी आपणाला जाणवते.

शाहिरी काव्यांतील रस, अलंकार, शैली इत्यादि घटकांचें स्वरूप पाहिल्यावर काव्य या दृष्टीने शाहिरांचीं कवनें निश्चितच उपेक्षणीय नाहीत हें आपल्या सहज लक्षांत येईल. त्याबरोबर ‘ शाहिरांचा जीवन विषयक दृष्टिकोन कोणता होता ? ’ हाहि प्रश्न सहजच आपल्या नजरे-समोर उभा राहतो. ‘ जीवनविषयक दृष्टिकोन ’ हे शब्द मीं वापरले– ‘ जीवनविषयक तत्त्वज्ञान ’ हे शब्द मुदामच वापरले नाहींत. कारण संतांच्या प्रमाणें कोणतेंहि एक विशिष्ट तत्त्वज्ञान सांगण्यासाठी त्यांनी आपलीं कवनें लिहिलीं नाहीत हें स्पष्ट आहे. ‘ रामजोशी ’ च्या ‘ भला जन्म हा तुला लाभला ’ किंवा ‘ नरजन्मामधिं नरा करुन ये ’ अशा-सारख्या कांही लावण्यांतून व अनंत फंदीच्या ‘ फटक्यांतून ’ प्रत्यक्ष

उपदेश व तत्त्वज्ञान दिसून येतें हें खरें; पण ती त्यांची प्रकृति नव्हे 'नाजुक रुपडे बुंद मुखोटा' असणाऱ्या नव्या तरण्या नारींची व सुरत पाक देखण्या पुरुषांची प्रीत रंगविणें, त्यांच्या विरहव्याप्त भावनांचें वर्णन करणें व ज्वानीच्या बहरांतील शृंगार रंगविणें ही त्यांची खरी प्रकृति. संतांच्या वाङ्मयांत आलेल्या प्रपंचविषयक निवृत्तीचें शाहिरांच्या साहित्यांत आलेलें प्रतिबिंब कृत्रिम आहे. त्यांच्या खऱ्या प्रवृत्तींशीं तें सुसंगत नाही. दारधनाचा लोभ सोडण्याच्या त्यांच्या भाषा पोकळ व वरवरच्या वाटतात. उलट—

'सर्व पुढे कांही मिळून राहिल, तारुणपण हें नसें। क्षणभंगुर संसार पळपळ सोन्याचे हो जातसे॥' असाच त्यांचा आदेश आहे. ऐहिक सुखाची लालसा प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत वास करीत असते. स्त्री–पुरुषांना परस्पराविषयीं वाटणारी आसक्ति–ही तर मानवी जीवनांतील अत्यंत प्रबळ भावना आहे. त्या आसक्तीचें वर्णन शाहीर करतात, तरुण स्त्री–पुरुषांच्या सौंदर्याचें मोठें मनोज्ञ दर्शन ते घडवितात आणि त्यांच्या शृंगाराचें उत्तान चित्रहि आपणापुढे उभें करतात. जीवनविषयक कोणतेंहि तत्वज्ञान शिकविण्याचा ते अट्टाहास करीत नाहीत. मानवी प्रीतीचीं विविध चित्रें रंगवून ऐहिक जीवनांतील आनंदाचें व सुखाचें दर्शन आपणाला ते घडवितात. जीवनविषयक त्यांचा दृष्टिकोन हा त्यामुळे प्रसन्न वाटतो.

शाहिरांच्या लावण्या वाचत असतांना आणखी एक गोष्ट लक्षांत येते. स्त्री-पुरुषविषयक शारीरिक आकर्षणाचें चित्रच त्यांनीं अधिक प्रमाणांत रंगविलें आहे. स्त्रीच्या सौंदर्याचें सूक्ष्म व प्रसंगीं उत्तान वर्णन व त्यांचा शृंगार यापलीकडे प्रेमाच्या सूक्ष्म भावनेकडे ते फारसे गेले नाहीत. पतीचा विरह झाल्याने त्यांच्या बहुतेक नायिकांना जें दुःख होत असतें त्याचें कारण मदनशरांनी त्या व्याकुळ झाल्या आहेत, वसंतऋतूचें शुभ्र चांदणें जीवाची तगमग करतें आहे, विरहानलामुळे शरीर झुरून झुरून पांजर झालें आहे, पूर्वीचे विलास आठवत असल्यानें मीलनाची विलक्षण आसक्ति

त्यांच्या मनांत निर्माण झाली आहे. हें सर्व स्वाभाविक वर्णन आहे. पण ही शारीरिक आसक्ति झाली—त्याहून खोल अपार्थिव प्रेमाकडे शाहीर वळले नाहीत. आन्तरिक प्रीतीच्या कोमल व उत्कट भावनांचा आविष्कार त्यांच्या काव्यांतून फारसा दिसून येत नाही. फारसा दिसून येत नाही असें म्हणण्याचें कारण इतकेंच कीं होनाजीच्या कित्येक नायिकांना प्रीतीच्या या दिव्य भावनेची ओळख पटली आहे. ' जगीं बोलतात प्रीत पतंगाची खरी । झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी ' अशी प्रेमाची ओळख तिला पटते.

" तुम्हीं केलें पवित्र मला म्हणवुन पदरीं पडले
फळलें तप पूर्वीचें तव अर्धांगीं जडलें "

अशी जाणीव तिला झाली आहे आणि पतीच्या सहवासांत पवित्र झाल्यावर इतर तीर्थांची काय आवश्यकता असेंहि ती विचारते—

' जसें पुष्प कवळें पक्व होतां अधिक सुवासावें
तसें प्रीतीचें लक्षण दिसतें दिवसेंदिवस झालें ठावें '

अशी दिवसेंदिवस पक्व होत जाणाऱ्या प्रीतीचीहि तिला कल्पना आहे.

' पतिव्रतेचा धर्म पतीची सेवा करावी तिनें
ईश्वर मानुनि पति-सदनीं वर्तें आनंदी वृत्तीनें ॥

या पतिव्रताधर्माचीहि तिला ओळख आहे. परंतु अशा नायिका फार थोड्या. रंगीत महालांत सुखाची शेज पाहतांच रडूं येणाऱ्या, नवतीची बहार फुकट जाते म्हणून दुःख करणाऱ्या व म्हणूनच ' भ्रतार नव्हे दुसमान पुरा ' असें पतीला दुस्मानाप्रमाणें मानणाऱ्या नायिकांचीच संख्या अधिक. याचें कारणहि उघड आहे. लावणी करणाऱ्या शाहिरांची दृष्टि समोर असणाऱ्या बहुजनसमाजांतील श्रोतृवर्गाकडे असे. प्रेमाचे सूक्ष्म धागेदोरे सर्वसामान्य जनतेला आकलन होण्यासारखे नव्हते. त्यामुळेच प्रेमाच्या पार्थिव बाजूवरच शाहिरांना अधिक भर द्यावा लागला

व लोकांच्या अन्तःकरणाला भिडतील अशीं शृंगाराचीं दिलखेचक वर्णनें त्यांना करावीं लागलीं.

पण या शृंगारांतहि अनैतिक शृंगाराचा भाग सुदैवाने फार थोडा आहे. प्रभाकराच्या व इतर कांहीं शाहिरांच्या कवनांतून अशा शृंगाराचीं वर्णनें थोडीं आढळतात—नाहीं असें नाहीं. पण या बाबतींत सुदैवानें सर्व शाहिरांनीं जीवनाच्या नैतिक बाजूकडे दुर्लक्ष केलें नाहीं. जो शृंगार वर्णन केला आहे तो पतिपत्नीचा आहे. विरहाने झुरणारी स्त्री आपल्या पतीच्याच आगमनाची वाट पहात असते व ।

' निजघर सोडुन सखे परके घरीं
जाणे वाटे पद ठेवणें अहिफणावरी ॥'

असेंच तिला वाटत असतें. पति प्रवासाला गेल्यावर सर्व साजशृंगाराचा व सुखोपभोगाचा तिने त्याग केलेला असतो.

" निष्ठा स्वामीपदीं । आम्हां स्त्रियांचें साधन मोठें हेंच जगतामधीं " असा त्यांचा दृष्टिकोन आहे. त्या मानाने पुरुषच अधिक चंचल व लंपट असावेत असें वाटतें. कामविशतेच्या भरांत पत्नीवर केलेला अत्याचार—त्यांची अधीरता—इत्यादींचें वर्णन वाचतांना त्यावेळच्या विलासी वातावरणाचा लोकांवर किती परिणाम झाला होता याची कल्पना येते. हीं वर्णनें अनेक वेळां सदभिरुचीला सोडून केल्यासारखीं वाटतात.

' नका लाऊं जिवलगा प्रीत तुम्हीं परस्त्रीचे ठायीं " अशासारखी किंवा

या इष्काच्या पायीं बुडाले कैक लक्षापती "

अशासारखी जाणीव त्यांना सतत द्यावी लागते. पुरुषांचीं हीं वर्णनें त्यामानाने कमी आहेत. विराहिणींचींच चित्रें आपणाला ज्याअर्थीं शाहिरी वाङ्मयांत अधिक आढळतात त्याअर्थीं त्या काळचे पुरुष अनेक मोहिमांतून पराक्रम गाजविण्यांत गुंतले असावेत, व मोहीम झाल्यावर घरीं परत आलेल्या पुरुषांच्या उच्छृंखल वृत्तीचा थोडा अतिरेक होत असला तरी तो कांहीसा क्षम्य आहे असें वाटल्यावाचून राहात नाहीं.

आणि म्हणून शाहिरांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचा विचार करतांना व त्यांच्या काव्याचें रस-ग्रहण करतांना श्लील-अश्लीलतेच्या फाजील सोवळेपणाच्या कल्पना बाळगून आपणांला चालावयाचें नाही. ज्यांना असा फाजील सोवळेपणा हवा असेल त्यांनी शाहिरी लावण्यांच्या फडामध्ये न येणें बरें. मग अशा सोवळेपणाच्या आहारीं जाऊन उत्कृष्ट काव्यास त्यांना मुकावें लागलें तर त्याला कोण काय करणार? शाहिरांच्या पोवाडे-वाङ्मयाबद्दल कुणाचाहि कांही आक्षेप नाही. पण लावणी-वाङ्मयावर अश्लीलतेचा व अशिष्टपणाचा आरोप नेहमी केला जातो. आजच्या दृष्टीने पाहिलें तर तो आरोप थोडाफार खरा आहे असें म्हणावें लागेल. पण श्लील-अश्लीलतेच्या कल्पना किंवा शिष्टाशिष्टतेच्या आजच्या कल्पना शाहिरांच्या काळावर लादणें योग्य आहे काय? वाङ्मय हें कालसापेक्ष आहे असें आपण एकीकडे म्हणतों व एकीकडे आपल्या काळांतील जीवनमूल्यें जुन्या काळावर लादण्याचा प्रयत्न करतों. शाहिरी काव्याचें मूल्यमापन करतांना शाश्वत अशीं कांही मूल्यें ज्याप्रमाणें आपणाला विचारांत घ्यावयास हवींत त्याप्रमाणें तत्कालीन अशीं कांही जीवनमूल्येंहि विचारांत घ्यावयास हवींत. तीं विचारांत न घेतांना आपण जर त्यांचें मूल्यमापन करूं लागलों तर त्या वाङ्मयावर अन्याय केल्यासारखें होईल. अश्लीलतेबरोबरच सदभिरुचीच्या मर्यादा शाहिरी वाङ्मयाने ओलांडल्या असल्याचा आरोप लावणी-वाङ्मयावर केला जातो. थोडया प्रमाणांत तो खरा आहे. कांहीं कांही लावण्यांतून शृंगाराचें वर्णन करतांना शाहिरांनी संयम सोडला आहे हें अगदी खरें आहे. प्रभाकराच्या कांही लावण्यांनी तर उत्तान वर्णनांचा कळस गांठला आहे. पण ज्या काळांत व ज्या विशिष्ट समाजासाठी ह्या लावण्या रचल्या गेल्या त्या काळाचा तो परिणाम आहे हें विसरून चालावयाचें नाही. कवींनी काळाच्याहि पुढे जाऊन तत्कालीन समाजाची नैतिक पातळी खालावली असेल तर ती उन्नत करण्याचा प्रयत्न करावा-केवळ लोकांचा अनुनय

करण्याचा प्रयत्न करूं नये, या सर्व कल्पना शाहिरांच्या बाबतींत लावतां येणार नाहीत. संतांनी तें कार्य केलें. शाहिरांनी लोकरंजनाचीच भूमिका घेतली होती, लोकोद्धाराची नव्हे. लोकरंजनाच्या भरांत क्वचित् त्यांच्या-कडून अतिरेक झाला असेल तर त्यांचे इतर काव्यगुण लक्षांत घेऊन तो क्षम्य मानला पाहिजे. ग्राम्यता हाहि दोष शाहिरांच्या कवनांत असल्याचा आरोप त्यावर केला जातो. पण शाहिरांनी सर्वसामान्य जनतेसाठी कवनें रचलीं व तेहि सर्वसामान्य जनतेपैकीच होते. पंडित-कवींची संस्कृतनिष्ठ शैली अवलंबून त्यांना चाललें नसतें. आणि तसे ग्राम्य शब्द फार थोडया प्रमाणांत शाहिरी कवनांत आढळतात. ग्राम्यताहि सापेक्ष असते हेंहि या ठिकाणीं लक्षांत ठेवलें पाहिजे. वास्तविक शाहिरी काव्याची तरफदारी करण्याचें आज कारण नाही. त्यांतील सौंदर्य हें स्वयंसिद्ध आहे. पण अनेकदा लावणी वाङ्मयाबद्दल फक्त गैरसमजच रूढ झालेले दिसतात. म्हणून त्यावरील आक्षेपाची कल्पना घ्यावयास हवी आणि ते आक्षेप कोणत्या वृत्तींतून निघाले आहेत हेंहि समजावून घ्यावयास हवें.

शाहिरी वाङ्मयाची सुरुवात स्थूलमानाने शिवशाहीच्या काळांत झाली व पेशवाईबरोबर त्या वाङ्मयाचा शेवट झाला असें जें विधान प्रथमच केलें आहे त्याचा अर्थ इतकाच कीं मराठेशाहीच्या कालखंडांत शाहिरी वाङ्मयाला खरा बहर आला. पहिला उपलब्ध पोवाडा शिव-कालांतील आहे. पण पोवाडा त्यापूर्वीपासूनहि कदाचित् अस्तित्वांत असेल. काळाच्या उदरांत इतकें साहित्य आजपर्यंत नष्ट झालें आहे कीं त्यामुळे कोणत्याहि वाङ्मयप्रकाराच्या उत्पत्तीबाबत निश्चित मत प्रतिपादन करणें कठीण आहे. विशेषतः पोवाडे व लावणी या वाङ्मयासंबंधीं हें विधान विशेष खरें आहे. पोवाडे व लावण्या शाहिरांनी रचल्या व पाठ-परंपरेने त्या जिवंत राहिल्या. पण पुष्कळ वेळां लिहिलीं गेलेलीं हीं बाडें गहाळ झालीं—अनेक कंठगत असलेले पोवाडे व लावण्या विस्मृतप्राय

झाल्या. त्यामुळे शिवकालांतील व त्यानंतरच्या काळांतील अनेक पोवाडे व लावण्या आज उपलब्ध नाहींत. 'अनंतफंदी कवनाचा सागर' म्हणून होनाजीने त्याची स्तुति केली आहे. पण य. न केळकर म्हणतात त्याप्रमाणें त्या सागरांतील एक कळशीहि आज हातीं लागत नाही. अशा स्थितींत शाहिरी काव्याच्या उत्पत्तीबद्दल निश्चित विधान करणें धाडसाचेंच आहे. शिवकालांत त्याचा उदय झाला व पेशवाईच्या उत्तर-कालांत त्यांना बहर आला हें जें स्थूल मानाने विधान केलें आहे तें यासाठींच.

पेशवाईबरोबर शाहिरी वाङ्मयाचा शेवट झाला याचा अर्थ इतकाच कीं पेशवे कालांत शाहिरी वाङ्मयांत जो जोम होता, व जो जिवंतपणा होता तो त्यानंतरच्या कालांत राहिला नाही. शाहिरी काव्याची परंपरा चालू होती, पण ती निःसत्त्व होती. पराक्रम संपला–पराक्रमाचें कौतुक संपलें–तेव्हा शाहिरी कवनांतील पौरुषहि नाहीसें झालें. पोटभरू शाहीर कुणाहि आश्रयदात्याची पोटासाठीं स्तुति करूं लागले. पण १९०० नंतर हा काळ बदलला. पोवाडे वाङ्मयाला पुन्हा बहर येऊं लागला. पारतंत्र्याच्या चिडींतून निघालेले हे पोवाडे अधिक जिवंत व भावनांनी रसरसलेले असें होऊं लागलें. त्यांतून राष्ट्रीय भावना अधिक जाज्वल्य रीतीने प्रगट होऊं लागली. बॅ. सावरकर, शाहीर खाडिलकर, नानिवडेकर इत्यादि नव्या शाहिरांची प्रतिभा राष्ट्रीय भावनेचा नव्या स्वरूपांत आविष्कार करूं लागली. लावणीवाङ्मयाचाहि कांही प्रमाणांत विकास होऊं लागला. पठ्ठे बापूराव याचें नांव या बाबतींत उल्लेखनीय आहे. या लावणी वाङ्मयाचाच थोडाफार परिणाम आजच्या भावगीतांवर झाला. आज काव्यगायकांच्या तोंडीं असलेलीं व रेडिओवर गायिलीं जाणारीं अनेक भावगीतें म्हणजे लावणीवाङ्मयाचा आजचा सुसंस्कृत अवतारच होय.

लोकसाहित्याचें विवेचन करतांना Literature for the people, of the people, by the people हें घोषवाक्य नेहमी उच्चारलें जातें.

लोकांकरितां, लोकांचें व लोकांनीं लिहिलेलें वाङ्मय तें लोकवाङ्मय अशी लोकवाङ्मयाची व्याख्या करावयाची असेल तर शाहिरी वाङ्मयाला यथार्थपणें लोकवाङ्मय ही संज्ञा द्यावी लागेल. शाहीर हे कुणी विद्वान किंवा पढिक पंडित नव्हते. ते लोकांमधून निर्माण झाले व सामान्य लोकांच्या जीवनावर सामान्य लोकांसाठीच त्यांनी कवनें केलीं. त्या दृष्टीने खरोखरीच ते लोककवि होते. आपल्या कडकडीत वाणीने त्यांनी तत्कालीन लोकांचीं मनें तर आपलीशीं केलींच पण आजहि ती वाणी जनतेचें मन रमवितांना आढळेल. तुकारामाचे अभंग ज्याप्रमाणें प्रत्येक वारकऱ्याच्या तोंडीं असतातच त्याचप्रमाणें या सहा शाहिरांचीं कवनें आज प्रत्येक तमाशाच्या फडांत म्हटलीं गेलेलीं आढळतील. तीं ऐकतांना आजहि सामान्य जनतेचें अन्तःकरण उचंबळून येत असतांना आढळेल. मात्र शाहिरांच्या काव्याचें खरें सौंदर्य व खरा परिणाम त्या लावण्या किंवा ते पोवाडे पुस्तकांत वाचून कळणार नाही. त्यासाठी शाहिराच्या फडांत किंवा तमाशाच्या फडांत जावयास हवें. शाहिराची डफावर थाप पडली आहे, तुणतुण्याचे निनाद सगळीकडे घुमत आहेत, अशा वेळीं सारंगी-सारख्या आवाजांत ‘ घडी घडी अरे मनमोहना हासून गुणीजनां देखतां नको रे बोलूं मशीं ।’ असें म्हणत नायिका प्रवेश करते आहे—तिच्या पायांतील पैंजण तिला आपल्या मंजुळ नादाने साथ देताहेत—आणि फडांतील सारे लोक वाहवा म्हणून उत्तेजन देत आहेत—मधूनच चवल्या-पावल्यांचा वर्षाव गाणाऱ्या नटीवर होतो आहे—या वातावरणांत लावण्यांचा परिणाम पाहावा. ‘ लावण्या काय किंवा पोवाडे काय–त्या फडांत बसून ऐकण्याकरिता आहेत, पुस्तकांतून वाचण्याकरिता नाहीत; या विधानाचा प्रत्यय आपणाला त्या वेळीं येईल. आणि खऱ्या अर्थाने शाहीर हे लोक-कवि कसे आहेत याचीहि साक्ष आपणाला त्याच वेळीं पटेल.

जळगांव
६–६–१९५४

—म. ना. अदवंत

शाहिरांच्या
प्रतिभेस —

# अ नु क्र म णि का

| | | |
|---|---|---|
| | १ रामजोशी | १ ते ३२ |
| | परिचय | १ |
| १ | तुळजापूरची भवानी | ५ |
| २ | म्हणे सुभद्रा | ७ |
| ३ | म्हणे रुक्मिणी | ८ |
| ४ | ब्राह्मणी राज्य जोरदार | ९ |
| ५ | दुष्काळ | १० |
| ६ | वसंत | १४ |
| ७ | छेकापन्हुति अलंकार | १६ |
| ८ | विरहातुर गोपी | १८ |
| ९ | श्रीरंग गोपिकोत्संग | १९ |
| १० | झाली तरुणपणाची धूळ | २० |
| ११ | तुम्ही सजणा-सुजणा | २१ |
| १२ | सुंदरा मनामध्यें भरली | २२ |
| १३ | कान्ताला एकान्तीं | २४ |
| १४ | कोण्या ग सुभगाची | २४ |
| १५ | नरदेहामधिं येऊन गड्या | २५ |
| १६ | मंदा किति करशिल हा घरधंदा | २६ |
| १७ | दो दिवसाची तनु हे साची | २६ |
| १८ | मला जन्म हा तुला लाभला | २८ |
| १९ | नरजन्मामधि... | २९ |
| २० | श्रीनाथसद्गुरुपदा | ३० |
| २१ | दैवें ही गांठ बयाबाईची | ३० |
| २२ | पेशव्यांचा शुक्रवार वाडा | ३१ |
| | २ अनंतफंदी | ३३ ते ५५ |
| | परिचय | ३३ |
| १ | खड्यांची लढाई | ३७ |
| २ | शेवटचे बाजीराव | ३९ |
| ३ | यशवंतराव होळकर | ४० |

४ फत्तेसिंग गायकवाड — — — ४२
५ अक्रूर — — — — ४३
६ चंद्रावळ — — — — ४४
७ उपदेशपर फटका — — — ४८
८ दुष्काळ लावणी — — — ४९
९ बाजीराव कारकीर्द लावणी — — ५०
१० लावणी — — — — ५१
११ लावणी — — — — ५२
१२ लावणी — — — — ५३
१३ लावणी — — — — ५४

३ होनाजी बाळ — — — ५६ ते ८९

परिचय — — — — ५६
१ भाळलोचना नागभूषणा — — — ६०
२ घनःशाम सुंदरा — — — ६१
३ श्रीकृष्णतुला — — — — ६२
४ दमयंती-विलाप — — — ६६
५ द्रौपदी-वस्त्रहरण — — — ६७
६ फंदी अनंत कवनाचा सागर — — ६९
७ सवाई माधवराव — — — ७०
८ महादजी शिंदे — — — — ७४
९ नूतन वय दोघांचें — — — ७५
१० विरहव्यात आज सखे — — — ७६
११ गुणिजन गुणमंडीता — — — ७७
१२ हिण माझें प्रालब्ध — — — ७८
१३ पती प्रवासामधें सखे — — — ७९
१४ हार नव्हता मधीं सहात — — — ८१
१५ सहज मनामधें आलें — — — ८३
१६ नाजुक रुपडें — — — — ८४
१७ लटपट लटपट तुझें चालणें — — ८६
१८ तुझ्या प्रीतीचें दुःख — — — ८६

१९ या सृष्टींत दैवाची — — — ८७
२० हीरवी प्राणसख्ये बनलीस — — ८८
२१ आस्त्रीप्रळयंगता तुझी बुध — — ८९

४ परशराम ९० ते १२२

परिचय — — — — ९०
१ उठ झाला प्रातःकाळ — — — ९४
२ सती सुलोचना — — — ९५
३ मानवी जीवनाची कहाणी — — १००
४ काळी—गोरीचें भांडण — — — १०१
५ सतीची कथा — — — — १०२
६ देशस्थितीचा पोवाडा — — — १०३
७ देशस्थितीचा पोवाडा — — — १०४
८ अंधार नगरी बेबंद — — — १०६
९ समाजस्थितिपर पोवाडा — — — १०७
१० सवतीचें भांडण — — — १०८
११ लष्करचें सुख — — — — १०९
१२ दुघड नार — — — — १११
१३ पतिव्रतेची कहाणी — — — ११२
१४ निपुत्रिका — — — — ११४
१५ गर्भवासिनी — — — — ११६
१६ लेकुरवाळी — — — — ११८
१७ नयन सुरेख दोन्ही • — — — १२०
१८ बोले कावळा लवतो डोळा — — १२१

५ प्रभाकर १२३ ते १७०

परिचय — — — — १२३
१. लक्ष्मीपार्वतीचा संवाद — — — १२७
२. मुरली — — — — १२९
३. पंढरीवर्णन — — — — १३१
४. रंगाचा दरबार — — — १३२
५ खड्यांचे लढाईचा पोवाडा — — १३४

६ सवाई माधवरावांचा मृत्यु — १४३
७ निपुत्रिका — १५०
८ गर्भवासिनी — १५१
९ मोहिनी जसी सुरसभेमधीं — १५३
१० डुलत खुलत चाले — १५४
११ गौर गडे जन्मांतरीं पुजली — १५५
१२ नका जाऊं दूर देशीं — १५७
१३ परम परदेश कठिण कान्ते — १५९
१४ पहाट फारच झाली — १६०
१५ वैन्याचे दिवस लोटती — १६२
१६ कंठ तुझा मंजूळ — १६३
१७ दुसरे बाजीराव पेशवे — १६४

६ सगनभाऊ — १७१ ते २००

परिचय — १७१
१ पानपतचा पोवाडा — १७४
२ खडकीची लढाई — १८३
३ दुसऱ्या बाजीरावाचा पोवाडा — १८४
४ प्रतापसिंहावरील पोवाडा — १८६
५ साळू सासऱ्याला जाते — १८७
६ असीं किरे प्रित वाढल — १८८
७ मज पापिणीची दृष्ट — १९०
८ चंद्राचें चांदणें सितल कां उष्ण — १९१
९ कस्तुरीचा सुगंध — १९२
१० निवाडा — १९५
११ मुशाफर — १९६
१२ नार चंचल मनिं घाबरी — १९७
१३ आलें माहेरचें पत्र — १९९

टीपा — २०१ ते २२९
शब्दार्थ — २३० ते २६८

# पैंजण

अनुक्रम ९७६७५
विभाग २७ ; कोटा
क्रमांक ९२८५
नों. दि. २०/२५
... ालय शाखा

—१—

# राम जोशी

'कविराय' म्हणून शाहिरांत ओळखला जाणारा व 'कविराय चमकला हीर, इतर शाहीर काजवे' असा स्वतःचा अभिनानपूर्वक उल्लेख करणारा रामजोशी हा पंडित–कवि व शाहीर या दोन परंपरांना जोडणारा दुवा आहे. आपल्या कवित्वानें, पांडित्यानें आणि बेछूट विलासी जीवनानें रामजोशीचें बहुरंगी व्यक्तिमत्त्व सर्व रसिकांच्या कुतूहलाचा व कौतुकाचा विषय झालें आहे. याचें मूळ घराणें सोलापूरचें. वडील जगन्नाथ जोशी व चुलते अनंत जोशी. दोघेहि विद्वान् व वेदशास्त्रपारंगत. रामजोशीचा थोरला भाऊहि शास्त्रांत पारंगत व व्युत्पन्न कवि. अशा प्रखर विद्वत्तेच्या परंपरेंत व वातावरणांत रामजोशी जन्मलेला. पण या परंपरेचा व वातावरणाचा त्याच्यावर फारसा परिणाम झाल्याचें दिसत नाहीं. रामजोशीचें बालपण अभ्यासापेक्षां उनाडक्या करण्यांत व स्वच्छंदानें वागण्यांतच अधिक गेलें. त्याची तीव्र बुद्धिमत्ता व काव्य करण्याची शक्ति त्याच्या घरासमोर असलेल्या धोंडिबा शाहिराच्या फडांतच अधिक रमूं लागली. तमाशाच्या फडांत बैठक थाटून धोंडिबाला लावण्या करून देण्यांत त्याच्या प्रतिभेला अधिक हौस वाटूं लागली. या त्याच्या स्वच्छंदीपणामुळें जुन्या परंपरेमध्यें मुरलेल्या मुद्गलाला त्याची चीड

आली असल्यास नवल नाहीं. विशेषतः एका शास्त्र्याच्या मुलानं तमाशांत रमावें हें त्याला असह्य झालें आणि त्यानें सन १७७८ मध्यें म्हणजे रामजोशी अदमासें वीस वर्षांचा असतांना, त्याच्यापासून फारकत घेतली. त्या फारकत–पत्रांत 'आपण व तुम्ही एके स्थळीं असतां चालेनासे जाहले, कजिया होऊं लागला यानिमित्त विभक्त जालों,' असें म्हटलें आहे.

भावापासून फारकत होऊन वेगळे निघाल्यानंतर मात्र रामजोशींना अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें. प्रपंचाची जबाबदारी त्यांना योग्य रीतीनें पार पाडतां येईना आणि शेवटीं अनेक टक्के-टोणपे खात तो पंढरपूरला आला व वे. शा. सं. बाबा पाध्ये यांच्याकडे अध्ययनासाठीं राहिला. कांहीं वर्षांत त्यानें तेथें उत्तम विद्या संपादिली आणि एक विद्वान् कीर्तनकार या नव्या नात्यानें तो परत सोलापूरला आला. असें सांगतात कीं त्याचा भाऊ मुद्गल एकदां आजारी असतांना त्याच्या ऐवजीं तो एकदां पुराण सांगावयास आला. लोकांच्या कुत्सित नजरांना व उपहासगर्भपूर्ण भाषणांना दाद न देतां त्यानें अस्खलित व रसाळ वाणीनें व गोड गळ्यानें पुराणाला सुरुवात केली आणि थोड्याच अवकाशांत सर्व सभाजनांचीं मनें जिंकलीं. आणि तेव्हांपासून कीर्तनकार म्हणून त्याची कीर्ति जिकडे तिकडे पसरूं लागली.

त्याच काळांत बाबुजी नाईक बारामतीकरांच्या घरीं मोरोपंतांचा व त्याचा परिचय घडून आला. याहि बाबतींत आख्यायिका अशी आहे कीं, या तमासगिराचें तोंड पाहण्याची व कीर्तन ऐकण्याची मोरोपंतांची तयारी नव्हती. पण 'भला जन्म हा तुला लाभला' या लावणीचा चरण मोरोपंतांच्या कानीं पडला व ते ताबडतोब कीर्तनाकडे आकृष्ट झाले. आणि तेव्हांपासून परस्परांच्या विषयीं परस्परांच्या मनांत विलक्षण आदरभाव निर्माण झाला. मोरोपंत

कागदोपत्रीं ‘ कविप्रवर ’ असें रामजोशांना संबोधीत. रामजोशांच्या अनेक लावण्यांवर तर मोरोपंतांच्या शैलीची छाप पडलेली स्पष्ट दिसते.

यानंतरच्या काळांत रामजोशी कथा-कीर्तनें करीत महाराष्ट्रभर हिंडला. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत पुणेकरांवर तर त्यानें मोहिनी टाकली होतीच, पण बाजीरावहि सरकारवाड्यांत त्याचीं कीर्तनें नित्य करवीत. बाजीरावाकडून त्याला कमींत कमी हजार रुपये मिळाल्याचा उल्लेख आहे. बिदागीरूपानें वेळोवेळीं द्रव्य मिळत होतेंच. पण याशिवाय बाजीरावानें दरमहा पंचवीस रुपयांची नेमणूकहि करून दिली होती असें म्हणतात.

अशा रीतीनें कथा-कीर्तनाच्या द्वारें त्यानें अमाप द्रव्य मिळविलें. पण हा पैसा त्याच्या जवळ टिकला मात्र नाहीं. कारण त्याचा कीर्तनाचा पेशा व त्याचें खाजगी जीवन यांचा परस्परांशीं मेळ नव्हता. रामजोशी कमालीचा व्यसनी व उधळ्या होता. कथा-कीर्तनासाठीं गांवोगांव फिरत असतां एखाद्या संस्थानिकासारखा त्याचा थाट असे. बरोबर चिमा नायकीण म्हणून राख,—शिवाय मोठा शिष्यपरिवार. याशिवाय मोठा घोडा, दोन कुत्रीं, दोन माकडें, दोन राघू, बसण्यासाठीं रेशमी काढणीचा झोपाळा आणि विलासाचीं इतर अनेक साधनें नेहमीं त्याच्या बरोबर असत. शिवाय शाक्त पंथाची दीक्षा घेतल्यानें मद्यपान हाहि नित्याचाच भाग झाला होता.

त्यामुळें पाण्यासारखा पैसा मिळवून रामजोशी शेवटीं दरिद्रीच राहिला. इतका कीं काशीयात्रा करण्याचा हेतु मनांत आला असतांना ‘ आलों रावबाजीपाशीं या कविस घडावी काशी ’ असें म्हणत रावबाजीची त्याला याचना करावी लागली; पण बाजीरावानें त्याला

फारशी मदत केल्याचें दिसत नाहीं. त्यानें आज्ञापत्रें काढून लोकां-कडून परडी जमविण्याचा हुकूम केला. त्याचाहि विशेष उपयोग झाला नाहीं आणि रामजोशीला शेवटीं काशीयात्रा घडलीच नाहीं.

रामजोशीची व बयाबाईची गांठ हीहि त्याच्या जीवनांतील महत्त्वाची घटना असावी. या बाईचा आवाज विलक्षण गोड होता व रामजोशीच्या अनेक लावण्या गोड चालीवर म्हणून लोकप्रिय करण्याचें कार्य तिनें केलें असावें. स्वतः रामजोशी एका लावणींत म्हणतो, "दैवें ही गांठ बयाबाईची मज पडली साची ॥ कविता इजसंगें रंगा आली नानाविध चाली ।..."

अशा रीतीचें बहुरंगी जीवन जगून व आपल्या वाणीनें महा-राष्ट्राला भुलवून रामजोशी १८१३ सालीं स्वर्गस्थ झाला.

* * *

## १ : तुळजापूरची भवानी

भूतळांत जशि या स्थळांत यमुनाचळांत हिमनग बाळा। अशी भुवनत्रयिं कोणती दुजी वेल्हाळा ॥ ध्रु० ॥ मन सुमन करुनि विश्वमन गणुनि रतिरमण शिवाची राणी। ही भजतां देते नित्य सुखाची खाणी। हिचे चरण धरुनि दृढ शरण तया भवतरण अशी शर्वाणी। पावते जना दीनासि पहा निर्वाणीं। आंत दुष्ट रोग परिपुष्ट रोग करि कुष्ट वयाचि न हाणी। हा महिमा कविजन ऐकतील वाखाणी। किति लुळे कितिक आंधळे किती जन खुळे पाय न पाणी। चाळवी तयाही रोग्याची शिराणी। कांचना जपुनि किंचना म्हणाति वंचना करावी ज्याणीं। ही त्याला वंचिती माय मुलुखची शहाणी। क्षण मदोद्धत सदोष ही शुचि उदो उदो ही वाणी। तनुविक्षत करि कल्लोळ तीर्थिचें पाणी ॥ चाल ॥ जान्हवी गायमुख धारा, पडे अखंड। मातला दैत्यगण सारा, करि दुखंड। पाववी वंशविस्तारा, शिरीं शिखंड। निजभक्त जनांची दारा, करि मुखंड। अर्चना तिच्या उपचारा, कधिं न खंड ॥ चाल ॥ किति भुतें सरळ बाहुतें फिरविती सुतेज कुंकुम भाळा। कौड्यांचे खेळती पोत झळाळा ॥ भूतळांत जशि या स्थळांत० ॥ १ ॥

अति लगट तयाला तशी मग सगट जनाला तारी। हे विश्वकुंभिनी माय भक्तिची प्यारी। इथें बसून जनांवर रुसून पाहते कसुन सधन

लाचारी। दुबळ्याची भाकर म्हणे मला ही न्याहारी। नित्य उठुनि छळिति परि तुटुनि पडेना कुठुनि पुरविते ज्वारी। हा महिमा न कळे हिचा पार संसारीं। बेजरव जवळ काय अरब तथापि हि जरव जगामध्यें भारी। छप्पन्न देशिचे लोक लोळती द्वारीं। ही चुक अगर चिंचुका सोडिना चुकविल्या बनजारी। वाटेंतुनि यात्रा आणविते माघारी। ही तुका करित कौतुका नये समतुका हिच्या सुरनारी। येतिल हो कशा पाहा कालच्या पोरी ॥ चाल ॥ मिरविती छबीना नंदी, कधिं तुरंग। धांवती पुढें जनबंदी, बहु सुरंग। कधिं मतंगज छानंदी, हति फिरंग। कधिं पंकज गरुड स्कंधिं, वहन रंग। कधिं हंस मयूर छंदी, धरि करंग ॥ चाल ॥ ही सदा सकळ संपदासहित श्रीपदासही जपमाळा। भक्ताची माय कनवाळू दिसे चिल्लाळा ॥ भूतळांत जशिया स्थळांत० ॥ २ ॥

कुचतटा कसुनि शुचिदटा घाटशिल घटाव करिते माता। भक्ताची वाट पाहातसे येतां जातां। कुणि कसा असो जन पिसा विमानीं बसा म्हणति सुर आतां। या पापनाशि तीर्थात जाउनि नाहतां। कुणि जपा न धरुं कुणि तपा न करुं परि उपाय षण्मुख ताता। या युधोवास वंदिता मुक्ति दे हाता। ही धरा हि कागद दौत सागरास लेखक धाता। परि विष्णुचा महिमा न पुरे वर्णूं जातां। ही माय वदों तरि काय सुरांचा राय तयावर सत्ता। स्नानार्थ धाडिलें अमृतकुंड भूप्रांता। भूयिष्ट सुकृत करि पुष्ट असि हे अष्टतीर्थ रसवत्ता। शितें स्पर्शमात्रेंचि भवाधःपाता ॥ चाल ॥ ध्या मनिं हे दक्षिण काशी, खरि करून। दर्शनांत पातक नाशी, करिं धरून। सांडावी अमरी दासी, हिजबरून। राहतात सुर हिजपाशीं, पद चुरून। कितिएक तयांच्या राशी, मन भरून ॥ चाल ॥ हीं बया नवल काय दया करिल जलद या हरिल भवजाळा। या कृपा-नदीचा न कळे पार खल्लाला ॥ ३ ॥

ही अवा हिचा नित नवा साज किति हवा कविनें बोलावी। कोणत्या नराची दौलत हिशीं तोलावी। कधिं निजून उठते कधिं सुजन बसते

परि असून तेज मोलावी । अशि कोण देवता स्थानाहुनि डोलावी । नवरात्र करुनि दक्पात्ररसाची मात्र ग्रंथि खोलावी । मग मुक्ति तयाला गळां पडुन बोलावी । रणशौंड भार तिसी होड सारिपट झोड नित्य होवावी । ती भक्तवत्सला जाय भक्त बोलावी । ही अशी तरी हिची खुषी अभक्त ही ऋषी त्यास टोलावी । सप्रेम दीन दासार्थ नेत्र ओलावी । ही खरीच तुळजापुरीं अती सुंदरी विश्वगोला वी । मग युक्त हिचें बाळ ही माय सोलावी ॥ चाल ॥ ही मनिं हो चिन्मय बाला, जरि शिरल । काय जुरत यमाच्या बाला, पुढें शिरल । निज गुण जो गाइल त्याला, अनुसरल । तुळजेचें यशोमृत प्याला, नर तरल । दैन्य विपत्ति पापाला, स्थळ नुरल । कविराय म्हणुनि हिचे पाय धरून गुण गाय छंद सुरतळा । या कृपानदीचा न कळे दुर्लभ खळ, घोटितातचि लाळा ॥ ४ ॥

## २ : म्हणे सुभद्रा

मायबापाचा श्रीकृष्णाचा विचार मोडुनि बळिदेवें । दुराग्रहानें निश्चय केला सुयोधनाला मज द्यावे । भाउ नव्हे ग बाई बाउच केवळ भाउनि मनांत उमजावें । वडिल बंधु परि अडिल खोडकर खळाकडिल हें समजावें । हंसा टाकुनि काय वायसा मुक्ताफळ हें अर्पावें । ब्राह्मण ढकलुनि चांडाळाला का म्हण जेऊं घालावें । जन्मांतरिंचा वैरी भाऊ अशावरुनि हें वळखावें । अपाय याला उपाय न सुचे काय करावें विष खावें । दुर्योधन खळ मेला गेला उलथोनि तो पोटभरा ॥ १ ॥

नाऊजीचा निरोप घेउनि गेला तीर्थें हिंड फिरा । कोणी जागा न कळे आहे जागा किंवा नीजसुरा । तडीतापडी किंवा भापडी होउनि गेला काशिपुरा । आवडिनें कीं कावडि नेल्या सेतुबंध रामेश्वरा । गंगा यमुना तपतो तुंगा कृष्णा रेवा हरिद्वारा । यांच्या पुलिनें रम्य साधुच्या मंडळिमध्यें असल खरा । काटक बाई कर्नाटक व्यंकटपति पाहुनि करवीरा । पंढरपुर भूवैकुंठाला आला हरिजन माहेरा । पुंडलिकानें कान फुंकला केला चेल संत पुरा ॥ २ ॥

किंवा अमराधीशें नेला अमरावतिला निजकुमरा । तिलोत्तमा उर्वशी मेनका रंभादिक ज्या सुराप्सरा । असला सुंदर ठसला म्हणुनी भुलवुनि नेला त्यांनीं घरा । तसला बसला घुसला जाउनि फसला तेथें खराखुरा । अथवा झाला असेल साधू शोधुनि सगळी वसुंधरा । प्राणाधिक तो आणा घालुनि आणावा वर पार्थ हिरा । अर्जुन घेउनि कशास कोणा गर्जुन मज भय नाहि जरा । अर्जुन वर्जुन देह विसर्जुन वाटे मजला मृत्यु बरा । तो बैगी मी बैरागिण होउनि जाइन दिगंतरा ॥ ३ ॥

बहर नवतिचा कहर करितसे लहर आलि बाइ धरा धरा । पळ पळ युगसम वाटे अनुभव पहिला वहिनी मनीं स्मरा । काल रात्रिं म्यां स्वप्न देखिलें जणू पूजिते गौरिहरा । गौरव करुनी गौरीनें हा प्रसाद दिधला हारतुरा । कौरवपतिला रौरव होइल बोले ऐशी दिव्य गिरा । जाइल बाइल करुनी येईल ती तुजला ठिक नर नवरा । यती नव्हे यावरुनी गमतो पति अर्जुनजीचा चेहेरा । खुणा पाहतां उणा नसे तिळ कोणा सांगुन तुम्हि होरा । शुभचिन्हें हीं देहीं सांगति कविरायाचा ठिक होरा ॥ ४ ॥

## ३ : म्हणे रुक्मिणी

म्हणे रुक्मिणी सुदेव बाई पाठविला म्यां खरा । परि कधिं येईल वृद्ध मित्र हा मनामधें खरखरा ॥ ध्रु० ॥

तो दिन गेला रात पातली काय सांगु मी तुला । चैन पडेना अग्रु ग माझा कृष्णपदी गुंतला । तांतडि बहु दादाची त्यानें हळदि लावेली मला । देऊं केलें मज त्या मेल्या चैदिपतीच्या मुला । म्यां त्या रातीं केला जीवितसंकल्पचि आपुला ! दुःख सांगतां न ये मनांतिल बापाला आइला । रात जातसे जों जों जिव हा धडपड करुं लागला । अश्रु वाहती न्यनीं सखये गळा भरुनियां आला । त्या मेल्यानें लग्न–समारंभाचा मंडप दिला । कुंडन नगरी उत्सव मन्मनिं दुःखाचळ वाटला ॥ चाल ॥ गडे सांगू या

कर्माची कहाणी । अवकाश थोडका दादा मज नाहणी । परि समयीं झाली सुदैव गति लाहणी । मी पाय पहाया पहिल्यापुन शाहणी । उघडून दृष्टि जों करुं गेलें पाहणी ॥ अकस्मात तो दृष्टिस पडला जसा हरवला हिरा । विप्रमुखश्री कळवी मजला यदुविर आला घरां ॥

## ४ : ब्राह्मणी राज्य जोरदार–

ब्राह्मणी राज्य जोरदार घोडयावर स्वार होते शिपाई । जबर सद्दी कैकांनीं पाहिली शत्रु ठेवले नाहीं ॥ ध्रु० ॥ श्रीमंत पेशवे प्रधान बहु प्रीतीचे । अष्ट प्रधानांमध्यें उतरले मर्जीत महाराजांचे । वसविलें त्यांणिं पुणें शहर दुमदारीचें । जागोजाग बांधले दाट नळ पाण्याचे । ठायीं ठायीं शोभती हौद एक फर्म्याचे । धनी कृपावंत प्रभु कल्याण करी रयतेचें । लंकाच पुण्या-मध्यें लेश न दारिद्याचें । शहरांत घरोघर सावकार गबर घरचें । सरदार एकाहून एक श्रीमंताचे । लढणार शिपाई किती सांगूं मी वाचें । हत्ती घोडे रथ अंबारी थवे पालख्यांचे । सरकारवाड्याभोंतालीं झुलती बाहरीचे । जागोजाग वस्ति भरदार गर्दि बाजार कमति नसे कांहीं । पुणें शहर अमोलिक रचना अशी दुसरी नाहीं ॥ ब्राह्मणी राज्य जोरदार० ॥ १ ॥

उत्तम शोभती पुण्याच्या भंवतालीं बागा । शहरांत हजारों स्वार घोड्यांच्या पागा । भले भले धनत्तर वाडे हवेल्या जागा । आळोआळीं झळकती एकसारख्या रांगा । वर्णितां गोड वाटतें किती तरी सांगा । शहरांत सुखी अवघें क्वचितची भीकमागा । तेहि गेले कोठें धर्मास करिनारे जागा । शिंद्यांचा ज्यान बत्तीस फ्रेंच ना लुंगा । गाईकवाड सरदार येती प्रसंगा । धांवती रणांगणीं मानकऱ्यांचा चुंगा । शिरकेल कोणता काळ कोरण्या भुंगा । सहजांत जिरविती सर्व तयाचा मुंगा । गोखले बापू तरवार-बहादुर लढाईत जाई । शत्रूचि फौज जरजर करितसे लवलाही ॥ ब्राह्मणी राज्य जोरदार० ॥ २ ॥

साक्षात विष्णु अवतार पेशवे कूळ । संपूर्ण महीचे भूप कांपती धाक दरारा प्रबळ । सखोपंत देवराव विठ्ठल नाना काळ । शहाण्यांत साडेतीन शहाणे बुद्धीचे सबळ । सेवेंत सर्वदा श्रीमंतांच्या जवळ । होळकर भोसले शिंदे मानकरी सकळ । तलवारबहादुर करिती शत्रूची राळ । स्वारीच्या भोंवतीं पटवर्धन मंडळ । युद्धांत रणांगणीं जसा आगीचा लोळ । बहुमानी पल्लेदार तोफांचा कल्लोळ । जेजाल जंबुरे बाण करी वळवळ । सरदार सभोंवतीं दाट पसरती तळ। घोरपडे रास्ते सरदार पुरंदरे स्वार पानसे पाही । फडणीस नानांची जरब भूमंडळीं राही ॥ ब्राह्मणी राज्य जोरदार ॥ ३ ॥

पर्वतावरति पर्वतिस्थान वरति चौघडा । पायऱ्या तळापर्यंत जावें धडधडा । अनुष्ठान पंचपक्वान्न पडेना खाडा । पुजारी पुजती उमामहेश्वर जोडा । पीतवर्ण सोन्याच्या मूर्ति नव्हे या बाडा । पहाऱ्यास शिपाई उभे पेटवुनी तोडा । रमणाहि ब्राह्मणासाठी बांधिला केवडा । श्रावणमासिं खर्चतो कोटयावधी तोडा । पुढें तळें त्यामध्यें लहान बेटाचा तुकडा । गणपती त्यांत पलिकडे आंबिल ओढा । ग्रामांत तुळशीबागेंत बेतही जाडा । बुधवार पेठ बेलबाग नजीकचि वाडा । जागोजाग मौज अनिवार नसे अंतपार वर्णु तरि काई । कविराय म्हणे ही धन्य धन्य पेशवाई ॥ ब्राह्मणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई ॥ जबर सद्दी० ॥ ४ ॥

## ५ : दुष्काळ

उगा भ्रमासि वाउगा कशाला युगांत खळ हा कली । कलि मातला सारा धन दारा इच्छि राज्यासही हाकली ॥ ध्रु० ॥ कुणा न कुणि धनि मना येईल तसें जनांसी जन वंचिती । धनानिमित्तें मरती किति गरति धरुनि यवन अन्न चारिती । आठ दिसांमधिं पठाण तिंदा लुटावया धांवती । उठावयाला तकवा नाहीं बकवा सारा धणि चाकर झुंजती । दार वित्त घरदार दिलं तरी मार चुकेना अति । फार वदुं मी काई वधिल्या हो गाई बाटविल्या द्विजसती । फंद मातले धुंद झालि बेबंद बुडाली क्षिति । मंद

१९२० / २१

कारिति मसलतीला मग फसली तिला नावरितां बळ भोगिती। पुंड घरोंघरीं बंड कुणावर दंड कोण बांधिती। खंड कुणाच्या गांवा कुणी घ्यावा द्यावा कुणी कुणाला किती। असा न कोणी पुसावयाला कसा काळ कशी गती। वसावया नच जागा मग पागा गजरथ बागा कुठें राहती। चिका आंत ज्या निका पढविल्या पिकाशिं गळ लाविती। विकावया त्या नेल्या किति मेल्या अबला उरल्या जन चुंबिती। फास गळ्यामधिं बांस पाठिवर लोह हाडा लाविती। मास विप्र लोकांचें तोकांचें वेचिती सांडस घेउनि हातीं। धीर वीर किती अमीर होउनि फकीर भिक मागती। चीर नसे हो आंगा किति सांगावा तो ताप जिभा लाजती। हातिं धरुनि देवता फोडिल्या ल्ताराम भंगिती। गतायु किती झाले किति प्याले विष किति उरले सुख सेविती॥ चाल॥ किति सागरउदकें कुटुंबसह वाव्हले। किति दैवगतीनें काशीसही पावले। किति कर्नाटक देशांत धनिक धांवले। किति अब्रूचे जन तेथचि भांबावले। कैक्रांनीं हिरे बचनाग कैफ चावले। किती उठाउठी भयभीत मरण पावले। किती ब्राह्मणगालही यवनांनीं चावले। कावले जन करितील कांगावले। अति सात्त्विक ते दुष्कर्मीं सरसावले। किती फंद करिती ते बंदांतचि घातले॥ चाल॥ काय समय हा ल्या रुद्रा करिल दया दृष्टि झाकली। भयानका क्षिती झाली घरघाली रुद्रविंशाति जगीं फाकली। उगा भ्रम० ॥१॥

रुसा न कलिवर पुसा मनाला कसा काळ हा तरी। असा जनक्षय कांहो कोणि पाहो संशय कथितों याचेवरी। धराधीश कोणी परास म्हणति करा पातकें बरीं। खराब जन निजकर्में करिति अधर्म राजाची अफतरी। बाप तयाला ताप वृद्धपणिं पाप पुत्र हा करी। शाप देतसे तोही म्हणे नोहे माझा वीर्यज हा तरि अरि। माय टाकिली पाय बांधुनि बायकोसि घे शिरीं। होय कशाचा बेटा तो पेटाऱ्यांतुनि साप काढिला वरी। सून बहिण सासु जे म्हणति तिशीं सुरतवासना धरी। भवन बुडे पापानें

मधुपानें मातुनि माय सुताला वरी । मनीं धरुनि कामिनी मठामधीं मुनी विनय चातुरी । जगीं दाविती बावा परि आंतुनि कावा भोंदुनि खाती पुरी । लेश नसे उपदेश आपुला देश टाकुनि दुरी । केशवार्चन करती वरती परि आंतुनि कर्में नानापरि । असे धूर्त जे तूर्त जगामधिं मूर्त पाप चव धरि । पुतीं मखादिक यांचि व त्याचिं कर्में म्हणूं नको हीं खरीं । वित्त हरिति निरनिमित्त ठेवुनि चित्त अर्थ यावरी । मत्त धण्याशिं चोरी करिति अधिकारी दया कोठुन भूसुरीं । सती म्हणती निजपती त्यजुनि नांदती पराचे घरीं । जिवें मारितां भर्ते त्या वर्ते दुसरें करिति कितिक सुंदरी ॥ चाल ॥ किती कन्या हयविक्रये परम पातकी । एकाची कृती एकास करि घातकी । किती दुर्मतीनें गुरुपत्नीला हाटकी । किती जारण मारण उच्चाटण नाटकी । कितिकांची वाणी मृषा वदुनि हालकी । धनी यास पालखी चाकरास नालकी । कुणि विधवा ठेविती घरांमधिं पाणकी । मित्रास वंचिती मग कोठुन भावकी । अशीं किती पापें जगीं कुणा ठाउकी ॥ चाल ॥ जराक यास्तव करावया स्तव जरा मतिस झाकली । करा श्रवण हो वाचें व्हायाचे ऐशी विधिवाणी भाकली ॥ उगा भ्रम० ॥२॥

चिन्ह वाटतें भिन्न पुढती जे खिन्न जहाले मनीं । भिन्न देह किति करति किति भरती पोटीं श्वानें कंटाळुनी । पहा कितिक जन महागाईनें दहादिशा धुंडुनी । अहा शेवटीं मेले गेले यमलोकाशिं गणावें कुणी । भणाण सारा दणाण झाला कणा पावती सणी । कुणास न मिळे भाजी कुणि करडी राजी मिळो आंबाडी जुनी । मुरक चढती कुणी भूक म्हणती द्विज आधुक तशा ब्राह्मणी । कुकरी शाल शाला कुणीं त्याला उभे राहूं न देती अंगणीं । कदी म्हणती कोणी वडी घालती उडी अन्न पाहुनी । रडविताति किति पोरें किति ढोरें तैशी ओढिती दारांतुनी । पाक हो न हो हाक मारिती भाकर द्या म्हणउनी । टाक मुखामधिं कांहीं मज नाहीं म्हणती अन्न पंधरा दिनीं । जळा पिउनि किति नळांत

फुगले पळांत वपु त्यागुनी। गळा पडुनि किति रडती मरती बालक मुडदे कवटाळुनी। क्षुद्र इतर जे शुद्र तयांवरि रुद्रकोप या क्षणीं। मुद्रस कैंचा त्याला भलत्याला भाकर मागति मुख पसरुनी। चणा अगर नाचणा एकादा धणा मिळे त्यांतुनी। उणा दिवाळी दसरा किति दुष्काळाचा घसरा घ्या पाहुनी। पीठ डाळकुट मीठ दिशावरी नीट पडती जाऊनी। धीट सोशिती कांठी परि पाठी सोडित नच मेल्यावांचुनी ॥ चाल ॥ करितील काय हो अन्नाविण गांजली। ही दुनिया सारी जठराग्नींत भाजली। नच माधुकरिला कोणि तदा लाजली। वेंचिती शितें चिखलांत राड माजली। धनिकाची दौलत आपणांतच सामावली। शेवटीं विळे पळी दिवेलावणा वाजली। यावरी येउनियां देवा का गांजली। कैकांनीं कुटुंबें विष पाजुनि निजविली। ही दुष्काळाची बरी नौबत वाजली। वर्णावी म्हणुनिया कविमनिला डाजली ॥ चाल ॥ काळ कठिण दुष्काळ उडाला काळरीती ठाकली। बाळ वृद्ध लोकांत कुठें कांहीं तरी हो मर्यादा राहिली ॥ ३ ॥

सुधि म्हणति निरवधि काळ त्या मधिं दीड पायली। कधीं ऐकिली चिपटीं कधीं निपटी कोळवीं चोळवी कधिं पाहिलीं। जुना जिन्नस वरी उणा वाटे कुठें कुणांत पत राहिली। मणास रुपये तेरा तेलाला बारा तुपा शपथ वाहिली। गुळ असो तोळाभर आहे की मूळ मिठाचि डली। खूळ लवंगा पैशाच्या सवंगा मीरची पांच दीधली। हुजूर वाणी रुजु तराजु खजुरी ती एकली। खिजुन घेती पैसा देतिल हो कैसा मांखली नच जीमली। गहू म्हणति जे बहु सवंग ते नउ चिपटीं जाहलीं। मऊ नवे जे दाणे बेदाणे झाले अशि दशा साहिली। मका रांड ही आका इला परि शिका कोठडी केली। नको द्वाड एरंडी हे रंडी आठ चिपटीं कधिं ऐकिली। दुकाल त्यामधीं बकाल मंडळी ठकापरिस ठक भली। दुकान घालुनि बसती वरि दिसाति निर्मळ घातुकता वाइली। नितळ सोनिया पितळ म्हणती निज पितळ पुतळी आटली। कुतळ

बुडविलें सोरहि वारे वेळची सराफा रे लाभली। सार हिऱ्याला गार म्हणती सोनार देत पावली। चार शेर तांब्याला कांम्याला म्हणे कासार देत आधेली। पुरे काळ हा नुरे योग्यता विरे निघुन चालली। आहो शालुच्या फरदा चवलीचा खुर्दा काय गोष्ट चांगली ॥ चाल ॥ हें राहो भाजींत बागवान जोडका। पैशाचा एकचि मुळा एकचि दोडका। पैशास मक्याचा कंद एक मोडका। हा कांदा दो पैशास एक बोडका। जळणास रुपया एक लहान खोडका। घोड्यास शिपाई काय करील घोडका। काळानें देश यापरी केला रोडका। मग हत्याराचा उपाय काय थोडका। खाउनी नावद म्हणो नये गोडका ॥ चाल ॥ अजातारिपु रे प्रजा इतःपर मजा वृष्टि शिरकली। दुजी आस न कविरायाची कृति येथूनि उरकली ॥ ४ ॥

## ६ : वसंत

कुंजांत मधुप गुंजारव यमुनातटीं। होरी खेळतो हरी करुनि राधा नट आपण नटी ॥ ध्रु० ॥ लतागुच्छ सुरतरुही तुच्छ वरी रुंजन करिती मधुकरी। विमान वरी दाटल्या उतरल्या गगनीं सुरसुंदरी। सुरताल पखवाज खंजिरी मंजरींत बांसरी। बिन अमृतकुंडली कुणी डफ सारंगीला धरी। नृत्यकृत्य तत्कारतान करताल झुंमकऱ्या अंतरीं। मोरचंग झांजरी पतीसंपत्यही नानापरी। रूप रम्य राधेचें राधावल्लभ आपण धरी। तिलोत्तमा उर्वशी मेनका रंभापरी घाबरी। फागामधीं बागांत मातला वसंत अंतःपुरीं। कवण राधिकापति कवण राधा हे न कळे खरी ॥ चाल ॥ अगे सखेग आनंद मी सांगूं किती ॥ अगे सखे० ॥ एकमेकींवर टाकिती। अगे सखे० ॥ कुंकम अबीर झोकिती ॥ अगे सखे० ॥ पिचकाऱ्या मुखीं मारिती ॥ अगे सखे० ॥ केशर मृगमद उडविती। या रसाचा कोण जाणता सुरनर हातवटी। होरी खेळतो हरी करूनि राधा नट आपण नटी ॥ १ ॥

श्रीहरीचें वय रूप धरूनि राधा नट नागरधणी। पतिवसन बासुरी

मुगुट शिरीं तिळभर नाहीं उणीं । हावभाव नृत्यांत नटाकृति भाव दाविते क्षणीं । मदनमूर्ति सावळी तनु सुकुमार फार देखणी । तथै तथै तननन तननन वेणुरव किंकणी । नृत्यगीतमाधुरी हरीची जाणत कालिया फणी । गर्व-रहित गंधर्व सर्व त्या वसंत संतर्पणीं । कंठीं घालिती मिठी म्हणती राधेला यदुकुलमणी । रास जग जनकास मुखामधें हास हिऱ्याची खणी । बुलाख नथ नासिकीं चमक जशी शुक्राची चांदणी ॥ चाल ॥ अग सखे रंगरसामधीं यदुनायका ॥ अगे० ॥ नच ओळखिती कितिक बायका ॥ अगे० ॥ धरुनि मुरलीच्या गायका ॥ अगे० ॥ सोडिती नयनसायका ॥ अगे० ॥ कुणी म्हणती हरी आयका ॥ अगे० ॥ हें मोठें कीं नवल राधिका ॥ अगे० ॥ धरी नरवर कुचतटीं । होरी खेळतो हरी करूनि राधा नट आपण नटी ॥ २ ॥

वसंतऋतु संतान कुंज ते तरुवर फुलले फुली । किती फिरती गोपिका किती रंगामधीं भिजल्या मुली । शुक पिक बक कोकिळा कामपक्षामधीं पडल्या भुली । मयुर वर नाचती दिली गति कन्यानें आपुली । कुंद मंद मकरंद धुंद पिचुमंद बकुळवन खुलल्या खुली । गुलाब मधु मालती मोगरा बटचंपक मखमली । मंद शीत अति सुगंध पवनासहित कुसुम लाखुली । किती रासमंडळी गुलाल ही लाल ललित पाउली । स्त्रीवेषें हरि होरि खेळतो नवल काय गोकुळीं । अनंत कौतुक करी धरी अवतार कृष्ण माउली ॥ चाल ॥ अगे सखेग रासांत धूम मातली ॥ अगे सखे० ॥ श्रीरंगमूर्ति पातली ॥ अग सखे० ॥ रंगांत तळी घातली ॥ अगे सखे० ॥ गोपिका सकल रातली ॥ अग ॥ ठाउकी न किल्ली आतुली । सत्य सत्य हे भामा रुसली ॥ अगे सखे ॥ कशी येईल शेवटीं । होरी खेळतो हरी करूनि राधा नट आपण नटी ॥ ३ ॥

पुरुषवेष राधा निजवेष कवटाळुनि चुंबिती । हरी म्हणुन गोपिका शुद्ध राधेला आलिंगिती । अंगसंग रतिभंग दंग रंगामधीं किती लाजती । मनीं म्हणती कामिनी नव्हे माधव सुखसंगती । अष्टनायका कृष्ण म्हणून राधेला

कवटाळिती । काय सांगु मी तरी विचित्र होरी मज भासती । सारसाक्षी कंसारी धरुं धांवती । कुणी व्यजन चामरें धरिती पिचकाऱ्या चिपळ्या किती । ज्या रासामधीं गुलाबकेसरी मृगमदनदी वाहती । अशी धुम मातली कळेना कोण गाण गोपी कापती ॥ चाल ॥ अगे सखेग धांवत आलें तुजकडे ॥ अगे सखे० ॥ सांगाया दुःख रोकडें ॥ अगे० ॥ आधींच तुझें वांकडें ॥ अग सखे० ॥ मोठें मज साकडें ॥ अगे० ॥ कपटरूपिणी राधा येऊनि धरील तुझीं हनुवटी । होरी खेळतो हरी करूनि राधा नट आपण नटी ॥ ४ ॥

रासामधिं हरिलागीं समजले भामा रुसली पिशी। निजरूपातें धरीं करी खटपट पट पिवळा कशी । रंगातुनि सदनांत एकटा हरि पोहचे तिजपशीं । सचिंत पशुचे रिति तशी मंचकावरी ते मुसमुशी । हळूच पद चुरुनि तिचें मांडीस देतसे उशी । उठूनि म्हणे भामिनी सवती मजपुढें सोंग मिरविशी । त्या कपट्याचें रूप धरूनि किती रांडेला कवटाळिशी । ठकविशी तसें मजही पाहशी कळेना सये वो मज चौकशी । ऐकुनि हरि म्हणे भोग जाहला गोष्ट करावी कशी । हात जोडोनि तिला म्हणे मी कृष्ण वृष्णींच्या कुशी ॥ चाल ॥ अगे सखे नको संशय धरूं फारसा ॥ अगे सखे ॥ घे क्षणभरी रतिसुखरसा ॥ अगे सखे ॥ करीं कंकण नको आरसा । अग सखेग भामा सुखपडे गारसा । कविरायानें यापरी नेली रासामधीं गोमटी । होरी खेळतो हरी करून राधा नट आपण नटी ॥ ५ ॥

## ७ : छेकापन्हुति अलंकार

राधासखी संवादें छेकापन्हुति आयका । रसिक हो किती चतुर बायका ॥ ध्रु० ॥ अंबरगतपरि पयोधरातें रगडुनि पळतो दुरी । काय हा धीट म्हणावा तरी । तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया हरी । नव्हे गे मारुत मेघोदरीं ॥ १ ॥

सासुसासरा पति यां देखत अधरामृतमाधुरी। घेतसे काय वदावें तरी। तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया हरी। नव्हे गे हा मधुकर पंकज हरी ॥ २ ॥

पटविघटित कुचतटिही वसंतीं हळुच येउनी उरी। शीतल स्पर्श सुगंधित करी। तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया हरी। नव्हे हा मलयागर चातुरी ॥ ३ ॥

सुवर्ण पाहुनि तनुवरी वंचक रात्रीं शिरतों घरीं। हात टाकितसे अंगावरी। तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया तरी। नव्हे हा दस्यु समज अंतरीं ॥ ४ ॥

सुंदर रतिजोगता मिळाला पतिही सुभगा खरी। दुजीला असा मिळेल काय तरी। तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया हरी। नव्हे गे रतिला मन्मथ परी ॥ ५ ॥

गुणवंत कुचावरी लोळे, अति शोभला। तो कृष्ण काय? नव्हे गे हार कळेना तुला ॥ बाई आंगमर्दनीं आति सुखकर वाटला। तो कृष्ण काय? नव्हे गे कर दूतीचा मला ॥ मज शीतळ करितो श्रमी होउनिया मला। तो कृष्ण काय? नव्हे गे व्यसन सुवंशातीला ॥ यापरी निज संतोष वर्णिती पुसतां यदुनायका। लोपवी मुरलीच्या गायका ॥ राधा सखी संवादें छेकापन्हुति आयका। रसिक हो किती चतुर बायका ॥६॥

कंठीं लपटुनि सदा असावी सुभगा गुणशालिनी। वाटते पुष्पवती शोभिनी ॥ वृषभानूची सुता काय ती राधा लिकुच (पृथुल) स्तनी। नव्हे रे माळ आठविली मनीं ॥ ७ ॥ अधर चुंबुनी वंशसंभवा लालस मधुरध्वनी। असावी मुखासी मुख लावुनी ॥ वृषभानूची सुता काय ती राधा लिकुचस्तनी। नव्हे रे मुरली जगमोहिनी ॥ ८ ॥ सरला ती सद्वंशा गौरा आतिशय संयोगिनी। येतसे करीं धरुनि जीवनीं ॥ वृषभानूची सुता काय ती राधा लिकुचस्तनीं। नव्हे रे यष्टी सहचारिणी ॥ नखक्षतानें मृदु

करानें ती नवनवगुणरागिणी। धरावी हृदयीं कवटाळुनी ॥ वृषभानूची सुता काय ती राधा लिकुचस्तनी। नव्हे रे वीणामृदुभाषिणी ॥ विपरित आहे तनुवरी घेतां सुदशा सुखदायिनी। लहानशी शामतनु हारिणी ॥ वृषभानूची सुता काय ती राधा लिकुचस्तनी। नव्हेरे मत्कंबली भोगिनी ॥९॥

वाकडी दिसो परि बहिरंतरीं निर्मला। ती काय राधिका? नव्हे इंदुची कळा ॥ किती मंजुळ वदती रसाळ जीचा गळा। ती काय राधिका? नव्हे गड्या कोकिळा ॥ जी चांगट बससी धरून रसाच्या तळा। ती काय राधिका? नव्हे भुजंगबाळा ॥ यापरि हरि राधेला वर्णुनि पुसतां क्षण लोपवी। चतुर हा यदुकुलपंकजरवी ॥ श्रीकृष्णाची सखी संवादें छेकापन्हुति नवी। ऐकतां जन्म सफळ मानवी। करी हा कवि-रायाहुन कवी ॥ राधासखी संवादें छेकापन्हुति आयका। रसिक हो किती चतुर बायका ॥ १० ॥

## ८ : विरहातुर गोपी

राधा मुखरणमध्यें मिळाल्या आणिक त्या गवळणी। विरहातुर बोलती सख्यांनो गेला यदुकुळभूषणमणी ॥ ध्रु० ॥ कोठें होति जपून विवशी मथुरेमधिं वांकडी। सांड मिळाली कुब्जा त्याला कशी वाटली फांकडी। आम्ही येथें किती रडावें हरि दासींचा गडी। बाळ मित्र म्हणूं नये कासिग बाई तिकडेच दिधली बुडी। याणें जाउनि तिथेंच रहावें ही तर कसि आवडी। यांत सुगर म्हणूं नये जळो वटकिचि किती पाखडी ॥ चाल ॥ आम्ही बुडलों परंतु कुबडी ती तर कुब्जा खरी। यत्न न करतां बसले जागा तिणें मिळविला हरी। साऱ्या आम्ही उदास बसलों बाई यमुनेच्या तिरीं ॥ चाल ॥ या विरहामध्यें कसें जगावें रतिरंगाचा धनी। टाकुनि गेला आम्हांसि आतां कैची वेणीफणी। राधा मु० ॥ १ ॥

ज्याच्यासाठीं आम्हीं पतीची मर्यादा सोडिली। गोष्पद मानुनि दिनांत शतदां यमुना वोलांडिली। कुंजलतेचा महाल मानुनि रमलों

आम्ही मुली। जनांत यांचेसाठीं कुळाची अपकीर्ति साहिली। शेवट केला असा तयानें दासी अवलंबिली। काय करावी दुर्दैवाची गति आम्हां भोवली ॥ चाल ॥ त्याला आमची दया नसो पण लज्जा नाहीं कशी। कोठें होती रांड कळेना कोण सवत घरघुशी। या कपट्याची संगत करुनी पडलों आम्ही फशी। पहिलेपासून ठाउक होता हा नंदाचा गुणी। संगत यासि करूं नये परि मसलत पडली उणी। राधा मु० ॥२॥

प्राणावांचुनि तनु तशा हरिवांचुनि झालें पहा। नवस करा रांडांनो कांहीं तरि देवाला वहा। जोशी पंचाक्षरी जाणतां कुणी एखादा पहा। दैवावर घालवूं नका गे यत्न करावे दहा। रांडेच्या नादास गुंतला पुनरपि येतो न हा। धन्य म्हणा गे सुत नंदाचा कीर्ति मिळविली अहा। याचें आमचें विरुद्ध नसतां कसा कापला गळा। लालुच दाउन गडे बुडविलें याणें आमुच्या कुळा। सोळासहस्र गोपी टाकुनि किति बटकी चालला। गोकुळ सोडुन कविरायानें मथुरेमधिं छावणी। केली याचें निदान ऐका हरि दासाचा ऋणी। राधा मुखरणमध्यें मिळाल्या आणिक ही गवळणी० ॥ ३ ॥

## ९ : श्रीरंग गोपिकोत्संग

श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि करि रंग हरी हा बाई। कुंजांत मातला वसंत सांगुं मी काई ॥ ध्रु० ॥ तो कंजरसाचा पुंज बांधिला गुंज तशामधिं मुरली। अति मंजुळ हरिनें वदनसरोजीं धरली। थयिं थयिं नूपुरें वाजती चरणीं झणत्कृति भरली। त्या रसिकव्रजांतिल सुंदर तितुकी सरली। अति मंद शितल सुगंध जाति निष्पंद मरुत्कृति भरली। ती शोभा नच वर्णवे रमा अवतरली ॥ चाल ॥ रंगांत गोपिच्या पडल्या, किति उड्या। किति रासमंडळीं जडल्या, होत्या सड्या। किति श्रीहरिच्या तोंडीं देति विड्या ॥ चाल प० ॥ या सार सुखा नाहिं पार काय संसार हरीच्या पायीं। या चित्तवृत्तिला दुजे सुचेना कांहीं। श्रीरंग० ॥ १ ॥

तूं जरी रुसुनिया घरीं मंचकावरी बैसलिस भामा। तरि काय हरील उण्या सुरसिका रामा। हा भाग तुझा तरी लाग नको धरुं राग रिझवि गुणधामा। जी रसिक नव्हे ती स्त्री न म्हणावी पामा। किति मुली मिळाल्या झुलीस त्याच्या कुळीं किं कुशल वामा। श्रीमाधवसंगें गडे पुरविती कामा ॥ चाल॥ किति गुलाल केशरि रंगें, भिजविल्या। किति मानवती मदभंगें, निजविल्या। किति देउन रतिसुखसंगें, रिझविल्या ॥ चा० प० ॥ हा हाट हरीचा थाट गोपिला वाट सुचेना कांहीं। या मुखें वदूं किति पिचकाऱ्यांची घाई ॥ श्रीरंग० ॥ २ ॥

मधुकरी पंकजावरी तशा एकसरी धांवल्या रमणी। गेलि उमा रमा सखु साळू मैना चिमणी। चल ऊठ जाउं रंग लूट पडूं नये तूट हरीच्या चरणीं। या परि मग समजुन गेल्या दोघी गडणी। त्यापाशिं मिळाल्या रसीं उतरल्या मुशी नंदजाचरणीं। हा स्त्रीजन परि भगवंत कृपानिधि करणी ॥ चा० ॥ ही वसंतमाधव होरी, कोणि शिका। जरि गातां हरिची थोरी, भवभी कां। जर वर्णन करतां चोरी, करुं नका ॥ चाल० प० ॥ हें पर्व पावलें सर्व नको धरूं गर्व तरी कविराया। धनवान कोणाचे बाप कुणाची माया ॥ ३ ॥

## १० : झाली तरुणपणाची धूळ

झाली तरुणपणाची धूळ। पति नाहीं सेजेवरी सुंदरा रडे मुळमूळ ॥ ध्रु० ॥ हा वसंतऋतु अनिवार। करि मदन शराचा मार बहुत बेजार। आतां काय करूं मी संसार। सर्पापरी गमती गडे गळ्यामधें हार। जासुद करिति येरझार। नाहीं पत्र साजणी कथितें तपसिलवार। या विरहसमुद्रापार। कधीं होईन बाई येति कधीं सरदार ॥ चाल ॥ काय करूं मंचकीं बसून। नाहीं सर्व सौख्य मज असून। बोलूं कुणासवें मी हंसून। अंतरला साजण आला बाई मजला दिसून। मीं चित्त पाहिलें बहुत तयाचें कसून। ओढवलें दैव आतां काय तयावर रुसून ॥ चाल ॥

बाई सर्व सुखाचें मूळ। तो दिलभर मजला होईल कधीं अनुकूळ ॥ १ ॥

सजणाविण झाले दीन। जसा तप्त वाळूमधें तळमळतो मीन। काय सांगूं संचितहीन। नाहीं सये वर्तमान वर्षे झालीं तीन। बाई झालें दुःखाधीन। आतां देह तयाचे चरणावर ठेवीन। कधीं नेत्र भरून पाहीन। हा विलास त्याविण मजला देतों शीण ॥ चाल ॥ नार पतिविण कासि बरि दिसल। पर पुरुष घरामधिं घुसल। मग स्वकीय जन हा हसल। हा शुद्ध भाव जरी माझें मनिंचा असल। तरी सजण सखे मज लौकर नयनीं दिसल। नातरी तो परनारीसी गुंतुन फसल ॥ चाल ॥ एवढयावर न कळे खूळ। पिंगळा सकाळीं शुभ वदला पांगूळ ॥ २ ॥

अशि नार पडली शोकांत। मग तिच्या सखीनें कवळून धरिला हात। म्हणे काय करिशी घात। जाईल सखे तुज आज सखाची रात। हा ध्वनी पडतां कानांत। उघडिलें नेत्र तों जासुद उभा दारांत। घाबरली पुसे हुजरात। कुणीकून आली हो काय सुखाची मात ॥ चाल ॥ स्वारि आली बयाजी कडक। बागांत उतरले भडक। हें ऐकुनि झालि रंग सडक। हर्षानें भेटली सजणाला बेधडक। हरि संकट हेंहि नाग्यास बैसली धडक। टाकून दे कलगी व्यंकटपतीला हुडक। लिंब खासीन टाकुनि गूळ। धोंडि शाहिर कविचा छंद उरावर शूळ ॥ ३ ॥

## ११ : तुम्ही सजणा-सुजणा

तुम्ही सजणा-सुजणा-घ्या आदराचें पान। मज दुबळीचा राखा स्वाभिमान ॥ ध्रु० ॥ तुम्ही कां रुसलां काय चुकलें सेवेला। प्रतिपाळ आजवर तुम्हीं माझा कां केला। नाहीं कधीं मला शब्द दुःखाचा दिला। एकाएकी निष्ठुर कांहो झाला। म्यां धीर धरला कंठीं प्राण उरला। ह्या प्रीतीचें दुःख सांगूं कोणाला। तुजसाठीं सख्या करीन जिवाचें रान। तुम्ही सजणा० ॥ १ ॥

त्वां सजणारे कशी लाविलीस माया। अर्पण तुम्हासीं केली माझी काया। तुमची आमची झाली इमानाक्रिया। अंतर नका मज देऊं स्वामिराया। तूपसाखर भात वाढीन जेवाया। झड घातली राव मी तुमच्या पाया। धन संपत हा जीव करीन कुरबाणा। तुम्ही सजणा० ॥ २ ॥

दो दिवसांत कशी तोडितां प्रीत। सज्जनपणाची अशी कांहो रीत। नरदेहांत या मनुष्यजन्मांत। न चिंतावा कोणाचा घातपात। धनसंपत देईल श्रीभगवंत। संसार घडीचा निर्जिव नाशवंत। हा मृत्युलाभ नाहीं कोणास अधीन। तुम्ही सजणा० ॥ ३ ॥

जैसें यावें तैसें निदान जावें। या भ्रांत दशेची मोडावी निज राव। मन शांतीचा ऐकुन बोधभाव। मग प्राणपतीचा गेला राग सर्व। बाळा बहिरू म्हणे आतां समजावें। हा राग घडीचा याचें काय घ्यावें। कविराजाशीं नको होऊं बेमान। तुम्ही सजणा० ॥ ४ ॥

## १२ : सुंदरा मनामध्यें भरली

सुंदरा मनामध्यें भरली जरा नाहीं ठरली हवेलिंत शिरली मोत्याचा भांग। अरे गड्या हौस नाहीं पुरली म्हणोनि विरली पुन्हा नाहीं फिरलि कुणाची सांग ॥ ध्रु० ॥ जशी कळी सोनचांफ्याची न पडुं पाप्याची दृष्टि सोन्याची ती नार। अति नाजुक तनु देखणी गुणाची खाणी उभी नवखणी चढुन सुकुमार। जशि मन्मथ रति धाकटी सिंहसम कटीं उभी एकटी गळ्यामध्यें हार। अंगिं तारुण्याचा बहर ज्वानिचा कहर मारिते लहर मदन तलवार। पायीं पैंजण झुमकेदार कोणाची दार? कोण सरदार हिचा भरतार? कुलविद्याजडाव टिकली मनामध्यें टिकली नाहीं हटाकिली तेज अनिवार। नाकामध्यें बुलाख सुरती चांदणी वरती चमकती परति हिच्यापुढें फार। चालते गड्या गजाची चाल लड सुटली कुरळे बाल। किनकाप अंगीचा लाल हिजपुढें नको घन माल। शोमवी

दिठोणा गाल हिला जरि गाल विषय भोगाल फिटल तरि पांग। ही शुद्ध इंदुची मतिस नाकळा इतर वाकळा न हिजहुन चांग। सुंदरा मनामध्यें भरली जरा नाहीं ठरली० ॥ १ ॥

सुंदरी मूर्ति मनाची अमृत वदनाची मदन कदनाची विखारी धार। बाहुली कामसूत्रांत मदन नेत्रांत कोक-शास्त्रांत निपुण ही फार। शुक पिक यांणि धरिली लाज जहाले बाज कंठीं आवाज विण्याची तार। ही मन्मथ नवरस हवा काय पहावा बूट व्हावया सफल संसार। कच-घनांत सौदामिनी दिवस यामिनी जपावी मनीं कीं नकळे सार। वेणींत मूद राखडी कोर चोखडी माडीवर खडी विडा रंगदार। माणिकुसुम कर्णं शोभवी मतिस लोभवी मला तरी भवीं वाटली सार। नव्हे सुगंधा प्रौढ बाल दाविते तरुधोताल जित कुंबरु तिचें ताल अप्सरा उणी गुणवान। वाटली मदनकरवाल काय करबाल? कसें ठरवाल? हिचें कनक आंग। धाकुटी म्हणून कैकांची तुम्ही ऐकाची हिणें कैकांची उतरली भांग। सुंदरा मनामध्यें भरली जरा नाहीं ठरली० ॥ २ ॥

भुजबंद छंद नग नवा बसविला जवा तंत ताजवा न बहु नग भार। त्रिवळीं तळीं कांची दाम मौक्तिकोदाम हिचा दरदाम जाणतो मार। नखिं नाखिं मेंदि रंग लाल अंगठी वर लाल बहुत गुलजार चमक हिल्लाल। सोन्याचे पाय जिवंत ढुंबत ढुंबत कीं मदन पुतळी टाकि भूतळीं मंजु झुमकार। सुंदरि म्हणासि बाहेर हिचें माहेर कुठें घरदार। ती उभी जवळ तिची बटकी चढून जा हटकी बोल चाल ठीक माडीवार वार। दैवानें ध्यावी लाधली नार बाधली बहुत साधली विरल कुणिवार। यापरि होउनि बेताल तो तरुणाहि कुनका बाल पुरविला मनाचा ख्याल हा दर्द कठीण बेताल। म्हणुनि टाकाल नाहक बहकाल सुरस रोखाल कुठुन मग सांग। कविराय चमकला हीर लोकजाहीर इतर शाहीर काजवे वांग। सुंदरा मनामध्यें भरली जरा नाहीं ठरली हवेलिंत शिरली मोत्याचा भांग ॥ ३ ॥

## १३ : कान्ताला एकान्तीं

कान्ताला एकान्तीं कधिं पाहूं गे सखये । वाटते असें पुढें जाउनि उभि राहूं गे सखये ॥ ध्रु० ॥ मी तर सासुरवासी म्यां कोणावर रुसावें । सासऱ्या गांवीं हें कांहीं तरी असावें । नणदा सासु जाऊ यांणीं कांहीं मज पुसावें । तीं कांहींच नाहीं हां हुं किति साहूं । कान्ताला एकान्तीं ॥ १ ॥

मजहुनि पति भिडस्त युक्ति कैसी गे करावी । कुठवरी तरि मर्यादा वडिलांची यांणीं धरावी । मी अर्धांगी घरची काय आहें कोणी परावी । काय त्यास खुणाउनि बाहूं सुख लाहूं गे सखये । कान्ताला एकान्तीं ॥२॥

मी द्वादश वर्षांची वय नलगे बाई कळिला । हें तर आठवे वर्षीं कळूं येतें बाई मुलिला । रतिपतीचें भय नाहीं असें कोणा तरि मुलिला । कविराय मति लावूं मन बाहूं गे सखये । कान्ताला एकान्तीं ॥ ३ ॥

## १४ : कोण्याग सुभगाची

कोण्याग सुभगाची मदनमंजरी । सांग सखे सुंदरी ॥ ध्रु० ॥ इच्या सौंदर्याची सीमा । झाली गडे रतिहुनी अति उत्तमा । पाहुनिया मुखचंद्रमा । सखे गडे अमा गमति पौर्णिमा । काय अधराची रक्तिमा । लाजवी नव कुंकुम विद्रुमा । अंगिं वसन जिच्या भर्जरी । कोण्याग सुभ० ॥ १ ॥

मज वाटली विद्युन्नटी । भलिग रुपाची उतरली भटी । उरिं कंचुकि घट तटतटी । टिळक ललाटीं सुधारस घटी । पाहुनि कृश तव कटी । हरीचा कृश कटिमद लटपटी । अशि अनंत गुणगुर्जरी । कोण्याग सुभ० ॥ २ ॥

शिरिं सुंदर नवमाल्लिका । झटति वर मधुकर रस कौतुका । नयनाननखंजन रंजिका । मधुर कंठांत लाजवी पिका । अशी वार्णील कोण सदलिका । इतर कवि कविरायाहुनि फिका । मज वाटतसे निर्जरी । कोण्याग सुभगाची मदनमंजरी । सांग सखे सुंदरी ॥ ३ ॥

## १५ : नरदेहामधिं येऊन गड्या

नरदेहामधिं येऊन गड्या त्वां हित केलें नाहीं। दारधनाचा लोभ सोडशी तर साधल तुज कांहीं ॥ ध्रु० ॥ हरिची माया अगाध जेथें ब्रह्मादिक फसले। तूं तर मानवमनूचें पामर त्यांतहि कामादिक वसले। नाना प्रकारचे विषय मनामधें येडानिया घुसले। काय तुझा तरी पाड गाधिज पाराशरादिक तळीं बसले। या मदनावरी शुकासारखे विरळे कुणी रुसले। बाकी नर या भवाब्धिमध्यें लोळती किती थकले। यासाठीं बा तुला सांगतों सावध मनीं राही। रात्रंदिवस उदकाहुनि चंचळ आयु जात पाहीं। नरदेहामधिं येऊन गड्या त्वां हित केलें नाहीं ॥ १ ॥

तूं म्हणसी या संसारामधिं सुख पाहीन मोठें। परंतु जितकें पाहसिल तितुकें दृश्य सर्व खोटें। अंतिं यमाच्या हातांत गेल्यावरी तूं कुणीकडे तनु कोठें ?। तूं म्हणसि मी चिरायु परि तो काळ मोजी बोटें। ना आइकलें तरी जगतींतलीं या विषमविषाची खिर घोटे। विषयवासना धरशील परि हे नागवितिल साही। तुझीं इंद्रियें तुला बाधक होतिल परिणामीं दाहीं ॥ २ ॥

बाळपणामधिं तनु घालविली खेळुनियां सारी। तरुणपणामध्यें बहार माजला रांड झाली प्यारी। ते तर जातिल निघुन उद्यां गड्या दिवस पहा चारी। मग घालविसी बाहेर पैसा घरची झाली म्हातारी। तेही गेले मग कोण पुसते घरांत दमडी ना ज्वारी। रांड बिघडली फजिती झाली देणेकरी द्वारीं। अशा संकटीं कोण सोडविल तुझ्या मनाला ग्वाही ॥ ३ ॥

वृद्धपणामधिं पुत्रादिक तुज म्हणतील कीं निबरा। आणिकही वाचशिल कुठवर करुन जनाच्या किती कबरा। तुझ्या सुना तुज म्हणतील मेला म्हातारा हा बहु लुबरा। उगाच पडे खाटेवर तुजला कशास व्हाव्या घरखबरा। शक्तिरहित तूं रांड घरांतुनि गळा करुनि

जबरा। दरडाविल मग सोसून पडशील त्यांचा सांभाळुनि उंबरा। जें झालें तें बरेंच झालें अजुनि तूं सावध होई। करुनिया मन सुमन शीघ्र काविराया पदीं वाही ॥ ४ ॥

## १६ : मंदा किति करशिल हा घरधंदा

मंदा किति करशिल हा घरधंदा। विसरून सुखकंदा ॥ ध्रु० ॥ सारा संसृतीचा हाच पसारा। सुत कैची दारा। पारावारांतील जैशा गारा। घेऊनि विचारा। नारायणारे हा विश्व चितारा। भज जगदाधारा। कुंदा शंकुनि रसन मिलिंदा। करशील विषयछंदा ॥ १ ॥

रांडा मोहुनि तुज करतील बंडा। रचुनिया कुभांडा। चांडाळा बुडविसील सुकृतकरंडा। हे अपयश पिंडा। गुंडा म्हणविशी यमाच्या दंडा। कां घेसि वितंडा। सुंदा कां नेणसी ह्या उपसुंदा। किती विषयीं धुंदा ॥ २ ॥

बापा कां धरसिल भवतापा। किती जोडसी पापा। ज्या पाहुनि धरसी मन्मथकोपा। मग करिसी विलापा। चापापरि होउनि नत अनुतापा। धरि शांतिकलापा। छंदा या कृतिनें कवितानंदा। काविराय मुकुंदा ॥ ३ ॥

## १७ : दो दिवसाची तनु हे साची

दो दिवसाची तनु हे साची, सुरतरसाची करुनि मजा ॥ गमजा करितां मनिं उमजाना हें सुख न पुढें पडेल वजा ॥ भाई सावध व्हा ॥ध्रु०॥

आज उद्यांचा पूर नद्यांचा वलयगद्यांचा बहर नवा। उलट्या झाल्या कुलटा रांडा मग कोठिल हो माल पुवा। पाट बसाया ताट रुप्याचें दाट त्यामध्यें दूध-खवा ॥ धना वयाला बसेल घसरा मग विसरा हो गोड खवा ॥ रांडा पोरें वंचक-चोरें जंवर मिळविता तंवर थवा। शितें तंवर तीं भुतें भोंवतीं कोण कुणाचा सखा जिवा। जोंवरि पैसा तोंवरि बैसा मंचकिं म्हणतिल घ्याल हवा। बेटाबेटी हातीं नरोटी देतिल हा

खूप समज ठिवा। पात यांत कीं घात होतसे हात जोडितों हरिसि भजा ॥ फुका सुखाला मुकाल कथितों न कालचा दिन आज दुजा। दो दिवसाची तनु हे साची ॥ भाई सावध व्हा ॥ १ ॥

कनकधनाचा मद मदनाचा वोसरल्यावर रंग फिका ॥ रुका न पदरीं विकाल घर मग विलास भरजरि कुठून हुका। गजरथ घोडा कलगी तोडा पायीं जोडा लाल झुका। तोंडा जाउनी खोडा येईल वसेल एखादा धरमधक्का। सुगंधशाला नरम दुशाला गरम मसाला पान पका। हारतुरे हे बरे न पुढती बूरे हाल खेळाल बुका। कोशकाला नाटक-शाला दासी यांचा घ्याल मुका। कामुक होउनि कां मुकतां परमार्थ-सुखाला देह विका। कदममुलाजायांत मुला जा तुम्हां न लाजा मनिं समजा। दूत यमाचे मूत आणितिल नेला तुमचा बाप आजा। दो दिवसाची० ॥ भाई सावध व्हा ॥ २ ॥

पुरे करा या मजा तेथुनी फौजा झाल्याची रवाना। यमदूताची ढाल विनीवर बाल सफेदी देखाना। पुढें यमाचे खडे दूत हे बडे हरामी समजाना। मारा मारतिल फार कुणी मग मामा काका गौसेना। रांडा आतां मांडा चारिति खांडा म्हणतिल करा चुना। मूल कुणाचें भूल तुम्हांला चूल चालती तंवर म्हणा। तडका येतिल सारे अडका हुडकायाला मरतांना। पीठ गिळेना मीठ मिळेना ऐसें करितिल ऐकेना। वेडा होईल परिजन वेडा म्हणतिल पेढा आठिव जा। अडला भूवरि पडला मग तुम्ही रडला न म्हणा काळ खुजा। दो दिवसाची०॥ भाई सावध व्हा ॥ ३ ॥

सुभा करुनि मनसुभा एखादा उभा करा परिवार भरा। काय तुम्हांला यांत सांचलें अंत वाचलें आयु धारा। दारजनाला हार नगांचे भार मुलिस मुलग्यास तुरा। घाल पुन्हा जरि घ्याल न देतिल तुम्हांस त्यांतील चुरा जरा। कां मरतां धनलोभें फिरतां पुरता याचा शोध करा। कोण तुम्हाला वाली तो वनमाली लाविल पैलतिरा।

लोहधनाच्या जाड कवाडा आड वसा कीं बाडा चिरा। काळ सखत पाताळ तळांतुनि काढिल अंबुधिमाजी शिरा। फार कशाला सार सांगतों बारबार जन्मा नव जा। कविरायाचा बोल नव्हे कीं फोल डोळ ध्यानीं उमजा। दो दिवसाची० ॥ भाई सावध व्हा ॥ ४ ॥

## १८ : भला जन्म हा तुला लाभला

भला जन्म हा तुला लाभला खुलास हृदयीं बुधा। धरिसी तरि हरिचा सेवक सुधा ॥ ध्रु० ॥

चराचरीं गुरु तरावयाला नरा शिरावरि हरी। जरा तरी समज धरीं अंतरीं। हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं। मठाची उठाठेव कां तरी। वनांत अथवा जनांत हो कां मनांत व्हावें परी। हरीचें नांव भवांबुधि तरी ॥ चाल० ॥ काय गळ्यांत घालुनि तुळशीचीं लाकडें। हीं काय भवाला दूर करितिल माकडें। बाहेर मिरविशी आंत हरिशिं वांकडें। अशा भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशी बुधा। हरिरस सांडुनि घेसी दुधा ॥ १ ॥

जाळ गळ्यामधिं माळ कशाला व्याळ काम कोपला। आंतुनि बाहेर म्हणविशी भला। वित्त पहातां पित्त येतसे चित्त पाहिजे मला। असें हरि म्हणतो नुमजे तुला। दांभिक वर संभावित अभ्यंतरीं नाहिंस बिंबला। बहिर्मुख नर नरका लाधला ॥ चाल० ॥ तूं पोटासाठीं करि खटपट भलतिशी। परि भक्तिरसाविण हरि भेटेल काय तुशी। काय मौन धरुनियां गोमुखीला जाळिशी। स्वार्थसुखें परमार्थ बुडविला अनर्थ केला मुधा। न जाणसि कांजी म्हणसी सुधा ॥ भला० ॥ २ ॥

टिळाटोपिवर शिळा पडो या बिळांत करिसी जपा। तथापि न होय हरीची कृपा। दर्भ मुष्टिच्या गर्भी धरूनिया निर्भर पशुची वपा। जाळिशी तिळा तांदुळा तुपा। दंडकमंडलु बंड माजविशी मुंड मुंडिशी तपा। न सार्थक लटक्या साऱ्या गपा ॥ चाल० ॥ ही बार बार तल्वार

येइल काय पुन्हा । ह्या दुर्लभ नरदेहांत ठेविशी कुण्हा । भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा । वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त न द्विधा । सदा हरि कविरायावर फिदा ॥ भला जन्म हा तुला० ॥ ३ ॥

## १९ : नरजन्मामधिं

नरजन्मामधिं नरा करुनि घे नर नारायण गडी । तरिच हे सार्थक मानवकुडी ॥ ध्रु० ॥ बा चौऱ्यांशी लक्ष वेळ संसार पडला गळां । चिंतेचा पिकला मळा । दार धनाचा लोभ टाकुनी झटकर हो मोकळा । हा कसा उकलिसी पिळा । धनानिमित्तें जनापुढें तूं दाविसी नाना कळा । किती तुला मुलांचा लळा ॥ चाल ॥ तूं पडूं नको यांचे भरीं । तुझ्या हें खापर फुटतें शिरीं । तुला मी गोष्ट सांगतों खरी । आतां कर तांतडी । ही पुन्हा नये बा घडी । नरजन्मामधिं नरा० ॥ १ ॥

निपट बावळा या विषयाच्या मागें लागसि कसा । कां होसी बा धड पिसा । वयोधनांची किति चंचळ गति कां धरिशी भरंवसा । हें सकल मनाला पुसा । उदरासाठीं दुर्धनिकांच्या पुढें पसारिशी पसा । किति उगाळशिल कोळसा ॥ चाल० ॥ हें तुला शिकविलें कुणीं । दयाळू नरनारायण धनी । अझुनि तरि करि हीं घोकणी । विषवल्लीची जडी । तूं म्हणशिल साखर खडी ॥ नरजन्मामधिं नरा० ॥ २ ॥

नवस कामना करुनि मनामधिं म्हणशील पुरुषोत्तमा । दे संतत विपुला रमा । विषयवासना तुला तुटेना मानसिं या संभ्रमा । काय पुढें बोलशील अधमा । किति प्रपंचामध्यें फिरुनियां पावसि विफल श्रमा । कां करिशी भजनोत्तमा ॥ चाल० ॥ हें कसें तुला भावलें । करावी अचळा दारामुलें । मिळेना पुढती हें बाहुलें । कविरायाची उडी दाविली भवार्णवाची थडी ॥ नरजन्मामधिं नरा० ॥ ३ ॥

## २० : श्रीनाथसद्‌गुरुपदा

श्रीनाथ सद्‌गुरुपदा, भजा आपदा, काव्यसंपदा, जोड कंसारी। कर विचार पाहे काय आहे संसारीं ॥ ध्रु० ॥ आहे संपत जोंवरी, सर्व तोंवरी, आप्त सोयरीं, चहाती धनधामा। गणगोत येती मग धावुनि काका मामा। विषयामधीं होऊनि दंग, उडविशी रंग; निशिदिनीं संग चढविशी कामा। तनु धन मन खर्चुन तरुण मोहिशी रामा। किती यामधीं जाशिल नटुन, हरा दुर हटुन, गुरुपदीं झटुन, साध निज प्रेमा। कांहीं उमज शेवटीं कोणि न ये बा कामा ॥ चाल ॥ या दुष्कर्मामध्यें सारें वय खचल। हा विचार बारे आतां कधिं सुचल। नरदेहकांच ही न कळे कधिं पिचल। धीर सद्‌गुरुची तूं कास धरी सहवास दुष्कृती सारी ॥ श्रीनाथसद्‌गुरुपदा० ॥ १ ॥

भलताची करिशी अधर्म सोडुनी कर्म, कळेना वर्म, आहे गुरुपाशीं। गुरुकृपेंचि येशी बारे नांवरुपाशीं। सुस्वभाव निजमनीं भाव तरिच निभाव, धरी दृढ भाव, सुसंतापाशीं। ते समूळ छेदितिल प्रपंचसंतापासी। गुरुपाय न करतिल काय, रक्षिती काय मायबापाशीं। त्या शरण जाच पडूं नको यमाच्या पाशीं ॥ चाल ॥ या प्रपंच घोटाळ्यांतुनि रहा तुटक। किती जन्मभरी विषयाची तरी चटक। आतां पुरे पुरे डोहांतुनि चल सटक। हें सर्व मायेचें कटक, यांतुनि इटक करुनि घे अटक, नरतनु सारी। विषयाची कशी अजुनि नयेचि शिसारी ॥ श्रीनाथसद्‌गुरुपदा० ॥२॥

## २१ : दैवें ही गांठ बयाबाईची

दैवें ही गांठ बयाबाईची, मज पडली साची ॥ ध्रु० ॥ कविता इजसंगें रंगा आली। नानाविध चाली। वाणी काय परीक्षा झाली, गाणारी घाली। ऐशि मति नरांत विरळ रसाची, बायकांत कैंची ॥ दैवें ही गांठ ॥ १ ॥

आहे घरोघरीं पुण्यामधिं गाणें, परि खोटें नाणें । आलाप कंठामधिं घेति किराणे, हें लाजिरवाणें । पुण्याविण कविता नच येयाची, शुद्रास कशाची ॥ दैवें ही गांठ ॥ २ ॥

कवितारस मनांत झडकरी यावा, पुण्याचा ठेवा । दाता परि नीरस काय करावा, जन मार्मिक व्हावा । धन्या सत्कविता कविरायाची, रसिकता बयाची ॥ दैवें ही गांठ बयाबाईची म० ॥ ३ ॥

## २२ : पेशव्यांचा शुक्रवार वाडा

### पोवाडा

कृष्णजन्म आनंद वाटतो गोकुळ आज हें पुणें ॥ श्रीमंतांचें मंदिर कांहिं न वसुदेवाहुनि उणे ॥ ध्रु० ॥ अद्भुत कविचा वार पहा हो कृत मंदिर चातुरी ॥ काय कल्पना अचाट शोभा बाहेर तसि भीतरीं ॥ १ ॥ जिकडे तिकडे रंग कटारी खिडक्या जाळ्यावरी । ज्याणें जेथें बसुनि पहावें तेथें सुख अंतरीं ॥ २ ॥ ठांई ठांई हवुद जळाचे अमृतसराचे परी । स्नानें करिती संध्या जप तप किति विप्रांच्या हरी ॥ ३ ॥ जेथें नरनारायण पूजा सांबासह आदरीं । प्रभुच्या हस्तें विप्रभोजनें भोजन ऐका तरी ॥४॥ साग्र कर्दळी दलें तयावरि षड्रस साखरपुरी । भात केशरी भक्षुनि खाद्यें सर्वे वरपिती खिरी ॥ ५ ॥ पक्वदलाचे विडे सुवसनें ज्या त्या वरि मर्जरी । हार गळ्यामधें तुरे लटकती ज्याच्या त्याच्या शिरीं ॥ ६ ॥ गीत कला नर्तनें दिवा निशी सदैव रसमाधुरी । राजसु झाला एक वेळ हा नित्योत्सव मंदिरीं ॥ ७ ॥ ज्या ज्या ऋतुचे जसे यथोचित विलास नाना परी । भागवतांचे थवे नवे किति कीर्तनरस या घरीं ॥ ८ ॥ तळीं धरुनियां शिरींमंदिरा पर्यंकाहि एकसरी । पडदे कुल रेशमी बिछोने जरबाबी झालरी ॥ ९ ॥ कविनें मंदिर कमळ म्हणावें जर ही सरसी पुरी । पंकज मंदिर खरे न कमला राती कमलोदरी ॥ १० ॥ या सदनामधें निरंतर श्री दिवाराति साजिरी । संध्येपासुनि निशांत शोभा दीप तिमिर संहरी ॥ ११ ॥

फाणस कंदिल पोत दुशाखा हिलाल समया तरी । समया अगणित मेणबत्तिचा प्रकाश अंतःपुरीं ॥ १२ ॥ सायंकाळीं सुवास लक्ष्मीसमा फिरति सुंदरी । दांत मंचकी किती कितिक त्या डोले वरि नागरी ॥ १३ ॥ ज्याच्या दामल मुक्ता सत्कुच कंदुक शोभति उरीं । आनंदें क्रीडती नारि किति न कळत या किन्नरी ॥ १४ ॥ सुभोंवत्या अप्सरा पहा हो चिन्ह भासतें कसें । सूक्ष्म दृष्टिनें पाहिल त्याला सत्यचि सर्वहि दिसे ॥ १५ ॥ यास्तव या घरिं कृष्णजन्म हें सत्यचि, लटिकें नसे । टाळ, विणे, किति रुबाब भेरी वाद्यें वाजति रसें ॥ १६ ॥ दानधर्म आनंद पहा हो किति निशिदिनिं होतसे । जेथें नरनारायण वसले स्वयें भक्तिच्या गुणें । तें मंदिर कविराय वर्णितो नको म्हणावें कुणे ॥ १७ ॥

* * *

—२—

# अनंत फंदी

अनंतफंदी हे मूळ नगर जिल्ह्यांत असलेल्या संगमनेर या गांवचे राहणारे. यांचें उपनांव घोलप. हे यजुर्वेदी कौंडण्य गोत्री ब्राह्मण. यांच्या पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा व सराफीचाहि होता. यापलीकडे यांच्या वडिलांचें नांव किंवा त्यांचा उद्योगधंदा यासंबंधीं अधिक माहिती उपलब्ध होत नाहीं. यांचा जन्म सन १७४४ सालीं झाला. बालपणच्या त्यांच्यासंबंधींच्या ज्या अनेक आख्यायिका उपलब्ध आहेत त्यांवरून त्यांचे वडील लहानपणीं निवर्तले असून त्यांच्या विधवा आईनें—राजुबाईनें—यांचें प्रतिपालन केलें असावें असें दिसतें. कुणाचा धाक नसल्यामुळें बालपणीं फंदी अत्यंत खोडकर व उनाड होते. विद्याभ्यास न करतां गांवांत उनाडक्या कराव्यात, रात्र तमासगिरांच्या फडांत काढावी असा त्यांचा क्रम होता. त्यामुळें राजुबाईचें त्याला वळण लावण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले व तिच्याशीं एकदां भांडण होऊन फंदी घरांतून बाहेर पडले. त्याच गांवांत भवानीबुवा नांवाचे एक मोठे साधु होते त्यांच्या मठांत ते जाऊन बसले. राजुबाईहि तेथें आली व आपल्या मुलाच्या तक्रारी सांगूं लागली. ‘ मुलगा अनिवार आहे. उनाड मुलें सोबतीला घेऊन धिंगामस्ती घालीत असतो. लावण्या ऐकण्याचा भारी छंद. रात्रीं प्रहर प्रहर रात्रपर्यंत घरीं येत

नाहीं. इत्यादि तक्रारी सांगून बाबांनीं त्याला कांहीं उपदेश करावा, अशी तिनें त्यांना विनंति केली. आणि आख्यायिका असें सांगते कीं बाबांनीं धोंडा मारून फंदीला घालवून दिलें–पण त्या कृपाप्रसादामुळें अनंतफंदीस कवित्वस्फूर्ति झाली. यांतील तारतम्य येवढेंच कीं बालपणापासून अनंतफंदी कवित्व करूं लागले. त्यांचा वडिलार्जित धंदा गोंधळीपणाचा असल्यानें कवित्व करण्याची विद्या त्यांना अल्प परिश्रमानें प्राप्त झाली असावी. त्या शक्तीवरच तरुणपणांत अनंतफंदींनीं आपला तमाशाचा फड उभा केला. मलकफंदी, रतनफंदी व राघवफंदी असे तिघे या कामांतील त्यांचे साथीदार असावेत असें त्यांच्या लावण्यावरून दिसतें.

तारुण्यांत त्यांनीं निरनिराळ्या प्रांतांत मुलुखगिऱ्या केल्या व लौकिक आणि द्रव्य दोन्हीहि पुष्कळच मिळविलें. ‘ मोठ्या मोठ्या राज्यामाधिं महशूर । जगजाहिर चारी तर्फा ॥ ’ असें त्याचें होनाजी बाळनें वर्णन केलें आहे, आणि तें सार्थ असावेसें वाटतें. मात्र तमाशाच्या धंद्याकडून कीर्तनाकडे ते ज्या वेळीं वळले त्या वेळीं त्यांच्या लौकिकांत अधिकच भर पडली. शृंगारिक लावण्याकडून परमार्थाकडे वळण्यास व कीर्तनकाराचा पेशा पत्करण्यास अहिल्याबाईचा उपदेश कारणीभूत झाला अशी एक आख्यायिका आहे. पण कांहींहि असलें तरी शीघ्र कवित्व, समयसूचकता व रसाळ वाणी यामुळें या पेशांत त्यांनीं चांगलाच लौकिक मिळविला. वयाच्या उत्तर काळांत पुण्यांत त्यांचा विशेष बोलबाला झाला. पुण्यांत फंदी केव्हां आले हें जरी निश्चित सांगतां येत नसलें तरी १७९५ सालीं खर्ड्यांच्या स्वारीच्या वेळीं त्यांचें वास्तव्य पुण्याला होतें व दरबारांत त्यांचा परामर्शहि घेण्यांत आला असावा हें निश्चित. ‘ फंदी अनंत कवनबंध छंद ललकारी श्रीमंताचे दरबारी ’ हा खर्ड्यांच्या लढाईवरील पोवाड्यांतील उल्लेख सूचक आहे. सवाई माधवरावानंतर रावबाजीच्या-

सुरुवातीच्या कारकीर्दीतहि अनंतफंदीचा बराच गौरव झाला असावा असें दिसतें. कारण सवाई माधवरावाच्या मृत्यूपासून ते स्वतः पेशवे-पदावर येईपर्यंतच्या काळांत घडलेल्या सर्व राजकारणावर 'माधव-निधन काव्य' हें काव्य दुसऱ्या बाजीरावानें अनंतफंदीकडून लिहवून घेतलें. पुण्यांत कीर्तनकार या नात्यानें अनंतफंदीनें मिळविलेली लोक-प्रियता व समाजावरील त्यांची पडलेली छाप या गोष्टी लक्षांत घेऊन बाजीरावानें हा खटाटोप केला असावा. प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं 'ही कथा बाजीराव रघुनाथें । लिहून दिधली अपुल्या हातें । त्या पत्राबरहुकूम टीका येथें । कवित्व केलें कवीनें ॥' यावरून या कालांत रावबाजीची अनंतफंदीवर किती मर्जी होती याची कल्पना येते.

पण ती मर्जी पुढें टिकली नाहीं. नंतर १८०६ च्या सुमारास पुण्यांत यशवंतराव होळकरांचा दंगा उसळला व शिंद्यांच्या फौजेचा हडपसरच्या लढाईत पराजय करून व बाजीरावाला कोंकणांत पळावयास लावून पुणें प्रांतांत बरेच दिवस यशवंतराव होळकर यांनीं अंमल गाजविला. अनंतफंदीनें या हडपसरच्या लढाईवर व यशवंतरावाच्या पुणें प्रांतांतील कारभारावर एक पोवाडा रचलेला सांपडतो. त्यामुळें किंवा इतर कांहीं कारणांमुळें बाजीरावाची त्याच्यावर गैरमर्जी झाली व अनंतफंदींनाहि तेथें राहण्यांत विशेष स्वारस्य उरलें नाहीं. 'वडिलांचे हातचे चाकर त्यास न मिळे भाकर' अशी बाजीरावाच्या निंदेनें भरलेलीं कवनेंहि ते गाऊं लागले.

अनंतफंदींनीं अनेक प्रांतांत व राज्यांत लोकप्रियता तर मिळविलीच, पण समकालीन शाहिराकडूनहि स्तुतीचा करभार त्यांनीं वसूल केला. होनाजी बाळनें अनंतफंदीवर लिहिलेली लावणी त्या लोकप्रियतेचें एक महत्त्वाचें गमक आहे.

'फंदी अनंत कवनांचा सागर । अजिंक्य ज्याचा हातखंडा ।' या

कवनांत अनंतफंदीच्या लोकप्रियतेचें त्यानें केलेलें वर्णन मोठें सूचक आहे.

‘ वाचावंत संपत्ति सारखी । बहुतांचें तनमन हरकी ।
लंगेलुंगे कवि भेदरले । अवघ्यावर त्याची गुर्की । ’ हें किंवा
‘ कवन बहुत उदरामधिं भरलें । फणस जसा मोठा कापा ’
हें वर्णन त्याच्या कवित्वशक्तीबद्दल इतर शाहिरांच्या मनांत किती आदर होता याची कल्पना सहज देऊं शकेल.

अशा रीतीनें आपल्या कवित्वशक्तीनें, रसाळ वाणीनें सर्व लोकांच्या अंतःकरणाची पकड घेत अनंतफंदी १८१९ सालीं वयाच्या ७५ व्या वर्षी दिवंगत झाले. आज त्यांचे फटके तर महाराष्ट्रीय रसिकांच्या जिव्हाग्रीं आहेत. पण दुर्दैव येवढेंच ‘ अनंत कवनांचा सागर ’ म्हणून स्तुति केल्या गेलेल्या या शाहिराचें जवळ जवळ सर्व कवन काळाच्या ओघांत लुप्त झालेसें दिसतें. आज केवळ ७ पोवाडे, कांहीं थोड्या लावण्या व फटके यांपलीकडे त्यांचें वाङ्मय उपलब्ध होऊं शकत नाहीं. आणि म्हणून ‘ पुढें मागें ऐसा नसे दुसरा । मृत्युलोकिंचा रहिवासी ’ या होनाजी बाळनें केलेल्या स्तुतीवरच आज आपणाला त्यांच्या योग्यतेविषयीं कल्पना करून समाधान मानून घ्यावें लागतें.

× × ×

## १ : खड्यांची लढाई

(पोवाडा)

\श्रीमंत सवाई नांव पावले। दिव्य तनू जणुं चित्र बाहुलें। विचित्र पुण्योदरीं समावले। नानातें राज्याचे अवले। विधात्यानें नेमून ठेविले। बसल्या जागा कैक छपविले। उन्मत्त झाले तेच खपविले। अति रतिकुल दोरींत ओविले। जगावयाचे तेच जगविले। तमाम शत्रु मग नागविले। तपसामध्यें येश लपविलें। दिल्ली अग्र्या झेंडे रोविले। अटक कर्नाटकांत मोंवले, जिकडे पहावें तिकडे उगवलें, माधवराय पुण्याचीं पावलें, टिपूसारखे मुठींत घावले, मेणापरिस मृदु वांकविले। सवाई तेजापुढें झाकले। पुण्य सबळ उत्कृष्ट फांकलें। नानापुढें बुद्धिवान चकले। कैक त्यांची तालीम शिकले। तरि ते अपक्व नाहीं पिकले, दहा विस वर्षे स्वराज्य हांकिलें, श्रीमंताचें तक्त राखिलें, अक्कलवंत कोठेंहि न थकले। श्रीमंत गर्भी असतां एकले, नानांनीं राज्य ठोकुनि हाकिले, माझे करूनि महाभाव केले, जहाज बुद्धीबळ जवकले, यावत्काळ पावेतों टिकले, श्रीमंत पाहून धनुवर छकले, छोटेखानी कैक दबकले, जे स्वामीचरणांस लुबकले, ते तरले वरकड अंतरले, जे मीपणांत गर्वे भरले, ते नानांनीं हातिं न धरले, ते साहेबसेवेंत घसरले; मग त्यांचें पुण्योदक सरलें, न जन्मले माते उदरीं, घाशिराम कोतवाल त्यावर उलथून पडली ब्रह्मपुरी। सवाई

माधवराव सवार भाग्योदय ज्यांचे पदरीं, यशवंत श्रीमंत पेशवे अपेश तेथें पाणी भरी ॥ १ ॥ श्रीमंताचें पुण्य सबळ कीं, न्यून पडेना पदार्थ एकहि, महान्न झाले भिन्न मनोदय खिन्न करूनी, शत्रुचीं शकलें मध्यें एक चिन्ह उद्भवलें, नबाब झाला सिद्ध करुं म्हणे, राज्य आपण पृथ्वीचें सारें, गनिमाचे मोडुनि पसारे, वकील धाडुनिया परभारें, हळुच लाविले सारे दोरे, म्हणे युद्ध करा धरा हत्यारें, त्यामुळें वीरश्रीच्या मारें, शहर पुण्याच्या बाहेर डेरे, गारपिरावर दिधले डेरे, श्रीमंतांना जयजयकारें, होळकरास धाडिलें बलाउन, छोटे मोठे समग्र येउन, वडिलपणानें जयसंपदा, पाटिल गेले ते विष्णुपदा, जबर त्यांची सबसे ज्यादा, गादीवर दवलतराव शिंदा, बहुत शिपायांचा पोशिंदा, त्याच्या नांवें करूनि सनदा, लष्करि एकहि नाहिं अजुरदा, त्याचे पदरचे जिवबादादा, सुद्धां आणविलें, परशरामभाऊ मिरजवाले, नागपुरांकडुन आले भोसले, बाबा फडके, आप्पा बळवंत, बजाबा बापू, शिलेरकर माधवराव रास्ते, राजे बहादर, गोविंदराव पिंगळे, विठ्ठलसिंग आणिक देव रंगराव वढेकर, गोडबोले, राघोपंत जयवंत पानशे मालोजी राजे, घोरपडे, दाजीबा पाटणकर, अष्ट प्रधानांतील प्रतिनिधि फाकंडे मानाजी मागुन आले, चक्रदेव नारोपंत भले दाभाडे निंबाळकर हे उभेच ठेले, रामराव दरेकर चमकले, वकील रामाजी पाटिल सुकले, मग याशिवाय चुकले मुकले। कोण पाह्याला गेले आपले। तमाम पागे पतके। बेरोजगारी घेउनि कुतुकें। अचाट फौजा मिळूनि आले, वळून गेले। जुळून संगम झाला, तीलक्षाचा एकच ठेला, त्यामधिं नाना ते कुलकल्ला, होणारी शंकर नानाला, बंदुखानी तोफा गरनाळा, वाद्यें रणभेरी कर्णाला, गणित नाहीं शामकर्णाला, मरणालाच नच भीती घोडे, पुढें थकाउनि नानासहवर्तमान पुण्यांत आले, राउत तमाम दुनिया आली पाह्याला, कन्हया माधवराव फुलाचा झेला, पेशव्यांनीं कुच केला, सवेंचि मोंगल सावध झाला, याचा त्याचा पाण्यावरूनी तंटा झाला, तो तंटा त्यांनिच वाढविला, श्रीमंतांनीं करूनि हल्ला, घ्या घ्या म्हणून कैक धुडाउन, दिले

लुढाउन, मोगल गोगलगाय करूनिया, पृथ्वी देईना ठाय, मोकली धाय करित हायहाय, तेव्हां लेंकरा विसरली माय, प्रतापी सवाई माधवराय, मोंगल त्राहे त्राहे करितील माय, करूनि सोडविला गनिमाचा वरपाय, कैक दरपानें खालीं पाहे, किं सर्पासंनिध उंदिर जाय, असा मृदु मोंगल केला, शरण आला मग मरण कसें चिंतावें त्याला, उभयतापक्षीं सल्ला झाला, पुढें मग महाल मुलुख कांहीं देतो घेतो श्रीमंताला, ते आपल्याला, कोण सांगतो आतां पुढें जे उडेल, मातु तेव्हां कळेल कीं आमके महाल अमकी धातु अमकी पांतु, नबाबावर रहस्य राखुनि रंग मारला, पुढें ठेविली अस्ता, रस्ता धरूनि पुण्याचा थाट दुरस्ता, नबाबावर कंबरबस्ता, फिरून आले वळून एक एक नानापरिच्या वस्ता, स्वस्ता दाणा पाणी वाद्यांसह-वर्तमान मश्रु मुलुख कैद करुनियां, श्रीमंतांनीं कारागृहीं ठेविला, तेथुनि पवाडा समाप्त झाला, सब् शहरीं संगमनेरी फंदी अनंत कटिबंद छंद लल्कारी, श्रीमंता दरबारीं । सवाई माधवराव सवाई भाग्योदय ज्याचे पदरीं । यशवंत श्रीमंत पेशवे अपेश तेथें पाणी भरी ॥ २ ॥

## २ : शेवटचे बाजीराव

(पोवाडा)

— वाडिलांचे हातचे चाकर । त्यांस न मिळे भाकर ।<br>
अजागळ ते तूपसाखर । चारुनि व्यर्थ पोशिले ॥ १ ॥<br>
सत्पात्राचा त्रास मनीं । उपजे प्रभूचे मनांतूनि ।<br>
ज्या पुरुषास न कोणी । अधीं त्याला भजावें ॥ २ ॥<br>
तट्टू ज्यास न मिळे कधीं । पालखी द्यावी तयास आधीं ।<br>
मडकें टाकुनि भांड्यांत रांधी ॥ ताटवाट्या भोजना ॥ ३ ॥<br>
द्रव्य देऊन आणिक आणिक । नवे तितके केले धनिक ।<br>
जुन्याची तिंबुनि कणीक । राज्य आपुलें हरविलें ॥ ४ ॥

जो पायलीची खाईल क्षिप्रा । पालखी धावी तया विप्रा ।
निरक्षर एखाद्या विप्रा । त्याला क्षिप्रा चारावी ॥ ५ ॥
एके दिवशीं व्हावी खुशाली । स्वारी पुढें शंभर मशाली ।
एके दिवशीं जैशी निशा आली । मशाला एकही नसावी ॥ ६ ॥
मेण्यांत बसावें जाउनि । कपाटें घ्यावीं लाउनि ।
स्वरूप कोणा न दावूनि । जागे किंवा निजलें कळेना ॥ ७ ॥
हुताशनीच्या सुंदर गांठ्या । शेर शेर साकरेच्या पेट्या
विप्र कंठीं जैशा घंट्या । उगाच कंठ्या घालाव्या ॥ ८ ॥
तशाच राख्या जबरदस्त । सांभाळितां जड होती हस्त ॥
दौलत लुटुनी केली फस्त । हस्त चहूंकडे फिरविला ॥ ९ ॥
तुरा शिरीं केवढा तरी । बहुतची मोठा चक्राकारी ॥
हार गजरे नखरेदारी । सोंगापरी दिसावें ॥ १० ॥
हात हात रेशमी धोतर जोडे । चालतां ओझें चहूंकडे ॥
आंगवस्त्र दाहदां पडे । चरणीं खडे रुतताती ॥ ११ ॥
पोषाख दिधले बाजिरायें । मोच्यास पैका कोठें आहे ? ॥
तैसेच अनवाणी चालताहे । शास्त्री अथवा अशास्त्री ॥ १२ ॥
घडींत व्हावें क्रोधयुक्त । घडींत व्हावें आनंदभरित ॥
घडींत व्हावें कृपण बहुत । घडींत उदार कर्णापरी ॥ १३ ॥
घडींत व्हावी सौम्य मुद्रा । घडींत यावा कोपरुद्रा ।
घडींत घ्यावी क्षणैक निद्रा । स्वेच्छाचारी प्रभू हा ॥ १४ ॥

## ३ : यशवंतराव होळकर

(पोवाडा)

१ सुभेदार यशवंत कन्हया सदा फत्ते करी तलवारी । सवाई यशवंतराव होळकर प्रसन्न मल्हारी हस्त शिरीं ॥ ध्रुवपद ॥

वडील नावकर मल्हार ऐका गर्दी झाली त्यावरती । जे सावध होते परंतु सर्यत केली सरतासरती । भाऊ यशवंतराव बहादर ऐकून घ्याया ह्या कीर्ति । दोन लाख फौजेचा जमाव दों वर्षांमधिं घ्या गणती । बनकस कंपू पठाण कडिये फौजेमधिं नित्य झडती । मान भिडावून देति लढावुन टोपीवाले नाहीं गणती । नागोपंत सरदार शिपाई अनेक उमराव हे बाहेरी ॥ सुमे० ॥ १ ॥

शहर पुण्याशीं यावें ऐसा विचार ठरला फौजेचा । दरकूच घेउनि आघाडी मुक्काम केला फलटणचा । मागून दुसरा गोलपठाणशहा अमदखान मीरखानचा । मार्गीं येतां लढाई संग्राम झाला टोपीवाल्याचा । उद्यां लढाई दुसरी नेमिली आला हल्कारा लष्करचा । खाशासुद्धां करुनि तयारी मुकाम केला जेजूरीचा । किं मल्हाराचें दर्शन घ्यावें मग निर्दाळावे वैरी ॥ सुमे० ॥ २ ॥

सोमवारच्या दिवशीं प्रातःकाळीं लढाई नेमिली । फत्तेसिंग मानी यांणीं तलख लिहून पाठविली । अशी लढाई करा म्हणावें मागें मोहरें नाहीं जाहलीं । टोपीवाले फार हरामी त्यांनीं बहु धुंद केली । सवाई यशवंतराव जाऊन अंगें तरवार चमकविली । दोन लाख फौजेमधिं जाऊन कणसापरि कत्तल केली । तमाम कंपू पळ सुटला चहूंकडे गेले हो पेंढारी ॥ सुमे० ॥ ३ ॥

सवाई मल्हार ऐका गर्दी झाली त्यावरती । बेफाम होते परंतु भली केली सरतांसरती । सवाई यशवंतराव बहादर ऐकून घ्याव्या या कीर्ति । दोन लाख फौजेचा जमाव दोप्रहरांमधिं घ्या गणाति । बंक कंपु पठाण कडवे फौजेमधिं नित्य झडती । मान भिडावून देती लढावून टोपीवाले नाहीं गणती । फत्तेसिंग मान्या कुलअखत्यारी ऐकुनि घ्या या शूर मूर्ति । नागोपंत सरदार शिपाई अनेक उमराव हे बाहिरी । जसा कृष्ण अवतार मुरारी गोपिकांवर कृपा करी ॥ सुमे० ॥ ४ ॥

सुभेदार महाराज प्रतापी नामें ऐक एक मोहोरा। कारभारी ऐकुनि घ्यावे हरनाथाचा कुलकल्ला। शहर पुण्याची नाकेबंदी वागुं देईना पसारा। खटमार मोठा कठिण नाहीं कुठें ऐकिली तऱ्हा। मार देउनि खंडया घेतो चौमुलखामधिं दरारा। वडिला वडिलीं पुरुषार्थ महिमा सवाई यशवंतराव जुरा। अनंतफंदीचे छंद ऐकतां लढाई झाली ही सारी। सुभेदार यशवंत कन्हया सदा फत्ते करी तलवारी। सवाई यशवंतराव होळ्कर प्रसन्न मल्हारी हस्त शिरीं॥ सुभे०॥ ५॥

## ४ : फत्तेसिंग गायकवाड

(पोवाडा)

॥ पुण्यांत बाजीराय बडोद्यांत फत्तेसिंग महाराज। उदार स्वामी सेवक त्यांना कर्णाची उपमा साज॥ ध्रु०॥ इकडे अमृतराय वडील। तिकडेही आनंदराय दादा। इकडे प्रभु बाजीराय तिकडे फत्तेसिंग साहेब जादा। इकडे आप्पासाहेब तिकडे महाराज सयाजी उमदा। इकडे पांच चार वाडे। तिकडेही तसाच महाल जुदा। इकडे स्वामी चाकरीस पलटणें। तिकडे सेवक इंग्रज। उदार स्वामी सेवक त्यांना०॥ १॥ इकडे स्वार शिपाई। तिकडेही तसेच थोडे बहुत। इकडे श्रावणमासीं दक्षिणा। तिकडेही धर्म होत। इकडे आल्या गेल्याचा आदर कारितात यथास्थित श्रीमंत। तिकडेही जो आला गुणिजन तो नाहीं गेला रिक्तहस्त। इकडे पेशवे तिकडे गायकवाड उभयतां शिरताज। उदार स्वामी सेवक त्यांना०॥ २॥ इकडे भरगची पांघरूणें। तिकडेही याहुन चढी। इकडे अन्नशांतीचा तडाखा तिकडेही चालू खिचडी। इकडे आदितवार बुधवार। तिकडेही मांडवींत घडमोडी। इकडे मुळामुठा तिकडे विश्वामित्र जोडी जोडी। इकडे तलाव पर्वतीचा। तिकडे सुरसागर नांव गाज। उदार स्वामी सेवक त्यांना०॥ ३॥ इकडे भूमीवर अंथरुण। तिकडे रेतीमुळें घरोघर

खाटा। इकडे। पैका पुष्कळ तिकडेही सुवर्णाच्या लाटा। इकडे जुना वाडा। तिकडे लहरीपुऱ्याचा बोभाटा। इकडे पुरण वरण। तिकडे चुरमा क्वचित् वरंटा पाटा। इकडे पैठणी लफ्फे। तिकडे उशा जवळ अमदाबाज। उदार स्वामी० ॥ ४ ॥ इकडे हत्ती ,घोडे पालख्या। तिकडेही कमती नाहीं। इकडे रावबाजी तिकडे फत्तेसिंगाजी दाहींदुराई। इकडे जोगेश्वरी। तिकडेही दैवत बेचराई। इकडे देवस्थान। तिकडेही तशीच सांगूं काई। इकडे लोक दक्षणी। तिकडे गुजराथी न्यारी मिजाज। उदार स्वामी सेवक त्यांना० ॥ ५ ॥ इकडे उत्साह गणपतिचा। तिकडे तशीच चंपाषष्ठी। इकडे हरदासाच्या बिदाग्या। तिकडे तशाच भरमुष्टी। इकडे मेघडंबरी। तिकडे तशीच पहा जा दृष्टी। इकडे ओंकारेश्वर। तिकडे मुक्तेश्वर। नवीच सृष्टी। इकडे दिग्गज पाहिलवान तिकडे जेठी कुस्ती रोज। उदार स्वामी सेवक त्यांना० ॥ ६ ॥ इकडे नानाफडणीस। तिकडे सिताराम दिवाण गाज़ी। इकडे पंत सदाशिवा। तिकडे शास्त्री गंगाधर दाजी। इकडे बागमळे। तिकडे हर जिन्नस शाखभाजी। इकडे माती। तिकडे रेती हारफेर जामिनीमाजी। इकडे हौद पाण्याचे तिकडे कुव्यावर मोठी मौज। उदार स्वामी सेवक त्यांना० ॥ ७ ॥ इकडे रावबाजी पंढरीस। आषाढी यात्रेस जातात। तिकडे विसा कोसांवर डाकुरजी पंढरीनाथ। इकडे गंगा जवळ, तिकडेही तसेंच, रेवातीर्थ। इकडे तसेच, तिकडे घटाव दोन्ही कडला यथार्थ। इकडे कडेतोडेवाले तिकडेही तशीच लहज। इकडे अनंत फंदी तिकडेही जाऊनि आला सहज। उदारस्वामी सेवक त्यांना कर्णाची उपमा साज ॥ ८ ॥

## ५ : अक्रूर

१ अक्रूरा गोपी आक्रंदती हरीप्रति ठेवा। मथुरेशीं नको नेऊं पहा रे मथुरेशीं नको नेऊं आमचा प्राणविसांवा ॥ ध्रु० ॥ येऊन गोकुळीं अवतरला दीनबंधु। तेपासुनि अवघे आनंदले गोपबंधु। त्रैलोक्यामाजी द्रुम-

दुमिला आनंदु। हें क्षीरसागरिचें निधान ब्रह्मानंदु। हा भक्तांना कनवाळू गोकुळा बाई। अक्रूरा याविना गोपी धृतराष्ट्र न दिसे कांहीं। मथुरेशीं कसा नेतां समुद्रजावाई। या हरिवांचुनि आम्ही मृत्यु पावलों लवलाही। हा पुतनारी घननीळ हत्तीचा छावा। आमचा प्राणविसांवा ॥ १ ॥ मथुरेशीं कंस कसा रिपु निर्मिला हरिचे साठीं। धाडिलें तुम्हातें आणावया जगजेठी। अक्रूर पण तुम्ही क्रूर भासतां पोटीं। निष्ठुर हा तुमच्या हृदयीं विषाच्या गोटी। आधीं समस्त गोपींचे प्राण वधावे। मग स्वस्तिक्षेम मथुरेशीं हरीला न्यावें। हरि गेल्यावर राहून आम्हीं काय करावें। म्हणुनि स्वहस्तें आम्हांशी मारुनि जावें। या मुरारीचा दचका प्राणाशीं नसावा। आमुचा प्राण० ॥ २ ॥ अक्रूर म्हणे पुरुषोत्तम सर्वां ठायीं। भरुनि उरलासे तुम्हाशीं ठावा नाहीं। हा जळिं काष्ठीं पाषाणीं शेषशायी। कंसालागीं हरी हा वधील एके घाईं। ही तुम्हास भासती याची लहान पराई। परि हा प्रळयाग्नि कैक बांधिल पायीं। हा सर्वांचा देह असुनि विदेही। गोपीहो तुम्हाला भ्रांत पडली एव्हां। आमचा प्राण० ॥ ३ ॥ अक्रूरा तुम्हि इतुकें बोललां असत्य। कळलें ये समयीं तूं कंसाचा भृत्य। वचनें ऐकुनी गोपीं चित्तीं वनवास जाला। अक्रूरा काननीं कसें मोकलिलें गोपिकांला। जननी मृत्तिका फाकिती प्रळय झाला। मालणी कैक प्राशिती विषाचा प्याला। फंदि अनंत 'म्हणे हृदयीं हरि बसवा। आमचा प्राणविसांवा। मथुरेशीं नको नेऊं अक्रूरा पहारे। मथुरेशीं नको नेऊं आमुचा प्राणविसांवा ॥ ४ ॥

## ६ : चंद्रावळ

नट धीट अचाट राही नटला सारंगपाणी। पतिव्रता चंद्रावळ भोगिली त्या भगवंतांनीं ॥ ध्रु० ॥ अप्रतीम चंद्रावळ पाहून भुलले वनमाळी। तिचा नेम असा कीं सूर्य टळेल एक वेळीं। परि ती सत्कर्माशीं न टळे, कुकर्मा वेगळी। राहीची धाकुटी बहिण ऐका चंद्रावळी ॥चाल॥

फुल सव्वाशेर भार वजन चंद्रावळ। मृगनयना एक एक डोळा दिसे चंचळ। कुच उरीं हालती दोन्ही'मुक्ताफळ। अंगीं वीर्य जसें कुपींतील जल निर्मळ। हृदयावर जोबन दोन्ही हालती कमळ। वेणींत केवडा सुगंध परिमळ। गोरी मुरकी गालावरता हिरवा तीळ। मंजूळ शब्द जशि टाहो करिति कोयाळ। कंठांतुन पिक दिसे अशी वेल्हाळ। नार कळसूत्र दिसे बाहुली। नाशीक चोंच राव्याची देह कोमळ। भर सव्वाशेर वजन चंद्रावळ। नार फारच हल्की जसें तुंबिनीफळ। हा तिचा नेम कीं राहावें निर्मळ। काय सूर्य टळेल नेमाशीं एक वेळ। परि ती न टळे ऐशी चंद्रावळ। त्या चंद्रावळीचा नेम असा असेल। त्या नगरामधीं स्वतां हरी शिन्नळ। चंद्रावळ पाहतां न पडे त्याशीं कळ। तेव्हां भगवंतांनीं तिथें मांडिला खेळ। राहीचें रूप मग नटले तमाळनिळ। अलंकार अंगावर घालुनि तेव्हां भगवंतांनीं। राही झाले भगवान अलंकाराची मांडणी। नट धीट अचाट० ॥ १ ॥ तेव्हां राहीचें रूप नटलें एका हृषिकेशी। अलंकार अंगावर घालुनि तेव्हां त्या समयाशीं। जडिताचा शृंगार कोंदणें हिरे जिनसा जिनसी। राही काय त्यापुढें किं नटला श्रीरंगा ऐशी ॥चाल॥ राहीचें रूप मग नटला मुरलीधर। घालुनि मूद राखडी राव माथ्यावर। तिपेड गंगावन वेणी गुंफी पदर। मस्तकीं बिजवरा माथ्यावर मासा बोर। नाकामधीं नथ सरज्याची वर बिल्लोर। मोत्यांनीं भरला भांग बहुत सुंदर। कर्णफूल शिसफूल तानवडा वर चौफेर। वेल्या, बुगड्या काप पडे प्रकाश गालावर। कानीं धेंड्या आणिक वेलबाळ्या मोत्याचे सर। पानबाळ्या तिथें मासबाळ्या मारी लहर। नालबाळ्या अबदागीरबाळ्या तर्कधर। खुंटबाळ्या सांध्या बाळ्या त्याजवर। मोतीबाळ्या दाळिंबीबाळ्या त्या गंभीर। बोंडबाळ्या कोथिंबिरीबाळ्या बहुत सुंदर। चंद्रबाळ्या आणिक चिंचबाळ्या त्याजवर। घोसबाळ्या पडींच्या बाळ्या त्याली सुंदर। झुबुक बाळ्या मखमालीबाळ्या तानोडयावर। खिरणीबाळ्या पोवळ्याच्या बाळ्या तर्कधर। हिरी बाळ्या कंगणीबाळ्या मनोहर। नागबाळ्या फणिंद्रबाळ्या

हातीं हातसर। मुदबाळ्या पठाडीवाळ्या नथेवर मोर। हौदीबाळ्या पतंगी-बाळ्या तुटती तार। कुड्डुबाळ्या मंडवीबाळ्या चाले छबीदार। फुलबाळ्या बतिसा बाळ्यांचा प्रकार। कानीं कुडुक ते बहू सुंदर दिसती। ताईतपेटी दुल्लडी सात पदर। पुतळ्यांची बोरांची जवाची माळ नवसर हार। दंडी बाजुबंद गजरानें भरला कर। गुजराथी कांकणें अंगुस्थान न जाहंगिर। रत्नजाडित पाटल्या पत्र्या मनोहर। दंडी वेळा वाकडया गुजऱ्याचा झणत्कार। बसविले नागिना मंगलसूत्रावर। एकदाण्याची खरबुजी तऱ्हा सादर। चितांग चिंचपेट्या मारी लहर सुंदर। अणवट बिजवे विरोद्या वराति स्थापिले मोर। हातिं मोतीसर वाक्या साकळ्या घालुनिया चरणीं। राही झाले भगवंत शृंगार झाला येथुनी। नट धीट अचाट० ॥ २ ॥ चंद्रावळी घरीं गेले श्रीहरी राहीरूप धरुन। परिचारिका सांगती आली बाई तुमची बहिण। दिला बसाया पाट दिला त्या चंद्रावळीनं। चंद्रावळ म्हणे बाई आज तुझें कोणीकडे येणें ॥ चाल ॥ राही म्हणे आज ग बाई उदासलें मन! म्यां म्हटलें आज यावें बहिणीला भेटून। तेव्हां चंद्रावळ पाहे जरा तिजकडे न्याहाळून। बाई तुझ्या उरावर कांगे दिसेना स्तन। तुझी पुरुषाची आकृति दिसती जाण। तेव्हां उराकडे पाहे अवचित नारायण। तेवढीच कळा विसरला मधुसूदन। म्हणे आतां हें सोंग न्यावें संपादुन। पुसूं नको ग सखये माझें दुःख मी जाणें। भाल्याची जखम काय होतें तुला सांगून। एके दिवशीं सत्यभामा मनमोहन। दोघे निजले ग मजला खोलिमध्यें कोंडून। त्या काळजीनें हा जीव गेला करपुन। पुसूं नको ग गवळ्याघरिं कष्टाची धन। चंद्रावळ म्हणे बाई आतां तुला न्हाणिन। मी न्हाइना बाई खुण केली वेणिला त्यानं। श्रीकृष्णाची कदर फार दारुण। आतां तुलाच न्हाणिन मग घरां जाइन। आतां भ्रतार येईल तुझा बाहेरून। तो थट्टा करील माझी मेव्हणीच्या नात्यानं। तेव्हां चुलीवर गुंड पाण्याचा राही तत्क्षणीं। असे हरीचे खेळ देव मग चंद्रावळ न्हाणी। नट धीट अचाट राही० ॥ ३ ॥ राही म्हणे चंद्रावळी उठ बाई मग करी

स्नान। पितांबर परिधान चंद्रावळ ठेवी फेडून। चौरंगावर उभी ठाकली चंद्रावळ नग्न। राही गंगाळयांत पाणी घाली त्या हंडयांतून ॥ चाल॥ राही घाली ऊन पाणी चंद्रावळीवर दाटून। चंद्रावळ म्हणे बाई पाणी फारच ऊन। ऊन पाणी बरें, त्यानें जाइल तुझा शीण। ऐसें चंद्रावळीशी न्हाणिलें राहीनं। त्या चंद्रावळीचा पति आला बाहेरून। त्यानें राही पाहिली करी मग हास्यवदन। आज कोणीकडे ग मेहुणी केलें येणं। म्हणे उगीच आलें इला भेटायाकारण। तेव्हां चंद्रावळीनें स्वयंपाक करून। द्या पुऱ्या पोळ्या घावण्या तेथें काय उणें। तेलच्या आणिक फेण्या गुरोळ्या जाण। आणिक बुंदीचे लाडू वाढी युक्तीनं। केशरी भात वर केळाचें शिखरण। लोणकढें तूप आणाविलें मागून तिनें। भोजन करितां पति चंद्रावळिचा म्हणे। तुम्ही दोघी बहिणी निजा महालीं जाऊन। आज आम्ही एकटे निजूं बाहेर जाऊन। तेव्हां पतिला तोशक दिला दारिं अंथरून। राही आणि चंद्रावळी दोघी गेल्या निजभुवनीं। नट धीट अचाट राही नटला ॥ ४ ॥ बंगल्यामधिं अरास केली त्या चंद्रावळिनं। अबिर बुक्का सुवास आणिला राहीकारण। पलंग तिवाशा लोड जंबुखा टाकून। बहुता दिवशीं राही बहिण आली म्हणुन। चौफुला ठेवुन मधीं पानपुडा आणविला। चहूंभोंतीं समया मधिं कंदिल लाविला। राही म्हणे दिव्यानें झोंप येईना मला। त्या चंद्रावळीनें दीप विझवुन अंधार केला। तेव्हां निद्रा आली त्या चंद्रावळिला। अंगाशीं अंग लागतां देव चंचळ झाला। धरि हळू स्तनाला मुखचुंबन रगडिला। जागी झाली चंद्रावळ हरि ऐसा भासला। अरे पाप्या दुष्टा भंग तपाचा केला। एक वेळ मी हांसत होतें चंद्राला। मी पतिव्रता त्वां कसा डाग लाविला। जर अशी गोष्ट ही सांगावी भ्रताराला। तो म्हणेल स्त्रीचा पुरुष कैसा झाला। दोहिंकडून आड ना विहीर झाली मला। तेव्हां हरी म्हणे इला नवल काय दाखवावें नयनीं। अकस्मात दिवे लाविले तिच्या निजभुवनीं। नट धीट अचाट राही नटला सारंगपाणी ॥ ५ ॥ विष्णुदुताला आज्ञा केली

पहा भगवंतानें। स्वर्गाहून विमान आणिलें तत्क्षणीं जाण। देवानें चंद्रावळ विमानांत बसवून। एकवीस स्वर्गे चंद्रावळिला दाखविलीं जाण। श्रीहरीनें चंद्रावळ नेली मोक्षपदाशीं। सृष्टीची घडमोड यमपुरी दाखवी तिशीं। सदाशिव दाखविला कैलासासी। खालीं उतरुनिया आणिली समुद्रापाशीं। खांबाची द्वारका दाखवी चंद्रावळिसी। तेव्हां देव ठसला चंद्रावळिसी। घाली लोटांगण तेव्हां हरिचरणाशीं। नाहिं झाला भोग तुम्ही फेडून घ्या असोशी। देवानें आड धरिलें सुदर्शनासी। केली सहा महिन्यांची रात्र त्या समयासी। प्रीतीनें भोगिलें दिलें आलिंगन तिशीं। चंद्रावळ म्हणे देवा नको अंतर देऊं मशीं। तेव्हां देव बोलले त्या चंद्रावळिशीं। जेव्हां स्मरशिल तेव्हां आहे तुजपाशीं। फंदिमलिकचा ठिकाण पोखरिशी। करी अभंग लावण्या धाक पडे वैऱ्याशीं।(फंदि अनंतची लपेट झपेट ही विकट विकट धरणी। रतिरती समजून कसली पहा ब्राह्मण राणी। नट धीट अचाट राही नटला सारंगपाणी ॥ ६ ॥

## ७ : उपदेशपर फटका

लंडे गुंडे हिरसे तट्टू ह्यांची संगत धरूं नको। नरदेहासी येऊन प्राण्या दुष्ट वासना धरूं नको ॥ ध्रु०॥ भंगी चंगी बटकी सठकी ह्यांच्या मेळ्यांत बसूं नको। बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडूं नको। संसारामधिं ऐस आपला उगाच भटकत फिरूं नको। चल सालसपण धरुनि निखालस बोला खोट्या बोलुं नको। पर धन पर नार पाहुनि चित्त भ्रमुं हें देउं नको। अंगिं नम्रता सदां असावी राग कुणावर धरूं नको। नास्तिकपणांत शिरुनि जनाचा बोल आपणा घेउं नको। भली भलाई कर कांहीं पण अधर्म मार्गीं शिरूं नको ॥ चाल ॥ मायबापावर रुसूं नको। दूर एकला बसूं नको। व्यवहारामधिं फसूं नको ॥ चा०प० ॥ परी उलाढाली भलभलत्या पोटासाठीं करूं नको ॥ लंडे गुडे० ॥१॥ वर्म काढुनि शरमायाला उणें कुणाला बोलुं नको।

बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करूनि हेवा झटूं नको। मी मोठा शाहणा धनाढ्यहि गर्वभार हा वाहुं नको। एकाहुन एक चढी जगामधिं थोरपणाला मिरवुं नको ॥ हिमायतीच्या बळें गरिबगुरिबाला तूं गुरकावुं नको। दो दिवसांची जाइल सत्ता अपेश माथां घेउं नको। बहुत कर्जबाजारी होउनि बोज आपला दवडुं नको। स्नेह्यासाठीं पदरमोड कर परंतु जामिन होउं नको ॥ चाल ॥ विडा पैजेचा उचलुं नको। उणी तराजू तोलुं नको। गहाण कुणाचें डुलवुं नको ॥ असल्यावर भीक मागुं नको ॥ चा० प० ॥ नसल्यावर सांगणें कशाला गांव तुझा भिड धरूं नको। लंडे गुंडे० ॥ २ ॥ उगीच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठीं करूं नको। वरी खुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्रि नको। कष्टाची बरि भाजिभाकरी तूपसाखरेची चोरि नको। आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढतीं पाहुं नको। दिली स्थिती देवानें तींतच मानी सुख कधिं विटूं नको ॥ आपल्या गांठीं धनसंचय कर सत्कार्यीं व्यय हटूं नको। आतां तुज ही गोष्ट सांगतों सत्कर्मा ओसरूं नको। सत्कीर्ती नौबदीचा डंगा गाजे मग शंकाच नको ॥ चाल ॥ सुविचारा कांतरूं नको। सत्संगत अंतरूं नको। हरिभजनाला विसरूं नको ॥ चा० प० ॥ गावयास अनंतफंदीचे फटके मागें सरूं नको ॥ लंडे गुंडे० ॥ ३ ॥

## ८ : दुष्काळ लावणी

उलटा जमाना आलारे। सेवक स्वामींचें मानीना ॥ ध्रु० ॥ जिकडे तिकडे टोळ माजले। दुनियाचें केलें वाटोळें। मुलुख कूल उजाड हलकल्लोळ। आंगावरते चमक्याचे ओळ। कुठवर घालतील हळदी बोळ। जी सांपडली तिलाच घोळ। घरें दारें जाळुनिया कोळ। गरिबा भोंवतें माजलेत पोळ। एकामागें एक जैसे लोळ। ईश्वरें पैदा केले ओढाळ। न राहे खोंडया मका कडोळ। कारलीं मेंडया वांगीं पडोळ। किती दिवस राहील पाणी गढूळ। ओस परगणा जालारे। उलटा जमाना आलारे।

सेवक स्वामी० ॥ १ ॥ कलीमहात्म आलें उफराटें । होऊं लागलें खऱ्याचें खोटें । खाटमार ऐकलात कोठें ? । ज्याला न भरवे आपलें पोट । ते जैसे मोंगलाचे बेटे । ठेवितात फिरवून पागोटें । महार पोरग्याचे गळ्यांत गेठे । हुरडा खाऊन बनले लेठे । गव्हार जगली जट लंगोटे । त्यांना आभाळ दोनचीं बोटें । दे उगेच भलत्याला सोटे । वाटसरूं बागेना वाटे । उगेच माजले गोटेगोटे । दुनयेचा फुटाणा केलारे । उलटा जमाना आलारे । सेवक० ॥ २ ॥ धर बिगारी भलताच धरावा । ब्राह्मण शूद्र न ओळखावा । जेथील मुक्काम तेथची न्यावा । वस्त्रें घेऊन नागवावा । माघारें बोडकाची लावावा । तिकडून शिपाई दुसरा यावा । हा त्याला वाटेस भेटावा । परंतु त्याणें तोच दामटावा । परतुनि न्यावा मागल्या गांवा । असा किती वेळ यावा जावा । ज्याचा गहूं हरभरा लुटावा । तोच बिगारी पुढें पिटावा । गांवकऱ्यांचा प्राण आटावा । कारभारी तो निघून जावा । गरीब एखादा हातीं लागावा । त्याच्या मतें पाटीलबावा । माराखालीं भोत भरावा । आंगठे धरवाया लावावा । कळेल येवढा धोंडा द्यावा । कोठें पुरलें ? ठिकाण दावा । खंडणीचा ठैराव ठरवावा । महाप्रळय यांना आलारे । फंदी अनंत सांगे जमाना । उलटा जमाना आलारे । सेवक० ॥ ३ ॥

## ९ : बाजीराव कारकीर्द लावणी

दुनयेला तिळमात्र उपद्रव काडी नसावा । उलटा सुलटा आया जमाना आतां कधीं चक बसावा ॥ ध्रु० ॥

दुनयेमध्यें लोक बांडे अनर्थ मोठा करतात । शेत कापुनि त्या कुणब्याचें त्याला बिगारी धरतात । वड पिंपळ तोडुनि मोकळे केवढा धर्म आचरतात । घरांत कडबा असला म्हणजे महार पोर आंत शिरतात । हत्ती घोडे उंट बैल खुप सलिंदा कसावा । मालधन्यानें उगाच आपला पाहत तमाशा बसावा । ध्या घर तुमचें दुनयेला तिळमात्र उपद्रव काडी-

मात्र नसावा। उलटा सुलटा आया जमाना आतां कधीं चंक बसावा ॥१॥ नल पिंगल दो संवत्सर हुमजुसकु दुख पैदा। दोदिन घरमें चूप बैठो हाय हुवाजी तुमकु बैदा। आपने दिलकी क्या खबर हये तुम कहते बैदा बैदा। सचे आदमी भुके मरते झुटा खावत हय मैदा। देऊन दस्ता खांद्यावरता फिरून सोटा धरावा। देख आगाऊ चलना यारो घेऊन घाना विसावा। लई शीण झाला। दुनयेला तिळमात्र० ॥ २ ॥ खेडीं पाडीं भलताच लुटितो कुणब्याचा जीव उदासला। सुपें टोपलीं बिगार वाहतां वाहतां बिट्टा वासला। ज्याच्या घरावर हल्ला तो कुणबी ओझ्यानें त्रासला। चल तेरे जोरुकु चोदु देऊं धक्का पाडूं पासला। शरिराची अवघी अवस्था भगवंताला पुसावी। मारी सोटे घेतो झोले बैल भाड्याचा कसावा। चल पळ मोहर ॥ ३ ॥ मागें जाणें जोशी सांगत होते राजीक होईल। रक्ताचे पूर वाहतील नवी मुद्रा उभी राहील। कुणी कुणाचें नोहे अति एकंकार होईल। येतील टोपीवाले अशी कांहीं दिवस झुळुक वाहील। झाले बाजीराव धणी आतां पृथ्वीला आनंद असावा। जुने मुत्सदी घरीं बसविले दोन दिवस घ्या विसावा। लई शिण झाला। दुन० ॥ ४ ॥ शिपाई थेसो फर्जी हो गये आपने आपने जगा मगन। लाल अखिया कहर कहर उसे रख्या दो बोट गगन। चल पाटील थोडा जलदी लाव देऊं धका पाडूं सदन। चल तेरे जोरुकु चोदु खडा रहे व क्या होवे अलग। करो खुदाकी बंदगी यारो उचे मालसे बिकावेंमें। फंदी अनंत कहे उलटी दुनया। किदरसे शिकशिकावेंगे। मैं चुप बैठ० ॥ ५ ॥

## १० : लावणी

१ जमाना आला उफराटा। सुन सासूला लावी बट्टा ॥ ध्रु० ॥ लेक बापाशीं लावी आवभाषी। शिष्य गांजितो गुरूशीं। जावई सासूला म्हणतो तूं काशी। लवंडून देतो मातेशीं ॥ चाल ॥ मेहुणीचा चालवी लाड। बहिणीला म्हणे तूं रांड ॥ चाल ॥ निघ घरांतुन द्वाड। तुझी नाहींग

मजला चाड । माझी बायकोच मजला गोड । नाहीं सासऱ्याची ठेवली भीड । बेटा लबाड पाहून बापाला लटका धरी ताठा । जमाना आला आला उफराटा ॥ सून० ॥ १ ॥ धन्यावर चाकर झाले फिखान । उलटून पडले बेइमान । सावकाराशीं कुळ गेलें बदलून । करीती मुदत लबाडीनें ॥ चाल ॥ अशी कलियुगाची रीत । सोय नाहीं दरबारांत । खऱ्याचें खोटें होत । पाटील हकिमाचें मत । कीं बुडवावी रयत । खासदार झाले राऊत । शिपाई हाकिती आऊत । झाले भवानीचे भूत । जोशी झाले पंडीत । भट करी बटकिशी मोहोबत । दप्तर पडलें सांदींत । आतां तरी पाहे अक्कल धरी भटा । जमाना आला आला उफराटा ॥ सुन० ॥ २ ॥ मारवाडयानें दुनया नाडली फार । करिती मलताच व्यापार । साळी कोष्टी शिंपी सोनार । हे तो झाले सरदार ॥ चाल ॥ असा कलीचा वारा । गरती जाती परद्वारां । दोहीं कुळीं पाडिती अंधारा । तेलाचा उणा पावशेरा । तुटपुंज्या करितो तोरा । फुगून बसला पीसारा । ताथावर हाणीतील वारा । तो या काळा मधें वरा । फंदी म्हणे अक्कल धरा । उमज गव्हरा । दे कलगीवर सोटा । जमाना आला० ॥ ३ ॥

## ११ : लावणी

पंडित शाहणा आला मनामधीं उलटा सुलटा आला जमाना । पाऊस म्हणतो कर्मेना । धरत्रीनें पीक टाकिलें अंतपारी दिसेना ॥ ध्रु० ॥ दुनयामधिं बंड मातलें जो बळी तो कानपिळी । सुलतानी अस्मानी रात्र ऐका एकच धुमाळी । मोमणानें माग टाकले शिपाई झाले साळी माळी । ज्या योनीला जन्म घेतला त्याची उद्धरली नाहीं कुळी । आपलें सांडी देवदंडी त्याला पुर्वेला येईना । आपआपल्यामधीं मर्जी ठेविती मोक्षपदाशीं मिळेना । पंडित० ॥ १ ॥ कळावंतणीची झाली राळ बटकी झाल्या शिरोमणी । दे साव्हू वाण्याची घाण केली मारवाडयांनीं । गुरवांचें संधान बुडविलें महार या वाजंत्र्यांनीं । पाटीलपांडे घरीं राहिले पट्टी केली

कुणब्यांनीं । पहा पासरी कितीक घ्यावी सवा हात खचली धरणी । पाऊस अंतरीं शाहाणा मग तो जाऊन बैसला कोकणीं । बावन हकांचा महार धनी याला पुरविल्या येईना । भोपळ्यामधीं सत्त्व राहिलें तो पाण्यामध्यें बुडेना । पंडित० ॥ २ ॥ लेक म्हणे बापाला म्हातारा झाला याची शुद्ध गेली । सुन सासुची मर्जी ठेविना फिरून बोलूं ती लागली । शिष्य झाले मस्त गुरूची विद्या गुरूवर फिरली । गोरसाला कोणी पुसेना दारू महाग विकूं लागली ॥ पतिव्रता ही उपाशी मरती तिला मिळेना सावली । चंचल नार बांधीत असे नवें घर एक दरसालीं । ब्राह्मण जोशी लटके यांचा ठोका येईना । अनंतफंदी म्हणे गड्यांनो ऐकुनि घ्यावें सुज्ञाना ॥ ३ ॥

## १२ : लावणी

हे मूर्खा खूण तर्का पर्का पुरुष आपला नसे । तशा मधीं कोणी विरळा प्रीत चालवितसे ॥ ध्रु० ॥ म्यां म्हटलें हा चक रुपया दिसतो माल खरा । वाजून जों पाहतों तों आंत तांब्याचा मुरमुरा । म्यां म्हटलें हा जुरा शिपाई फाकडा खुप तऱ्हा । झुंजाचें जेव्हां तोंड लागलें पळतसे माघारा । म्यां म्हटलें हा सुरेख उमदा आंगठिवरला हिरा । बसतां घन मस्तकीं भोगितां कस्त झाला चुरा । म्यां म्हटलें कोणी आहे मिजाशी फार नाजुक दिसे । हस्तचरण सनकाड्या क्षयरोगानें जिंकिली असे । हे मूर्खा खुण० ॥ १ ॥ म्यां म्हटलें हें मोतीं चांगलें जाईल जन्मा जुगा । हातीं घेतां फुगा समजला म्हणून झाला भुगा । म्यां म्हटलें हे साधु ज्याचे दोष नाहीं आंगा । परंतु थोडे केस मस्तकीं वशाळ इतका बघा । म्यां म्हटलें हा शिकारी मारील व्याघ्र टाकितो डगा । परिणामीं समजला कुलंगा म्हणून बसला दगा । म्यां म्हटलें हा मार्ग चांगला काडी कसपट नसे । चालाया लागलें उकीर्डा सामोरा येतसे । हे मूर्खा० ॥ २ ॥ म्यां म्हटलें झड मोठी तागली फार पाऊस पडे । तेव्हांच झाले निरभ्र इतकी व्यर्थच गडगडे । म्यां म्हटलें हें झाड शिंदीचें उंच कीं अवघड । जेव्ह

लागलें चढूं तेव्हां बाई त्यानें काढले फड । म्यां म्हटले अंजिरासारखे गोड पिंपळवड । मुखामधीं घालितां समजलें तुरटसे चोथड । म्यां म्हटलें कोणी शहरमिजाशी चांगलीं माणसें । रस्त्यांतून पाहतें तों कळकट मळकट-चाणी जसे । हे मूर्खा खुण तर्का० ॥ ३ ॥ म्यां म्हटलें हा घोडा झुरा किमतीचा दिसतो । न्याहाळून पुर्तेपणें पाहते तों गर्दभ दिसतो । म्यां म्हटलें राघो पिंजऱ्यामाजी डोकावितो । जवळ जाऊन पाहते तों कावळा अदा दावितो । म्यां म्हटलें कोणी चतुर शाहणा योगी बोलावितो । संबंध घडल्यावरी कळूं आला मूर्खसा मजकी तो॥ म्यां म्हटलें कोणी गायक गातो तान झोकितसे । फंदी आनंदाचे छंद जिव्हारी शस्त्र भोस्कितसे । हे मूर्खा० ॥ ४ ॥

## १३ : लावणी

धन्य तुझें लावण्य प्रीतीचे बाण जैसे सणाणी । खरें सांगशील कधीं तृप्त होईल गे आमचे मनानीं ॥ ध्रु० ॥

दोमजला पैठणचें पातळ लफाका घे टाचेची खबर । आधींच निबर जोबन त्यावर पितांबराची चोळी जबर । लालशालु जशीं मशाल घरचीं खुशाल दोपैशानें गबर । नाहीं कोणाची प्रभा उत्तमा तेव्हां तर्फेडी मात जबर । मांड्या गुडघ्या सरळ पोटऱ्या पायीं जोडवीं खणाणी । जसे घोड्याचे नाल वाजती आवाज कानीं दणाणी । धन्य तुझें लाव० ॥१॥ फार चांगली तूं जर माहीत कळलीस कानोकानाला । तर तुला भलताच उडविल चुना न लागेल पानाला । कैक विलासी अहो रात्रीं टपले देही दानाला । टक्कारून तुजकडेच पाहतील कळा लागतील मनाला । स्तनाला कधीं हस्त लाविती आमची विनंती मानी । तूं थोराची लेक तुला आम्ही काय देयाचें दिनानी ॥ धन्य० ॥ २ ॥ वडिलानवडली जी काय दौलत लाखो ज्यांनीं कमावली । तितकें तुज अर्पिलें परंतु कांहींच नाहीं जमावली । असें चांगलुपण तुझें धन्य मातेच्या उदरीं समावली ।

अटोकाट शहाणीं युक्ती युक्तीनें पाहुन जमावली । अतीरती कुल खप्पी झालें हिंडूं लागले वनानी । नयन तुझें पाहतां मृगानींच तोंड खुपसलें तनानी ॥ धन्य० ॥ ३ ॥ कोट्यावधी तुज पैसां देऊं तूं खा नारी तूप साखर । जशी चंद्राला दशी वहावी घ्या आमची भाजीभाकर । दोनी हस्तक तिसरें मस्तक जसें तुझ्या घरचे चाकर । मनामधीं समजून उमजून घाल आम्हावरती पाखर ॥ अनंतफंदीचे छंद जसे काटिबंद जडन नवी झनानी । लांगे लुंगे कवि ना ठरती जशा भोरड्या मनानीं ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम १०७७८
विभाग २१ : कवि
क्रमांक १२८
नों. दि. २०/१२/५५

—३—

# होनाजी बाळ

सवाई माधवरावांच्या व दुसऱ्या बाजीरावांच्या कारकीर्दींत जे अत्यंत नाणावलेले शाहीर होते त्यांत होनाजी बाळ यांची प्रामुख्यानें गणना करावयास हवी. कवित्व त्यांच्या घराण्यांत वंशपरंपरागत चालत आलें होतें असें म्हटलें पाहिजे. कारण होनाजीचा आजोबा साताप्पा शिलारखाने हा पेशव्याचा आश्रित होता व अत्यंत नांवाजलेल्या तमासगीर शाहिरांत त्याची गणना होत होती. त्याला शंकराचा वरप्रसाद होता असेंहि सांगतात. तमासगिरांत त्याला इतकी मान्यता होती कीं अद्यापाहि पुण्यास संगमावर असलेल्या त्याच्या समाधीपुढें दर श्रावण सोमवारीं पुण्यांतील तमासगीर तेथें जाऊन हजेरी देत असतात. साताप्पाचा थोरला मुलगा व होनाजीचा चुलता बाळा हाहि नाणावलेला तमासगीर व कवि होता. तो व त्याचा सोबती बहिरू यांच्या संयुक्त नांवानें किती तरी लावण्या प्रसिद्ध आहेत.

अशा शाहिराच्या कुळांत होनाजीचा जन्म झाला. जातीनें हा नंदगवळी—आडनांव शिलारखाने. त्याचे वडील सयाजी हे साताप्पाचे धाकटे चिरंजीव. पण त्यांच्या विषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. होनाजीनें मात्र घरांतील गवळ्याचा धंदा व बाहेरचा तमाशाचा धंदा पुढें चालविला आणि तमाशाच्या क्षेत्रांत आपल्या आजोबाच्या व

चुलत्याच्या कर्तृत्वास शोभेल असें यश मिळविलें. बाळा कारंजकर नांवाचा शिंपी त्याचा तमाशाच्या क्षेत्रांत जोडीदार होता—त्या दोघांनीं पुणें चांगलेंच गाजविलें. ' होनाजी—बाळ ' हें संयुक्त नांव त्या काळांत इतकें रूढ झालें कीं त्यामुळें होनाजीला होनाजी बाळ असें संबोधण्याचा प्रघात पडला. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत होनाजीला पेशव्यांचा आश्रय मिळाला. रंगाचा दरबार, खर्ड्यांची लढाई या प्रसंगावरील पोवाडे याच काळांत रचले गेले. बाजीरावाच्या कारकीर्दीत होनाजीनें लोकप्रियतेचा कळस गांठला. होनाजीवर दुसऱ्या बाजीरावाची बरीच मर्जी होती. याचें कारण असें असावें कीं निर-निराळ्या रागदारीच्या चालींवर लावण्या रचून बैठकीच्या गाण्याचें स्वरूप तमाशाला आणून देण्याचें व त्यामुळें तमाशालाहि एक प्रकारची प्रतिष्ठा मिळवून देण्याचें कार्य त्यानें केलें. कै. शाळिग्राम यांनीं होनाजी बाळच्या चरित्रांत त्यांच्या या कार्याचें वैशिष्ट्य चांगलें वर्णन केलें आहे. ते म्हणतात, " बाळा बहिरू हा उत्कृष्ट गाणारा असून त्यानें आपल्या बापाचे मागें नांव चांगलें राखलें. त्याच्या सर्व लावण्या बैठकीच्या म्हणजे शांत सुराच्या आहेत. हें वळण बाळा बहिरूस सातारच्याप्पापासून मिळालें होतें. तेंच पुढें पूर्वजांचें वळण होनाजी बाळानेंहि उचललें. फडावरील उंच स्वराच्या लावण्या होनाजी बाळ कधींच म्हणत नसे. स्थिर समुद्राची लाट सायंकाळीं जशी पाहणाऱ्याला मनोरम दिसून उदासीन मनास आल्हाद देते, एकामागून एक ती लहान येते, ती वारंवार पाहण्याची जशी हौस वाढत जाते हाच प्रकार होनाजी बाळच्या लावणींतील होय. " त्यामुळें ज्या कलावंतिणीच्या गाण्यांत पूर्वीं ख्याल, टप्पे वगैरे चिजा येत असत त्यांना त्या चिजा सोडून होनाजी बाळच्या लावण्या शिकण्याचा प्रसंग आला. होनाजीच्या लोकप्रियतेचें हें मोठेंच गमक म्हटलें पाहिजे. दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या आत्मचरित्रांत लिहून ठेवलेला, " होनाजी हा शृंगारांत

पुष्कळ ठिकाणीं घसरून जाई. सर्व शृंगाररस ऐकणाऱ्याला कंटाळा येईल इतकें प्रकाशित करी. परंतु तो दांडग्या रुचीच्या लोकांचा रावबाजीच्या अखेरीच्या कारकीर्दींतील कवि. तथापि मला त्याची कोठें कोठें शब्दांची ठेवण फार सरस वाटते व लावण्याचे नवे नवे छंद व धाटणी कानास फार गोड लागतात." हा अभिप्राय मोठा सूचक आहे.

कमालीची लोकप्रियता व पेशव्यांचा आश्रय त्यामुळें होनाजीला पुष्कळच संपत्ति मिळाली. पेशव्यांकडून शिमग्यामध्यें पांच दिवस सरकारवाड्यापुढें तमाशा करण्याबद्दल होनाजीला सालीना तीनशें रुपये मिळत असत. याशिवाय शेले, दुपट्टे, रोख देणग्या वगैरे निराळेंच. ह्या सर्व संपत्तीचा संग्रह होनाजी त्र्यंबकजी डेंगळ्यांच्या वाड्यांतील आपल्या खोलींत करीत असे. शुक्रवारांत भोतकरांच्या हवेलीसमोर असलेल्या मारुतीच्या देवळाशेजारीं त्र्यंबकजी डेंगळ्यांचा हा वाडा होता. त्या वाड्यांतील एका खोलींत होनाजीची बैठक असे. त्याच ठिकाणीं होनाजीनें डफ, तंबोरी, मंजिरी इत्यादि तमाशाचीं वाद्यें आणि आपली सर्व मिळकत ठेविली होती. पण दुर्दैवानें त्र्यंबकजी डेंगळ्यांवर मरेकऱ्यांचा रोष झाल्यामुळें डेंगळ्यांच्या संपत्तीबरोबर होनाजीच्या संपत्तीचीहि धुळधाण उडाली. त्यामुळें पेशवाईनंतर होनाजीलाहि थोडे हालाचे दिवस आले व इतर शाहिराप्रमाणें त्यालाहि पोटासाठीं बडोदें पहावें लागलें. बडोद्याच्या सयाजी महाराजांकडून त्याला दोनशें रुपयांचें वर्षासन होतें.

होनाजीचा अंतहि शोकजनक झाला. भाद्रपद कृष्ण त्रयोदशीचे दिवशीं दोन प्रहरीं होनाजीच्या घरांतील सर्व मंडळी रानांत गेल्याची संधि पाहून दोन महार होनाजीच्या घरीं आले व त्यांनीं त्याला वानवडीला बोलावून नेलें. वानवडीच्या अलीकडच्या रानांत आणखी कांहीं मारेकरी जमून त्यांनीं होनाजीस मरेमरेतों मारलें आणि शेवटीं

निवडुंगांत ढकलून दिलें आणि नंतर दोन प्रहर रात्र उलटल्यानंतर त्याला शहरांत आदितवार पेठेच्या कोपऱ्यांत आणून टाकलें.* दुसरे दिवशीं पहाटे शहरवासी लोकांनीं त्याला उचलून घरीं आणलें. पण त्या मारहाणीचें स्वरूप इतकें गंभीर होतें कीं त्याच दिवशीं होनाजीचा अंत झाला. ही बातमी सगळीकडे हां हां म्हणतां पसरली आणि पुण्यांतील सर्व तमासगिरांनीं जमून मोठ्या समारंभानें त्याच्या लावण्या म्हणत म्हणत व भजन करीत त्याची प्रेतयात्रा काढली. मरणाच्या दिवशीं जो तमासगिरांचा मेळावा गवळी आळींत होनाजीच्या वाड्यासमोर जमला होता तो दरसाल चालूं राहिला. दरसाल भाद्रपद वद्य चतुर्दशीच्या दिवशीं पुणें शहरांतील सर्व तमाशे त्याच्या वाड्यासमोर अद्यापिहि हजेरी देत असतात.

होनाजीवर मारेकरी कां व कुणी घातले हें गूढच आहे. कुणी म्हणतात महारांची व त्याची गत्रतावरून झालेली बोलाचाली विकोपास जाऊन त्याचें पर्यवसान असें मारेकरी घालण्यांत झालें. होनाजीची लोकप्रियता व वर्चस्व सहन न होणाऱ्या कांहीं दुसऱ्या तमासगिरांचें हें कृत्य असावें असेंहि कुणी सांगतात. कांहींहि असो, ' घनःशाम सुंदरा ' ही भूपाळी अखिल महाराष्ट्राला गावयास लावणाऱ्या होनाजीचा त्यांनीं खून केला नाहीं—तर महाराष्ट्रीय रसिकतेचा खून केला असेंच त्याच्या दुःखद अंताचा विचार करतांना सारखें मनांत येतें.

× × ×

# शंकर–पार्वती संवाद

## १ : भाळलोचना नागभूषणा

भाळलोचना नागभूषणा नीलग्रीवा पशुपती। मुगुटीं जटेंत कोठून दिसती ललनेची आकृती ॥ ध्रु० ॥ नेटकी प्रवीण वनिता सुंदर केवळ बिंबाधरी। सांगतां मजप्रती वाटतें तूंच ठेविलें शिरीं। कोमळांग लावण्य सांवळी मूर्ति बहुत गोजरी। नेत्र मृगासारखे चमकती विद्युल्लतेचे परी। निवळ धनुष्याकृती भोंवया शोभा वरी। कां हो चोरितां मला दक्षक्रतु-दलना सांगा तरी। रत्नमाणिकें जडीत सुशोभित सुरस कंकणें हातीं। तेज सांवळें करीं उणें आणिति नक्षत्राप्रती ॥ भाळ० ॥ १ ॥ शिरीं अपूर्व वाहतसें तें गंगाजळ निर्मळ सुंदरें। जळावरील तें कमळ नव्हे मुख पहातां न्याहाळूं या बरें। कमळांतील मकरंद सेविती मिलिंद प्राणेश्वरें। म्हणून सावळें तेज तुला दिसतें हिमनगकुमरें। नेत्र नव्हे ते मीन तळपती जिवनामधें येकसरे। नव्हे भोंवया सलिल लहरी उदकाच्या प्रियकरें। रत्नमाणिकें नव्हेत जळावर ते तरंग उठती। वृष्टी कारितां मेघबिंदु नक्षत्रावत् झळकती ॥ भाळ० ॥ २ ॥ विश्वव्यापका विश्वपती विश्वेशा विश्वंभरा। विश्वोद्धारक विश्वरक्षणा इशान जगदीश्वरा। त्रिपुरांतक त्रिविधतापहरणा अहो त्र्यंबकेश्वरा। भवभंजना भयहरणा भूतादिपती अपर्णावरा। नागनाथ

नागेंद्रभूषणा वृषभध्वज शंकरा। मदनदहन हे पंचवक्त्रा भालचंद्र-शेखरा। कुंडलकत कुचमंडळ दोन्ही कनक कलश भासती। अति बारिक चिर कंचुकि हिरवी मुजी प्रभा दाविती। भाळलो० ॥ ३ ॥ प्रणवरूपिणी फरशांकुशकरमंडित सुखवर्धने। चिद्विलासिनि हे जगदंबे महिषासुरमर्दने। दाक्षयणे अष्टभुजे अहो दुर्गे हिमनगनंदिने। शुंभनिशुंभादिक दैत्यदानव-कुळनिकंदने। कुच नव्हे ते चक्रवाक गंगातिरीं शुभमूर्धने। नव्हे चिर कंचूकीं जळीं शेवाळ मनीं शोधने। वदे गिरिज्या शांभवा बोल हे अप्रमाण वाटती। होनाजी बाळ म्हणे उभयतां पदीं वसो चित्तवृत्ती। भाळलोचना नागभूषणा नीलग्रीवा पशुपती ॥ ४ ॥

## भूपाळी

## २ : घनःशाम सुंदरा

। घनःशाम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला। उठिं लौकरी वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ ध्रु० ॥ सायंकाळीं एकेमेळीं द्विजगण—अवघे वृक्षीं। अरुणोदय होतांच उडाले चरावया पक्षी। अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरण दक्षी। प्रभात काळीं उठुनि कावडी तीर्थ-पंथ लक्षी। करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं। यमुनाजळासी जाती मुकुंदा दध्योदन भक्षी ॥ चाल ॥ मुक्तता होउं पाहे, कमळिणीपासुनि भ्रमरा। पूर्व दिशे मुख धुतलें, होतसे नाश तिमिरा। उठिं लवकरी गोविंदा, सांवळ्या नंदा कुमरा ॥ चाल पहिली ॥ मुख प्रक्षाळण करी अंगिकारी भाकर काला। उठिं लौकरीं वनमाळी उदयाचळीं मित्र आला। घनःशाम सुंदरा श्रीधरा० ॥ १ ॥ घरोघरीं दीप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती। गीत गाती सप्रेमें गोपी सदना येती जाती। प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळी घाळं पाहती। आनंदकंदा प्रभात झाली उठ सरली राती। कादिं धार क्षिरपात्र घेउनी धेनू हंबरती। द्वारिं उभे गोपाळ हाक मारुनि तुजला बाहती ॥ चाल ॥ हे मुक्तहार कंठीं, घालीं या रत्नमाळा। हातीं वेत्रयष्टि

बरवी, कांबळा घेइं काळा । ममात्मजा मधु-सुदना, हृषिकेशी जगत्पाळा ॥ चाल पहिली ॥ लक्षिताती वासुरें हरि धेनुस्तनपानाला । उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला । घनःशाम सुंदरा श्रीधरा० ॥ २ ॥ प्रातःस्नानें करुनि गोपिका अलंकारें नटती । कुंकुमादि चर्चुनी मंथनालागिं आरंभिती । प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळी गाती । अर्घ्यदान देउनिया द्विजगण देवार्चन करिती । नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णु-पूजा समर्पिती । स्मार्त शिवार्चनसक्त शक्तीतें शाक्तहि आराधिती ॥ चाल ॥ ऋषीगण आश्रम-वासी; जे निरंजनीं धाले । अरुणोदयिं आपुलाले, ध्यानीं निमग्न झाले । पंचपंच उषःकालीं, रविचक्र निघों आले ॥ चाल पहिली ॥ एवढा वेळ निजलासि म्हणून हरि समजेल नंदाला । उठिं लौकरी वनमाळी उदया-चळीं मित्र आला । घनःशाम सुंदरा श्रीधरा० ॥ ३ ॥ विद्यार्थी विद्याभ्या-सास्तव सादर गुरुपायीं । अध्यापन गुरु करिती शिष्याहि अध्ययना उदयीं । याज्ञिकजन कुंडामधिं आहुति टाकितात पाहीं । रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही । हे माझे पाडसे सांवळे उठ कृष्णाबाई । सिद्ध सर्वे बळिराम घेउनि गोधनें वना जाई ॥ चाल ॥ मुनि-जनमानस-हंसा, श्रीमनःकमलभृंगा । मुरऱ्हर पंकजपाणी, पद्मनाभ श्रीरंगा । शकटांतक सर्वेशा, हे हरि प्रतापतुंगा ॥ चा० प० ॥ कोटिरवींहुनि तेज आगळें तुझिया वदनाला । होनाजी बाळ नित्य ध्यातसे, हृदयीं नाममाळा । उठिं लौकरी वनमाळी उदयाचळीं मित्र आला । घनःशाम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला० ॥ ४ ॥

## ३ : श्रीकृष्णतुला

जन्मोजन्मीं हरीप्राप्ती स्तवते उदीत भामासती । प्रश्न पुसुन नारदालागीं दान दिधला श्रीपती ॥ ध्रु० ॥ सत्राजित प्रभुची कन्या ती भामा सुंदरी । द्वारीं स्वर्गींचा वृक्ष स्यमंतक मणी पित्याच्या घरीं । त्या ऐश्वर्यावरून न मानी कोणा द्वारकेपुरीं । जन्मोजन्मीं प्राप्ती हरीची

इच्छितसे अंतरीं । तो नारद पातला अकाल्पित भामेच्या मंदिरीं । ती म्हणे नारदा हरिप्राप्तीची युक्त सांग मज बरी ॥ चाल ॥ नारद म्हणे हे आवळा । नेणुन हरिची कळा । इच्छित अंत सांवळा ॥ चाल ॥ नारदे बुद्धि सांगितली बरवे परी । दानासी कृष्ण दे भामे आपले करीं । होईल प्राप्त जन्मोजन्मीं श्रीहरी ॥ चाल ॥ ऐसें उत्तर भामा ऐकुनी । पुसती एकांतीं हरीलागुनी । दाना देते द्विज बोलाउनी । हें तो मानेल कीं तुमचे मनीं । भामे हरी म्हणे त्वरा कर क्षणीं । सखये ही मात न फुटतां जनीं ॥ चाल ॥ अति हर्षे सत्राजीतबाळी । पुजा आणि सामोग्री ते काळीं । सिद्ध करून टेवी वेल्हाळी ॥ चाल ॥ गंध अक्षता नाना परिचीं सुगंध पुष्पें निरांजन आणि कर्पूर आरत्या परमानंद हृदयीं भामेच्या नंदनास श्रीगोविंदजीस बसवून मुनीपुढें ॥ चाल ॥ यथाविधी संकल्प करुनी हरि दिला नारदा हातीं । नारद म्हणे हे त्रिजग धुंडिता न मिळे असा सोबती ॥ १ ॥ नारद म्हणे उठ चाल त्वरें मज सवें जगन्नायका । विणा गबाळें पुस्तक सांभाळी आमच्या पादुका । हें काय आज आश्चर्य अगा हे वैकुंठीचा सखा । याच्या खांदा ओझें नेतसे कोठें नारद नेटका । केलें दान भामेनें नारदाप्रती यदुकुळटिळका । प्रगटता हे मात आल्या भामेसदनीं गोपिका ॥ चाल ॥ मंद्रावती बोले मुखें । भामे अनर्थकारके । तव ज्ञान आम्हां ठावकें ॥चाल॥ पाज्यातक पुष्प हें स्वर्गीहून आणिलें । तें सहज रुक्मिणीप्रती हरीनें दिलें । निर्वाण तयाचें त्वां फारच मांडलें ॥चाल॥ स्वर्गीं हरी या कामें लाविला तेव्हां स्वर्गवृक्ष देखिला । तो त्वां जंव द्वारीं आणून लाविला तेव्हां जीव तुझा संतोषला । एक वेगळी करून रुक्मिणी । अष्ट नायका आदि कामिनी । सर्व आल्या गजगामिनी तैशा । तळपतात सौदामिनी जैशा । गर्जतात कैशा हरिदानालागीं स्वामिणी । कोण हौसी वैरीण भासे अनर्थ न पाहतां त्वां अप परमार्थ गमाउनी व्यर्थ, पतीदानार्थ, कोण शास्त्रार्थ, सुचविला । म्हणे देवकी नवमास उदरीं माझ्या हरी गर्भ स्थिती । माझें बाळ द्यावयास दान तूं कोण होसी निश्चिती ॥२॥

लक्ष्मणा यज्ञजिती म्हणे साधिलें सवतीमत्सरा। तुझ्या पित्यानें मण्या-
निमित्यें वनीं धाडिलें यदुविरा । पहा पहा केवढा अनर्थ निर्दाळिलें प्रशंशी
नवरा। हा मणी घातला घातला जीवा सत्राजीत नृपवरा। अनर्थकारक
मणी प्रत्यहीं वसे तुझ्या मंदिरा। याच निमित्यें जांबुवंति ते पर्तुन
आणिलें घरा ॥ चाल ॥ तव ज्ञान समजलें आम्हा । होउनी हरिची रमा ।
ना लेखिलें पुरुषोत्तमा ॥चाल॥ बोलती सर्व वनिता आपापले परी । प्रत्युत्तर
न देची मग भामासुंदरी। बळिरामानें सैन्य तें सिद्ध करून सत्वरी ॥चाल॥
पाठोपाठीं मुनिच्या धांवती। मार्गीं उभयतांसी आटोपिती। स्वामी नारदा
उभे बोलती। कोठें नेतां आमचा यदुपती । सांगे नारद वळीरामाप्रती ।
ठकवून नेतो काय हरी या रिती ॥ चाल ॥ दान करी भामा कृष्णासी।
आम्हीं जातसों स्वआश्रमासी। भांडावया सिद्ध सैन्येसी। आले तयावरी
तो घनःशाम अग्रज मग काय वदतसे नम्र बोलते। अमृत जैसें तैसें
मुनिप्रती प्रार्थित कैसें। अति रहस्यें संतोष मुनिस पदारविंदीं। मस्तक
ठेउनी त्या संनिध मुनी वदती रडे देवकी स्नेहें नारदापुढें पदर पसरिती।
पुत्रदान मागतें देईं मज येवढें प्रसन्न चित्तीं ॥ ३ ॥ मुनिस म्हणे
बळिराम कृष्ण पालट घ्या सेवकजनां। मागे देवकी दान तिसी अर्पावें
जगजीवना। नारद म्हणे ब्रह्मादि वंदिती ज्या यदुकुळभूषणा। अनायासें
लाधला आम्हांप्रती न करितांची साधना। ते वस्तु तुम्ही नेउं म्हणतसां
ठकऊन मज ब्राह्मणा। याच प्रकारें प्रार्थितात नारदास कृष्णांगना
॥ चाल ॥ यादव म्हणती अहो मुनी। पालट सुवर्ण घेऊनी। द्या हरी
आम्हांलागुनी ॥ चाल ॥ नारद म्हणे आवश्य या घेऊनी झडकरी।
उभविली तुळातें तेथें तया अवसरीं। धांवले तेव्हां जन मग घे अवघे
सत्वरी ॥ चाल ॥ तेथें पारडीं हरीस बसविला। भामा म्हणे सोडवीन
हरीला। सत्राजितें मणी आपणा दिला। प्रसवे प्रत्यहीं सुवर्णरासिला।
सदनींहुन सुवर्णनग आणविला। गर्वें पारड्यामध्यें घातला ॥ चाल ॥ तरी
कदापि नुचले तें पारडें पडे। समुद्रामाजीं हरळ तैसें जालें रडें। देवकी

कडोविकडी घालिती सुवर्णरासी। आंगावरील अलंकारासी। घालुनिया रुक्मिणी वरासी। म्हणती सोडवूं तुळणेसी नयेतें सुवर्णभामेसी। म्हणती साधिलें सवतमत्सरासी। भ्रतारासी दान देऊन त्या। भांडारीं राज्याचे द्वारकाजन सुवर्ण आणिती। अष्ट धातु घातल्या पारडें नुचलें आक्षई क्षितीं ॥ ४ ॥ जन करिती आश्चर्य बहुत हा जड जाला श्रीहरी। गर्व सत्यभामेचा निर्दाळुन समुळिहुन करी एक चोर एक ज्यार चाहाड एक मैंद कर्म आचरी। दोघे मिळून हा मंत्र योजिला भामेच्या मंदिरीं। म्हणे देवकी भामेसी सप्तजन्मीची वैरिण खरी। कसा वैर साधिला वैरिणी माझा तव यावरी ॥ चाल ॥ मग बोले ब्रह्मनंद। जे पट्टराणी रुक्मिणी। ते नाहीं आलियांतून। घरीं तिच्या धनाच्या रासी बहुत असती। यादव ऐकून उद्धवासी पाचारिती। जा घेऊन या रुक्मिणीप्रती ॥ चाल ॥ वेगें उद्धव मंदिरीं पावले। तेथें भीमकीरत्न देखिलें। भावें उद्धवीं हृदयीं आलिंगिली। जालें वर्तमान निवेदिलें। किंचितसें हास्यवदन दाविलें। भीमकीचें हृदय वर उठलें ॥ चाल ॥ हस्तपाद प्रक्षालुन अपूर्व गर्व नसून मग सर्व प्रकारें। बरवें परी तुळसीस प्रार्थी हें पर्व मोठें पक्क पत्र तबकांत वस्त्र आच्छादून वरतें। पुर्तेपणें भावबळें जाणून परतें। सुवर्ण काढून तुळेतें तें तुळसीपत्र ठेवितां पारडें उंच उसळलें। कळला हा भावार्थची सारा। जयजयकारा प्रवर्तले ते वृंदारक संभारानें। पुष्पवृष्टी करिती धरिती हातीं रुक्मिणी सर्वेशा। पाहती तमाशा। गोपी कशा धन आशा धरुन भांडती परस्परें। तशांत भामा धन अपार आवरित स्वहातें फारच म्या भांडार फोडुनी। सुवर्ण आणिलें किंचित् होता न्यूनच मग मी। बरी नव्हे आवघे जन पडती एकमेकींच्या, गळां देवकी म्हणे सकळां' तुम्ही लबाड दिसतां वस्ता द्या माझ्या मज वांटूनी। सुना म्हणती सासुशीं कशाला कशासी नग द्या आम्हांसी वांटूनी। याच प्रकारें सहद्वारका गोपिका धनलोभें गुंतल्या ते पाहती ब्रह्मसुत कृष्ण रुक्मिणी।

५ पैं.

भीमकीनें भावार्थीं सोडवून नेला हारि या रीती । होनाजी बाळा म्हणे मुकेला भावाचा यदुपती ॥५॥

## ४ : दमयंतीविलाप

माझे नळरायें निरपराधि मज त्यागिलें ॥ध्रु०॥ अगदीं तीन दिवस अरण्यामाजीं होता उपवासी । म्हणऊन पक्षी नळराय मुकला वस्त्रासी । येऊन नदीतिरीं मग नैषधरायें वधिलें मच्छासी । पचवून लवकर घाली म्हणुनी या दिधला मजपासी । भाजुनिया जों सत्वर गेले वधावयासी । होऊनिया तों जिवंत माझे हातिचा गेला दुःखरासी । केवढे दुःखाचे डोंगर झाले उभयतां आम्हांसी । बोले येऊन विदर्भाजवळीं वनीं कष्ट भोगिले ॥१॥ ऐशा दुःखामध्यें असतां घडला हा वियोग बाई । या गे समयांत तयाच्या सखये मी सन्निध नाहीं । वाटे दुःख माझ्या अंतरीं गत करूं तरी मी कांहीं ।। पक्ष्यादिक वनचरें वृक्ष-शिळे हो तुम्ही सर्वत्रांही । येथें कीं काय नळासी लवलाही । पाहूं जाऊं दृष्टीनें आपल्या तरी कवणे ठाईं । भक्षाभक्षा श्वापद हो मजला तुम्ही सत्वर गती । याचें किंचित् हृदयांत न साहे दुःख मानिलें ॥२॥ दोघे उपवासी तीन दिवसांचें या अरण्यामार्गे । देखुनी ओसाड धर्मशाळा कष्टी निजलागे । तेथें लागून गेली काळसी दारुण निद्रा गे । माझ्यानें पहावेनात क्लेश तयासी म्हणवून मजलागे । फाडून वस्त्र अर्धें निजल्या मी जागीं टाकून गेला गे । आतां मजला त्याविण मरण सुखाचें हें नयेची कां गे । कंटक पाषाण रुतती त्याच्या सकुमार पदीं । कधीं ग उष्ण वायूसी तयानें नाहीं पाहिलें ॥३॥ ऐसे दुर्धर पर्वत विंध्याद्री ओलांडुनी गेली । तेथ त्या वनीं ऋषींचीं स्थानें उत्तम देखिलीं । म्हणती वसुधामर पाहुनी तिजला आदि शक्ती उदेली । तेव्हां आमचे तपसिद्धी न कळे आज फळाशी आली । ऋषीनें मग प्रसन्नमनें करुनिया तिजला पुसी केली । जितुकी वर्तली तितुकी ऋषीवर्या वार्ता सांगितली । पुढती

आज म्हणे होनाजी बाळास तिनें पतिव्रतपणें। माग्य पहा ऋषी आशिर्वादें पतीमुख देखिलें ॥४॥

## ५ : द्रौपदीवस्त्रहरण

\ द्रौपदी म्हणे ये समयीं धांव हृषीकेशी। गांजिलें फार मी कौरव दुष्ट सभेशीं ॥ध्रु०॥ ऐश्वर्य तेजसंपत्ती पंडुकुमाराची। त्यावर मंडप चतुराई विश्वकर्म्याची। अनुकूल अवघे परिपूर्ण कृपा श्रीहरिची। पाहून कपटीवृत्ती जलपे सुयोधनाची। त्रैलोकीं कीर्ति राजसूय यज्ञाची। वर्णिती सुरनर ते सभा धर्मरायाची॥ चाल॥ दुर्जनें कपट योजून द्यूतपण केलें। त्या पणें करूनिया धर्म राज्य हारविलें। द्रौपदीसाहित धन सर्वही जिंकून नेलें॥ चाल॥ सद्‌बुद्धि धर्म ऐसा विपरीत कैसा। खेळून द्यूत पाही। बैसला दिनत्रई निरउपाई। तो द्रुपदजांवाई। सद्भक्त सत्य वचनी अनुचित करणें। दुसरें न सुचे कांहीं॥ चाल॥ दुर्योधन बोले विदुरासी। आम्ही जिंकिलें पंडुसुतांशीं॥ झाली द्रौपदी आमची दासी॥ चाल॥ सभेमाजीं बोलावून आणी। तिचें पतिव्रतापण ये स्थानीं। दाविलें तें पहावें सर्वांनीं। विदूर म्हणे अरे पापखाणी। निकट आली तुजला प्राण-वाणी। तरिच वदसी अपवित्र वाणी। तिचा पाठिराखा निर्वाणी। निशिदिनीं सन्निध चक्रपाणी॥ चाल॥ दुर्योधन त्या विदुरासी बळें धिःकारी। निकरानें। आपले प्रातकामीं सुतासी हांक मारी। आदरानें। भीड सोडून आण पांचाळी सभेमाझारीं। स्वकरानें। तो म्हणे जाऊन द्रुपदराजकुमारी। ते द्यूत खेळून हारविली संपद सारी। धर्मानें। बोल-विती दुर्योधन सभेशीं। निर्धारी। क्रोधानें। किंचित् न चले कोणाचें तेथें अवधारी। अभिमानें। पांचाळी वदे दुर्योधन आधींच द्वेषी। मांडिला रोकडा अनर्थ भाग्यविशेषीं। द्रौपदी म्हणे ॥१॥ द्रुपदतनया म्हणे दुर्योधनपुत्राशीं। श्रुत करा निवेदन तुम्ही भीष्मद्रोणाशीं। द्यूत खेळून धर्में हारविलें आपणाशीं तरी मग तें तुमचें कारण काय आम्हांशीं। मी

पंचजाया मज नेमिलें पंचवराशीं । दोन मास द्वादश दिवस एक एकाशीं ।। चाल ।। प्रस्तुत आतां रत असें भिमाचे ठांई । मजलागीं सत्य सर्वथा जिंकलें नाहीं । दुर्योधन जाऊन समेशीं लवलाही ।। चाल ।। सांगे तयाशीं वार्ता म्हणे ताता । ऋतुस्नात ऋतुकाळीं । द्रौपदी धरून पदरीं समेभीतरीं । केवी आणूं पांचाळी दुर्योधन निरभर्त्सी म्हणे छी छी । पुत्राशीं तये वेळीं ।। चाल ।। दुःशासन आज्ञापी कुमती । आण पांचाळी सभे निश्चिती । किंचित् भिड न धरितां चित्तीं ।। चाल ।। महा व्याघ्र तो सरसावोनी । धरीं वनांत कपिलेसी जाउनी । कीं तें जनकात्मजा निधान । धरूं धांवला द्विपंचवदन । तेवीं द्रौपदी दुःशासन । म्हणे आतां वरी दुर्योधन ।। चाल ।। अन्यथा हें भाषण तूं काय करीसी मातें । सत्पात्रा । गांधारी समान श्रेष्ठ मी सुयोधनातें । शिष्टाई कळेल तैसी करी तयातें । सत्पात्रा । हो माझा द्रुपद पिता अशा समयातें सत्पात्रा । न ऐकसी तरी घे शस्त्र मज वधी येथें । सत्पात्रा । तो पापरूपी निर्दय बोलतो तयेशीं । उठ चाल सभे वाचाळे धरीन केशीं ।।२।। ऐकून कठीणोत्तर द्रौपदी मागें सरली । मंदिरामाजीं शशिवदना भुखीं उतरली । धाऊन दुःशासनें कवळून केशीं धरिली । त्या श्रवणफुलाचीं मुक्तें तळीं विखुरलीं । भवतालीं पाहे चहूंकडे सभेंत घाबरली । म्हणे धांव धांव श्रीरंगा लज्जा हरली ।। चाल ।। दुर्योधन जानु उघडी करून दावी । द्रौपदी बैस अंकीं दुजी गोष्ट न वदावी । मम संगती योगें त्वां संपत्ती भोगावी ।। चाल ।। द्रौपदी म्हणे नष्टा बसेल दुष्टा । तुज अंकीं गदा नवरी रक्तेची हरिद्रा लावून निद्रा । कर रणमंचक समरीं ऐकतां शब्द असा व्याघ्र जसा बघुं रिघे हरणी विवरीं ।। चाल ।। दुःशासनास तो दुर्बुद्धी । म्हणे दुर्योधन न करी अवधी । पांडव हे शतमूर्ख त्रिशुद्धी ।। चाल ।। आधीं वस्त्रें घे यांचीं हिरोनी । मग द्रौपदीशीं नग्न करूनी । दावया समेशीं त्वरें या नयनीं । हा शब्द पडतां पांडवश्रवणीं । पांच जणें वलकलें वेष्टनीं । केवळ दीन बैसले होऊनी । त्या द्रौपदी सन्निध

येउनी निरी आसडितां दुःशासनीं । आठवी कृष्णाशीं कृष्णभगिनी ।। चाल ।। गांजीती कौरव दुर्जन मज मेघःशामा । श्रीरंगा । संकट जाणून सत्वर ये मंगलधामा । श्रीरंगा । विधिजनका भक्तजनांच्या हृदयारामा । श्रीरंगा । द्वारकाधीशा रुक्मिणीमानसविश्रामा । श्रीरंगा । कां पहुडलास शेजेवर घेऊन भामा । श्रीरंगा । खेळला द्यूत धर्म म्हणून मोकालिले आम्हां । श्रीरंगा करुणानिधी क्षीराब्धिवासा अजून न येशी । लज्जा गेल्यावर तूं कायहो डोळा पाहासी ।।३।। पहुडला शेषमंचकीं तो मुमुक्षूदानीं । तळहात पद रुक्मिणीचिद्रत्नाची खाणी । उद्धव अक्रूर तें सितळ समीर संधानी उभे भक्तराज तिष्ठती करद्वय जोडुनी पाणी ।। ऐकिली श्रवणीं द्रौपदीची मिलिंदवाणी । गुंजारववर्ण श्रुतहरीतें निद्रास्थानीं ।।चाल।। कौरव तस्कर शिरले पांडव भांडारीं । द्रौपदीसहित धनसंपत्ती नेली सारी । ऐकतांच जागृत झाला कंसतमारी ।। चाल ।। घाबरा उठून गे निघून वेगें । कोणासही न पुसतां । आपले भगिनीसाठीं तो जगजेठी । आला इंद्रप्रहस्ता । म्हणे द्रौपदी सावध होई । आलों ऐकून व्यवस्था ।। चाल ।। याज्ञसेनी जंव मागें पाहे । कैवारी पाठीशीं उभा आहे । हें देखून मानसीं निर्भयें ।। चाल ।। तंव दुर्जन दुःशासन सरसी । निरी ओढीत फेडित वसनाशी । नेसवी वस्त्रें हरि भगिनीशीं ।। चाल ।। डाळिंबी मोती चुरनकसी । राधावळगुजरी खसखसी । कुंबुवर्ण पटवस्त्र प्रकाशी । निळी हिरवी अंजिरी पानसी । सोनवडी रानघडीसरसी ।। चाल ।। नाना जाती भगिनीशीं पुरविलीं वस्त्रें । श्रीरंगें । आपल्या पितांबरें झांकिलीं द्रौपदी गात्रें । भगवंतें । हें फेडतील म्हणून करीं बसविलीं शस्त्रें । निजअंगें । पांडव यश आलें नेणती अपवित्रें । मदसंगें । श्री शांत सिद्ध तत्पर सन्निध सेवेशीं । गाई होनाजी बाळा वस्त्रहरण प्रेमेसी । द्रौपदी म्हणे ये समयीं धांव हृषीकेशी।।४।।

## : ६ : फंदी अनंतकवनाचा सागर

फंदी अनंत कवनाचा सागर, अजिंक्य ज्याचा हातखंडा । चमत्कार चहूंकडे चालतो, सृष्टीवर ज्याचा झेंडा ।। धृ० ।। मूळ संगमनेर ठिकाण

त्याचा कीर्ती उदय जैसा अर्की । नवीन तऱ्हा नारळी डोईला । पदर पागोट्याची फिरकी ।। वाचावंत संपत्तीसारखी बहुतांचें तनमन हारकी । लंगेलुंगे कवि भेदरले, अवघ्यांवर त्याची गुर्की । समोर गातां कोणी टिकेना । मनामधीं बसली कर्की । धन ज्याचा हातचा मळ, केवळ तोच रुपयांचा हांडा । फंदी अनंत कवनाचा सागर, अजिंक्य ज्याचा हातखंडा । चमत्कार चहूंकडे चालतो, सृष्टीवर ज्याचा झेंडा ।। १ ।। फंदी आनंदी छंदी वरदी, ब्राह्मण त्यावर गुरुकृपा । सरस्वती जिव्हाग्रीं अक्षयीं, भंग नसे ज्याचा हरपा । कवन बहुत उदरामधीं भरलें, फणस जसा मोठा कापा । भाळीं त्रिपुंड्रीं टिळा केशरी, कस्तुरीचा वरती छापा । मोठमोठ्या राज्यामधीं महशूर, जगजाहीर चारी तर्फा । आकट विकट कवनांच्या चाली, नित्य नव्या आक्षयी थापा । विद्याअभिमान नाहीं जयाला, असा कवी कंचा धुंडा । फंदी अनंतकवनाचा सागर आजिंक्य ज्याचा हातखंडा । चमत्कार चहूंकडे चालतो सृष्टीवर ज्याचा झेंडा ।। २ ।। नांवाचें चांदणें जगाचें, मुख्य मुख्य खासे खासे । कीर्तनरंगीं झडा घालिती मानवाला सर्वत्रासीं असे । पुढें मागें ऐसा नसे दुसरा मृत्युलोकींचा राहिवासी । पहा रत्न पंधरावें माता, धन्य जन्मली हो त्याशीं । असा पुरुष चिरकाळ असावा, गुणनिर्गुण पंडितराशी । होनाजी बाळ म्हणे जगावा, बहुतकाळ आयुष्य याशीं । अविट ज्याची करणी ऐकतां, देहप्राण होतो थंडा । गुरव त्याचे संगें सोबती; कुशल कला जाणें उदंडा । फंदी अनंत कवनाचा सागर, अजिंक्य ज्याचा हातखंडा । चमत्कार चहूंकडे चालतो सृष्टीवर ज्याचा झेंडा ।। ३ ।।

## ७ : सवाई माधवराव

### पोवाडा

त्रेतायुगीं शूर पाही । परशुराम विख्यात, कलिंत माधवराव सवाई ।।ध्रु०।।
एकवीस वेळां धरत्री । फरशधरें अति पराक्रमें कुंभिनी केली निःक्षेत्री ।

माघ शुभनक्षत्रीं । पुरंदरीं जन्मतां दाक्षिणेमध्यें राज्य एकछत्री । नाना प्रधान मंत्री । श्रीमंत गर्भी असतां राज्य राक्षिलें आराधुन यंत्री ॥ चाल ॥ कीर्ती दिगंतरीं मिरवे । जे महा महा दळ दक्षण उरवे । करून पुंडाई वर्तती गर्वे । अजिंक्य शत्रु जिंकून सर्वे । त्यांच्या मुखें वदाविलें बर्वे । श्रीमंतां सन्मुख युद्ध न करवे । स्वकरें बुद्धी शस्त्र न धरवे ॥ चाल ॥ नाना ज्ञानगभस्ती आस्ता । करी स्वराज्य न्यून न दिसतां । मुलखामध्यें चौथाई शिरस्ता । शहर पुण्याशीं येती रस्ता । जयजय धर्मराज इंद्रप्रस्था। तैसे श्रीमंत तक्तीं बैसतां । संनिध नाना दिपिच्या वस्ता । मोंगलावर कंबरबस्ता । युद्धीं गवस्ता काय अवस्था । तें कथन बुध श्रवणीं वरसतां । वाटे प्रजेशीं सौख्य समस्तां । ऐकुनि हे व्यवस्था सारी ॥ चाल ॥ अहारे आवघे भूप तयारी । पर्वतीस जाते जंव स्वारी । गजपृष्ठी आदर्शअंबारी । चोपदार ललकारी भारी । हारोहारी रयत व्यापारी । सावकारी मुजरे होतां मग मान तया साहेब दरबारीं ॥ चाल ॥ नानाची चतुराई धन्य तयाचें करणें दुसरीच उपमा नाहीं ॥ त्रेतायुगीं० ॥ १ ॥

अमृत वेळ सुमुहूर्ती । गारपिरावर डेरे दिधले शत्रूशीं बांधुन शर्ती । रणीं पण केल्या अर्थी । नानाचें शौर्य तेज जें अर्जुन जैद्रथ वधार्थी । दळ तीन लक्षांची भरती । व्हावयास नानांनीं धाडिलीं पत्रें देशावरती ॥ ॥ चाल ॥ कोण कोण सरदार ते न कळे । प्रळयकाल शत्रूशीं तमले । वैकुंठीं यशाचे इमले । बांधुन मग सुरवंशीं जन्मले । तें श्रवण करा कथनीं न कळे । जरीपटक्याचे सर्वे नेमिले । बाबा फडके हुजरातींतले । मानकरी शत्रूशीं तमले । शिरीं समले लाउन निकरानें ॥ चाल ॥ धायगुडे पाटणकर माने । जाधव यादव रणाभिमानें । घोरपडे केवढे मर्दाने । निंबाळकर पांढरे स्फुराणे । ढमढेरे बरे सत्रानें । उभे आपआपल्या बाजुनें ॥ हुजरातींतले नामाभिधानें । किंचित कथली यथामतीनें । मध्यम पतकीं हिंदुस्थानें । विंचुरकर पवार धिरानें । उभे सडे फौजेंत भरानें ॥ चाल ॥

राजे बहादर रंगराव होळकर स्वतां आदी उमवार । तयाचें जाहीर पृथ्वी-वर नांव । प्रतापि शिंदे दौलतराव । सैन्य समुदाव समंधी ॥ चाल ॥ जिवबादादा ते रणफंदी । काबीज हिंदुस्थान सिवंदी । करून आले दक्षिण संधी । मिरजवाले भोंसले सुबुद्धी । आपा बळवंत निशाधी । ते परशुरामपंत प्रतिनिधी । वजावा बापु ते स्थीरबुद्धी । फिरंगाणी हापसाणी सिद्धी । फराशीस आरबस्तानी सिंधी । चंदीचंदावर बुंदी । कोट्याचे नृपाळ असंख्य सर्वे शूरांची मांदी । धनी माधवराव त्यामधीं । प्रवर्तले मग मोंगल युद्धीं । राज्य आविंधी । बुडवुन होतां किंचित अवधी । परागंदा शत्रूंशीं करूं म्हणती । द्वादश कोस तळाची गणती । महा महा मागिल युद्धांतीं । सैन्य न कळे तें पैवस्ती । वडिल वृद्ध आश्चर्य सांगती । धन्य धन्य नानाच्या युक्ती ॥ चाल ॥ असो शत्रूच्या पराजयालागीं वेळ होती । मजलोंमजलीं चढाई करून चालले सैन्य पुढें नेमुन सन्मुख लढाई । परशुराम ॥ २ ॥

युद्धप्रसंगकाळीं । मोंगल दळरण युक्तीशीं सादर श्रीमंत सैन्य मुऱ्हाळी । होतां रणखंदाळी । यंत्राचे भडिमार न दिसे धुम्रें सूर्य निराळी । मोक-लितां शरजाळी । भयाभीत गज शुर शत्रुसैन्य माळोमाळीं ॥ चाल ॥ येकच रणवाद्याची घाई । वीरश्रीची धुमराई । अचळप्राय मत्तकुंजर शाई । चक्राकार उभे शूर शिपाई । दळ आशिलता धरून करा पाईं ॥ चाल ॥ ठाईं ठाईं रथ शोभिवंत मग दाही दिशा चवताळती वारु । असी वादा असीवार तों ठाईं । थाट पुढें शत्रूचा देखोन हाट करुनीया साठ तुरंगा । जाणउन मग गांठ घालिती प्राणाशीं दुजार्यांच्या दाऊन ऊर्ध्व वाट माघारे फिरती । दाट पराक्रम तुमचा साहेब अफाट कीर्ती । वडला वडली भार असे जंव पडती । चढती कळा धन्याची जाणुन वीर असे भिडती । तेथें चढती मारून अडती कै नरमुंडे पडती । झडती घे यासीं येकयेकाशीं उलटे । किंवा काळच परसैन्यावर उलटे । पापभार शत्रू निवटले फुटलें परदळ लुटलें । अवघे विटलें । मोंगल मल्ल युद्धासी

उठले । मागें इतक्यांत यशस्वी । श्रीमंत वीर प्रगटले । बळें लगटले । खटलेखोर तो मश्रुलमुल्रख । त्यास विगटले । घाबरलें दळ त्यांचें पळाया । पुढें वीर सरले । गांगरले परिवारासहित हरिले । अवघे पराक्रम भुवनत्रयीं भरले । जें शत्रूचें मीपण हरलें । कारागृहीं ठेवावें ठरलें । सर्व सैन्य यशवंतराव साहेबांचें फिरलें ॥चाल॥ विरलें जिकडे तिकडे सारें । बिनहत्यारें येती शरण तृषेचे भारें । पाणी पाजुन प्राण वांचवा । म्हणति हे परभारें वार्ता । ऐकुन कानीं श्रीमंतांनीं । आज्ञा दिधली नाहीं, मनाई । कोणाशीं पाणी द्या सर्वांशीं । इकडे आज्ञा वकिलाशीं चवथाई आणखी माहाल मुल्रख पूर्वींचा होता तो मागुन घ्या त्याशीं श्रीमंत आज्ञेनें नबाबाशीं मग वकिल भेटले । चवथाई मुलुखाचें निवेदन श्रुत केलें । मग वकिल आदरें गौरविले । त्या करें त्वरें मग । तें कबुलायतपत्र दिधलें । वाचितांच हर्षकृत मनीं झाले । जय संपादुन शहर पुण्याशीं येऊन आदरले ॥ चाल ॥ करून नगाची राई । जयवाद्यें वाजवीत परतली श्रीमंताची शाई ॥ त्रेतायुगीं० ॥३॥

शृंगारुन गजातें । आदर्श अंबारींत । करिती शूर मुजरे पिटुन भुजातें । उभवुन यश-ध्वजातें । पुणें मार्गीं लागले हें ऐकुन श्रवणीं सौख्य प्रजातें । आनंदरूप द्विजातें । ठेवूनियां श्रीराम आले भेटायाला भरतानुजातें । स्नेहसद्गदीत नंदीग्रामीं । तैसे श्रीमंत थेऊर मुक्कामीं । स्वामी देखुन स्व-सेवका सुख अंतरयामीं । व्योमीहून सुर पुष्पवृष्टि करिताती सकाळिका । सरंजामी ते सरदार तैनामी । स्वामी सान्निध शोभताती अती सव्यवामी । कामीं पडले रणसंग्रामीं । मुहूर्त शुभ पाहून स्वधर्मी । यावयास जमावले । ताकीद शहरांतील रस्ते झाडा ऐकतां दूत धावले । निर्मळ रस्ते करुन दुतर्फा दीप लावले । नगर लोक पहावया धांवले । पाहुन मन विश्रांती पावलें । ते समयीं कोणाचे कसें जिवीं भासलें । पूर्वतपश्चर्येचें फळ आज उद्भवलें । कीं श्रीमंत रूप या दृष्टीमाजीं समावलें । सर्वांनीं धन्याशीं

पोहोंचविलें । वाडयांत आनंदें बैसविलें । गादीवर साहेब । मग मुजरे करून सकळ शूरांनीं । त्वरेनें निरोपवारे घेतले । स्वनगरासी जाया इच्छिलें । येथून मोंगल युद्ध संपलें । श्रेष्ठ भाग्य रायाचें केवढें । शके सोळाशें शहाण्णवांतील जन्म । धन्य तधींपासून या दिवसेंदिवशीं । राज्याचीं चिन्हें दाखविली लीला । अद्भुत हे कीर्ति गाजती । सर करुनियां सर्व ही सृष्टी । शके सतराशें सत्तर राक्षसनाम संवत्सरीं । शुक्लपक्ष अश्विनी पौर्णिमा ते दिवशीं । सायंकाळीं मग संपाविला अवतार आपला । श्रीशांत (?) शिद्ध कृपावरें । होनाजी बाळा करी कवन रसिक जें जनांसीं प्रिय या । श्रीमंत राज्यामधीं प्रजेला सुखापार, ऋषी महान महान कल्याण वांच्छिती गादीचा आधिकार ज्याला लक्ष श्रीमंता पायीं । लावुनी रामा अंदु निशिदिनीं रसिक कवनरस गाई । त्रेतायुगीं शूरपाहीं परशुराम विख्यात कलींत० ॥ ४ ॥

## ८ : महादजी शिंदे

### पोवाडा

॥ द्वापारीं श्रीमाधवविलास भामवतीं प्रत्यय पहावा । तसे कलीमध्यें रंग खेळले श्रीमंत पाटीलबावा ॥ ध्रुवपद ॥

पुण्यासारखें दुजें शहर या दाक्षिणेंत कोठें नाहीं । धर्मराज श्रीमंत धन्याची त्रैलोक्यामध्यें अवाई । धन्य रणवीर पाटीलबावा पराक्रमी जाणती शाई । नवखंडामध्यें कीर्ति गाजती धनी रावसाहेब सवाई । यशवंत अति श्रेष्ठ तपोबळी साजती ब्रह्म बादछाई । दिल्लीपतीनें माहिमरात दिल्ली नालकी लवलाही ॥ चाल ॥ स्वामी प्रताप अद्भुत वर्णूं कुठवरी । सारें हिंदुस्थान पाटीलबावाचे करीं । घेविलें असून स्वथानी परात्परी मी वर्णूं कुठवरी हा प्रादुर्भाव स्नेहाचा ऐकावा ॥ द्वापारीं० १ ॥

एके सतराशें पंधरा चैत्र नाम प्रमादी संवत्सरीं । अत्यादरें हा रंग

खेळले उभयपक्षीं हर्ष अंतरीं । बंब भरून रंगाचे ठेविले ठाई ठाई शहरा-भीतरीं । गुलालाचे हौदे भरूनिया खुप कसले हस्तीवरीं । तक्त राव्यावर पात्रा नाचती परोपरी । रंग भरून पिचकाऱ्या घेतल्या सर्वांनीं आपले करीं ॥ (चाल) ॥ एक एकावरी चालले रंग टाकीत । नानांनीं बंब रंगाचे ठेविले जेथें त्या ठाई येतां श्रीमंत स्वारी अवचित । सर्व भिजविले तेथें हा कुठवर घोष कीर्तिचा वर्णावा ॥ द्वापारीं० ॥ २ ॥

सर्व मुत्सदी मानकरी यांच्या हौद्याचे जमावानिशीं । हस्ती सेवकां-सुद्धां सकळहि लाल रंग रसीं । रविवार पेठेमध्यें पाहा तात्यांचे दरवाज्याशीं । दोन बंब रंगाचे भरून ठेविले होते अति सायाशीं । निट पेठेंतून श्रीमंत स्वारी गेली त्या ठायाशीं । खुप गर्दी रंगाची केली त्याऱ्यांनीं अति उल्हासी । ते दिवशीं सफेत असा कोण नाहीं राहिला । रंगाविरहित नाहीं दृष्टीनें पाहिला ॥ लौकिक रंग हा पृथ्वीवर पसरला । पुत्रपौत्रांशीं सांगायाशीं जाहला । हा रंग सुवदावा ॥ द्वापारीं ॥ ३ ॥

नानापरी गोकुळीं क्रिडले श्रीमाधवजी कुंजवनीं । तें साक्षात् दृष्टी पाहिलें पुणें नगर पुण्यस्थानीं । नाना परीचे हरिचे विलास शास्त्रीं ऐकिल्या श्रवणीं । पुणें ग्राम गोकुळ क्रिडलें त्यांत कृष्ण श्रीमंत धनी । अधीक देह आमचे आम्हांला भासतसें आपले ध्यानीं । स्वामीपद अवलोकुन दैवी उल्हासी होते नित्यानी ॥ (चाल) ॥ होनाजी बाळा पदरचा आहे किंकर । विज्ञप्ती श्रुत करितों जोडून कर । अक्षई असावी कृपा सेवकावर । धनी बक्षीस देणार । रामा अंदु वांछी स्वामी सेवा ॥ द्वापारीं० ॥ ४ ॥

## ९ : नूतन वय दोघांचें

१ नूतन वय दोघांचें सारखा जोडागे बाई । पति प्रवासा जाती हौस मनची पुरली नाहीं ॥ध्रु० ॥ सासू सासऱ्या घरींच आजवर होतें मी अज्ञान । बाळदशा अगदींच आलें नव्हतें मजला न्हाण । आतां उमेदींत

आलें समजलें जों पुरतें ज्ञान । तो पती निघून जातो मारून प्रीतीचे बाण । हुरहूर वाटे जिवा लागले हंसाचें ध्यान । कधीं भेटती येऊनं सुखाचें घरीं आनंदानं । केवळ झालें वेडी सुचेना घरधंदा कांहीं ॥१॥ फार कठिण ऐकतें मुलुखगिरी उत्तर देशाची । झाडी मोठी घनदाट सांगती दहशत भिल्लांची । कंटक वन दारुण सावजें फिरतीं जंगलचीं । वाघ म्हणतां कानीं आरोळ्या पडती व्याघ्राची । अशा अरण्यामध्यें कीं धरली उमेद जायाची । राहण्याचा निश्चय ठरवाया भिड वाटे त्याची । मर्जी एक तऱ्हेची बोलतां नाहीं मजला ठायीं ॥ २ ॥ माझा सुखाचा पिंड मला कधीं दुःख नाहीं ठावें । अशा पराईमध्यें दुःख तरी कोठवर सोसावें । माय बाप भाऊबंद आपल्या दैवानें ध्यावें । एवढा जिव मारून कोणाच्या वळें मी कंठावें । एकांतीं धरलीं लाज शरम म्यां हें काय बोलावें । असो यापुढें आतां दिवस कोण्या रीती जाळावे । या ममतेच्या मुळें वाटती वोस दिशा दाही ॥ ३ ॥ कोण उपाय करावा मी घरची सासुरवासी । दर्द जिवांतील माझा मी तरी सांगूं कोणापाशीं । दोन गोष्टी समजावून सखये सांग भ्रताराशीं । येथेंच ईश्वर येईल म्हणावें द्रव्याच्या रासी । नित्य उठून अंतरीं प्रार्थना करितें देवाशीं । पति घरीं राहतील असा कधीं पावल नवसासी । होनाजी बाळा म्हणे येतील घरीं परतून पाही । नको पडूं संशयांत सखये किंचित सहसाही ॥ नूतन वय० ॥ ४ ॥

## १० : विरहव्याप्त आज सखे

विरहव्याप्त आज सखे राजमंदिरीं । अशा संकटामध्यें ते पती द्विपांतरीं ॥ ध्रु० ॥ जिंकीत जीवमात्र समुळी विषय रोग हा । अन्यत्र तें दुःख व्यर्थ शरीरभोग हा । थोर दुःख मुख्य सखे पतिवियोग हा । भ्रमित मन होउनी फिरे पिशाच्यापरी ॥ अशा० ॥ १ ॥ निशी जशी नीकुमुदिशी जळीं विकासती । होऊन प्रफुल्लित समीरसवें सुवासती । त्यांत पुष्पहार ते विखार भासती । शीतउपचारार्थ शयनीं दहती अंतरीं ॥ अशा० ॥ २ ॥

कुठून प्रवर्तली असे घोर यामिनी। त्यांत आम्ही कुळशील कुळवंत कामिनी। न मानुन गृहस्वार्थ कोण्या अर्थे स्वामिनी। करून चित्त कठोर कसे राहिले दुरी ॥ अशा० ॥ ३ ॥ निज घर सोडून सखे पारखे घरीं। जावें वाटे पद ठेवणें अहिफणावरी। अन्य पुरुष चंद्रवरद चतुर्थी परी। न पाहती जन तद्वत मनवृत्त हें सुंदरी ॥ अशा० ॥ ४ ॥ कृपण तो धन रक्षून जसा वर्ततो जनीं। पर भाषणीं धर्म तसें वागती मनीं। या निश्चयें लाभ वाटे सांब पूजनीं। हृदयीं म्हणे होनाजी बाळा ध्यान हें धरीं। अशा संकटामध्यें ते पति द्विपांतरीं ॥ ५ ॥

अनुक्रम
विभाग
क्र.

## ११ : गुणीजन गुणमंडीता

गुणीजन गुणमंडीता पाहतां अहो सद्गुणरासी। सर्वोपरी प्रत्यक्ष लक्ष तुमचे पायापाशीं ॥ध्रु०॥ सेवार्चनीं ध्यानस्त असतां मनापासून पाहीं। अरुणोदयपर्यंत ध्यान मजला दुसरें नाहीं। चारी प्रहर बत्तिस घटिका तरी प्रपंचा ठायीं। शरीर मात्र वर्तते परि मन निमग्न तव पायीं। स्नेह वियोग हा रोग करितसे या देहांतलाही। चैन पडूं नये कोठें वाटती ओस दिशा दाही ॥ चाल ॥ मम प्रियकर प्रिय पात्रा मी कुडी तुम्ही आत्माराम। मंगळसूत्र गळीचें तुम्ही माझें मंगळधाम। मी तों तीर्थयात्रा तीर्थी तुम्ही केवळ पुण्यग्राम। मन पावत विश्राम अशा तुमच्या प्रीतिरसाशीं ॥ १ ॥ धन्य धन्य सौभाग्य शुद्ध कुंकुम विशाळ निढळीं। कंठीं मंगळसूत्र धन्य मी जगीं भाग्य आगळीं। अलंकार भूषणें वस्त्र प्रावर्णयुक्त सगळी। काय न्यून मज स्वामी पुण्य तुमच्या पदरीं सगळीं। अनुकूल पदार्थ मात्र असतां लक्ष तुम्हाजवळी। निष्ठा अंतीं प्रतिष्ठा हें जीव जाणें हृद्कमळीं ॥ चाल ॥ तुम्ही केलें पवित्र मला म्हणऊन पदरीं पडलें। फळलें तप पूर्वीचें तव अर्धांगीं जडलें। अनायासें रत्न मला अंधारीं सांपडलें। भागि-थींत घडलें स्नान मग कारण काय इतर जलाशीं ॥ २ ॥ प्रयत्नेंविण अनायासें लाधलें निजसुख प्राप्तीचें। मग कासया करावें साधन क्षुद्र

दैवतांचें । सुधा प्राशिल्यावर काय भयें पळावें जिवित्वाचें । संजीवनि साधिल्या यत्न काय अनेक मंत्राचे । घरीं अहिल्या मग कारण काय दीपाचें । एक सद्भावावरून जोडले पाय असे तुमचे ॥ चाल ॥ तुम्ही स्वामीराज मी तव तुमची जाया । तुम्ही कल्पवृक्ष मी तळीची अति शितळ छाया । तव पदावरून आपली कुरवंडी करीन काया । अक्षई तुमच्या ठाया पाहून झालें सुखवासी ॥ ३ ॥ पूर्वसंबंधावरून मातृपितृ उदाराशीं आलें । नंतर काया वाचा मनें वनिता तुमची झालें । भाग्यउदय सौख्यांत अष्ट अंगीं मी निवालें । विरक्त मात्र स्वतःसिद्ध नाभिकमळापासुन धालें । साध्य साधनीं देहगेह समुळीं अवघेंच विरालें । ब्रह्मानंद डोहांत एक सद्भावें मी बुडालें ॥ चाल ॥ यांतील सारांश असा मुळीं एक शुद्ध सद्भाव । तरी प्राप्तीचा अनायासें स्वामी पदकमळीं ठाव ॥ सत्वार्थीं असावी एक सन्मार्गी मनाची धांव । तरीच जड देह नांव पार होईल पैल तिराशी । होनाजी बाळा म्हणे मी करीं पवित्र पवित्राशीं ॥ ४ ॥

## १२ : हिण माझें प्रालब्ध

हिण माझें प्रालब्ध वांझपण कधीं फिटेल बाई । एक बाळक पोटीं नाहीं ॥ ध्रु० ॥ सर्व गोष्टी अनुकूल कृपा परिपूर्ण ईश्वराची । नसे घरीं न्यूनता मला बाई कोण्या पदार्थाची । काया वाचा मनें भुकेली एक्या बाळकाची ॥ चाल ॥ आपआपल्या घरीं नारी मूल घेऊनिया कडे । हौसेनें उभ्या राहतात भ्रतारापुढें । बोलविती मुलापासून वेडेवांकडे ॥ चाल ॥ हांसविती पतिला अशा प्रकारें करून । रिझविती पतीचें मन एका बाळा-वरून । घडोघडीं बोलतो एकांतीं सखा मुख भरून ॥ चाल ॥ धिग्धिग् हें माझें जिणें । बाई एक्या बाळाविणें मंदीर घर दिसतें सुनें । कोण मधीं अडथळा ? न कळती पूर्व दोष कांहीं ॥ हिण० ॥ १ ॥ जरजर झालें शरीर प्राण कासाविस न गमे कोठें । लेंकुरवाळ्या पाहून माझें तिळ तिळ काळीज तुटें । नगनगोटे घडवायाचें मज कौतुक मोठें ॥ चाल ॥

शिवविते अंगडें कुंचडें उंच भरजरी । वाघनखें आणिक बिंदली गळ्यांतील सरी । कानांत झुबे बाळ्याग दृष्टी मणी करी ॥ चाल ॥ जाडिताचें पिंपळपान बहुत गोजिरें । मनगटया मुद्रिकेवरी बसवितें हिरे । करगोटा करवितें तळीं लावून घुंगरें ॥ चाल ॥ पायीं पैंजण सांकळ्या । नक्षिदार चरणांगुळ्या । लावून वतें झिळमिळ्या । मनाची हौस कधीं फिटल मला मूल होईल लवलाही । हिण माझें० ॥ २ ॥ तें दारिद्र मजलागीं भाग्यापरिस तें बरें । समावृत्तीनें स्त्रिया त्या खेळविती लेंकुरें । असून सारें सौख्य संततीवांचून जीव झुरे ॥ चाल ॥ निमित्य पुष्कळ पैसा खर्चिला । मध्यान्ह समयीं शिव बिल्वदळें अर्चिला । बाई यथासांग परिमळ चर्चिला ॥चाल॥ जाणी जोशी भट ब्राह्मण सांगितल्या रीती । म्यां प्रदाक्षिणा घातल्या पिंपळाप्रती । घेतली बगाडें लोटांगणें नेणुं किती ॥ चाल ॥ देव्हारे देव नवासितां । कुळमंत्री अभ्यासितां । शिणलें साधन साधितां । अजून कोणाची प्रचिती आली नाहीं मजला सहसाही ॥ ३ ॥ माझेंच मज मासतें पतिची मीच आहें वैरिण । नाहीं पुत्रफळ पोटीं म्हणून बाई अगदींच झालें लिन । वाळवंटीं तळमळी जसाग बाई पाण्यावांचून मिन ॥ चाल ॥ त्यापरी रात्रंदिस बाई झुरतें मी मनीं । वाटतें चोरट्यावाणी वर्ततां जनीं । भासते जिवा वांटून घ्यावी हिरकणी ॥ चाल ॥ लौकिकांत वाईट दिसेल म्हणून सांगतें । संसारीं दृष्टी ठेवून जनांत वागतें । हें पूर्वजन्मिचें फळ आपलें भोगितें ॥ चाल ॥ या वांझपणाच्यामुळें । झालें भ्रमिष्ट केवळ । मी कंठूं कोणाच्या बळें । होनाजी बाळा म्हणे वर्म हें स्वाधीनचें नाहीं । ठेव निश्चय सद्गुरुचे पायीं । हिण माझें० ॥ ४ ॥

## १३ : पती प्रवासामधें सखे

\- पती प्रवासामधें सखे मी येकली मंदिरीं । कंठूं कोणाच्या बळें पाठवा पत्र लिहून यातरी ॥ ध्रु० ॥ झुरझुरून पांजर झालें शरीर निपट राहिलीं हाडें । रात्रंदिवस घोकणी पतीच्या लक्ष वाटेकडे । परदेशी येकलें

जसें कां दिनदुर्बळ बापुडें । ती गत झाली मला सख्याचा दुःखीं जिव चरफडे । एकटी पक्षावाणी आणखी पदार्थ नावडे । अन्नपाणि वर्जिलें सखे मज नित्य उपोषण घडे ।। चाल ।। गेल्या दिवसापासून सख्यानं मधीं परत नाहीं केली । एकाकडे एक पाहून कंठीत होतों आनंदाखालीं । परीचे विलास केले सखे बसून राजमंदिरीं रंगमहालीं ।। चाल ।। सखा निष्ठुर बाई । येवढा तरी झाला कांगे । कोठें दुर्गुण कांहीं । पाहून मजवर भरला रागें । जाऊन लवलाही । सख्यांनो त्यास पुसा जागे ।। चाल ।। पतिच्या वियोगा । काय करूं मी । जाऊन कोणाचे पाय धरूं कीं । आतां हें कशानें । दुःख विसरूं कीं । खुण मुद्रेचा खंजीर पतिचा मारून घेईन उरीं ।। १ ।। रथ गाड्या पालख्या अश्व कुंजर भरली । दामोदरा नवखणी उंच गगनीं गोष्ट सांगती । जागोजागीं कारंजीं बैठका त्या उदास दिसती । नये नरम मखमाली बिछान्यावर निद्रा मजप्रती । दासी उभ्या चहुंकडे कराया पंखा शितळ गती । गळा फुलांचे हार सर्पासारखी मासती । ।। चाल ।। दैवी धर्मी सौभाग्यवत्या आपापल्या अंतरंगें । घरोघरीं एकांतीं विनोदें रमती भ्रतारासंगें । पती भेटतील मला अशी तूं पावसील गंगे ।।चाल।। नळ दारिद्रपणें । दमयंती राणी जैशी । नेऊन या घोर वनीं । सती टाकून गेला तैसी । अशीच मी सुखशयनीं । मलाग बाई गत झाली तैसी ।। चाल ।। प्राणविसावा । तो गुणराशी । पाहिन जेव्हां । जाऊन प्रवासी । भेटेल तेव्हां । हर्ष जिवासी । मरन आठा चौ दिवसा । पति न येतां जरी । कंठू कोणाच्या बळें ।। २ ।। न्हाण भोग वर्जिलें शिरीं केसांची झाली दशा । कांहीं सुचेना मला दिसती दाही दिशा ।। व्यर्थ दिवस जातात खबर सांगा माझ्या कवेशा । जसा अधांत्रीं दोर कापला तशीच राहिली आशा । विलासीक जिनसांच्या या संदुका झांकल्या जशा । पती गेल्यापासून सखे मी नाहीं उघडल्या तशा ।। चाल ।। लवंगा चिकण-सुपारी वर्खी जायफळ । उंच धनवडी पैठणी पितांबर वरती बारीक वखी । हें नसून दावावें स्वामीला इच्छा अंत्री ।। चाल ।। सखे त्या मनमोहना ।

आतां मी कधीं पाहीन दृष्टी । नये सांगतां कोणा । सखे एकांतीच्या गोष्टी । उभयतां विषय खुणा । आठवून जिव होतो कष्टी ॥ चाल ॥ चढली उदाशी । बहुत मनींगे । काय मी दाऊं । वदन जगीतें । वाटे त्यजावा प्राण वनींगे । मी ल्यालें नसलें । पतिसंगें दिसते साजिरी ॥ ३ ॥ पाऊस काळामधीं वाणिकव्यापारी घराशीं आले । जिन्नस करून खरेदी मागें सवदागर परतले । बहुत विजा कडकडाट त्यामध्यें सूर्यकिरण लोपले । एकसारखे मेघ सदोदित आभाळ झाकुळलें । कठीण वाट डोंगरच्या जाळ्या निबिड ओहोळ थरियेले । दोहि थडयानें पाणि नद्यांना पूर भरून चालले ॥ चाल ॥ गेला जसा तसा कधीं पाहीन आपला प्राणविसावा । सत्वर उठा सख्यांनो मजला पक्ष्याचे पर लावा । असें वाटतें मला एकदां सखा दृष्टीनें पहावा ॥ चाल ॥ कशी गत करूं आतां । मला सुख नाहीं संसारीं । काय वर्तूं मी वृथा । या जनलोका माझारीं । अशी करितां चिंता उभे अवचित साजण द्वारीं ॥ चाल ॥ हर्षें उठोनी । गुणवेल्हाळी । धरून पतिला करीं कवटाळी । प्राण दिपानें आरती ओवाळी । होनाजी बाळा म्हणे सुखें कर मौजा सदनांतरीं । बापू धोंडिचे गुण प्रसंगामधीं केवळ सरभरी ॥ कंठूं कोणा० ॥ ४ ॥

## १४ : हार नव्हता मधीं सहात

हार नव्हता मधीं सहात कसें आज संकट वडवडलें । संसार भट पडो दोघांमधीं आड पर्वत पडले ॥ ध्रु० ॥ कवळी कांता सुकुमार पती लावण्याचे राशी । गांजून सर्वत्रांनीं तयाला केलें प्रवासी । सुखानें अथवा दुःखें पहात होतों एकमेकांशीं । आज अंतर पाडियेलें ईश्वरें करूं गत कशी । कसा क्षोभलासी । काय केली तुझी चोरी बिघडलें आम्हां उभयतांसी । जळो हें मागिल कथा सुखें पती येत्रोत घराशीं ॥ चाल ॥ उद्यां जातील हें कळलें । म्हणवून रात्री कष्टी झालें । तेव्हां मज हृदयीं

आलिंगिलें । आदरें मांडिवर बसविलें । स्वहस्तें करून कुर्वाळिलें । अरुणोदयीं निघोन चालिले । पुढिल मागें पडती पाउलें । पाहून मजकडे वदन उतरलें । सख्यानें उष्ण नाहीं पाहिलें । बोळवून जंव मागें परतलें । ते वेळीं कसें भासलें । जणुं का आकाश कडकडलें । नानापरि मिष्टान्नें करुनिया प्राणसख्यासाठीं । संतोषें वाढलीं स्वहस्तें या सुवर्णताटीं । घडोघडीं मुख कुर्वाळित पाहून माझी प्रपंच रहाटी । आतां कोण हराविल श्रम येवढेंच होतें ललाटीं । धनी न पुरे पाहतां तयाच्या स्वरूपाची धाटी । आज नांदतें सदन सख्यांनो वोस लागतें ग पाठीं ॥ चाल ॥ उदास सर्वोपरी । न वाटे गोड कांहीं अंतरीं । म्हणून लागे निद्रा मंदिरीं । उभयतां याच कीं पलंगावरी । विलासें रमलों नानापरी । विनोदें विडे करून सत्वरीं । घातलें मुखामधें मुख भरी । दुःख आठवलें तया अवसरीं । तेव्हां लगबग आलें बाहेरी । दिशा पिंवळी दिसते अंबरीं । वियोगें हा जीव तगमग करी । मला न गमे त्याविण क्षणभरीं । चित्त त्याचें स्वरूपीं जडलें । संसारा ॥२॥ जंबु आंब्र अवदुंबर कदंब फणस बिल्व आंवळी । बटमोगरे मालती रातांजनपार्यातक बकुळी । देवदार मांदार खर्जुरी मातुलिंग केळी । वट अशोक ताड माड सुरु नारंग्या नारळी । गिरीकंदरी पोखरणी झाडों घनदाट दिशा ढवळी । मोठा दुर्धर पंथ दिसेना सूर्य अभ्रमंडळीं ॥ चाल ॥ निबिड तरुच्यांत जाळ्या । त्यांतून देती व्याघ्र आरोळ्या । अस्वलें दिवाभितें सायेळ्या । येती गुंघाटे किंकाळ्या । बदके बिडाळके पाकोळ्या । कस्तुरीमृग भुजंग वेटोळ्या । जांभया देउनी चाटती जिभळ्या । नाना जाती श्वापदपाळ्या । हिंडती वनीं निःसंग निराळ्या । शोधिती नरमांसाच्या गोळ्या । पर्वतसंधीं तस्कर टोळ्या । वधून भरती झोळ्या । दुरावलें आपल्या सावळ्या । न कळे कांहीं भविष्य पुढिलें ॥ सं० ॥३॥ चिंताग्रस्त मानसीं वियोगानळें आहाळुन भारी । म्लानवदन अति विव्हळ बैसली हृदयामाझारीं । कागे पिंगळे किजाबिज करिती वृक्षावर द्वारीं । पतिभेटिचीं चिन्हें दिसती सगुण सौख्यकारी ।

एक उभयतां निश्चय म्हणून निकडेच वेव्हारी । यशस्वी होऊन परतली खाशाची स्वारी ॥ चाल ॥ स्फुरतें दाक्षिण बाही । लवतो वाम नेत्र लवलाहीं । मजलोमजलीं करून कमाई । आले आपले धनी । स्वगृहीं पाहतां आनंद पोटीं न माई । घालतां मिठी प्रीतिनें पाई । उठवली सुखस्थान देसदाई । कर्मिलें आजवर कोणे ठाईं । वियोगें तुमच्या अशक्त देहीं । जाली तव कृपादृष्टीनें पाही । येथें तव संशय उरला नाहीं । म्हणे होनाजी बाळा गुणग्राही । कवन हें रसिक रसा चढलें ॥ संसारा भट० ॥ ४ ॥

## १५ : सहज मनामधें आलें

सहज मनामधें आलें साजणी कधीं स्वामीचा येकांत घडे । तों जासूद येऊन सांगितलें मुकाम गंगे आलीकडे ॥ ध्रु० ॥ मुखीं सांगतां नये हर्ष जाला माझ्या मनामधीं । द्या मंडप आंगणांत उभवा गुढीया तोरणें त्वरीत आधीं । दिवस उल्हास साजणी लक्ष लागलें स्वामीपदीं । करा घरीं ब्राह्मण संतर्पण भोजन घालून यथाविधि । मोहोर मोहोर एक एक दक्षणा द्यावी द्विजाच्या हातामधीं । दर कुच चालून येतील वाटे येण्याची अवधी थोडी । ठेवा सत्वर हें आपलें मंदीर शृंगारुन चहूंकडे ॥ तों जासूद ॥ १ ॥ होतें गंगेचे पार अलीकडे स्वारी गंगेचे तीरीं । कूल शहरामध्यें ताकीद फीरवा चित्रें रेखवा घरोघरीं । अमूं द्यावी तरतूद फार दिपक लावाया हारोहारीं । छतें झालरा जेथील तेथें बांधुन ठेवाव्या परस्परें । कारंजाचे हौद खजीने धुऊन करा निर्मळ स्वकरीं । स्वच्छ ठेवा बागेंतील बंगले आधीं जाऊन बागेभीतरीं । विलासस्थानें सजवा अवघे न्यून ज्यांत किंचित् न पडे । तों जासूद ॥ २ ॥ अनुष्ठानीं ब्राह्मण-मंडळी बैसविली ज्या ज्या ठाईं । भोजन विडे दक्षणा देउनिया तृप्त करा त्या त्या ठाईं । जिनसखान्या मधीं सुगंधीक जिनसांनीं भरवा कांहीं । मीं सांगतें ज्या गोष्टी यामधीं आळस नका करुं सहसाही । मर्जी प्रसन्न

ज्यांत तयारी तिथि पाहून या लवलाही । जीवीं होतील संतोष साजणी घरीं येतांच गुणग्राही । पदार्थमात्र स्वयुक्त उभी राहीन कर जोडुन त्याजपुढें ॥ तों जासूद ॥ ३ ॥ असी सखयेशीं सांगत होतें स्वांतरांतील सुखोत्पती । तों उभी दुसरी जासूद जोडी दरवाजामधीं सहज गती । वर्तमान तें ऐकावयासी सखी उतावळ बहुत चित्तीं । मुकाम आजचा नदीपलीकडे शहराबाहेर यथास्थिति । सुमुहूर्त आहे उद्यांचा येतील सदनीं सत्वर ते भूपती । नरनारी उल्हासयुक्त शहरांत आनंदें अतीप्रीती । कारखाने सुरू झाले चहुंकडे त्रिकाळ नौबतखाना झडे ॥ तों जासूद ॥ ४ ॥ संपतांच तो दिवस तयारी स्वारीची दुसरे दिवशीं । सुटल्या तोफा एक कडका धुमें न कळे दिवसनिशीं । आले शहरामध्यें सायंकाळीं रोषनाई पाहुन सरसा सखा जीवीं संतोष सखीची चतुराई पाहुन ऐसी । पोंहचतांच सदनांत वाढीलीं पात्रें अमृततुल्य जशीं । सखा भोजनीं तृप्त होउनी सखी भोगली आदरली दिवसनिशीं । होनाजी बाळा म्हणे सख्याला दे सखये गोविंदाविडे । काशीनाथ श्रीमंत पदासी गाई करुन रुचीकर छंदडे ॥ ५ ॥

## १६ : नाजुक रुपडें

नाजुक रुपडें बुंद मुखोटा नवतीची लाली । पदरांतून वर नजर पाहातीस सात्विकपणें खालीं ॥ ध्रु० ॥ मागें बुचडा अरळ झोक माथ्यावर पदराचा । चार अंगुळ्या सरस लपविला चंद्र तारफेचा । भवयाकपानामधीं बहार कुंकवाचे टिकलीचा । अती चंचल घातला डौल वर सात्विकपणाचा । ठक धनुष्य तुजकरी गवसेना गवस तुझा साचा । लाउन इर्षाचा तीर फोडला पडदा अंतरींचा ॥ चाल ॥ गरतीचा अवघा साज करुनिया । आज घटा गटुन । केवळ सात्विक होउन मनीं मोहून घेतीस लुटून । लवलवा हालतें तुझें अंग असे गुण सांग शिकलीस कोठुन । बरीच चालसील नटुन थटुन । कणींची सीमा जाहाली । पदरांतुन० ॥ १ ॥

साधी नथ नाकाग्रीं शोभली बरी साध्या वसनें । पाहुन समयोचित्त तुझें ग नारी मंद मंद हांसणें । न ढळे पाईची दृष्टी सौम्य लक्षणें मुळा पसणे । चौकी करून मांड्याची मिजाजींत बौद्धरूपें वसणें । लुब्ध सख्ये मन भ्रमर जळज वर्णी तुझी या रसने । गौरवील्या आदरें नको देऊं प्रत्योत्तर उसणें ॥ चाल ॥ पाहिलें तुला गुणवान सकळ संज्ञानज्ञानें निपुण । लुब्धता बघुन तव ध्यान सदनीं कोठें जाण बसतीस लपुन । कोणत्या वेळीं नीर्वाण पाहुन संधान यावें जपुन । सांग बसावें कोठें लपुन छपुन बांधुन अक्षयीं दाली ॥ पदरांतुन० ॥२॥ बीज तसे अंकुर भासतें गुण घेउन उठलें । सकळ रुपाचें तेज तुझ्या सखु वदनीं येक-वटलें । मीपण मिरउन सदापरीस नटपणांत नटलें । तुझ्या नटपणापुढें तयाचे मनीं संशय फिटले । किंचित न पडे भरम अशा वृत्तींत संधींत तटले । उभे थव्याचे थवे तुज पाहुन चांगटले ॥ चाल ॥ अमरपुरीचा समुदाय तुझा नारी भाव दिसला तसा । साधुन पाहतां अवघा भाव जये निके वाटे असा । फेडून चिंताघाव बसविसी अव न कळे कसा । नाहीं असा भरंवसा रसा येसी हृदयीं बाहाली ॥ पदरांतुन० ॥३॥ येवढी चाटक असुन राखीलें त्वां मज वजना आपुल्या । तुळतील तव स्वरुपांत पाहुन तुज अशा स्त्रीया दिपल्या । अधीं विषयवासना ज्याच्या आंगीं सकळ विपल्या । मनशांतीच्या बळें कल्पना दुरोक्तीच्या लपल्या । त्या पश्चात्तापें मग होती विरक्ती तप तपल्या । तसेच तव सद्गुणें पाहुन हृदयीं दुर्बुद्धी समुळ लपल्या ॥ चाल ॥ निर्मळ गंगेचें नीर तुझें मन स्थीर दिसलें तसें । मध्यम मंजुळ समीर वाटतें क्षीर प्रियकर असें । तद्वत तव देखत धीर बहुत गंभीर तु स्नेहें रसें । होनाजीबाळा म्हणे असें तुज पाहुन वृत्ती बाधली ॥ पदरांतुन० ॥४॥

## १७ : लटपट लटपट तुझें चालणें

लटपट लटपट तुझें चालणें मोठें नखऱ्याचें। बोलणें मंजुळ मैनाचें ।। ध्रु० ।। वय वरुषें पंधराची दिसे चंद्राची प्रभा ढवळी। आकृति लहान दिसे कवळी। दिसे नार सकुमार मुदराखडी वेणींत आवळी। नरम गोजरे गाल होट पवळी। रूपस्वरूपाचा झोंक दिव्य नारी लोट चवळी। जशी चमके नागीन गौवळी। तरुणपण अंगांत नोक मदनाचे जोराचे। बोलणें० ।। १ ।। डुलत डुलत चालणें बोलणें बहु मंजुळवाणी। नाहीं कोणी दुसरी इजवाणी। इष्की यार सरदार कैक सोडून केविलवाणी। हिंडताती वेड्यावाणी। न पडे नख दृष्टींत कुठें सृष्टींत इच्या वाणी। फंदी झुरती मोरावाणी। लखलखाट चकचक़ाट जैसें दुकान बोहोऱ्याचें ।। बोलणें० ।। २ ।। रूप सुर्ताचा डौल तेज आनमोल सगुण गहिना। जैसी कां पिंजऱ्यांतील मैना ।। इच्यासाठीं कैकाची जन लोकांत जाली दैना। अशी ही चंचळ मृगनयना। मर्जी तुटेना भीड लोटेना जहाला एक महिना। कधींग सांपडसील निजभुवना। निर्मळ कोमल कांती जैसी तुटती ताऱ्याचे। बोलणें० ।। ३ ।। असे ऐकुनिया बोध नारीनें शोध मनीं करुनी। हस्तकी सखयाला धरुनी। जाईजुईची सेज फुलांची पलंगी सावरुनी। भोगिला सखा कल्प हरुनी। होनाजी बाळा गुणा आगळा कवीची जडणी। तयाचे जा चरण स्मरोनी। धोंडी सटवा म्हणे बापुजी बाजी हारीप वैऱ्याचे। बोलणें मंजुळ मैनाचें ।। ४ ।।

## १८ : तुझ्या प्रीतीचें दुःख

तुझ्या प्रीतीचें दुःख मला दाऊं नकोरे। वधुन जाई प्राण घेइ जगीं ठेवूं नकोरे ।। ध्रु० ।। याचे ममतेचा लोभ मला कळला आतां। कोण्या ठिकाणीं आहे जाउन लावा पत्ता। तिथें चालत जाईन आप आंगें स्वतां। जाऊन सांगा कांहीं रानभरी होऊं नकोरे ।। तुझ्या० ।। १ ।। कीं ज्याणें दाहा घरची मजा पाहिली असेल। एक ठिकाणीं जाऊन

कशाला तो बसेल। हें मी सांगतें कीं खोटें खरें पुढें दिसेल। गोष्ट ऐकुनी दुसऱ्याचा वारा घेऊं नकोरं ॥ तुझ्या० ॥ २ ॥ जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी। झड घालुन प्राण देतो दिपकाचे वरी। हें मी सांगत असतांना कांगे पडले भरी। रत्न टाकुन पदरांत गार घेऊं नकोरे ॥ तुझ्या० ॥ ३ ॥ होनाजी बाळा म्हणे हजारांत शिरा। कळा दाऊन मोहुन पती आणिले घरां। गेले पलंगीं उभयतां मनोरथ पुरा करा। काशिराम म्हणे कल्प कांहीं ठेवूं नकोरे ॥ तुझ्या० ॥ ४ ॥

## १९ : या सृष्टींत दैवाची

या सृष्टींत दैवाची धुंडितां मजसारखी नाहीं ॥ ध्रु० ॥ पहिल्या न्हाणापासून शुद्धद्वादश वर्ष न्हालें। निपुत्र निशी संपदा आतां उदयास भाग्यें आलें। गर्भ राहिला मला तयाला दोन मास जाले ॥ चाल ॥ मळमळ पोटीं लागली ओकारी मला। अन्नाची शिसारी जो पदार्थ निपजला। तो वाटे विषवत जीव हा कंटाळला ॥ चाल ॥ यांतिल वर्म किंचित मजला समजेना। बाई लेकुरवाळ्या शाहण्या लौकर आणा। एकांतीं बसूनी त्या फेडतील कल्पना ॥ चाल ॥ दैवानं सारसाजणी। राहिला गर्भ यापणी ॥ अती हर्ष वाटला मनीं ॥ चाल ॥ मी पहिलारु म्हणून कळेना यांत मला कांहीं ॥ या सृष्टींत ॥ १ ॥ पूर्वार्जित चांगलें म्हणून ईश्वर मजसी पावला ॥ बहुत आनंदामधें मला तिसरा महिना लागला ॥ या उपरांतीक मला चवथा महिना लागला ॥ चाल ॥ घडोघडी भ्रतार येऊन बोले मजपासी। आवडीनें बोलतो धरुनी मला पोटासी। बाई आनकुळ अवघ्या सुखामधेंग मी आसी ॥ चाल ॥ नाजूक शरीर हें पहिलेंच माझें आधीं। पांचवा मास आखेरीच्या संधीमधीं। लागला मास साहवा पेंगूळलें पदीं ॥ चाल ॥ चढली मुखावर टवटवी। सर्वांगीं घाम डवडवी। डोकें माझें भवभवी ॥ चाल ॥ चैन पडेना मला जवळ बोलवा गुणग्राही ॥ या सृष्टींत ॥ २ ॥ दिवस भरत चालले सातव्या महिन्याची

छाया । दिसों लागली केवळ माझी कांचनवत काया । कष्ट वाटती उठतां बसतां जीव होतो जाया ॥ चाल ॥ हे फिरते डोहळे माझे नानापरी । हे शरीरसंबंधी नेतीं जेवाया घरीं । चिर कंचुकी हिरवा मज नेसवीती बरी ॥ चाल ॥ भासते तुष्टते सुखसोहळे मजप्रती । दिवसमास वाढतें पोट रती रती । तगमग होती निजते पलंगाखालतीं ॥ चाल ॥ हा जीव होतो घाबरा । कोणी उठा सखेनो धरा । कोणी शितळ पंखा करा ॥चाल॥ द्यावें मला जीवदान मिळुनी सर्वत्रांहीं ॥ या सृष्टींत ॥ ३ ॥ आठ महिने संपतां सखेनो या नव्वे मासीं । पोट दुखूं लागलें ठेवा सुचवून पतिरायासी । प्रसूतकाळ हा समीप दिसे राहा सावध मजपाशीं । मी आशांतुन कधीं पार पडन चांगली । ही चिंता माझ्या भ्रतारासी लागली । ईश्वरसत्तें वेळ प्रसूतसंधी आली ॥ चाल ॥ बाई श्वास वेणीचा मज माझ्या घेऊं द्या । गलबलं नका निश्चळ प्रसूत होऊं द्या । आशावंत मुख बाळाचें पाहूं ॥ चाल ॥ या संसारीं सुखरुपे । मुख पुत्राचें साक्षपे । पाहिलें ईश्वरीकृपें ॥ चाल ॥ होनाजी बाळा म्हणे ठेवा सद्गुरुचे पाई । या सृष्टींत दैवाची धुंडितां मजसारखी नाहीं ॥ या सृष्टींत ॥ ४ ॥

## २० : हीरवी प्राणसख्ये बनलीस

हीरवी प्राणसख्ये बनलीस अरवा । खोउन वेणीमधीं मरवा । ॥ ध्रु० ॥ हीरवा साज करुनिया प्रीयकरणी । कटीं कसली पैठणी । हीरवी तंग चोळी ल्यालीस गडणी । हीरवा दुपेटा वरुनी । हीरवा तीळ गालावर मृगनयनी । शोभतसे मैतरणी । हीरवा सरंजाम केला सर्वा ॥ खोउन ॥१॥ हीरवे जडीताचे अळंकार । हीरवा पाचुचा हार । नाकीं नथ शोभे उमदा फार । लालडी हीरवी गार । हीरवी टीक जडली बहु गुळजार । मोती हालकडीला चार । तनमणी गळ्यांत शोभे बेपरवा ॥ खोउन ॥ २ ॥ हीरवा चौगर्दा फुले अंबराई । हीरवीच बागशाई । हीरवा महाल मीन्याचा सवाई । त्यांत केले चतुराई । हांडी बीलोरी ठांई ठांई । मेणबत्त्या रोशनाई । पडदे मखमलीचे वर छत हीरवा ॥ खोउन ॥ गाद्यागीरद्यावर हीरवा

रंग । हीरवा छपरपलंग । हीरवा महाल सोनेरी हा रंग । त्यामधीं समशेर नंग । होनाजी बाळा म्हणे घडुंदे संग । हाच आहे प्रसंग । धोंडी बापु म्हणे आज बेत ठरवा ।। खोउन ।। ४ ।।

## २१ : आस्त्रीप्रलयंगता तुझीग बुध

आस्त्रीप्रलयंगता तुझीग बुध नाहीं कामाची । आली धन्याचीं पत्रें आम्हाला जलदी जाण्याची ।। ध्रु० ।। या लष्करचीं सुखसाजणी नयेग सांगाया । आहे धन्याची दया आम्हावर कृपेची छाया । उठून ताजीम देती ठाव पंगतीचा जेवया । पोऱ्या खीसमतगार कोतवाल घोडा बसाया ।। चाल ।। स्वारी जपून चाले । नवुसे रंगीत भाले । वीटेपटे वाले । हत्ती बीनीवर चाले । नौबद वाजे कडाख्याची । नामज्यात शीपाई पुढें जीलीब गारद्याची । आस्त्रीप्रलयंगता ।। १ ।। करनाटकचीं स्वारिस होतो श्रीमंता-बरोबर । रणसंग्रामीं झटुन आंगीं केली तलवार । ढीगांतुन फटके आम्ही शिपाई रणशुर । झाडिमध्यें पीटुन घातला लुटुन हैदर ।। चाल ।। पाहुन मनीं चटका । म्हणति त्याला हाटका । शिर पात्र द्या जरीपटका । चवरी अबदागिरी बक्षीस कंठीं मोत्याची आंवदाची बोली येक पालखीची । आस्त्रीप्रलयंगता ।। २ ।। पूर्वीपासुन नक्षा चालत आला वडिलाचा । आणीबाणीच्या वेळीं विडा उचलीला पैजेचा । कटुन मरावें खरें असा धर्म क्षत्रियाचा । कसे राहा म्हणतीस घरीं डाग लागेल जन्माचा ।।चाल।। नाहीं असें कधीं घडलें । यास्तव येणें पडलें । न कळे कांहीं पुढलें । होईल गे इतराजी आबरु आमची । बाकी साकी गुंतुन राहिली साल मजकुराची । आस्त्रीप्रलयंगता ।। ३ ।। करुनिया मनसुबा निघाले मग नगरांतुन । प्रातःकाळीं सहा घटकेचा मुहूर्त पाहुन । घर पागाही तैयार केली मोठे हौशीनें । चौकोसावर मुकाम केला लौकर जाऊन ।। चाल ।। कवी म्हणे बाळा बहेरु । गुणी जन सजनहे तरु । नाथपंथ्याला बाहिरु धोंडी बापू गुणी म्हणे लावणी ही मनीरामाची । ज्ञान वळीची फते तलवार रेवडी रावळाची । आस्त्रीप्रलयंगता ।। ४ ।।

× × ×

## —४—

# परशराम

नाशिकच्या पूर्वेला गोदाकांठीं सिन्नर तालुक्यांत वावी नांवाचें गांव आहे. तें परशरामाच्या घराण्याचें वसतिस्थान. त्यांचे वडील शिंप्याचा धंदा करीत असत व वाडिलांपासून परशरामानेंहि त्या धंद्याचें शिक्षण घेतलें असावें यापलीकडे त्यांच्या वडिलाविषयीं किंवा गृहस्थितीविषयीं अधिक विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं. त्यांचा जन्म सन १७५४ सालीं झाला असावा. वडील त्यांच्या लहानपणींच वारले असावे. असें सांगतात कीं वयाच्या पंधराव्या सोळाव्या वर्षींच परशरामानें विठ्ठलाची कडकडीत उपासना केली व विठ्ठलाचा त्याला साक्षात्कार झाला. पण त्यानंतर तो भगवद्भक्तांच्या संगतींत अधिक रमूं लागला असावा.

देवपुरकर बाबा भागवत हे परशरामाचे गुरु समजले जातात. त्यांचा अनुग्रह झाल्यावर कांहीं अभंग, पदें वगैरेंची रचना करावी असें परशरामाच्या मनांत आलें. पण अभंग—रचनेऐवजीं लावण्या व पोवाडे करण्याचा आदेश त्याला मिळाला. हा आदेश त्याला विठोबा खत्री यांच्याकडून मिळाला असें म्हणतात. त्यामुळें लावणीच्या व पोवाड्याच्या शेवटीं ‘नामी विठ्ठल’ ‘वरदी विठ्ठल’ असा आपल्या गुरूच्या नांवाचा उल्लेख त्यानें अनेक ठिकाणीं केलेला आढळतो. शिंपीपणाचा धंदा जरी ते करीत असत तरी तरुण वयांतच त्यांनीं

तमाशाचा धंदा सुरू केला. स्वतःच कवि असल्यानें वीणा हातीं घेऊन स्वतःच्याच लावण्या तो गोड सुरांत म्हणावयाचा. सुदैवानें बाबा सातभाई, मलुराज, नारायण, भवानी तेली ऊर्फ बाकेराव इत्यादींची जोड त्याला चांगली मिळाली व त्यामुळें खेडोखेडीं त्याच्या तमाशाची कीर्ति पोहोंचली. त्यांतील बाकेराव तर पुढें फारच विख्यात झाला.

रामजोशी किंवा अनंतफंदी यांच्या लावण्यांपेक्षांहि परशरामाच्या लावण्यांची प्रसिद्धि अधिक झाली असें म्हणतात. सामान्य लोक तर त्याला अवतारी पुरुष समजत. त्याची बुद्धि तीक्ष्ण—त्यांत बाबा भागवतांच्या सहवासामुळें भारत—रामायण व संत-वाङ्मय यांचा त्याला परिचय झालेला; त्यामुळें त्याच्या लावणींत अधिक कस यावा हें स्वाभाविक होतें. स्वतः त्यालाहि त्याची जाणीव असावी असें त्याच्या अनेक दर्पोक्तिपर उल्लेखावरून वाटतें.

पेशवे सरकारजवळ त्याचा प्रवेश मात्र त्या मानानें उशीरा झाला. सन १८०८ सालीं दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत त्याचा तमाशा पुण्यांत आला असावा असें दिसतें. कारण त्याच्या तमाशांतील नाच्या बाकेराव यास ५०० व १५०० रुपयांच्या देणग्या बाजीरावानें दिल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें बाजीरावाला आपल्या कवित्व-गुणाची प्रचीति पटवून देण्याची एक संधिहि परशरामाला लाभली होती. असें सांगतात कीं पेशवे सरकारची स्वारी कोपरगांवीं आली असतां सगनभाऊ, होनाजी बाळ, धोंडी महत्या इत्यादि तमासगीर स्वारीबरोबर होते. स्वारीचा मुक्काम बेटांत होता. त्या वेळीं त्रिंबकजी डेंगळ्यानें बावीस जासूद पाठवून परशरामास तमाशासह कोपरगांवीं बोलावून घेतलें. तमाशांची सुरुवात झाल्यावर होनाजी बाळ यानें गंगेवर केलेल्या लावणीचें एक कडवें तेथें वाचलें. त्यानंतर परशरामाची पाळी आल्यावर त्यानें स्वतः नवीन रचलेली ‘ पश्चिम—वाहिनी गोदा,

प्रतिमूळ गंगा ' ही लावणी म्हणून दाखविली. त्यांतील गंगेची स्तुति व पर्यायानें केलेली राघोबाची व बाजीरावाची स्तुति बाजीरावांना फार आवडली. त्याच प्रसंगीं बाजीराव त्याला कांहीं जहागीर देत होते पण ती त्यानें

' पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा
महाल मोकासे जहरी वळसे करितील अपुला बंदा
....................................
सुइदोऱ्याला हयात असों द्या तोचि इनाम मोकासा
निज कर्मी रत नर झाल्यावर काय उणा मग त्या पैसा ! '

असें निस्पृह उत्तर देऊन नाकारिली अशी आख्यायिका आहे.

पेशवाई गेल्यानंतर मात्र त्यांना मुलुखगिरी करावी लागली. बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर या उत्तरेकडील संस्थानांत त्यानें नंतर तमाशे केले व तिकडे त्याचें कौतुकहि पुष्कळ झालें. इंदूरला तर त्याच्या दोन मोहिमा झाल्या व त्यांतील एका प्रसंगीं परशरामाच्या होळीवरील लावण्या ऐकून खुष होऊन सयाजीराव महाराजांनीं त्याला एक भारी दुपट्टा व पागोटें तेथल्या तेथें बक्षीस दिलें.

परशरामाचा अंतहि मोठा चमत्कातिपूर्ण झाला असें म्हणतात. त्याला शेवटीं इच्छामरण आलें अशी आख्यायिका आहे. बाके-रावांनीं त्यासंबंधीं जी हकीकत सांगितली त्यावरून वावीच्या सर्व लोकांस ' आजपासून आमचें मरण चार दिवसांनीं आहे, गंगेच्या कांठीं मंजुरास मरण्यास जातों ' असें त्यानें सांगितलें व त्याप्रमाणें चौथ्या दिवशीं मंजुरेस त्याला मृत्यु आला. सर्व लोक त्या वेळीं तेथें जमले होते. बाकेराव, गोविंदा सोनार इत्यादींकडून त्यानें आदल्या दिवशीं लावण्या म्हणून घेतल्या व दुसरे दिवशीं सर्वांचा निरोप घेऊन त्यानें देह ठेवला. सन १८४४ सालीं वयाच्या नव्वदाव्या वर्षी परश-रामाचा असा चमत्कातिपूर्ण अंत झाला.

परशराम हा तरुणपणीं मोठा देखणा होता. एका सुपारीखेरीज त्याला कोणतेंहि व्यसन नव्हतें. आणि त्याचा पोषाखहि जाडाभरडा असे. मोठमोठ्या देणग्या त्यांनीं मिळविल्या तरी कपडे शिवण्याचा पिढी-जात धंदा करून तो योगक्षेम चालवीत असे. त्याची वागणूक पवित्र होती व तशी असावी असा तो इतर तमासगिरांना उपदेश करी.

इतर शाहिरांच्या मानानें परशरामाचें अवलोकन अतिशय सूक्ष्म होतें व त्याची विनोददृष्टीहि प्रशंसनीय होती. त्यामुळें त्याच्या लावण्यांत खूप विषयवैचित्र आहे. पेशवाईअखेर झालेली लोकांची अगतिक स्थिति, लोकांच्या समजुती, चालीरीति यांचें चित्रण त्यानें अतिशय परिणामकारक रीतीनें केलें आहे. सवती-सवतीचे झगडे, दोन बायकांच्या दादल्याची फजीति, शेंदाड शिपायाची फजीति इत्यादि अनेक चित्रें त्याच्या विनोद दृष्टीची साक्ष देतात. त्याची वाणी तुकारामासारखी प्रासादिक आणि प्रभावी आहे व लावण्यांची किती तरी कडवीं ठाशीव व ठसठशीत आहेत, म्हणूनच

वावी नांव गांव धनवटांत आखाडा जब्बरु
कोणी विरळ एखादा राहील सांभाळून अब्बरु ॥

ही त्याची दर्पोक्ति, त्या वेळची त्याची लोकप्रियता लक्षांत घेतां-यथार्थ वाटूं लागते.

× × ×

## १ : उठ झाला प्रातःकाळ

उठ झाला प्रातःकाळ तुझे गोपाळ आले घननीळा । पूर्वदिशे उदयला भानू आला उदयाचळा । प्राणिमात्र पशुपक्षी विश्रांतवृक्षीं आपापल्या स्थळीं । निद्रा सारून जागृत होती पंच उषःकाळीं । षट्कर्मादि ऋषि योगी तापसी गुप्त जळीं स्थळीं । सकळ विहंगम काक पिंगळे किजबिजती एकेवेळीं । रावे मयुरे हंस साळया सुस्वर मुखकमळीं । सद्भावें तुज गाती ध्याती स्वमुखें नामावळी । मंथनास प्रारंमिती गोपी घरोघर त्या गोकुळीं । सडासंमार्जन करून घालिती रंगमाळा रांगोळी । कनकाचे घट शिरीं यमुनातिरीं जाती आणूं जळा । पूर्वदिशे उदयला भानू आला उदयाचळा । उठ झाला प्रातःकाळ तुझे गोपाळ आले घननीळा । पूर्वदिशे० ॥ १ ॥

क्षुधित वासरें सोडून–धार आणी काढून झडकरी । गोपवृंद उभे द्वारीं बहाती, मुखमार्जन तूं करी । दधि दुग्ध नवनीत साय ही मुखीं भरी । घृतमिश्रित शर्करा उभी मी घेउन आपल्या करीं । मधुसूदना माधवा मुकुंदा नारायणा नरहरी । रामकृष्ण विष्णु सर्वोत्तम आलासी मम उदरीं । त्रिविक्रमा केशवा जनार्दना माया स्तवी यापरी । उठ कान्हा

ताऱ्हया आळवितां शिणली ही वैखरी । निद्रा तुझी कशी नासेरे माझ्या तूं भक्तवत्सला । पूर्वदिशे उदयला भानू आला उदयाचळा । उठ झाला प्रातःकाळ तुझे गोपाळ आले घननीळा । पूर्वदिशे० ॥ २ ॥

निज जननीचे बोल प्रेमसुखें डोले आलें अंतरीं । उठून. धरी कटी कवळून माता लिंबलोण उतरी । काकडआरत्या करून येते हातीं धरून सदनांतरीं । व्रजांगना लक्षावधि आळविती मंजुळ मधुरोत्तरीं । छत्रचामरें ढाळिती हरीवर जातां वनांतरीं । नृत्य करून गातात संवगडे भवतें सविस्तरीं । बोळवीत निघतां नितंबिनी यमभागिनीच्या तिरीं । नंदयशवदा पाहे नेत्रीं जळ वाहें असूं ढळढळा । पूर्वदिशे उदयला भानू आला उदयाचला । उठ झाला प्रातःकाळ तुझे गोपाळ आले घननीळा । पूर्वदिशे० ॥ ३ ॥

वनक्रीडा हरी करी हर्ष आवरी सकळ निर्जरां । गोधन धन देऊन विधी हरला मग पिता म्हणे खरा । वनमाळांचे भार-सुमनसंभार हार पूजिती मनोहरा । नित्य गुढ्या उभारिती पताका परतुन येती घरां । पंचआरत्या घेऊन धांवती गवळणी परस्परा । धन्य धन्य तें वृंदावन गोकुळच्या नारीनरां । नवल न वर्णवे लिळा हरीची लिहितां न पुरे धरा । मानवदेहें स्तुति किती करावीं भावें भावें स्मरा । नामीं विठ्ठलपद प्रीति-परशराम गीति गाई हरीलिळा । पूर्वदिशे उदयला भानू आला उदयाचळा । उठ झाला प्रातःकाल तुझे गोपाळ आले घननीळा । पूर्वदिशे० ॥ ४ ॥

## २ : सती सुलोचना

दशमुख लंकेशाची स्नुषा सुलोचना एक सती । भुज पाहूनी करीं अकांत पडिले इंद्राजित रणीं पती ॥ ध्रु० ॥ रविकुळभूषण श्रीराम जो कां राजा अयोध्यापती । सितेस्तव वानरदळ घेऊनी आले सुवेळा प्रती । दुश्चिन्हें जाणवती सतीला गेले संग्रामा पती । वदनेंदु कोमेला कळाहीन

चाटे सुखसंपत्ती । मोक्षसदन पावला इंद्रजित सौमित्राचे हातीं । कंदुकवत् शिर नेलें वानरें उभें धड रणाक्षितीं । सव्यभुज आलें उडून उलंघुनी लंका निकुंभळेप्रती । आंगणीं पडदा नाद ऐकिला चिंतातुर झाली सती ॥ ॥ चाल ॥ पहागे सख्यांनो कशाची ध्वनी । प्राणेश्वर रणीं सुखाचा असो । तंव त्या धांवत आल्या सेवक जणी । प्रभा आंगणीं लागली दिसो । म्हणती आला तुटून विराचा पाणी । पाहूनी भुज नयनीं आले आसो । उठली गजबजून डचकली मनीं । विघ्न पतिरायावर झणी नसो ॥ चाल ॥ देखिला सुशोभितहो । कर रुधिरानें भरला । पेटी भुज हीर कंकण । चमके नीळ मुदिवरला । ओळखिला सतीनें तो । सप्रेमें हृदयीं धरला । सौभाग्यमणी माझा । चमूसागरीं विघरला ॥ चाल ॥ घाली उभ्या आंग धरणीवर केश कुरळी । माखली धुळी । विखुरली पोत झळझळी । आहळली जशी करदळी । कीं शोकानळीं । सुमनकळी । नग विगलित भूमंडळीं । आग लावागे सदनांत । होऊंद्या होळी । जीव तळमळी । मूर्च्छित पडे त्या वेळीं ॥ चाल ॥ तेव्हां सखयांनीं सावरून । केलें सावध पदरीं धरून । संकल्प मनाचा करून । स्वधर्म आपला स्मरून ॥ चाल ॥ भोजपत्र आणविलें तत्क्षणीं । दउत कलम दिलें हातीं । पतिव्रता जरी मी असेन लिहून द्या जाली कैसी गती । दशमुख० ॥ १ ॥ वर्तमान वर्तला लिहितसे भुज देतां लेखणी । सकळ स्त्रिया चौभोंतीं पहातीं पत्र लक्ष राखुनी । ऐक शेषकन्यके सर्वसंपन्न चतुर देखणी । अजय आले आम्हासही तंव पूर्वीची आंखणी । अश्व रथ देतां अग्नी केलें हवन नेत्र झांकुनी । आराध्यदैवत क्षोभविलें वानरें शिळा झोकोनी । केला पराक्रम उदंड परी तो जयपरिखा निरखुनी । उदारमन आम्ही केलें संग्रामीं वीर मानवी देखुनी ॥ चाल ॥ चवदा वर्षे तप निराहार केलें । आम्हांस्तव वीर त्या लक्ष्मुमणें । ती मज आली दया दान शिर दिलें । आपुल्या स्वकाया वाचा मनें । श्रीरामपदीं निजसुख मनीं लाधलें । अर्पून धड सुफळीत केलें जिणें । म्हणून भुजमूळ तुज पाठविलें । उतरूनी भवदुस्तर

सत्वर येणें ॥ चाल ॥ तव प्रीतींत जीव रिझला । मी उभा तुझेसाठीं । होईल उशीर मजला । दे येऊन प्रिये भेटी । असें पत्र लिहून तिजला । भुज दावीत हातवटी । देह कागदभर झिजला । झाली भयाभीत पोटीं ॥ चाल ॥ चुकली मृगाशी हरण दुःख वाटलें । वन पेटलें । वाटे गगन जणूं फाटलें । क्षणभंगुर जाउनी दुःख मायीक लोटलें । वदन उटलें । रोमांच अंगीं उठले । आलें स्फुरण सतीचें आंगीं प्रेम दाटलें । अश्रु आटले । चित्त प्रपंचांत विटलें ॥ चाल ॥ झाली उतावेळ तद्धडी । करी शय्या दान आवडी । पतिव्रतापणाची आढी । त्रैलोकीं उभवीन गुढी ॥ चाल ॥ स्वार होऊनी अश्विनीवर घेऊनी भुज शिबिकेमधीं प्रीति । रावणाशी आली विदित कराया रूपगुणी जन वर्णिती । दशमुख० ॥ २ ॥ नख दृष्टी न पडे जिचें ती निर्भिड आली एकली । सुने निढळ निकुंकुम येतां रावणानें देखिली । शिबिकेंतून भुज सभेशीं आणितां होती वस्त्रें झांकिली । उघडुनी पाहतां नयनीं सकळीं रुधिरानें माखली । हाहाकार झाला एकचि लंकाधीश धाय मोकली । धैर्यमेरू आज खचला शोकें मंदोदरी शोकली । शक्र जिंकिला समरीं कीर्ति त्रैलोकीं फांकली । तव सामर्थ्यें निर्जर बंदीं आज ही दशा ठाकली ॥ चाल ॥ पुत्राचा प्रताप आठवूनी मनीं । दाही वदनीं घाली मृत्तिका । तंव ते विनवितसे शुभ-लोचनी । शय्यादानी मला चित्तवृत्तिका । लिहिलें जें आहे मजला स्वामिनी । पहा वाचुनी हेच पत्रिका । द्यावें तुम्हीं सत्वर शिर आणूनी । आले म्हणुनी हेच अर्थीका ॥ चाल ॥ नाहींतरी मीच जातें न कार्य तुम्हा तोले । करकरा दशन रगडुनी । वीस नेत्र लाल केले । दळ सकळ सिद्ध व्हारे शिर आणून देईन वहिलें । जयराम वधीन आज मी सुतपंथीं जाइल बोले ॥ चाल ॥ करी उत्तर मंदोदरी । चतुरा सुंदरा । दशकंधरा । आणिलें विघ्न तुम्ही घरा । श्रीरामचंद्र गौरवा बहुत आदरा । व्हा विजयी धुरंधरा । वंशाशी दीपक लावा निजमंदिरा । लावुनी इंदिरा । सांगते गोष्ट

जिवीं धरा ॥ चाल ॥ ऐकणें नसेल अंतरीं । जाऊंद्या तिजला तरी । लंकापति उत्तर करी । आणिली सीता आहे घरीं ॥ चाल ॥ वर्म धरूनी अभिलाषील तिजला कैसी करावी गती । परद्वारीं कोण जय पावला पहा विचारुनी चित्तीं ॥ दश० ३ ॥ साह्य बिभीषण दयाब्धिनायक राजा रघुवीर आहे । मंदोदरी म्हणे जय मायगे तुझी तूंच निर्भयें । अर्धसहस्र सवें दासी निघाल्या न धरितां संशय । येतां निकट वानरें देखिली अंतरीं आनंदमय । दिली सीता सोडूनी रावणें धरूनी प्रभूचें भय । श्रीरामाशीं येऊन सांगती आली जनकजामाय । न पडे दृष्टी तुमच्या जोंवर रावण जिवंत आहे । युद्धावीण तो कदा न सहसा सोडी कालत्रय ॥ चाल ॥ रत्नमणीमय पायीं पादुका । दूर तोचि उतरूनी आश्विनीखालीं । शुक्लपक्षींचा लघु इंदु का । सेना सर्वही पाहूं लागली । श्रीराम सौमित्र कृपासिंधु का । पाहूनी सन्निध नेत्रकमळीं ॥ चाल ॥ पहा ही शक्रारीची कांता । सुकुमार धुळें भरिली । ठेवितां भाळ चरणीं राघवें हृदयीं धरली । तूं धन्य धन्य माते तव नामें दुरितें हरिलीं । श्रमलीस एथवरी कां उत्तर करूं अनुसरली ॥ चाल ॥ तूं मच्छ कच्छ वराह नारसिंहरूपा । रविकुळदीपा । तूं धैर्य ध्यान चिद्रूपा । वामना तूंचि भार्गवा आचरसी तपा क्षत्रिणी क्षपा । गोब्राह्मण आणिले रूपा । शिवाचें निज बीज आचरूनी जपा । दाविजे रूपा । मजवरी करावी कृपा ॥ चाल ॥ राघवा तनु कोमळा । तव नामीं तरल्या शिळा । चरित्र दाविशी लिळा । स्तुति करूनी उभी अबळा ॥ चाल ॥ उशीर होतसे मला । आणूनि द्या पतिशिर सत्वरगति । कुशळ बोल ऐकूनी तोषली सकळ सभा जीत पती । दशमुख० ॥ ४ ॥ रघुवीर म्हणे आम्हीं शिर आणिलें हें तुजला कळलें कसें । लिहून दिलें दाखवी पत्र हे भूज पुढें ठेवितसें । आश्चर्य सर्वांशीं निर्जिव कर लिहितां न दिसे । बरें असो शिर हासवील तर हें खरें आम्हाला ठसे । रामचंद्र म्हणे पतिव्रता हें अगाध तिजला नसे । केश धरूनी आणविलें रुंड तें वृषभा हातें जगदिशें । सव्य नेत्र झांकिला वाम

नेत्र तो उघडा असे । उत्तरी वस्त्रावर मग ठेवी सकळ सभा पाहतसे ॥ चाल ॥ आठवूनी मग निजसुख हृदयांतरीं । कर्माची गती गहन ईश्वरी । निष्ठा पदीं असेल तुमच्या जरी । एक वेळ हांसावें प्राणेश्वरा । राहील ही कीर्ति दिगंतरीं । सीमा सौभाग्याच्या ऐश्वरा । आणखी ही सभा मानवेल सारी । होईल सांगाया सुरा असुरा ॥ चाल ॥ उभयतां तुम्हीं आम्हीं मनीं इच्छा नाहीं पुरली । झुंजतां रणभूमीं कीं धनुर्विद्या सरली । नाहीं आलें समरांगणीं मी म्हणूनी आढी धरली । राहिलें चित्त कामीं कल्पना मनींच मुरली ॥चाल॥ मग विनोद प्रारंभूनी काय बोलती । सुलोचना सती ॥ खिजवूनिया आपुला पती । विटंबिली शूर्पनखा तुमची आर्ती । पंचवटी प्रती । निर्नासिक आली रीती । वीर कुंभकर्ण पावला रणीं विपत्ती । वानरा हातीं तो राग आलासेल चित्तीं ॥ चाल ॥ बोले सुलोचना गहिंवरून । अभिमान दासीचा धरून । हांसावें कृपा करून । मुखचंद्र गेला उतरून ॥ चाल ॥ एक चुकलें पिता शेष न साह्य आणिला पती । हें उत्तर ऐकूनि शिर हांसलें उघडूनि नेत्र पाहती । दशमुख० ॥५॥ पिता शेष न साह्य आणिला ऐकूनिया उत्तरा । शेष हाच सौमित्र म्हणूनि आलें हास्य सतीच्या वरा । ज्ञानदृष्टीनें खूण दाविली शिर हालवूनी थरथरा । मम कन्या जाणूनी कळवळला लक्ष्मुमण अंतरा । सजीव करा इंद्रजित ऐकूनी हींव आलें वानरा । भीड उलंघूनी मारुती बोले न्याय नीतीनें करा । पिता सुत गुरू बंधू समरीं दोष नाहीं रणशूरा ॥ चाल ॥ द्यावें शिर ठरलें सर्वांमुखीं । चित्ता निराशा बहु वाटली । तंव तें शिर घालूनी पालखीं । पाह्या मंडपीं सभा दाटली । रामा तूं विजयी होशील सुखी । आज्ञा घेऊन चरणीं लोटली । आवरी हें वानरदळ मजविशीं । युद्ध न करी म्हणूनी उठली ॥ चाल ॥ मग लंकेसमीप येऊन । सकळांशीं श्रुत केलें । बरी स्मशानभूमी पाहुन । परिवार सकळ आले । विधियुक्त पूजा वाहून । विस्तीर्ण कुंड केलें । पत्रांपत्रीं लिहून वर्तमान दान दिलें ॥ चाल ॥ करी धर्मशिळेची पूजा उभी राहूनी । स्तब्ध होऊनी ।

पतिरूप आणिलें मनीं । निघाली मुखांतूनी । अंतरज्योति झणीं । ताठ घ्वनी । मी दासी म्हणवुनी । अग्नीमध्यें पाडिला देह प्रेत होऊनी । सुरवर गणीं । वर्षाव केला सुमनीं ।। चाल ।। या नांव म्हणावें सती । जीत जगतीं नाहीं त्या गती । केली जडना साधून राती । नामें विठ्ठल वर दे मती । वावी गांव सर्व जाणती । परशराम करी कवन जगीं इच्छून साधु-संगति । तारी करी कृपा । येसू म्हणे श्रीराम सीतापति । दशमुख० ।। ६ ।।

## ३ : मानवी जीवनाची कहाणी

त्रिगुणांचें तीनपण केलें सर्व पाहिली मजा । आत्महित काय जन्मुन केलें मी अपराधी तुझा ।। ध्रुं० ।। मूळ जननिच्या जठरीं जन्मलों उत्पन्न झालों जेव्हां । सोहंशब्द भागाशीं आला इथून सोडवी देवा । सहा जन्मांची आठवण प्राण्या माहित होती तेव्हां । चवजन्माचीं दुःखें रडशी कांहींच नाहीं अनुभवा ।। चाल ।। आली बाळदशा गोजरी । लेण्यानें दिसे साजरी । लेववितो वस्त्र भरजरी । चौभवते हाट गुजरी । ।। मोड ।। कडे खांदे घेऊनशी बोलतात हितगुजा । पाळण्यांत जेऊन निजविती हाडशीर म्हणती निजा । त्रिगुणांचें० ।। १ ।। बारा सोळा वीसपंचविशी तारुण्याचा भर । मद विषयांमध्यें चाले उताणा पगडी कानावर । वडिलांचें सांगितलें ऐकेना हित अनहित तिळभर । आप्त सोयरे बोलती बळानें दौलतीची भरभर ।। चाल ।। तीस चाळीस आले घडून । अवध्यांवर जरब कडकडून । इच्छिलें कार्य ये घडून । चालता काळ चहूंकडून ।। मोड ।। पूजेचा वर खटलान पडल अर्धे आयुष्य वजा । नेम धर्म तीर्थ नाहीं घडलें आणिक साधू पूजा । त्रिगुणांचें० ।। २ ।। साठसत्तर वर्षे झालीं आली उतरती कळा । शाम केस सफेत झाले मंद दिसतें डोळा । दंत भग्न झाले मुखाची लाळ गळे भळभळा । कोण कोठून आलें म्हणून पुसतसे हात लावून निढळा ।। चाल ।। उठतां बसतां संकटीं । बुलबुला हाले हनवटी । जवळ कोणी नये शेवटीं । अवघ्यांशीं

पडल्या तुटी ॥ मोड ॥ स्त्री शेजेची राग करिती अजून तरी हरी भजा ।
शरीर संपदाही निघून जाईल आपण देतील निजा ॥ त्रिगुणांचें० ॥ ३ ॥
ऐशीं नव्वद वर्षे झालीं अझून नाहीं भरला धुरा । पित्त कफाचा अंमल
बसला कंठ वाजे घरघरा । गुदद्वारानें धीर सोडला वाजतसे भरभरा । बळें
खाटेवर नेऊन निजविती ओढ्ढानिया फरफरा ॥ चाल ॥ घर थुंक्यानें
नासलें । शेजारी जन त्रासले । शत वर्षे दुःख सोशिलें । हें असें खचीत
भासलें ॥ मोड ॥ विठ्ठल नामें परशराम म्हणे चुकलों कीं मूळबीजा ।
रामकृष्ण गुणीं रामा गाती नामें लाउन ध्वजा । त्रिगुणाचें तीनपण केलें
सर्व पाहिली मजा । आत्महित काय जन्मुन केलें मी अपराधी तुझा ॥४॥

## ४ : काळी-गोरीचें भांडण

एकुणेरीला उणें बोलती एकाहून एक आगळी । आपआपल्या
स्वरूपाला वाणिती गोरी आणि काळी ॥ ध्रु० ॥ काळी म्हणे गोरीला ऐक
हा मुळीहून वृत्तांत । कांहींच नव्हतें रात्र काळी अक्षई आदि अंत ।
शून्यापासून आकाश काळें पाहे धादांत । आकाशापुन वायु त्याचा
निळा रंग नित । वायुपासून तेज तांबडें व्यापून आप श्वेत । आपापासुन
पृथ्वी झाली वर्ण तिचा पीत । पांच मिळोन मूस ब्रह्मांड ओतली काळी
श्रेष्ठ त्यांत । काळ पुरुष करी उसास गगनीं बसून अहोरात । काळ्यानें
गोऱ्यास ओळखिलें अभिमान गाळी । एकुणेरीला० ॥ १ ॥ गोरी म्हणे
काळीला वाणिशील तुझेंच तूं सारें । कांहींच नवतें निर्गुण होतें ज्योति-
र्मय गोरें । ह्या ज्योतीची जमली काजळी आकाश निर्धारें । मधें निर्गुण
तें सगूण झालें शून्याकारें । श्वासोच्छ्वासाशी चंद्र सूर्य दोन्ही पांगोरे ।
नामी निघालें अष्टकमलदल पुष्पपत्रभारें । नामी ब्रह्मा हृदयीं विष्णु
मस्तकीं हरि हर । एक स्वरूप हरि त्रिगुण झाले उभवणीस न्यारे
तारांगणें नव लक्ष निघालीं रोमरंध्रें सगळीं । एकुणेरीला० ॥ २ ॥ काळी
म्हणे गोरीला लाविशील मोठेपणा वाया । काळी बाहुली मी नेत्रां तर्धी

जनयात्रा पाहाया । काळें काजळ काळ्या पापण्या काळ्या दोन्ही भिवया। काळे केस मस्तकींचे बसशील चौरंगीं न्हाया । काळी पोत गरसुळी आहे वपण जगांत मिरवाया । काळें दांतवण न लाविशील तर शुभ्र दंत लाह्मा । काळी शाई काळीं अक्षरें हरीचे गुण गाया । काळी कस्तुरी उंच मोलाची आरोग्य करी काया । काळी मृत्तिका करून पार्थिव पुजी प्रातःकाळीं । एकुणेरीला० ॥ ३ ॥ उलट जाब काळीला गोरी मग सरसाऊन देती । नेत्रीं बाहुल्या कशानें पाहशील आंत गोऱ्या ज्योती । गोरी कांती गोरें सुवर्ण गोरें मोती । गोरें रत्न करूं परीक्षा श्रीमंत जन घेती । गोरें चांदणें गोरा चंद्र गोरा गभस्ती । उदय होतां यज्ञ याग आणि स्नान दान करिती । गोरें अमृत दुर्लभ सर्वी गोरा ऐरावती । गोरा अग्नी परि-पाकामधें स्थूळ देह पाळी । एकुणेरीला० ॥ ४ ॥ काळी गोरीचें भांडण असें चढावढी होतां । आली सांवळी तिसरी म्हणती कां भ्रमणीं भ्रमतां । काळें गोरें हें एकाचेंच आंगीं अक्षई आदि अंतां । रहा आनंद करून येथून निर्वैर होइल आतां । निवृत्ति प्रवृत्ति दोहींची झाली लाघव मूळ-वार्ता । समाधान चित्तीं वृत्ती नामीं विठ्ठल गीत गातां । काग पिंगळा हंस बगळा भिन्नभाव पाहतां । परशराम म्हणे असार सोडुन सार घेई आतां । भेदावांचुन करिती शाहिरी पोटास्तव दुबळीं । एकुणेरीला ॥ ५ ॥

## ५ : सतीची कथा

देह गेला तरी जावो परंतु नेम न टळे कधीं । आम्हां स्त्रियांचा स्वधर्म ऐसा लक्ष पतीच्या पदीं ॥ ध्रु० ॥ सकळ तीर्थें धर्म अवघे एकीकडे । सद्भावें पतिसेवा करिती अवघे तिजला घडे । मी सेवेशीं उभी तिष्ठत दासी दोन्ही कर जोडून पुढें । सत्वशीळ म्हणूनि वैभव पाळी पळभर वर ना चढे । जशी कमळन असतां जळीं-तशी जवळी मी पतीचरणीं । लक्ष लावि शशिमंडळीं । दृढ भाव स्वरचिती गाऊं आर्जविले गुणनिधी । देह गेला तरी जावो० ॥ १ ॥ चोपाळ्यावर पहुडी पतीला आपण तांदुळ

सडी। सर्वेच होता जागा भ्रतार पाणी मागे तत्घडी। तशी उठली घाव न देतां आधार मुसळ सोडी। मनोभंग होईल पतीचा म्हणून लगबगीनें तातडी। होती शेजारीण जवळ—ती पुसे सतीला केवळ। कसें स्थापिलें आधार मुसळ। हें गुह्य सांग मज आधीं। देह गेला तरी० ॥२॥ सती म्हणे पतिव्रता पण करशील तर तूं होशील अशी। उत्तर ऐकून घराशीं आली प्राणपतीला पुसे। मी झालें पतिव्रता आजपासून तुम्हीं व्हावें तसें। बसेन सडाया तांदुळ मागा पाणी तृषेच्या मिसें। तुम्ही पती माझे ईश्वर—मी तुमच्या पायाची किंकर। परी त्याशी वाटेना खरें। काय करील पुढें कळेना संशय चित्तामधीं। देह गेला तरी जावो० ॥ ३ ॥ करी सेवा निर्मळ निश्चळ असा एक मास लोटला। कांहीं तरी पालट पडला असेल म्हणूनि संशय चित्तीं वाटला। आज मागा मजपाशीं पाणी यास्तव जीव आटला। सांगितल्यासारखें करी मग कंठीं प्रेम दाटला। दे पाणी निजहस्तकीं करी कांडण स्वहस्तकीं। सोडितां मुसळ वरून कीं। येऊन सतीच्या भाळीं पडलें रुधिर वाहे जशी नदी। देह० ॥ ४ ॥ धनद्रव्य लुटविलें तुजसाठीं सर्वांशीं नाडिले। तुजसारख्या वाष्कळ म्हणुनिया मुसळानें ताडिलें। थर थर कांपे पती स्त्रियांला आज-पासून हात जोडिले। पण निश्चय एक सती। जन सभा चतुर मानिती। नामी विठ्ठल कवीची मती। परशराम येसूचे छंद जशी साखर विरघे दुधीं। देह० ॥ ५ ॥

## ६ : देशस्थितीचा पोवाडा—१

। संकट मोठें। युगांत आलासा वाटे। आचरण खोटें। संकट मोठें ॥ ध्रु० ॥ बुडाला धर्म। हारपलें नाणें। विसरलें सत्कर्माचें भाणें। लोप दैवताचे पुरले पेणे। नगरी दिसती उदासवाणे। तेजहीन राजे निरअभिमानें। शूर सरदार होऊन दिनवाणे। हत्ती उंट किलवाणे। त्यावर वाहती भुसार गोणे। मुंगी मेरू एकच मानें। फिरावें काठीस

बांधून सोनें । पुसेना कोणी थोर सानें । नवी मुद्रा यांत काय उणें । अखंड कहर पर्जन्यानें । अकाळ मृत्यु जुंपले घाणे । संकट मोठें० ॥ १ ॥

चार लक्ष बत्तीस हजार कली । त्यांत कमी संख्या गत झाली । पुढील होय कीं आतांच आली । ब्राह्मण अवध्याची गुरुकिल्ली । जे कां वरिष्ठ वेदवल्ली । त्यांचें दासीवर मन बाहली । तिच्यापुढें काय लग्नाची आली । वेदवंशीं लेंकरें झालीं । त्यांचा आचार याहुनि डौली । जसें काय आभाळीं गगनीं खवलीं । बुडाल्या कुलांगनांच्या भेली । पतीला करून ठेविली बिल्ली । संकट मोठें० ॥ २ ॥

पुत्र पित्याला क्रोधें ताडी । रुसून बसावें सासुरवाडीं । आपल्या मेहुणीशीं रथगाडी । आणून दावी वैभव माडी । कथाकीर्तनाची लागेना गोडी । ऐके डफगाण्याची झोडी । द्यावी बहुरुप्याला शालजोडी । नीच हीन जातीचा जोडी । सून सासुवर कपाळ झोडी । करीना इकडिल तिकडे काडी । बायकोस मूल हात जोडी । नको छळूं इची आयुरदा थोडी । मेल्यावर दाढी मिशी बोडी । कानोले खीर दिवसाला वाढी । उलटें खोटें संकट मोठें० ॥ ३ ॥

जपी तपी संन्याशाचे भार । गोसावी बैरागी अपार । जे का तपतीर्थ करणार । घराश्रमावर बांधती घरदार । संत झाले चोखेमेळे फार । टिळाटोपी माळांचे भार । करूं पाहती एकंकार । जार जारणी जारणी जार । निराशा अंतरीं निर्धार । त्याशीं एक नाम सार । नामीं विठ्ठल पायीं घालून भार । परशराम येसू म्हणे तार । येउनियां नेटें संकट मोठें० ॥ ४ ॥

## ७ : देशस्थितीचा पोवाडा–२

॥ जुने कायदे अगदीं मोडले जधीपुन झाली इंग्रेजी । कांदा भाजी एक्या मोलें तुप साकर मैदा मोजी ॥ ध्रु० ॥ मोठेमोठे उमराव धारकरी

जबर चहूंकडे दरारा । राव्यापरी पिंजऱ्यांत कोंडिले मायेणीचा चंदीचारा । देशमुख देशपांडे कदीम जुमेदारींचा असकारा । रुसुम मिलानें घ्यावे पोत्यांतून हुकूम कोणावर नाहीं जोरा । पाटील कुळकर्णी नांव उगीच घालून दमले येरझारा । सत्ता साहेबी अगदीं बुडाली महाराचा त्याहून तोरा । शहाणे पुरखे अकलवंत हेवट म्हतारे बिनकाजी । कवळे कोम वय तरणे कारभारी त्यावर बहाल खुष मर्जी । जुने० ॥ १ ॥

रथगाड्या अंबाऱ्या पालख्या टांगून ठेविल्या आढ्याला । धमण्या छकडे म्याने बसाया दुखणाईत जीत मढ्याला । भाले बरच्या ढाल तलवारा न पुसती कवडयाला । चकमकीच्या बंदुका काढून गरज नाहीं कळ तोड्याला । ठुसके ठेंगणे शिपाई पाहून एकसारखी एक मर्जी । टोपी डगलें तंग विजारी खडी चवकी हुजुरजी । जुने कायदे० ॥ २ ॥

रणबाजे चवघडे वाजती काळु कर्णी शिंगबारी । जिलिब मशाली अवघी हरपली सडी रुजू रणीं स्वारी । तुरुकस्वार पलटणें पायदळ रव चाले मुंग्याच्या परी । जिकडे बदली तिकडे जावें घेऊन कुटुंब कबिला बरोबरी । राजधान्या अगदींच बुडाल्या राजाचे झाले फर्जी । चवरी, अबदागिरी टांगून ठेविल्या छत्री आपुण आपली धरी शिरीं । जुने कायदे० ॥ ३ ॥

आठ आणे चार आणे एकोत्रा असा सावकारी शिरस्ता । आतां सावकारी मारवाड्याची घर बुडवील दिवसां दिसतां । ती टोल्याचा कागद त्यावर हजारोच भरी दस्ता । घरादाराचा लिलाव करून तुरुंगांत खाती खस्ता । एक साल सुकळ एक साल दुकळ हराजिन्नस व्हावा स्वस्ता । जिकडे तिकडे मरी पांगली पाउस घाला घाली शिस्ता । चांबाचे पहा दाम चालती ज्याचा तो मुल्ला काजी । शक न बरा म्हणून वाघ बकरी एके ठायीं पाणी पाजी । जुने कायदे० ॥ ४ ॥

बायकांनीं ताळ सोडिला मर्जीस आलें तर महाल । उत्तम मध्यम

चहूं वर्णांची अवघ्यांनीं केली एकच धांदल। अठरापगड मांग महार एक्या पोहऱ्यानें पाणी सेंदल। रामकृष्ण गुणी रामा गातो साधुपायाची होऊन राजी। गुण दुर्गुण ज्याचा त्याला असल तशी भाकर भाजी। जुने० ॥ ५ ॥

## ८ : अंधार नगरी बेबंद

अंधार नगरी बेबंद राजा न्यायनीति कैची। ठाके ठोके ठेगाई करून पाहिल पत त्याची। ॥ ध्रु० ॥ अंधार नगरी बाजार भरला चहू चहूव्याचा। आला माल चहूंकडून किराणा उदमी चाटयाचा। हेला भरून भोपळे गेला विकाया माळी कवठ्याचा। बसला दुकान मांडून म्हणे मी चाकर पोटाचा। सेव उकळाया झुंडी निघाल्या प्रथम राजाच्या। एक भोपळा उचलून नेला न चाले अर्जी कोणाची। अंधार० ॥ १ ॥

राज प्रधान दोन तयानें नेले बळजबरी। देशमुख देशपांडे तयाला सुद झाल्या खबरी। पाटील कुळकर्णी शेटे महाजन कदीम हकदारी। सहाजणांनीं सहा नेले लूट केली सारी। चवकीदारानें वळी मुठ नेली उचलून हक्काची। हेला नेला कोतवालानें तक्षीर अन्यायाची। अंधार० ॥ २ ॥

राजापाशीं फिर्याद गेला न्याय त्यांनीं केला। हक्कदाराचा हक्क चुकवून ने सोडून हेला। अर्जी कारितां झाला इतराजी माळी पिटून लाविला। माळी होता शाहाणा म्हणे मी हात दावीन याला। अशी मनसुबी करून राहिला बारा वर्षांची। पुढें अकलेचा कोट वांधिला धन्य त्या पुरुषाची। अंधार० ॥ ३ ॥

भसक चोथवा करून त्यावर शिक्का सरकारी। हर जिन्नस भर भरून नेतां कोणीच न वारी। बारा वर्षे शहर लुटलें धूम केली

सारी । मग राजाची भेट घेतली करून सडी स्वारी । विठ्ठल नामीं परशराम म्हणे ओळख भोपळ्याची रामकृष्ण गुणीं रामा म्हणे नाहीं दुनिया भोळ्याची ॥ अंधार० ॥ ४ ॥

## ९ : समाजस्थितिपर पोवाडा

सोनार शिक्का नवा निघाला पंधरा आणे जरी बट्टा ॥ ध्रु० ॥ वडाची साल पिंपळाला लावितां कशी लागेल पहा शोधून । हेल्यावर जरी दिली अंबारी मटकन बसेल भारानें । पखाल आपण वाहूं विसरला घरोघरच असेल गाणं । हिजडे जर तरवार मारते शिपायाशीं पुसतें कोण। उदंड झाला ताजा गधडा याला शोभल काय वर जीण । कोल्हे कुत्रे भुंकुं लागले हत्ती पळेल काय भिऊन । भीक मागून पित्र घालशी तर स्वर्गीं कैसा वाजेल घंटा ॥ सोनार० ॥१॥

कसे मुंगीला पर फुटले घेऊं म्हणती गगन । गरुडाची सर याला टिटवी गेली गर्वानें । हनुमंतापुढें उडी माराया पण केला कोल्ह्यानें । उडीं मारितां धरणीशीं पडला झालं बावन गेलें अवसान । श्रावणमासा शिदड मातले शेषाघरीं नेऊं लग्न । चैत्र वैशाखांत या म्हणून म्हटलें तिकडेच गेले मरून । ताड म्हणतो मी मेरूहून उंच कैलासाशीं लावीन फाटा ॥ सोनार० ॥२॥

राजहंसाच्या पंक्तीं बसाया गर्वे गेला कावळा । जातां खेपे टोचून पाहे जड लागे माणिक गोळा । बेडुक म्हणे मी वेद पढतों डबकामधीं खरडी गाळा । मैना सारख्या रडूं लागल्या नित्य रडती वटवाघुळा । कोणी कोणाचा गुरु ना चेला घरोघरचे झाले गोळा । शिलंगणाचें सोनें आणूं आठ रुपयांचा म्हणे तोळा । जसे शिमग्याचे वीर घुमती फौजांचा कारिती सपाटा ॥ सोनार० ॥३॥

तळहातानें चंद्र झांकेना उजेड त्याचा बहु जागा । मोत्याच्या

लडींत सरजा दमडीचा तो माल फुगा। गुरु गुरकावी चेला टरकावी मात्रागमनी असेल बगा॥ परस्परें जग देत ग्वाही अपकीर्ति माहित जगा। कथा भागवत शास्त्र पुराण हरीचे गुण कोणी गागा। नामें विठ्ठलचे असे धडाके ऐकून मूर्खा होय जागा॥ येसू परशराम म्हणे अशिलाचा पोकळ ताठा। साऱ्या गांवाचे ओहोळ मिळून गंगेची करिती थट्टा॥ सोनार०॥४॥

## १० : सवतीचें भांडण

हारीस आणिला पति दोघींनीं केला सळो कां पळो। सवतीचा प्रतिवाद नित्य विवाद लागला कळों॥ हारी०॥ ध्रु०॥ म्हणे थोरली मी लग्नाची देवीधर्मीं रुजु। कोरा नवरा आधीं म्यां वरला येती मला जन पुजूं। जेठी सून मी वडील घरामधीं जशी ढगामधीं विजू। भय कोणाचें समया लावून आम्ही उभयतां निजूं। मी थोराची लेक नको सवती मज पाहून खिजूं। सासुसासऱ्यानें मज आणिलें इला कशाला भजूं॥ चाल॥ माझें संयवर झालें जेव्हां। फार गजर। रथ गाडे घोडे तेव्हां। दिली नजर। मजपुढें तुझा काय केवा। कर गुजर। अर्मीमर्जीमधें जरा न राहशी पुढेंच येईल कळों। हारीस०॥१॥

म्हणे धाकटी वडीलपणाचा नको लावूं तोरा। खुष मर्जी पतीची असली तुझा काय जोरा॥ कानींकवाडीं येऊन लागशील अवघा वेळ सारा। दिड तांदुळ शिजवून सांगशी गोष्टी तीन तेरा। वय नूतन माझ्या भरजानीचा जणूं गगनीं तारा। म्हणून भाळले पति रूपाला तुज सोडून गारा॥ चाल॥ हत्तीवर अंबारी जशी। भरजरी। शिवमस्तकीं गंगा जशी। आहे शिरीं। ही चुनी मुदीवर कशी। पहा खरी। पोट पिकेना म्हणून मज केलें धिक् जिणें तुझें जळो। हारीस०॥२॥

सरसाऊन मग म्हणे थोरली उपमा देशील बरी। पार्वतीच्या धाकानें

लपविली शिवानें गंगा शिरीं। मखमाली पैजार चांगली उदंड झाली जरी। पायाची पायामधीं शोभेल, कोणी बांधली शिरीं। अर्धांगीं निजअंकीं बसन मी, माझी करशील सरी। आजपासून चार पाउलें तुला मी ठेवीन दुरी ॥ चाल ॥ येऊं दे पतीला घरीं। उभी आडून। कां केली मजवरी। गळा पडून। लोण्याची सवत नाहीं बरी। कडकडून। असेंच सांगेन निक्षून पतीला तुझी क्रिया तुज फळो। हारीस० ॥ ३ ॥

रंगरस त्वां आधीं घेतला तपीं बसलीस करकरून। खोटेपणा मोठाई लावशील मजभोंतीं फिरफिरून। आजवर म्यां सोसिले आतां राहे भरमाभरमी दुरून। बरोबरीचा दावा घेशील लगदा लगदी करून। अति निकट असें भांडण होतां पति आले बाहेरून। दोघीजणींची समजूत केली राहा आनंदेंकरून ॥ चाल ॥ समतोल दोईंला ठेवून। करी मजा। मर्जींत वागती बहुत हितगुजा। नामी विठ्ठल करी छंद पाहून। करी हजा। परशराम येसू म्हणे ऐसा ज्याचा तो न ढळो। हारीस० ॥ ४ ॥

## ११ : लष्करचें सुख

लष्करचें काय सुख सांगूं गे तुज नारी। तुझे प्रीतिस्तव तें सोडून राहिलों घरीं ॥ ध्रु० ॥ आम्ही बाळ सराईत आधींच घोडेस्वार। जातांच लागला लष्करांत रोजगार। दिला बसाया सभल घोडा धन्याचा प्यार। पंगतीचें ताट दिलें मशाल खिजमदार। उमतीचा तव्र केली झड घालून तलवार। बाक्षिसा मिळविल्या चवरीन अबदागीर। दौलत मिळविली भर उंट दोन चार। मग आली तुझी सय जीव करतो हुरहुर। धन्याची रजा चौमहिन्यांचा करार। कुच मुक्काम आलों कसार बारी। केली गर्दी भिलानें दौलत नेली सारी ॥ लष्करचें० ॥ १ ॥ दोन चार पांघरुणें आला आंगावर लेऊन। नारीचे दिपले डोळे लिभास पाहून। करी गोड गोड जेवाया समया लावून। करी खुशामत अर्जीनें पुढे उभी राहून। आज

लाख मिळविले हरी विसरला देऊन। बरे आले हेतशीर घरीं आपले जीव घेऊन। वडिलांची अर्धी भाकर खाऊं धुऊन। आहेवपण भोगीव कपाळीं कुंकू लावून। गेली महालामधें दिला पलंग बिछावून। शेजारीं निजले दोघे लई प्रीत लावून। भोगिला विलासें समया लावून चारी। मज रुपासारखा जोडा असा बेबहारी। लष्करचें ॥ २ ॥ गेली रात्र उगवला दिनमान दुसऱ्या दिवशीं। लगबगून उठली होती चतुर नार हावशी। वांटिती साकरा जन नारीला पुसी। चुडेदान दिलें अंबिका पावली नवशी। आंघोळीस पाणी ठेवून ऊन ऊन सरशी। लावी उटणें चौरंगावर होऊन सरशी। माथ्याला टक्कल कशाचें हो गुणराशी। दोन्ही खांद्यांला दोन्ही घट्टे, बांधल्या गरशी। वाकडा हात खुळा देह झाली झांजरशी। टांचांच्या गेल्या भेगा असून सुखवासी। रात्रंदिस होती घोड्यावरती स्वारी। रांगडा मुलुख तिथें लढाई केली भारी ॥ लष्करचें० ॥ ३ ॥ पाठीशीं ढाल खांद्यांवर बंदुक आमच्या। कंबरेला साज परदाळे सुऱ्या निमच्या। आम्हीं केली लढाई पाछायाशीं रुमच्या। करकरा निरपल्या जेव्हां चमाचम चमच्या। गोळ्यांचा बरसतो पाऊस अती सुमसुमच्या। रक्ताचे वाहती पूर नद्या रुमधूमच्या। लढणार असाम्या निवडक जाण आमच्या। तिथें पाणी मिळेना रुप्याचा एक चमचा। निसंग केली लढाई पेटलों भरी। सोन्याचे मंदिल तुरे दिले जरतारी। लष्करचें० ॥४॥ इतकें ऐकुन नार हर्षली चित्ता। लष्करचा गडी एक याला जामीन होता। त्यानें मुळापासून सांगितली अवघी वार्ता। माथ्याला टक्कल पडलें मोळी वाहतां। खांद्यांला पडले घट्टे बादलें वाहतां। बादल्याची मोडली काठी याचे हातां। याला सकाळींच उठून मारती लाता। जेव्हां झाली लढाई बुणग्यांमधीं हा होता। पोषाख पळाला घेऊन येतां येतां। हेलपाटा पडला इथवर याच्याकरतां। नारीचें झिजलें कपाळ पायां पडतां। वाण्याची उचापत देऊं कशानें मी आतां। विठू परशरामाचे छंद असेग बेबहारी। भगलीच्या उडाल्या भगल भणभण सारी। लष्करचें० ॥ ५ ॥

## १२ : दुघड नार

दुघड नार नवऱ्याला शिकवी म्हणे वेगळे निघा। जहामर्दी संसार दावितें करून तुम्हाला बघा ॥ ध्रु० ॥

जसा भाड्याचा बैल राबतो देह अगदीं झिजली । तुमच्या जिवावर एवढी द्वारका केलें घरदार दोमजली। आवस पहाट नित्य उठूनया शेजभाज त्यजिली। रूपासारखा जोडा तुझ्या मी आहें नाजुक बिजली। इतकें करून नाहीं सत्ता कां अक्कल थिजली। तुम्ही चाकर मी बटीक फुकाची दैवदशा निजली ॥ चाल ॥ कारभारी तुमचा माऊ। कुलकुला घरांत जाऊं। तिजपुढें काय मी माऊ। अशी तत्ता कुठवर साहूं। केली खुलवर शेवटीं मुक्रर देतील दगा कर्जाचें डोंगर दावितील करून वर त्या बगा। दुघड नार० ॥ १ ॥

पहिल्यापासून केली कमाई कवडी कवडी पुसा। तोडा सुतळीचा वांटून ध्या तुम्ही बरोबरीचा हिस्सा। नग डागिने घडवा मजला रोकड हुंडी दुसा। माझ्या माहेरीं जाऊन राहूं बिन घोरानें असा। परगणे पाटिल तुमचा सासरा जिकडे तिकडे ठसा। राबणार राबतील शेती, स्वस्थ चावडीं बसा ॥ चाल ॥ बायकोची अक्कल खोटी। जिवीं धरून बांधल्या गांठी। पहा केवडी कळीची काठी। भावाभावांत पडल्या तुटी। वेगळेपणाची हौस मनामधें आगीन करी धुगधुगा। निमित्ताशीं केली पुढें बायको, आपण राहिला उगा। दुघड नार० ॥ ५ ॥

अशी मनसुभी वाटून घाटून आडला आवत्या गडी। लटकीच कुरबुर बायको झोडिली घालुन बसला आदी। रागें भरून गोठ्यामधें निजला हातीं पाई घोंगडी। आला बाहेरून भावा म्हणतो कुठें गेल्या धांगडी। नका भाऊजी लावूं कुरकुर करीन तलाव बाबडी। ध्या अक्कल व्हा शाहाणे माझे काय भिजतील तीन खडी। मला होईना तुमचा धंदा

कुठवर मार खाऊं कितीदां ॥ चाल ॥ कोणी आड येईना या चिंदा। अशी घळमळ पडली मदा। सारी रात्र असा विचार केला धरिला दोहिनि फुगा। नांदत्या घराला विभो लावला पिळ पाडून केला भुगा। दूघड नार० ॥ ३ ॥

चवघांनीं वांटणी करून बरोबर वांटा करून दिला। अर्ध्या आडा-मधें भरून आंवाडी सासुरवाडीं गेला। तेच सालीं खरपा पडलें शेतामधें तोटा आला। पट्टीवारी बिलकुल पैसा अवघा वाटे लाविला। खायावांचून बैल दमले कर्जबंदी झाला। चलतीचे सोयरेधायरे कोणी पुसेना याला। ॥ चाल ॥ झाली दशा आली अवकळा। डोई चिंध्याचा झिळमिळा। गेला विसरून टाकमटिळा। देह वाळून झाली पिळा। विळा घेऊन मग करी मजुरी दोहींकडून तुटला लगा। दाणे खाऊन करी गुदराण दांताच्या बसल्या शिगा। दुघड नार० ॥ ४ ॥

बायकोच्या अकलेनें झाली थोरथोरांची दशा। ढोर वेगळे सोडून निघती मायबापाची आशा। गेला शरण भावासी आपली पुरती फिटली निशा। केली पहिल्याहून चढी उतरली डोळ्यांवरली नशा। एक जोडी-पर दैव दहांचें हाजा उडवी परखुशा। जिकडे तिकडे मान मानति लौकिकाच्या उशा ॥ चाल ॥ नामीं विठ्ठलाचे छंद गीति। धर ऐकून मूर्खा चित्तीं। नवाशिकाची किंमत किती। श्वानास भिईना हत्ती। परशराम येसू निवडून दावी हा मोति हा फुगा। तीळ नाहीं म्हणून कोळ सांठविलें घरांत घालून ओघा। दुघड नार० ॥ ५ ॥

## १३ : पतिव्रतेची कहाणी

पतिव्रता खुण करून पतीला गुंफून दिधला तुरा। पर पुरुषीं जर रत मी होईन तरी सुकेल चातुरा ॥ ध्रु० ॥

पर मुलखीं जाऊन राहिलां बारा वर्षें जरी। नाहीं सुकणार तुरा जराभर हीच प्रतिज्ञा खरी। ऐसें ऐकून नारीचे शिपाई हर्षले अंतरीं। आम्ही जातों लष्करीं, कामिनी खुशाल रहावें घरीं। चार कामें तुज सांगून जातों निक्षून हृदयीं धरी। बिन पैशाविण महाल बांधून बाग लाव रसभरी। पुरुषाविण स्त्री पर्णून आण एक आम्हास रूपगुणपरी। पुत्र पतीविण पैदा करून ठेव आपलें मंदिरीं। असें सांकडें घालून गेला फंदी फाकडा झुरा। रात्रंदिवस काळजी नारीला चैन पडेना जरा। पतिव्रता खुण ०॥ १ ॥

नवगेंदाचा तुरा मस्तकीं फुलाशीं फूल दाटलें। हुजूर चाकरी राजापाशीं कांहीं दिवस कांटले। ताहादार नित्यनवा सुके न अग्नी लोळ तुटले। कुठून लावितो नकळे शोधितां सहा महिने लोटले। कांहीं तरी किमया असेल पराक्रम आश्चर्य वाटलें। वर्म पुसाया त्यासी एकांतीं राजानें गांठलें। तो म्हणे आमची नार सती घरीं सुवर्णमुशीं आटलें। तिचें ब्रीद हें लावून आम्हीं चार मुलुख खेटले। ऐकून राजा चकित झाला बाण जिव्हारीं पुरा। तुरा सुकेल तरी नक्षा राहील यावर आपला कुरा। पतिव्रता खुण० ॥ २ ॥

पलंगाची चाकरी शिपाई जवळ हुजूर ठेविला। पतिव्रतेचें व्रत भंगाया प्रधान पाठविला। शहराबाहेर मुक्काम करुनि कागद भेटविला। गोष्ट लावितां तिशीं पतीचा हुकूम आठविला। बाग महाल बहाल जर बांधून देशील तरी जीव बाटविला। दासी हातीं संदेसा मनसुभा थोडक्यांत आटाविला। बाग महाल त्यानें सहा महिन्यांमध्यें तयार करून ठेविला। आपल्यासारखी सजउन दासी तिशीं रंग लुटविला। पतिआज्ञे-स्तव असत्य भाषण कधीं बाधेना जा। पतिव्रता व्रत राखून आपलें अभंग अक्षई हिरा। पतिव्रता खुण० ॥ ३ ॥

कुच करून मग प्रधान आपल्या नगराशीं जातां। सर्वे निघाली गवळण होऊन कोणा न कळतां। पत लाऊन तिनें पती भोंगिला पाहून दिस चौथा। पोषाक खंजिर खूण मागितली लाऊन मोहे ममता ॥ करून साज पुरुषाचा निघाली परतून घरीं येतां। खंजिराशीं लग्न लाऊन आणिली दुसरी दुहिता। नवमहिन्या घरीं पुत्र प्रसवली आनंद बहु चित्ता। वर्तमान लिहून पाठविलें झाली मूलवार्ता। पत्र वाचितां हरुष झाला मग वांटी साखरा। आज्ञा मागे बहु युक्तीनें जातों आपुल्या घरां। पतिव्रता खुण० ॥ ४ ॥

दासी भोगून प्रधान थकला विनोद राजा करी। नाहीं सुकला तुरा जरामर नार सती ते खरी। तलफ चुकऊन पोषाख दिधला खुप उमदा भरजरी। यशाचा शिरीं तुरा लाऊन लय घेऊन आला घरीं। चार कामें हीं करून ठेविलीं वाईट अथवा बरीं। पोषाक खंजिर खूण दाखविली याला साक्ष हरी। दोघी बायका आणि पुत्र प्रीतीनें बसून अंकावरी। लाखांमध्यें कोणी विरळा, असलीं नाहीं घरोघरीं। नामीं विठ्ठल परशराम गुण येसू गातो शिरा। रामकृष्ण रामाचे तोड हे ऐकून नवशीक झुरारे। पतिव्रता खुण० ॥ ५ ॥

## १४ : निपुत्रिका

पोट पिकेना म्हणून बांधिलें भाराभर गंडे। बाई मी दुःखी फार घोर जीवा वाऱ्यावर हिंडे ॥ ध्रु० ॥

आधींच वर बिजवर पतीला हिणवर मी झालें। सर्व सुख अनकूळ न्हाण विन दिवसाविण आलें। आज पावेल हरी उद्यां पावेल अशीं वर्षे सात न्हालें। उदास झालें मन माझें मी कर्महीन तालें ॥ चाल ॥ पती भोळा शंकर जैसा। मजवरीं प्रीत करी लईसा। घडोघडी देऊन दिलासा। खर्चुनिया महामुरसा पैसा। कोणी दोष लाविला असेल गे। म्हणून मनांत

मी भ्यालें। पंचाक्षरी आणून आधीं। घरबंधन मी केलें। लेकाची माय पाहून गे तिच्या बाजेजवळ गेलें। तिशीं ना कळतां चोरून गे जावळाच केस आणिले। केलें टाणेटोणे सारी। पाहिलें करून झाले खोरी। मज बरोबरीच्या पोरी। त्यांशीं कसा पावला हरी। पुत्रवंत्या घरोघरीं। उभारती विजयध्वज झेंडे। पोट पिकेना० ॥ १ ॥

फळ पुष्पाविण झाड नसे नाहीं सुख संसारीं येऊन। असें वाटतें सख्या मरावें पुडी जहराची खाऊन। वेरूळांत वैनगंगा उभयतां आलों जोडयानें न्हाऊन। करूं नये ते उपाय केले अधिक तास्ति साहून ॥ चा० सुप हलव्या देव देऱ्हारे। घुमविले आणून घुमारे। पंचरंगी रेशीम कोरें। ठाई ठाई वांधिले दोरे। केली कचेश्वरीं सेवा। एक संतत सहा माहिने। तुळजापुर माहूरचें। सांगती खडतर ठाणें। तिशीं म्यां वाहूं केलें। जरी चोळी पातळ पंचामृत हें बोणें। आलें उलटून माघारी केलें। कोलापुरीं देणें ॥ चाल ॥ महादेवी वाहिली गुढी। तेथून आलें जेजुरगडीं। पुढें कान्होबाची मढी। चळ भरला झालें मी वेडी। केस थोडके देव पुजिले माळावरले धोंडे। पोट पिकेना० ॥ २ ॥

सर्वांगीं डोळे पाहून पायाकडे झुरतें मोरापरी। एक लेंकरावांचून पक्षी निढाळ वृक्षावरी। नागबळ नारायणबळी केली जाऊन त्रिंबकेश्वरी। हरीहरेश्वर भीमाशंकर पुजिला ब्रह्मगीरी ॥ चाल ॥ कोकणची वजराबाई। महालक्ष्मी आणि नवलाई। वाळकेश्वर मंमादेवी। स्वकष्टीं पाहिली पाई। जहाजांत बैसुनिया बाई द्वारकेस गेलें। घेतल्या तप्त मुद्रा। पुढें गोमतीस आलें। डाकुरांत डाकुरजी। पुष्कर तीर्थीं मी न्हालें। आलें गोकुळ मथुरा क्षेत्रीं। हरीद्वारी मन धालें। तळीं मुक्तेश्वर तो नीट। रामघाट सोमरघाट। ब्रह्मवर्त चित्रकोट। पुढें प्रयाग काशी नीट विश्वनाथ केली गया अयोध्या वैराग्यपण दंडे। पोट पिकेना० ॥ ३ ॥

बद्रिकेदार बद्रिनारायण केली कापिलगंगा। कापिलेश्वर पाहिला

कलकत्ता झीज साहून आंगा। जगन्नाथीं चढविल्या हंड्या दोष जाती भंगा। सोमनाथ सोरट चापुनी कसत लावून संगा। नागनाथा वैजनाथा। पाइ पुजून ठेविला माथा। एक बाळक व्हावें या अर्था। परदेश घेतला माथा। गिरीवरी व्यंकटेशा। मनीं भाव धरून नमिले। लालची धनाचा तो। त्याशीं धन वाहूं केले। नाहीं बायकांशीं दर्शन। स्वामीकार्तिकी जन बोले। सेंडुरांतळीं राहून मनच्या मनीं नवशिले। येऊन पंपा सरोवरीं। श्रीरंगपट्टण कावेरी। मल्कार्जुन रामेश्वरीं। पाहून वारा मल्हारी। पंचवटी-मधें गुंफा पाहिली रामाचीं कुंडें। पोट पिकेना० ॥ ४ ॥

सप्तशृंग तापी ही नर्मदा उज्जनी क्षिप्रातिरीं। महांकाळेश्वर करून परतलें मन माझें हावभरी। ओंकार मांधाता अराधून तिर्थें केलीं सारीं। राक्षसभुवनीं शनी पुजून मग आलें पंढरपुरीं। आधीं चंद्रभागा न्हाऊन। भेट पुंडलिकाची घेऊन। उभी गरूडपारीं राहुन। सावळा अंतरीं ध्याऊन। ठेविला भाळ चरणीं। भेटलें विठ्ठलाशीं। फळ प्रसाद घेऊनिया घरीं आलें विश्वासी। पावला देव मजला। झालें बाळ ग नवमासीं। त्या सुखाशीं काय वाणूं। पती केवळ गुणराशी। देवाची अशी मी गडे। लेंकरूं घेऊनिया कडे। प्रीतीनें उभी पतीपुढें। जन्मे जुग नांवो चढे। विठू परशराम म्हणे पुसत नाहीं मालाचे हंडे। पोट पिकेना० ॥ ५ ॥

## १५ : गर्भवासिनी

गर्भ राहिला मला आतां बाई हरला अवघा शीण। जन्मीं आल्याचें सार्थक झालें फिटलें वांझपण ॥ धृ० ॥

तपीं राज्य बाई कष्टीं फळ असे बोलती अवघेजण। प्रचिती आलें माझें मजला ग्वाही देतें मन। पहिल्यानें मशीं गर्भ राहिला नकळे अंतर खुण। मळमळ सुटली भवभव करी आंगीं थरथरलें जोबन ॥ चाल ॥ गर्भाची छाया पडली। जाणवती चिन्हें पुढलीं। सर्वांगीं लाली चढली।

तंग चोळी आंगांत गढली । मी अनाड कांहीं कळेना गे ये । देह जड पडली भ्रांती । लेंकुरवाळ्या पुरल्या गे ये । त्याशीं पुसलें एकांतीं । त्यांनीं निज गुज सांगितलें गे ये । मग झाली मनशांति । वाटला हर्ष अंतरीं । एक मास लोटल्यावरी । पती मला पोटाशीं धरी । गर्भीण झालें मी खरी । भाग्योदय झाला मज वाटे कोटी गवसलें धन । गर्भ राहिला ॥ १ ॥

दुसऱ्या तिसऱ्या चवथ्या मासीं आली गर्भिणीची कळा । कमळ लागलें फिरूं पोटामधें करी कांति झळझळा । घडी मोडून दिली हातीं नेसाया भरजरी सोनसळा ॥ चाल ॥ होत डोहाळे पती मज पुरवी हात घालुनिया गळा । ओले नारळ फणस केळें । दाळिंबें द्राक्षें ढवळे । घोस खिरण्या खजुरा पिवळे । अंजीर आणि आंबे आवळे ॥चाल॥ रामफळें सिताफळें गे ये । जांबुळें जांब बोरे । सोळवंड्या ब्राह्मणाशीं गे । दिले हारे भरून कोरे । उटी चंदन मैलागिरीचे ग दिसे आंतून अंग गोरें ॥ चाल ॥ असे विलास नानापरी । डोहोळे जेवण घरोघरीं । ह्या बाळपणाच्या नारी । मज रमविती मंजुळ स्वरीं । हिरवें पातळ खण अंजिरी ओटी भरली प्रीतीनें । गर्भ राहिला ॥ २ ॥

महिना पांचवा साहावा सातवा सरतां सरता गडे । ऊठतां बसतां संकट मज पडलें सांकडें । डब डब घामें होतो उबारा चैन जरा ना पडे । ऐन उन्हाळा पडदे चिकाचे झुरक्याला चहूंकडे ॥ चाल ॥ आंत वाहेर फिरतां महालीं । शरीराची होते कहाली । अन्नाची शिसारी आली । काया अगदींच पिंगट झाली ॥ चाल ॥ घरधन्यास कळ पडे ना गे । घडोघडी जवळ येऊन । कुरवाळी वदन माझें गे । बाई मुखास मुख लावून ठाई ठाई चोपाळे गादिले । हलक्यामधीं गोवून । आवडेल त्यावरी निजणें । घरीं वाळ्याचें विंझणें । दिस नख बोटी मोजणें । हलवितां मधुर चांदणें । मधुर घालिती वारा मजवर दासी चहुंकुन । गर्भ राहिला० ॥ ३ ॥

आठवा सरून नवव्याची अर्धी घडीना घडी लोटली । अटकर बांधा लहान गर्भ मुस पोटामधें दाटली । पार पडन मी कधीं पतीला अशी चिंता वाटली । सर्व आंगीं वेदना गांठ बाई कंचुकीची सुटली ॥ चाल ॥ विंचाहुन अधिक कळा । कळलें आली प्रसूत वेळा । केल्या शहाण्या चतुरा गोळा । त्या कळा जाणती कुशळा ॥ चाल ॥ गोड पदार्थ किंचित सांगे । आधीं मजकडून खाविला । बसुन स्थीर स्थीर । म्हणती हळू बोला । वेणीचा वास माझ्या गे मजकडून घेविला । धरवेना तेव्हां मशीं धीर दैवतास कोणत्या स्मरूं । मशीं नका घाबरे करूं । जीव जातो कसेंग बाई करूं । बत्तीस लक्षणी बाळ जन्मलें न लागतां एक क्षण । गर्भ राहिला० ॥ ४ ॥

आला प्रेमाचा पान्हा मजला मुख पाहूंद्या आधीं । वाजंत्रीं वाजतील वाजूंया पूर्वापरी ज्याविधी । सभोंताल्या उभ्या बायका नमस्कार करी पदीं । नारळानें भरी ओट्या साकरा घाळून मुखामधीं ॥ चाल ॥ शेख शेगड्या बिछित न्हालें । बाराबळी सुखाशीं झालें । पती पुढें लेंकरूं नेलें । आनंद पाहून मन धालें ॥ चाल ॥ भरजरी आंगडें कुंचडें गे । लखलखीत प्रभा पडली । जाडिताचें वाळलेणे गे । नेई पिंपळपानें घडली । रंगीत पाळण्याला गे । रावे मोरें जडलीं ॥ चाल ॥ पावला असा हरी । नामीं विठ्ठल हात शिरीं । यशाचा पटका जरी । गुण परशराम छंद करी । येसू म्हणे काय कळेल सोहळा वांजेला ही खूण । गर्भ राहिला० ॥ ५ ॥

## १६ : लेकुरवाळी

नव नवसाचें बाळ एक दिलें ईश्वरें । नाहीं समाधान त्याशीं बाई पाहिलें करून घुमारे ॥ ध्रु० ॥

मी बारा वर्षें एक ठीक न्हालें आधीं । जीव सुजला माझा बाई नाहीं बाळक झालें कधीं । कर दुसरी बायको जन म्हणती दुर्बुद्धि ।

पति भोळा शंकर जैसा–नाहीं मनास आणिलें कधीं । कडू खातां मडूं आलें मी गर्भीण झालें तधीं । उंच शेलारी हिरवी दिली नेसाया जधीं । होती नानापरीचे डोहाळे काय कमी घरीं नवनिधी । एक वाघिणिचें दूध नाहीं मग भरल्या अष्टसिद्धी । असे सुकळाशींनें नवमास झालें पुरे । आली प्रसूतवेळा बाई जन्मलें मूल गोजरें । नव नवसाचें ॥१॥

गेलें बारावळी पाळणा तेरावे दिवशीं । रंगीत आणवला बाई मग हर्ष माईना मशी । वर नक्षीचा चांदवा काढून बांधून नरवशी । सोनेरी खेळण्या मोहरे जन बोलती अशी । अशी पर केली पाहण्या घरधनी फार हौसी । दिल्या काढून साड्या चोळ्या हेलकरणी झाल्या खुशी । बाळ आंगडें लेणें लुगडें पैक्याची रबीर अशी । आला वडील सासरा पोटीं मी जेठी सून मज कुशी । गजरानें म्यां नांव ठेविलें गेलें रुकाथुका दूर देशीं । एक्या पोरानें घर भरलें जणूं कीं आंगण सारें । दिसें मासें लागलें रांगूं आंगण त्याशी नापुरे । नव नवसाचें ॥२॥

पानसाकळ्या हसळ्या पुतळ्या मधीं वाघनखें मढविलें । आणून जरीची टोपी त्यावरी जाळी काढविली । पांई पैंजण तोडे घालून राव्या-परी पढविले । होती हौस मनामध्यें बाई कल्पना तितकी उडविली । लेकाची माय म्हणती घडी आनंदाची वाढविली । झाली एकाएकी झडप डोळे लावून तनु झडपिलें । जीव ब्याहलाग माझा बाई सुटलें उभें मन वारें । दृष्टीनें कलकन उलटी त्या पाषाणाचे चिरे । नव नवसाचें बाळ० ॥३॥

केले नवस मोय बगाडे खेळन । गर्भ्याच्या सटवाईला मी जाईन पाहीन वळण । कोलापुर चतरसिंगी तुळजापुर अडजुड येऊन रूळन । जळत विंगळावर चालेन जळनगदा मागेन । दाव लमलकी पाव मला नको करूं छळन । नळदुर्ग खंडोबासाठीं घालीन भंडाराचें दळन । जाखाया जोखाया जाणें जोशा पुसले होरे । नवसाचे डोंगर झाले अझून पुरेना धुरे । नव नवसाचें० ॥४॥

केले वैद्यवाणी बाई पंचाक्षरी जमविले । सुप हलविले देव देव्हारीं घुमारे आणून घुमविले । त्यांनीं घालून अर्त्या बाई देवाशीं नमविलें । कांहीं गुणाशी येईना बाई धाव दवडी दवडिले । म्यां हिय्या मनाचा केला जाऊं पंढरीस नमिलें । कडकडीत घडीत गुण आला त्याचें पाईंच मन रमलें । नामीं विठ्ठलचे छंद बुंदरचित चित्ताचे श्रमविलें । गाती परशराम येसू महादू विष्की पुरे । काळ्याचे ढवळे झाले गायाचे पुरले धुरे । नव नवसाचें ।।५।।

## १७ : नयन सुरेख दोन्ही

नयन सुरेख दोन्ही लाल आंगावर शाल दुपेटा जरी । उमदा कोणी उमराव दिसे सरदार सौभाग्य घरीं ।। ध्रु० ।।

हजार दो चवशा किमतीचा अवलक तेजी खडक । नैन फेंकला तीर जसा नीट हत्तीस मारील धडक । पांई पैंजण घोड्याचे थै थै नाहीं जराभर अडक । जडाव जीण रेखला कसून वर शिपाई वसला सडक ।। ।। चाल ।। वय दिसे सोळा सत्रांत । जणुं लिहिलें भोजपत्रांत । तजवीर थेट चित्रांत । आले शहरांतून गरकन झरकन आली पहातां मज गिरी । पटकन पडलें झटकन धरलें सख्यांनीं वरच्यावरी । नयन सुरेख० ।।१।।

फाक सुरेख नवलाख झाक वाऱ्यापरी आली झुळक । पटकन स्वारी सजून गेली जशी पाण्याची झुळक । कानीं बिगवाळी चवकडा कंठीला मोती ओविलें ठळक ।। चाल ।। रूपचंद्र आकाशीं जैसा । तो दृष्टी देखणा लईसा । याचा संग घडेल तरी कैसा । लाग साग या घेऊन जातां ऐसी या घरीं । जगेन कशी मी मरेन सख्याचा जीव पाहून हुरहुरी । नयन सुरेख० ।।२।।

जलद सख्यांनो जागे पाहून या गे कोठील सुमा । कुच खवरा आधीं ऐकल कोणी, मग पुढला मनसुभा । घाला गळ्याची आण त्याला,

तो क्षणभर राहिला उभा । अन्नपाणी जो घेईल पिईल निजनयनीं गुण नभा । संकल्प मनाचा केला तो गेंद फुलाचा झेला । विश्वासेल तुमच्या बोला आणा करून हरबहाणा विनवा जाऊन बहुता परी । शहाणा असेल समजेल उमजेल चंदन मैलागिरी । नयन सुरेख० ॥३॥

भरमी गोष्टी कांहीं वरमी बोलून युक्तीनें फिरवीला । शहर पुण्याचा रमणा पाहून मधीं मुक्काम करविला । नानापरी करी आरास महालीं जरीचा छत चिरवीला । करी साहित्य सरंजाम कुल तबकामधीं भरविला ! ॥ चाल ॥ एक प्रहर रात्र झाली । आणविला छबिला महालीं । हेतु पूर्ण गळां हात घाली । नामीं विठ्ठलाचे छंद फंद अति गोड । कवन रसभरी । परशराम येसु महादु म्हणे होय सावध पडशील भरी । नयन सुरेख० ॥४॥

## १८ : बोले कावळा लवतो डोळा

बोले कावळा लवतो डोळा फुरफुरती बाही । गेले प्रवासां घरीं कधीं येतील आमचे शिपाई ॥ ध्रु० ॥

गेल्या दिवसापासूनि कागदपत्र नाहीं आला सेदसा । झुरुझुरु पांजर झालें शरीर किती करूं अंदेसा । बिकट वाट बाई कठीण मुल्ख तो फारच खांदेसा । दुष्काळामुळें न चाले रस्ता पडला मंदेसा । ग्वाले-रीवर तमाम फौजा एकवटली शाही । दक्षणच्या लोकांला आसरा दुसरा कुठें नाहीं । बोले कावळा० ॥ १ ॥

भूमी मिरासे राजे रजवाडे करून निर विरजी । जिकडे तिकडे टोपीवाला चहुंकडे इंग्रेजी । आतां कशाला जाऊन राहिला पोकळ अलगरजी । एक प्यादडीवर काम, हत्यारें दिलीं सोडून बुरजी । वंश बुडवाई होईल वाटे लष्करचे पाईं । रत्न कोटीच्या कोटीं जिरतील जीव जाळून लाहीं । बोले कावळा० ॥ २ ॥

अबरूसाठीं लाऊन राहिलें अंगाला माती। वाट पाहतां हात पायांच्या फुल झाल्या वाती। ऐक सखे मी स्वपन देखिलें आज अर्ध्या रातीं। चोळी पातळ हिरव्या बांगड्या दिल्या माझ्या हातीं। ओटी भरून हाळदी कुंकूं माझ्या निढळा लावी। शकुन चांगला तुजला झाला आम्ही अवघ्या गाही। बोळे कावळा ०॥ ३॥

दिल दिलासा देतें मी सखया फारच सुख मानी। अवचित स्वारी आली दणाणित ऐकुन या कानीं। लगबगून उठली मिळालें पाण्याशीं पाणी। नामी विठ्ठल परशराम येसू म्हणे चतुर शहाणी। रामकृष्ण गुणी रामा गातो ठिकाण मूळ वावी। धनवट देशांमध्यें महाशूर नक्षा सवाई। बोले कावळा० ॥ ४॥

* * *

—५—

# प्रभाकर

प्रभाकरच्या वडिलांचें नांव जनार्दन व उपनांव दातार. हे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यांतील हर्णैनजीक मुरूड या गांवचे राहणारे. मुरूड गांव सोडून नाशिक जिल्ह्यांतील गंगापूर या गांवीं जनार्दनपंत केव्हां आले हें निश्चित नाहीं, पण प्रभाकरचा जन्म गंगापूरलाच झाला. त्याच्या जन्मसनासंबंधीं विद्वानांत मतभेद आहेत. श्री. य. न. केळकर यांच्या मतें त्यांचा जन्म सन १७५५ च्या सुमारास झाला असावा. प्रभाकरच्या लावण्यांचें ज्यांनीं संपादन केलें आहे, ( चित्रशाळा प्रकाशन ) त्यांच्या मतें याचा जन्म १७६९ सालीं झाला असावा. महाराष्ट्र सारस्वतकार श्री. भावे व 'मराठी शाहीर' लिहिणारे श्रा. श्री. म. वर्दे यांना हा सन मान्य दिसतो. प्रभाकरला दोन बंधु होते. त्यांपैकीं ज्येष्ठ गंगापुरींच निवर्तला व धाकटा बंधु धामधुमीच्या काळांत घरांतून जो निघून गेला त्याचा पुढें पत्ता नाहीं. प्रभाकरचें पहिलें लग्न गंगापुरासच झालें. पण त्याची प्रथम पत्नी निवर्तल्यावर

ठाणें जिल्ह्यांतील मुरबाड येथें राहणाऱ्या कोणा साठे यांच्या कन्येशीं त्यानें द्वितीय विवाह केला.

वयाच्या सुमारे वीस-बाविसाव्या वर्षी प्रभाकर गंगापूर सोडून पुण्याला आला. भाऊ महाराज यांचे बोळांत आप्पा घाणेकर यांच्या वाड्यांत त्याचें बिऱ्हाड होतें. वडिलांचा कारकुनी पेशा असल्यानें त्या पेशाचें आवश्यक तें शिक्षण प्रभाकरला बालपणापासूनच मिळालें होतें. पुण्याला आल्यावर प्रभाकरास खंडेराव रास्ते यांच्या पदरीं शागीर्द पेशांत कारकुनीची असामी मिळाली. ही नोकरी करीत असतांनाच प्रभाकराचा तमाशाच्या जगाशीं संबंध आला. पेशवाईंत त्या वेळीं गंगु हैबतीचा शाहिरी फड पुण्यांत फारच गाजला होता. या फडांतील गंगु हैबती, गुणीराज, महादबा सुतार इत्यादींची त्याची ओळख झाली—त्यांच्या साठीं तो कवनें करूं लागला. आणि नंतर लवकरच तो त्या फडाशीं एकरूप झाला. स्वतः गंगू हैबती चांगला कवि होता. ' गंगू हैबतीचा आहे लौकिक जगभर गाण्याचा ' अशा प्रकारचें त्याचें वर्णन केलें जातें. पण प्रभाकर त्या फडांत शिरल्यावर आपल्या प्रतिभेनें त्यांनीं बाकीच्या सर्वच शाहिरांना मागें टाकले. प्रभाकरानें कविता करावी व इतरांनीं ती म्हणावी अशी स्थिति त्यानें आणून ठेवली. सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत रंगाचा मोठा समारंभ झाला ! त्यावर प्रभाकरनें जो पोवाडा रचला तो प्रत्यक्ष पेशव्यांनीं दरबारांत गाववून घेतला असे.

> ' कुरानिसा करिती जन वाड्यामधें जाउनी
> दाखवि पवाडा गंगु हैबती गावुनी
> महादेव गुणिराज फेकिती तान तननन दरबारांत
> प्रभाकराचें कवन पसरलें सहज शतावधि नगरांत !

त्या पोवाड्याच्या वरील शेवटच्या ओळीवरून दिसून येतें.

सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत प्रभाकराची लोकप्रियता कळसास पोहोंचली. बाजीरावाची त्याच्यावर बहाल मर्जी बसली होती. प्रभाकरानेंहि बाजीरावाच्या विलासवर्णनपर ३०-३२ लावण्या रचल्या.

यशस्वी झाले श्रीमंत पाहिले सर्वं लढायाला
आतांच आलें अपेश कोठुन बाजीरायाला ॥

या पोवाड्यांत दुसऱ्या बाजीरावावर कोसळलेल्या संकटपरंपरांचें वर्णन प्रभाकर अतिशय व्याकुळ होऊन करतांना आढळतो.

पेशवाई बुडाल्यानंतर मात्र त्याचा आधार तुटला. त्याला अतिशय हलाखीची स्थिति आली व पोटासाठीं दारोदार भटकण्याची त्याच्यावर पाळी आली. त्याच काळांत सामान्य धनिक वर्गाच्या स्तुतिपर कवनें लिहिण्याची त्याच्यावर पाळी आली.

'प्रभाकराचें कवन प्रतिष्ठित सभेंत गायाला' अशा त्याच्या काव्याची नंतर बूज राहिली नाहीं. अशा स्थितींत १८४३ सालीं त्याला मृत्यु आला.

प्रभाकरानें पेशवाईच्या उत्कर्षाचा काळहि पाहिला होता व अवनतीच्या काळाचाहि अनुभव त्यानें घेतला. सवाई माधवरावांच्या रंगाचा दरबार-खर्ड्याची लढाई-सवाई माधवरावांचा मृत्यु-रावबाजीची विलासी कारकीर्द आणि त्याच्या जीवनाचा उत्तर रंग-या सर्व गोष्टी त्याच्या देखतच घडत होत्या-त्यामुळें त्या सर्व गोष्टीचें प्रतिबिंब त्याच्या कवनांत पडलें तर नवल नाहीं. विशेषतः रावबाजीच्या कारकीर्दीतील विलासी जीवनाचा परिणाम त्याच्या काव्यावर अधिक झालेला दिसतो आणि म्हणून उत्तान शृंगाराचें भडक चित्र अनेक लावण्यांतून त्यांनीं रेखाटलेलें दिसतें.

प्रभाकरला स्वतःच्या कवित्वाचा अभिमान होता. ‘ प्रभाकर कवीची कविता अमृतासमान ’ ‘ प्रभाकराची जडण घडण खडखडित म्हणायला ’ किंवा ‘ प्रभाकराची जडण अमोलिक जसा शिरीं शिरपेंच तुरा ’ असें प्रभाकर ज्या वेळीं अभिमानानें स्वतःच्या कवितेचें वर्णन करतो तो अभिमान फारसा वावगा नाहीं असें त्याचें कवन वाचत असतांना वाटत नाहीं.

× × ×

## १ : लक्ष्मी–पार्वती संवाद

लक्ष्मी गर्वे निंदा बोलुन झिडकारिती पार्वती । आहे ठाउक पुरुषार्थ तुझा तुज प्रिय असो पशुपती ॥धृ० ॥ स्मशानवासी भूषण भयंकर पिंगट मुकुटीं जटा । भाळीं चंद्र ज्या तीन नेत्र भस्माचा कपाळीं पटा ॥ व्याघ्रांबर गजचर्मांबर परिधान शुद्ध कानफटा । रुंडमाळ ती कंठीं कुंडलें भुजंग रुळती कटा ॥ त्रिशूळ पाणी त्रिपुंड्र भाळीं लोहोकंकण मनगटा । नंदी वहन सर्पांचा सदोदित करिं कमरे लंगुटा ॥ कसा आवडतो शंकर गिरजे सांग तुला मजप्रती । लक्ष जन्मिचें पातक म्हणउन पडलिस ऐशा हातीं ॥ १ ॥ भोळा माझा सांब लक्षुमी उगाच निंदूं नका । आदी अंत नसे अगम्य सुख तें अप्राप्त ब्रह्मादिकां ॥ सोळा सहस्र शत एक मुख्य तुम्ही अष्टजणी नायिका । कार्यवादु तो कृष्ण कसा करी पूर्ण मनोरथ सखा ॥ वक्रदंताशिशुपालकीटकां कपटें मर्दुन बका । प्रताप मुखें वर्णितां कशा भाळल्यात गोरक्षका ॥ जरासंध रिपु भयें वसविली जळांत द्वारावती । तस्करास कसा श्वशुर जडला पहा भीमक भूपती ॥ मच्छ कूर्म हा सूकर झाला सिंह वामन श्रीपती । जन्म गेला पहा अशा खालिं म्हणे लक्ष्मीस पार्वती ॥ २ ॥ भूतें पिशाचें यक्ष ब्रह्म-राक्षस हे ज्याचे दुत । श्वानें सभोंवतीं मिळवुन संगें फिरे भिक्षा मागत ॥

भुंभुं वाजवि शंख मुखानें चिताभस्म लावी नित। शूर्पकर्ण षण्मुख ज्याचे नवल परीचे सुत॥ मना गमे तिथें निद्रा कारितो जिवंत पहातां भुत। हिमालयाचें थोर असें प्रारब्ध पाहुन विस्मित॥ धन्य तुझी पार्वती अशाची राखितेस चित्तवृत्ती। दैवदशा भ्रतार तामसी कठीण होतां गती॥ ३॥ अनंत घेतो जन्म तुझा पति क्षीरसमुद्रामधीं। शेषावर निद्रिस्त नाभिवर चार मुखांचा विधी॥ वहन विहंगम दिलें सुदर्शन करून शंकरें अधीं। सुरासुरीं तुजसाठीं मंथिला पराक्रमें जळनिधी॥ इच्छा करती प्राणिमात्र तूं चंचळ नाहिंस सुधी। शंख सहोदर तुझा लक्ष्मी श्रीमंत झालिस कधीं॥ कृपानिधी हा सांब वसे अर्धांगी मी त्याची सती। लिळा तयाची विचित्र भासे विदीत सर्वांप्रती॥४॥ तपसामर्थ्यें करुन शिवाला भस्मासुरें जिंकिलें। हरुन तुला पार्वती त्वरेनें स्कंधावर वाहिलें॥ लपूं लागला सांब तेंव्हां मम पतीस पाचारिलें। मोहनी स्वरुप प्रत्यक्ष धरुन त्या राक्षसास जाळिलें॥ गजेंद्र कारितां धांवा नक्रासहित त्या उद्धारिलें। सुधन्व्यास तैलामधीं तळितां तैल थंड जाहलें॥ अशी घालितो उडी संकटीं पहा माझा श्रीपती। कोमलांग राजीवनेत्र नव्हे शिवासारखा जती॥ ५॥ नको सांगुं बडिवार विनोदें लक्ष्मी नानापरी। नंदाचीं गोधनें चारितो कुंजवनाभीतरीं॥ मुखांत घालुनी वेणु वाजवुनी मोहित करी सुंदरी। गोपव्रजांचें उच्छिष्ट खातो नव्हे निर्मळ श्रीहरी॥ मेघवर्ण सर्वांग खोंवितो मयूरपिच्छें शिरीं। नवनीत चोरी वाटे दैत्य कसे मर्दन केले तरी॥ लग्न लाविलें बसुन रिसाशीं कुब्जा होती दुती। किती एकेक गुण सांगुं ऐकतां दुःखित होशिल चित्तीं॥ ६॥ अनंत कोट ब्रह्मांडें निर्मितां जगांत जगत्रेगळा। चार वेद सहा शास्त्रें धुंडितां कुंठित झाल्या कळा॥ निराकार निर्गुण सगुण मीं पाहुन पडलें गळां। जन्मोजन्मि हा असो पती मज घनःशाम सांवळा॥ परम सुशील निष्कलंक वनीं उद्धरली आहिल्या शिळा। नामस्मरणें शीतळ झाला सांब देह सगळा॥ मुकुट-मणी वैकुंठपीठ जो अमर सदा वंदिती। प्राप्त व्हावे हे चरण म्हणुन किती

समाधिस्त बैसती ॥ ७ ॥ ताडपत्र श्रृंगार म्हणुन म्यां छाळिलें नित शंकरा। कुबेराची संपदा पुरे ना आहा रे विश्वेश्वरा ॥ एक स्वरूप शिव–विष्णु लक्ष्मी–गौरी एक स्मरा। लय लावुन एकाग्र भजावें मृत्युंजयश्रीधरा ॥ लक्ष्मिचा आणि पार्वतिचा संवाद गोड हा खरा। भक्तिपुरस्कर पुजुन करावें प्रसन्न नित हरिहरा ॥ महादेव गुणे सांब–हरीच्या चरणांबुजिं लोळती। प्रभाकराच्या कवना गुणि जन हेत धरुन धांवती ॥ ८ ॥

## २ : मुरली

मुरलीनें ग मन अवघ्यांचें मोहिलें सखये बाई ॥ ध्रु० ॥ मृदु मंजुळ वाजवी वेणू मधुसूदन वामनमूर्ती ॥ गोपिकांस मोहानि पडली गेली भेदुन अंतरीं पुर्ती ॥ बनि लगबग धांवत जाती कोठलि तयांना स्फुर्ती ॥ चा० बाई कदंब वृक्षाखालीं। गोधनें उभीं भवतालीं। तत्स्वरूप राधा जाहली ॥ चा ॥ तिची मागिल पूर्ण कमाई ॥ मुरलिनें० ॥ १ ॥ मंदिरांत बसलें होतें विंचरत आपली वेणी ॥ मन चंचल झालें माझें गेलें विसरुन सर्वही लेणीं ॥ घडघडी मज भ्रांती पडते आशि मुरली काशि घर घेणी ॥ चाल ॥ संसारीं चित्त जडेना। पतिसेवा कांहीं घडेना। सुखशय्या गडे अवडेना ॥ चाल ॥ कोणी उपाय सांगा कांहीं ॥ मुरलिनें० ॥ २ ॥ अघटित नित करणी करतो नंदाचा नंदन कान्हा ॥ तृण त्यागुन सर्वही धेनू वत्साविण घालिती पान्हा ॥ स्तन आदरें वदनीं देतां पयप्राशन करिना तान्हा ॥चाल॥ हरि ऐसा गारपगारी। मर्दुनया काल खगारी। हरि आणिक सहज नगारी ॥ चाल ॥ गोवर्धन उचलुन पाही ॥ मुरलिनें० ॥ ३ ॥ किती सोडुन सगळे धंदे वनिं फिरती हरीच्या भंवतीं ॥ अवलोकुन डोळां मूर्ती सद्गदित अंतरीं निवती ॥ तल्लीन किती होउन रत्नीं गर्भिणी पुत्र प्रसवती ॥चाल॥ अध्ययन विप्र विसरले। काननीं समुदाय पसरले। घन मौन्य धरुन अनुसरले ॥ चाल ॥ नट नाटक हा शेषशाई ॥ मुरलिनें० ॥ ४ ॥ गिरि कंदरीं मुनिजन करती किति साधन घोर तयांचें ॥ तळिं डगमग आसनें

हालती जंव चाले मंत्र जपाचे ।। शोधिती मुळ अंतर्यामीं शुक सनकादिक पुरुषाचे ।। चाल ।। परी अगम्य हा व्यभिचारी ।। शोषिली पुतना ग बिचारी ।। गवळ्यांचा पूर्ण आचारी ।। चाल ।। सर्वां घटीं भरला राही ।। मुरलिनें० ।। ५ ।। धरणीधर असतां खालीं, करी डळमळ अवघी अवनी ।। जिवजंतु उसळ्या घेती, खळबळाट होतो जिवनीं ।। गर गर वर पक्षी फिरती, स्तव करती बैसुन भुवनीं ।। चाल ।। गौतमी आणि सूर्य कुमारी ।। स्थिर चालती सिंधु सुमारीं ।। गेली उतरुन गर्व खुमारी ।।चाल।। नर किन्नर येती पायीं ।। मुरलिनें० ।। ६ ।। रथ पळ पळ तिष्ठत राहे गगनमंडळीं प्रखर करांचा ।। गति कुंठित मार्ग न चाले अंजनीच्या अज वराचा ।। मति मोहुन बसला खालीं ऐरावत वज्रधराचा ।। चाल ।। घ्या हिसकुन कोणी मुरली ।। त्रिभुवनांत कशी संचरली ।। नाहिं निवांत जागा उरली ।। चाल ।। अशि भरली सर्वां ठायीं ।। मुरलिनें० ।।७।। निरवैर धरित्री जाहली चाटितात व्याघ्र करींना ।। भेटतात सन्मुख अंगें शार्दुल आणि शरभ हरींना ।। निरजिवांस सये जिव आले श्रव सुटले महानागिरींना ।। चाल ।। नव पल्लव तरुंना फुटती ।। गर गर्जुन मधुकर उडती ।। अंतरिक्षिं तारे तुटती ।।चाल।। अंबरांत नाद न मायी ।। मुरलिनें० ।।८।। पाहती ते सुरवर दृष्टी बैसुनिया कौतुक हरिचें ।। पुष्पभार वर्षति सारे हें निदान ब्रह्मो-दरिचें ।। तव दर्शनें दुःख विसरलों आज अनंत जन्मांतरिचें ।।चाल।। गंधर्व गायन करती ।। आवडिनें अलगुज धरती ।। पद कमळें गोपी चुरती ।।चाल।। हंबरती साऱ्या गाई ।। मुरलिनें० ।।९।। जगदीश्वर अंतरसाक्षी हा हरी वैकुंठविलासी ।। मदनांतक प्राण सख्यांनो तो नवनीत पय अभि-लाषी ।। कर जोडून सौंगडे म्हणती अरे कृष्णा बहु श्रमलासी ।। चाल ।। गंगु हैबती कवन अकारी ।। पदें छाणुन छंद रुकारी ।। महादेवगुणिराज स्विकारी ।। चाल ।। आवडीनें प्रभाकर गाई ।। मुरलिनें० ।। १० ।।

## ३ : पंढरीवर्णन

। चंद्रभागेचे तिरीं विटेवर कटिं कर टेवुनि उभा, भक्तांचा कैवारि सांवळा त्रैलोक्याचा सुभा ॥ ध्रु० ॥ घेऊन कृष्ण अवतार निमांडुन समस्त खळ असुर, धर्म-स्थापना करून रक्षिलें बळें स्वस्थ जनीं सुर ॥ पूर्ण ब्रह्म अवतार आठवा रणपंडित रणशुर, घडी मोडी घटकेंत रिकामा आहे नाहिं क्षणभंगुर ॥ रचुन एक रात्रींत कनकमय नगर जळीं भयासुर ॥ नीतिवंत कारि राज्य सकळ समुदायसहित निसुर ॥ नर किन्नर वाणितात गण गंधर्व स्वयंभू शुभा ॥ चंद्रभागेचे तिरीं० ॥१॥ कोणे एके दिवसीं नटून थटून आली राधा नग लेवुनी, अवलोकुन भगवान बैसले अंकावर घेउनी ॥ रुक्मिणीस साहिना गेली सगळेंच दुःख पिउनी, कितीक सावरती स्वहस्तीं मंदिरांत नेउनी ॥ करुनि जिवाचें रान निघाली चरणीं भाळ ठेवुनी, अति संतापें श्रमुन राहिली ही दूर वनीं येउनी ॥ घेऊन शुद्ध वैराग्य चालली पहात प्राणवल्लभा ॥ चंद्रभागेचे तिरीं० ॥२॥ हरी आलिंगुन धरी विनोदें सकल वेग साहुनी, शब्दांचा सये निकर करुन कां आलिस आण वाहुनी ॥ सोळा सहस्र जरी सुरूप रुक्मिणी तूं वरिष्ठ त्याहुनी, अंतःकरणापासुन अवडंबरें घेतलेंस पोहुनी ॥ पुंडलिकाची भक्ति उभयतां निष्कलंक पाहुनी, सुखावलें मन तिथेंच केला मुक्काम उभें राहुनी ॥ भावार्थाचा परम भुकेला जात असो आशुभा । चंद्रभागेचे तिरीं० ॥३॥ मृत्युलोकिं वैकुंठ वसविलें पवित्र पंढरपुर, मंदाकिनी प्रत्यक्ष भिमातट व्याहारी जगदांकुर ॥ वाळवंट विस्तीर्ण हवाशिर मुक्त सदा गोपुर, आठ प्रहर नाहिं उसंत यात्रा उभय तिरीं भरपुर ॥ जिकडे तिकडे विठ्ठल विठ्ठल गर्जति मुढ चातुर, स्नान दान दर्शनें पातकें आपाप पळती दुर ॥ कळेल तिथें द्या फल नाहिं कर मन मानेल ती मुभा ॥ चंद्रभागेचे तिरीं० ॥४॥ ध्वजा पताका सोडुन साधु नाचतात देवळीं । चरणीं रुळ करिं चिपळ्या वदति मुखानें नामावळी ॥ पीत वसन कासेस कसुन वर

शालजोडी पिंवळी, तुळसीहार शुभ आपाद मिरवे तनु सुंदर कोंवळी ॥ धर्माघरीं जी काढि हातानें उच्छिष्ट पत्रावळी, तीच मूर्तही विटेवर नटली घनःशाम सांवळी ॥ जन्मोंजन्मिचें दुःख विसरलों पाहुन मुखाची प्रभा ॥ चंद्रभागेचे तिरीं० ॥ ५ ॥ प्रभात काळीं घेऊन उभे कुणी सभाग्य पंचारती, लिंबलोण उतरून चामरें चक्राकृति वारती ॥ सुगंध जलीं न्हाणून सख्याला लाल पाट श्रृंगारिती, नैवेद्य दाउन मग जन जयजय करिती ॥ गंगु हैबती म्हणे दर्शनें पूर्वज उद्धारती, महादेव गुणी करती हरीला अखंड शेजारती ॥ प्रभाकराचें कवन ऐकुनी मान डोलवी सभा, भक्तांचा कैवारी सांवळा त्रैलोक्याचा सुमा ॥ चंद्रभागेचे तिरीं० ॥६॥

## ४ : रंगाचा दरबार

जसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनिं द्वापारांत। तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगांत अति आदरांत ॥ ध्रु० ॥

धन्य धन्य धनि सवाई माधवराव प्रतापी अवतरले। कीर्त दिगंतरीं करून कुळांतिल सर्व पुरुष पहा उद्धरले ॥ एकापरिस एक मंत्रि धुरंधर बुद्धिबळें शहाणे ठरले। दौलतिचा उत्कर्ष दिसंदिस नाहीं दरिद्री कुणी उरले ॥ शालिवाहन शक नर्मदेपावत जाउन जळीं घोडे विरले । श्रीमंतांस करभार देउन आले शरण रिपु पृथ्वीवरले ॥ चाल ॥ महावीर महादजीबाबा हुजरातीचे ॥ आणुनि मरातब बाच्छाई वजिरातीचे ॥ केले महोच्छाव खुब मोठ्या गजरातीचे ॥ चाल ॥ तऱ्हेतऱ्हेचे ख्याल तमाशे बहुत होती दळभारांत। श्रीमंतांचा संकल्प हाच कीं रंग करावा शहरांत ॥ १ ॥

कल पाहुन मर्जिचा बरोबर रुकार पडला साऱ्यांचा। सिद्ध झाले संपूर्ण पुण्यामधें बेत अधिक कारभाऱ्यांचा ॥ मधें मुख्य अंबारि झळाळित मागें थाट अंबाऱ्यांचा । चंद्रबिंब श्रीमंत सभोंवता प्रकाश पडला ताऱ्यांचा ॥ हौद हंडे पुढें पायदळांतरीं पाउस पडे पिचकाऱ्यांचा।

धुमाधार अनिवार मार मर बंबांच्या फटकाऱ्यांचा ॥ चाल ॥ नरवीर श्रेष्ठ कुणी केवळ कृष्णार्जुन ॥ वर्णिती भाट यश कीर्ति सकल गर्जुन ॥ चालली स्वारी शनवार पेठ वर्जुन ॥ चाल ॥ घरोघरीं नारी झुरझरुक्यांतुन सजुन उभ्या शृंगारांत । गुलाल गर्दा पेल दुतर्फा रंग रिचविती बहारांत ॥२॥

सलाम मुजरे सर्व राहिले राव रंगाच्या छंदांत । हास्यवदन मन सदय शोभलें शूर शिपाईवृंदांत ॥ दोहों हातीं भरमुठीं दिल्हें छत लाल दिसे खुब बुंदांत । तक्तराव जिलेबंत नाचती सभांगना आनंदांत ॥ सुदिन दिवस तो प्रथम दिसाहुन शके सत्राशें चवदांत । परिधावि संवत्सरांत फाल्गुन वद्य चतुर्दशी धादांत ॥ चाल ॥ बाळाजि जनार्दन रंगामधें रंगले ॥ रंगाचे पाट रस्त्यांत वाहुं लागले ॥ किती भरले गुलालें चौक ओटे बंगले ॥चाल॥ कुलदीपक जन्मले सगुणी गुणी महादजीबाबा सुगरांत । पराक्रमी तलवारबहाद्दर मुगुटमणी सरदारांत ॥ ३ ॥

भोतगाडे रणगाडे गुलालें भरून चालती स्वारींत । गुलाल गोटे शिवाय ठिवले निरनिराळे अंबारींत ॥ अप्पाबळवंतराव खवाशित चौरि मिजाजित वारीत । लाल कुसुंबी रुमाल उडती घडोघडी मैरफगारींत ॥ कोतल नर कोतवाल वारण मगनमस्त किल करित । बल्लम बाण बोथाट्या इटे लगी वाद्यघोष डिमदारींत ॥ चाल ॥ भले भले एकांडे मधें घोडे घालती । बारगीर बिनीवर ध्वज रक्षित चालती ॥ संपूर्ण भिजिवले जन रंगाखालतीं ॥ चाल ॥ वेत्रपाणि वारिती तरी झालि गर्दी मोठि बुधवारांत । झुकत झुकत समुदाय सहित निट स्वारि आली रविवारांत ॥४॥

आधिंच पुणें गुलजार तशामधें अपूर्व बसला आदितवार । त्यांत कृष्ण श्रीमंत आवंतर समस्त यादव परिवार ॥ हरिपंत तात्यांनीं उडविला रंग केशर अनिवार । हर्ष होउन राजेंद्र झांकिती शरिरानन वारंवार ॥ पाटिल बाबांनीं नेउन शिबीरा रंग केला जोरावार । वस्त्रें देउन किनखाब वांटिले ठाण कुणाला गजवार ॥ चाल ॥ उलटली स्वारी मग महिताबा

लाउनी ॥ कुरनिसा करति जन वाड्यामधें जाउनी ॥ दाखवी पवाडा गंगु हैबती गाउनी ॥ चाल ॥ महादेव गुणिराज फेंकती तान तननन दरबारांत । प्रभाकराचें कवन पसरलें सहज शतावधि नगरांत ॥ ५ ॥

## ५ : खर्ड्याचे लढाईचा पोवाडा

दैन्य दिवस आज सरले । सवाई माधवराव प्रतापि कालियुगांत अवतरले ॥ ध्रु० ॥

भूभार सर्व हराया । युगायुगीं अवतार धरी हरी दानव संहाराया। कलियुगीं धर्म ताराया । ब्राह्मणवंशीं जन्म घेतला रिपु निर्मूळ कराया ॥ सुकिर्ती मागें उराया ॥ सौख्य दिलें सर्वांस अहारे सवाई माधवराया ॥ चाल ॥ धन्य धन्य नानाचें शहाणपण । बृहस्पति ते बनले आपण । गर्भीं प्रभुचें पाहुनि रोपण । तेव्हांच केला दुर्घट हा पण । आरंभिलें मग रक्षण शिंपण । सरदारांचें घालून कुंपण । आपल्या अंगीं ठेवून निरूपण । हरिपंतांना करुनि रवाना ॥ चाल ॥ दादासाहेब मागें वळविले । लगट करुनि फौजांनीं मिळविले । आपुल्या राज्यापार पळविले। कांहीं दिवस दुःखांत आळविले । इतर कारणीं भले लोळविले । लोहोलंगर पायांत खिळविले । ठेवून गडावर चणे दळविले । बंदीवान तेथेंच खपविले ॥ चाल ॥ बंड तोतया सहज मोडिला । एक एक त्याचा मंत्री फोडिला । जमाव ठायींचे ठायीं तोडिला । अडचण जागीं मुख्य कोंडिला । शहराबाहेर नेऊन झोडिला । जो नानांनीं पैसा जोडिला । तोच प्रसंगीं हुजुर ओढिला । लागेल तितकें द्रव्य पुरविलें ॥ चाल ॥ तळेगांवावर इंग्रज हरला । इष्टुर साहेब रणींच वीरला । उरला इंग्रज घांट उतरला । सरमजाम गलबतांत भरला । रातोरात मुंबईत शिरला । सर्वेच गाढर पुढेंच सरला । शिकस्त खाउन तोही फिरला । फिरून पुण्याकडे कधीं पाहीना ॥ चाल ॥ अशी रिपूची मस्ती जिरविली । शुद्ध बुद्ध पहा त्याची हरली । कारभाऱ्यांनीं पाठ पुरविली । पुण्यामध्यें अमदानी

अनुक्रम
विभाग १३५/१०२
२०/५५

करविली । पुरंदराहुन स्वारी फिरविली । पर्वतीस मष मुंज करविली । गजराची भिक्षावळ मिरविली । काल्हकर्णे वाजंत्री वाजती ॥ चाल ॥ लग्नचिठ्या देशावर लिहिल्या । ब्राह्मणांस पालख्याश्व वहिल्या । पाठविल्या बोलाऊं पहिल्या । पठाण मोंगलसाहित सहिल्या । छत्रपति रोहिले रोहिल्या । भोसल्यांच्या मौजा पाहिल्या । आणिक किती नांवनिशा राहिल्या । कवीश्वराची नजर पुरेना ॥ चाल ॥ आरशाचे मंडप सजविले । चित्रें काढून चौक उजविले । थयथयांत जन सर्व रिझविले । गुलाब आणि अत्तरें भिजविले । शिष्ट शिष्ट शेवटीं पुजविले । रुपये होन मोहो-रांनीं बुजविले । श्रीमंत कार्यार्थ देह झिजविले । यशस्वी झाली सकल मंडळी ॥ चाल ॥ सत्राशें सातांत बदामी । हल्लयाखालीं केली रिकामी । एक एक मोहोरे नामी नामी । फार उडाले रणसंग्रामीं । बाजीपंत अण्णा ते कामीं । हरीपंत तात्याचे लगामीं । परशुरामपंत त्या मुक्कामीं । स्वामी सेवक बहुत जपले ॥ चाल ॥ गलीमास कांहीं नव्हते भेऊन । पराक्रमानें किल्ला घेऊन । अलिबक्षावर निशाण ठेवून । पुण्यास नानासहित येऊन । श्रीमंतांनीं वाड्यामध्यें नेऊन । पंचामृतीं आनंदें जेऊन । बहुमानाचीं वस्त्रें देऊन । बोळविलें तयाला ॥चाल॥ सत्राशें तेरावें वरीस । अवघड गेलें पाहिल्या परीस । करनाटकच्या पहा स्वारीस । टोपीकर मोंगल पडले भरीस । तरी तो टिपू येइना हारीस । त्यावर तात्या गेले परीस । आणुन टिपू खूप जेरीस । साधुनी मतलब हरिपंतांनीं ॥ चाल पहिली ॥ नंतर मागें फिरले । दरकुच येऊन पुण्यास प्रभुचे चरण मस्तकीं धरिले ॥ दैन्य दिवस आज सरले० ॥ १ ॥

केवढें भाग्य रायाचें । चहुंकडे सेवक यशस्वी होती हें पुण्य त्या पायांचें ॥ करितां स्मरण जयाचें । कांहीं तरी व्हावा लाभ असें बलवत्तर नाम जयाचें ॥ प्रधानपद मूळ याचें । सत्राशें चवदांत मिळालें वजीरपद बाच्छायाचें ॥ चाल ॥ मुगुटमणी ते पाटिलबावा । कोठवर त्यांचा प्रताप

गावा । दर्शनमात्रें तापच जावा । नवस नवसितां फळास यावा । हर हमेशा शत्रुसि दावा । माहित सगळा मराठी कावा । हुशार फौजा लढाई लावा । जिंकुन हिंदुस्थान परतले ॥ चाल ॥ चवदा वर्षे वहुत भागले । म्हणून शिरस्ते पाहून मागले । तरतुदीस कारभारी लागले । उंच उंच पोशाग चांगले । देउन फार मर्जीनें वागले । भेटीसमयीं जंबूर डागले । मग तोफांचे बार शिलगले । सूर्यबिंब अगदींच झांकलें ॥ चाल ॥ राव जेव्हां नालकींत वसले । कृष्ण तेव्हां ते जनास दिसले । अर्जुन पाटिलबावा भासले । पायपोस पदरानें पुसले । चरणीं मिठी माराया घुसले । कर प्रभुनीं बगलेंत खुपसले । इमानी चाकर नाहींत असले । धन्य धनी आणि धन्य दास ते ॥ चाल ॥ दोन्ही दळें या सुखांत दंग । त्यावर झाला अमोल रंग । गुलाल आणि अनिवार पतंग । पळस फुलाचा नाहीं प्रसंग । मस्त चालती पुढें मातंग । कोतवाल घोडे करिती ढंग । राज्य प्रभुचें असो अभंग । अहर्निशीं कल्याण चिंतिती ॥ चाल ॥ गुलाम सोदे बुडवुनि पाजी । पंत प्रधान राखुन राजी । लष्कर दुनिया करून ताजी । शके सत्राशें पंधरामाजीं । माघ मासीं भली मारून बाजी । पाटिलबावा सुरमर्द गाजी । अगोदर गेले विष्णुपदाजी । शरीर वानवडीस ठेवुनी ॥ चाल ॥ सवाचार महिन्यांचें अन्तर । हरीपंत तात्या गेले नंतर । तेथें न चाले तंतर मंतर । वर्तमान हें एक अधिकोत्तर । कांहीं न करिती नाना उत्तर । दिलगीर मर्जी सुकलें अंतर । हिरे हरपले राहिले फत्तर । तरी तो पुरुष बहुत धिराचा ॥ चाल ॥ दौलतीचे आज खांबच खचले । लाल होते ते कोठेंच पचले । शिपायांचे काय चुडेच पिचले । परंतु नाना नाहीं कचले । कडोविकडीचे विकार सुचले । कलमज्यारीचे घटाव मचले । मोंगलावर मोर्चे रचले । जिकडे तिकडे झाली तयारी ॥ चाल ॥ पुकार पडला पृथ्वीवरती । सैन्य समुद्रा आली भरती । आगाऊ खर्ची मोहरा सुर्ती । रात्रंदिवस श्रम नाना करती । कशी ही मोहिम होईल पुरती । राव निघाले सुदिनमुहूर्तीं । लिंबलोण उतरितात गरती । इडापिडा

काढून टाकिती ॥ चाल ॥ गारपिराच्या मग रोखांना । तमाम रिघला फरासखाना । उजव्या बाजूस जामदारखाना । डावेकडे तो जवेरखाना । देवडीबराबर सराफखाना । चकचकीत खुब सिलेखाना । मध्यें रायाचा तालिमखाना ॥ खळ खळ खळ लेजिमा वाजती ॥ चाल ॥ वाड्याबाहेर जिन्नसखाना । पदार्थ भरपुर मोदीखाना । मागें उतरला उष्टरखाना । डेऱ्यासान्निध नगारखाना । तऱ्हतऱ्हेचा शिकारखाना । बाजाराच्या पुढें पिलखाना । दिला बिनीवर तोफखाना । मोठमोठ्या पल्लयाच्या जरबा ॥ चाल पहिली ॥ चोहोंकडे लोक परसले । नित्य नवे गणतीस लागतां एकांडे देशावरले ॥ दैन्य दिवस आज सरले० ॥ २ ॥

बहुत शिंदे जमले । शिलेपोस पलटणें लाविती पठाण जरीचे समले । रणपंडित ते गमले । भले भले पंजाबी ज्वान दाक्षिणेंत येउन रमले । ज्यांपुढें शत्रु दमले । त्यांणीं शतावधि कोस स्वामिकार्यास्तव लवकर क्रमिले ॥ चाल ॥ आधींच दौलतराव निघाले । काय दैवाचे शिकंदर ताले । फौज सभोंवतीं जमून चाले । खांद्यावरती घेऊन भाले । सर्व लढावया तयार झाले । जिवबादादा गर्जत आले । हासनभाई उज्जनीवाले । महाराजांचे केवळ कालिजे ॥ चाल ॥ बाळोबास तर काळिज नाहीं । धीट रणामध्यें उभाच राही । धोंडिबास जगदंबा साही । जय करण्याची चिंता वाही । सदाशिव मल्हार कांहीं । मागें पुढें तिळमात्र न पाही । देवजी गवळी रिपूस बाही । रणांगणाचा समय साधिती ॥चाल॥ निसंग नारायणराव बक्षी । हटकुन मारी उडता पक्षी । बंदुकीला कटपट्यास नक्षी । फत्ते होई तों गोड न भक्षी । रायाजी पाटिल महत्त्व रक्षी । नित्य कल्याण धन्याचें लक्षी । पिढीजाद शिंद्याचे पक्षीं । केवळ अंतरंग जिवाचें ॥ चाल ॥ मेरूसाहेब कठिण फिरंगी । कलाकुशलता ज्याचे अंगीं । सामायन किल्काटा जंगी । मुकीरसाहेब भले बहुरंगी । हापिसर पदरीं चंगी भंगी । जीनसाहेबाची समशेर नंगी । दुर्जन साहेब

झटे प्रसंगीं । झर झर झर झर बुरुज बांधुनी ॥ चाल ॥ शहामतखा सरदार किराणी । बाच्छायजादे थेट इराणी । किती काबूल खंदार दुराणी । मुजफरखाची टोळी खोराणी । कडकडीत सिंगरूपची राणी । तारीफ करती गोष्ट पुराणी । इतरांची ठेविना शिराणी । पंचविशीमध्यें ज्वान पलटणी ॥ चाल ॥ येथून सरली शिंदेशाई । होळकराची आली अवाई । तुकोजी बावांना गुरमाई । आधींच बळ स्वार शिपाई । वारगळ बरोबर फणशे जावाई । लांब हात बुळे वाघ सवाई । वाघमारे कुळ धनगरभाई । खेरीज ब्राह्मण नागो जिवाजी ॥ चाल ॥ शिवाय होळकर खासे खासे । काशीबाजी तर हुंगून फांसे । लढाईचे आणून नकाशे । स्वस्थपणें करतात तमाशे । बापुसाहेबांना येती उमासे । मल्हारजींनीं देउन दिलासे । जा जा म्हणती लोक बगासे । जंहामर्द तरवारकरांचे ॥ चाल ॥ हरजी विठूजी आनंदराव । स्वतां धनी यशवंतराव । संताजीचें प्रसिद्ध नांव । आबाजीचा तिखट स्वभाव । दूर नेला साधितात डाव । विचारी मतकर माधवराव । भागवतांनीं सोडुन गांव । ताबडतोब निघाले ॥ चाल ॥ महाशूर पटवर्धन सारे । ठाईं ठाईं त्यांचे फार पसारे । चिंतामणराव शूर कसारे । केवळ एकांगी वीर जसारे । परशुराम रामचंद्र असारे । चहुंकडे ज्याचा पूर्ण ठसारे । अप्पासाहेब तोही तसारे । थरथर ज्याला शूर कांपती ॥ चाल ॥ रास्ते आनंदराव दादा । पानशांची बहु मर्यादा । विंचुरकरांमधिं गांडु एखादा । राजाबहाद्दर पुरुष जवादा । चौपट खर्च दुप्पट आदा । पुरंधऱ्यांची कदीम इरादा । तत्पर पेठे मोगल वादा । ओढेकरही येऊन भेटले ॥ चाल पहिली ॥ वामोरकर सांवरले । आंबेकर आणि बारामतीकर प्रसंगास अनुसरले ॥ दैन्य दिवस आज सरले० ॥ ३ ॥

खास पथक नानाचें । निवडक माणुस त्यांत पुरातन सूचक संधानाचें ॥ पद देऊनि मानाचें । खुष करुनि बाबास काम मग सांगुन सुलतानाचें ॥ बळ विशेष यवनांचें । हें ऐकुनी लोकांनीं सोडिलें पाणी

शीरसदनाचें ॥चाल॥ आप्पा बळवंतराव सुबुद्ध। बिनीवाले पुरुषार्थी प्रबुद्ध। पवारांत मर्दाने शुद्ध। वाढविती भापकर विरुद्ध। केवळ्यांना शुष्कवत युद्ध। काढिती हांडे रणीं अशुद्ध। धायगुडे निर्बाणी कुबुद्ध। शेखमिरा फौजेंत मिसळले ॥चाल॥ पराक्रमी हिमतीचे दरेकर। तसेच जाधव बुरुजवाडीकर। अमीरसिंग जाधव माळेगांवकर। सुजाण गोपाळराव तळेगांवकर। जानराव नाईक, नट निंबाळकर। शेकर सोयरे बाळो वडाळकर। करारी डफळे अनंतपुरकर। आढोळ्याचे लोक इमानी ॥ चाल ॥ कामरगांवकर मग बोलवले। प्रतिनिधीला किती गौरविले। हर्ष वाहले पुढें सरसावले। रणनवरे दरकुच धांवले। समाधान राऊत पावले। बऱ्या बापु जसे नवरे मिरविले। शहर पुणें रक्षणार्थ ठेविले। माधवराव रामचंद्र कानडे ॥ चाल ॥ सरमजामी सरदार संपले। शिलेदार मागें नाहीं लपले। धाराशिवकर लेले खपले। जमेंत सुद्धां ते आपापले। गोट गणतिला तमाम जपले। सानपदोगें निगडे टपले। खुळे वाघ आणि बाबर सुपले। भगत बडे डोबाले दिपले। जाधव काळे माळशिकारे ॥ चाल ॥ बाजीराव गोविंद बर्वे। लाड शिरोळे धायबर सुर्वे। दाभाड्यांचा हात न धरवे। भगवंतसिंग बैसे बेपर्वे। वझरकराचा लौकिक मिरवे। खंडाळ्याचे पोषाग हिरवे। नलगे भोयते सुंदर सर्व। सखाराम हरी बाबुराव ते ॥ चाल ॥ कडकडीत हुजुरात हुजुरची। वीस सहस्र जूट पदरची। राउत घोडा बंदुक बरची। केवळ आगच उतरे वरची। एक एक पागा अमोल घरची। दाद न देती देशांतरची। काय कथा त्या भागानगरची। रणांगणीं काळास जिंकिती ॥ चाल ॥ दिघे फडतरे बाबरकाठे। तळपीर मानसिंग खलाटे। मारिती पुढें समोर सपाटे। निलाम कवडे झाले खपाटे। देवकांत्याचें फार हाकाटे। मुळे गांवढे करिती गल्हाटे। जगतापाचे महतर भोयटे। भले मुर्तुजा महात थडयाचे ॥ चाल ॥ गणेश गंगाधर थोरात। निळकंठ रामचंद्र भरांत। आयतुळे मान्य सकळ शूरांत। बेहरे मांजरे योग्य वीरांत। राघो बापुजी रणघोरांत। येसोजी हरी सैन्य पुरांत। दारकोजीबावा निंबाळकरांत।

वीरश्रींत तो धुंद सग्यावा ।। चाल ।। कृष्णासिंग हैवतसिंग तारे । तसेच लक्ष्मणसिंग बारे । दावलबावा महात सारे । मिळाले भापकर ते परभारे । भैराळजी पायगुडे विचारे । इंदापुरकर नव्हत बिचारे । गणेश विठ्ठल वाघमारे । बिडकर खुर्देकर आटीचे ।। चाल ।। गिरजोजी बर्गे फार दमाचे । बहादर बारगिर ते कदमाचे । आठवले तर बहु कामाचे । दुर्जनसिंग राठोड श्रमाचे । टिळे कपाळीं रामनामाचे । विनीबरोबर ते नेमाचे । श्रीमंतस्मरणें काळ क्रमाचे । जसे दूत सांबाचे प्रतापी ।। चाल पहिली ।। प्रपंच विसरले । चिलखत बख्तर शिलेटोप मल्हारराव पांघरले । दैन्य दिवस आज ते सरले० ।। ४ ।।

लष्कर सगळें गुर्के । जरीपटक्याभोंताले घालिती गरर मानकरी गर्के । सुंदर गोरे भुर्के । घोरपडे पाटणकर महाडिक खानविलकर शिर्के । मुंगी मध्यें ना फिर्के । चव्हाण मोहिते गुजर घाडगे निंबाळकर दे चर्के ।। चाल ।। पुढें पसरले रिसालदार । मुसा मुत्रीम नामदार । सय्यद अहमद जमादार । अमीर आबास नव्हे नादार । शहामिरखां ते डौलदार । इतक्यांवर ते हुकूमदार । राघोपंत ते दौलतदार । तसे काशिबा बल्लाळ रानडे ।। चाल ।। गोरा मुसावास अमोल । मुसानारद तो समतोल । विनायकपंताचा गलोल । आबा काळे गुणीच डोल । टोपकराचे बोलती बोल । पायदळांचा बांधुनि गोल । तंबुर ताशे वाजती ढोल । उठावल्या बैरखा निशाणें ।। चाल ।। संस्थानी याविरहित राजे । सेनासाहेब किताब साजे । राघोजीबाबा नांव विराजे । बाणांचा भडीमार माजे । सरखेलांचा लौकिक गाजे । समशेर बहादर गरीब नवाजे । अकलकोटी लोक ताजे । दुर्जनसिंग रजपूत हडोदी ।। चाल ।। दक्षिण उत्तर पश्चिम भागीं । पसरुन तोफा जागोजागीं । तमाम गारदी त्याचे मागीं । स्वार सैन्य त्यामागें झगागी । जरीपटका तो दुरुन धगागी । कोणीच नव्हता त्यांत अमागी । त्वरित बक्षिस पावे बिदागी । जासूद सांडणी स्वार धांवती ।। चाल ।। काय

पलटणच्या फैरा झडती । पर्जन्यापरि गोळ्या पडती । शिरकमळें कंदुकवत् उडती । छिन्न भिन्न किती होऊन रडती । कितीक पाण्याविण तडफडती । कितीक प्रेतामधींच दडती । वीर विरांशीं निसंग भिडती । सतीसारखे विडे उचलिती ॥ चाल ॥ पाउल पाउल पुढें सरकती । घाव चुकाउन शूर थडकती । सपुत वाघापरी गुरकती । हत्यार लाउन मागें मुरकती । खुणेनें शत्रुवर्म तरकती । मोंगल बच्चे मागें सरकती । जिवबादादा मनीं चरकती । अररररर शाबास बापांनो ॥ चाल ॥ सुटती तोफा धुंद दणादण । गुंगत गोळे येती छणाछण । सों सों करिती बाण सणासण । खालेल घोडे उडती टणाटण । टापा हाणती दुरुन ठणाठण । वाजति पट्टे खांडे खणाखण । नौबती झांझा झडती झणाझण । एकच गर्दी झाली घुराची ॥ चाल ॥ थोर मांडली रणधुमाळी । अगदींच बसली मग कांठाळी । फौज पसरली रानोमाळीं । लाखों लाख तरवार झळाळी । होळ्कराची फिरती पाळी । जिवबांची मर्दुमकी निराळी । मोंगलाची केली टवाळी । सबळ पुण्य श्रीमंत प्रभूचें ॥ चाल ॥ अठरा घटका लाही फुटली । तोफ हजारों हजार सुटली । मिरजकरांची मंडळी झटली । भाउबरोबर निसंग तुटली । मोंगल सेना मागें हटली । त्या समयीं कैकांची उपटली । पेंढाऱ्यांनी दौलत लुटली । गबर झाले एका दिसांत ॥ चाल ॥ शके सत्राशें सोळा भरतां । आनंद संवत्सरही सरतां । दहा दिवस शिमग्याचे उरतां । वद्य पंचमी सुवेळ ठरतां । तीन प्रहरांचा अंमल फिरतां । मोंगलांशीं प्रसंग करितां । पळाले मोंगल धीर न धरतां । चंद्रउदयीं खडर्यांत कोंडिले ॥ चाल पाहिली ॥ गढींत खासे शिरले । मराठे मोंगल पठाण पुर्भे इतर घरोभर भरले ॥ दैन्य दिवस हे आज सरले० ॥ ५ ॥

बहुत खराबी जहाली । मोहोऱ्यावरची फौज सैनिकां सहित रस्ते नाहली ॥ त्यांत उन्हाची कहाली । रुपयाचें दिड शेर पाणी अशी कठीण वेळा बहाली ॥ ती सर्व जनांनीं पाहिली । जिवबादादा परशुरामपंतांची दिसंदिस बहाली ॥ चाल ॥ निजाम अल्लीखान नव्हे सामान्य ।

वीरश्रींत तो धुंद सग्यावा ॥ चाल ॥ कृष्णसिंग हैबतसिंग तारे। तसेच लक्ष्मणसिंग बारे! दावलबावा महात सारे। मिळाले भापकर ते परभारे। मैराळजी पायगुडे विचारे। इंदापुरकर नव्हत विचारे। गणेश विठ्ठल वाघमारे। बिडकर खुर्देकर आटीचे ॥ चाल ॥ गिरजोजी वर्गे फार दमाचे। बहादर वारगिर ते कदमाचे। आठवले तर बहु कामाचे। दुर्जनसिंग राठोड श्रमाचे। टिळे कपाळीं रामनामाचे। विनीबरोबर ते नेमाचे। श्रीमंतस्मरणें काळ क्रमाचे। जसे दूत सांबाचे प्रतापी ॥ चाल पहिली ॥ प्रपंच विसरले। चिलखत बख्तर शिलेटोप मल्हारराव पांघरले। दैन्य दिवस आज ते सरले० ॥ ४ ॥

लष्कर सगळें गुर्के । जरीपटक्याभोंताले घालिती गरर मानकरी गर्के। सुंदर गोरे भुर्के। घोरपडे पाटणकर महाडिक खानविलकर शिर्के। मुंगी मध्यें ना फिर्के। चव्हाण मोहिते गुजर घाडगे निंबाळकर दे चर्के ॥ चाल ॥ पुढें पसरले रिसालदार। मुसा मुत्रीम नामदार। सय्यद अहमद जमादार। अमीर आबास नव्हे नादार। शहामिरखां ते डौलदार। इतक्यांवर ते हुकूमदार। राघोपंत ते दौलतदार। तसे काशिबा बल्लाळ रानडे ॥ चाल ॥ गोरा मुसावास अमोल। मुसानारद तो समतोल। विनायकपंताचा गलोल। आबा काळे गुणीच डोल। टोपकराचे बोलती बोल। पायदळांचा बांधुनि गोल। तंबुर ताशे वाजती ढोल। उठावल्या बैरखा निशाणें ॥ चाल ॥ संस्थानी याविरहित राजे। सेनासाहेब किताब साजे। राघोजीबाबा नांव विराजे। बाणांचा भडीमार माजे। सरखेलांचा लौकिक गाजे। समशेर बहादर गरीब नवाजे। अकल्कोटी लोक ताजे। दुर्जनसिंग रजपूत हडोर्दी ॥ चाल ॥ [दक्षिण उत्तर पश्चिम भागीं। पसरुन तोफा जागोजागीं। तमाम गारदी त्याचे मार्गी। स्वार सैन्य त्यामागें झगागी। जरीपटका तो दुरुन धगागी। कोणीच नव्हता त्यांत अभागी। त्वरित बक्षिस पावे बिदागी। जासूद सांडणी स्वार धांवती ॥ चाल ॥ काय

पलटणच्या फैरा झडती। पर्जन्यापरि गोळ्या पडती। शिरकमळें कंदुकवत् उडती। छिन्न भिन्न किती होऊन रडती। कितीक पाण्याविण तडफडती। कितीक प्रेतामधींच दडती। वीर विरांशीं निसंग भिडती। सतीसारखे विडे उचलिती॥ चाल॥ पाउल पाउल पुढें सरकती। घाव चुकाउन शूर थडकती। सपुत वाघापरी गुरकती। हत्यार लाउन मागें मुरकती। खुणेनें शत्रुवर्म तरकती। मोंगल बच्चे मागें सरकती। जिवबादादा मनीं चरकती। अरररर शाबास बापांनो॥ चाल॥ सुटती तोफा धुंद दणादण। गुंगत गोळे येती छणाछण। सों सों करिती बाण सणासण। खालेल घोडे उडती टणाटण। टापा हाणती दुरुन ठणाठण। वाजति पट्टे खांडे खणाखण। नौबती झांझा झडती झणाझण। एकच गर्दी झाली घुराची॥ चाल॥ थोर मांडली रणधुमाळी। अगदींच बसली मग कांठाळी। फौज पसरली रानोमाळीं। लाखों लाख तरवार झळाळी। होळकराची फिरती पाळी। जिवबांची मर्दुमकी निराळी। मोंगलाची केली टवाळी। सबळ पुण्य श्रीमंत प्रभूचें॥ चाल॥ अठरा घटका लाही फुटली। तोफ हजारों हजार सुटली। मिरजकरांची मंडळी झटली। भाउबरोबर निसंग तुटली। मोंगल सेना मागें हटली। त्या समयीं कैकांची उपटली। पेंढाऱ्यांनी दौलत लुटली। गबर झाले एका दिसांत॥ चाल॥ शके सत्राशें सोळा भरतां। आनंद संवत्सरही सरतां। दहा दिवस शिमग्याचे उरतां। वद्य पंचमी सुवेळ ठरतां। तीन प्रहरांचा अंमल फिरतां। मोंगलांशीं प्रसंग करितां। पळाले मोंगल धीर न धरतां। चंद्रउदयीं खड्यांत कोंडिले॥ चाल पहिली॥ गर्दीत खासे शिरले। मराठे मोंगल पठाण पुर्भे इतर घरोभर भरले॥ दैन्य दिवस हे आज सरले० ॥ ५ ॥

बहुत खराबी जहाली। मोहोऱ्यावरची फौज सैनिकां सहित रस्ते नाहली॥ त्यांत उन्हाची कहाली। रुपयाचें दिड शेर पाणी अशी कठीण वेळा बहाली॥ ती सर्व जनांनीं पाहिली। जिवबादादा परशुरामपंतांची दिसंदिस बहाली॥ चाल॥ निजाम अल्लीखान नव्हे सामान्य।

बाच्छाई सुलतानांत मान्य । जुनाट पुरुषांत राजमान्य । अपार पदरीं मण धन-धान्य । कोण बरोबरी करील अन्य । दैव धन्याचें मुळीं प्राधान्य । तशांत झालें अनुकुळ दैन्य । नाहीं तर घेते खबर पुण्याची ॥चाल॥ जेव्हां मारिती यवन मुसंडी । तेव्हांच होई ती फौज दुखंडी । साठ सहस्र पठाण बुंडी । तिनशें तोफा थोर अखंडी । पंचरशी आणि बिडी लोखंडी । तयार दारु तिनशें खंडी । असें असुनियां दबली लंडी । धरून मश्चुल्मुल्ख आणिला ॥चाल॥ संकटीं मोंगल अति पडियेला । देश होता जो तोडीस नेला । तो तेहतीस लक्षांचा गेला । तीन कोटींचा करार केला । पण नानांनीं सिद्धीस नेला । फिरला मोंगलांचा ढपेला । नक्षत्रापरी आला तजेला । त्यामध्यें माधव चंद्र उदेला ॥ चाल ॥ स्वारी नव्हे हें स्वयंवर झालें । श्रीमंतांस ऐश्वर्य मिळालें । अपेश अटकेपार पळालें । यादव सैन्य हरी भोंतालें । तसेंच लष्कर पुण्यास आलें । पहावया जन सर्व निघाले । दर्शन होतां शरीर निवालें । घरोघरीं आनंद माइना ॥ चाल ॥ पाहुन पूर्वापार शिरस्ते । भवानी पेठे-पासुनी रस्ते । दिपोत्सव शोभती दुरस्ते । शृंगारुन गज तुरंग बस्ते । शहरामाजी पदार्थ सस्ते । पहिलवान आणि जेठी मस्ते । खुराक त्यांना बदाम पिस्ते । सदाधुंद जिलीबींत चालती ॥ चाल ॥ मांड भाट भाल-दार भवय्ये । सुस्वर गाती धाडी गवय्ये । शिरापुरीचे सदा खवय्ये । मिठाई देती नित्य हलवय्ये । लोक सभोंवतीं लढवय्ये । नानासारिखे वीर संगवय्ये । बलाढ्य शत्रु पराभवय्ये । धनीराव राजेंद्र कन्हय्ये ॥ चाल ॥ लगी बाण बोथाटया दाट । बिनाइटयाचा खळखळाट । अंबाऱ्यांचा मागें थाट । त्यामागें हुजुरात अचाट । सत्तर हत्तींपुढें जुनाट । मधून फुटेना मुंगीस वाट । झुगारिल्या जरी दुरुनी ताट । तरी तें खालीं कधीं पडेना ॥चाल॥ सत्राशें सत्रामधिं स्वारी । राक्षस संवत्सरीं स्वनगरीं । उलटुनि आली घरीं माघारी । संवत् वैशाखाची बहारी । शुद्ध त्रयोदशी शुक्रवारीं । दहा घटका रात्रींच्या सुमारीं । गुढ्या उभारुन राजद्वारीं । गृहप्रवेश केला प्रभुनीं ॥ चाल ॥ न्यहाल केलें सरदारांना । दिला चौघडा मिरजकरांना ।

खेरीज जहागिर विंचुरकरांना । कडीं कंठ्या देऊन शुरांना । गौरवुनी नानांनीं वीरांना । निरोप दिले मग अमीरांना । गेले कृष्णा भीमातिरांना । कुटुंबसुद्धां स्वस्थ नांदती ॥ चाल ॥ गंगु हैबती शाहीर मोठे । कवनीं ज्यांच्या बंद बनोटे । महादेवाचे सवाई सोटे । गुणी राजाचे शब्द शिधोटे । जसे गोडीला घिवर चिरोटे । इतर कवीश्वर केवळ गोटे । अर्थ प्रास लावितात खोटे । पगडया फिरवुन डौल मिरविती ॥ चाल पहिली ॥ कैक प्रसंगीं हरले । बिनडाकिल दागिने अमोलिक प्रभाकराचे ठरले ॥ दैन्य दिवस आज सरले० ॥ ६ ॥

## ६ : सवाई माधवरावांचा मृत्यु

( कामि नव्हते पृथ्वींत अवांतर प्राणी न्यायाला । औक्ष कसें कमि झालें सवाई माधवरायाला ॥ ध्रुवपद ॥)

प्रभु नारायणराव धुरंधर दाक्षिणचे नृपती । प्रसन्न वदनें करुनि जयाला सकळ प्रजा जपती ॥ पतिव्रता किती धनाढ्य गंगाबाई भोंवत्या खपती । सुशील सति सौभाग्यवती पुढें रूपवत्या लपती ॥ सवाई माधवराव प्रसवली कुळदीपक दिपती । पुरंदरीं रक्षणार्थ मंत्री रात्रंदिवस जपती ॥ चाल ॥ शके सोळाशें शहाण्णवाच्या मूळ जय संवत्सरीं । अधिक होता वैशाख शुद्ध सप्तमी चंद्र वासरीं । पुनर्वसु नक्षत्र कडकाडित दुपारचे अवसरीं ॥ चाल ॥ झाला जन्म हा दैदीप्यमान पूतळा । जणुं सूर्य उगवला प्रकाश करी भूतळा । दिलें द्रव्य कंचुक्या नाहीं गणती पातळा ॥ चाल पहिली ॥ महोत्साह घरोघरीं लागले लोक करायाला । परशुराम प्रत्यक्ष आले काय छत्र धरायाला ॥ कामि नव्हते० ॥ १ ॥

पुरंदराहुन पुण्यास आणिले राव पंचम वर्षी । गुढ्या तोरणें उभवुन केली मुंज प्रथम सरशी । विवाहकार्या भूप मिळविले अति हर्षाहर्षी । देति धाडून कारभार ढिगाचे ढिग कोरे फरशी । स्वाऱ्या करून सरदार

बुडविती रिपु चुरसाचुरशी । थरथर किति कांपती वयस्कर उभे ठाकुन खुरशी ॥ चाल ॥ प्रताप महिमा थोर जळामधिं परि जळचर अडविला । नवी मोहिम दरसाल देउनी शाह टिपू तुडविला । अपार सेना लढवुनि मोंगल खर्ड्यावर बडविला ॥ चाल ॥ एकेक पदरचा सेवक साहेब सुभा । समरांगणीं सन्मुख कोणि न राहे उभा । ज्या दिशेस ज्याचा रोख ती त्याला मुभा ॥ चाल पहिली ॥ बिजेपासूनि करि प्रभा चंद्र तारांगण ठायाला । प्रौढ होतां संपूर्ण लोक आले खरेच उदयाला ॥ कामि नव्हते० ॥ २ ॥

कांहीं दिवस भयरहित सदोदित स्वराज्य चालविलें । दरिद्र अटकेपार जनांचें ज्यानें घालविलें । तीर्थरुपांहुन सकळ भूमंडळ बसून हालविलें । रीतमात इनसाफ लवण नाहीं दुधांत कालविलें । क्षीरसागरीं कृष्णास मुदत भरतां क्षणिं बोलविलें । तसें रावसाहेबांस अकल्पित वरून पालविलें ॥ चाल ॥ उदास झालें चित्त परोपरि त्या दिवसापासुनी । विचुक बोलती शब्द घडोघडि हृदयांतरीं त्रासुनी । बाजिराव साहेबांस आणा जा गुज सांगा निरसुनी ॥ चाल ॥ शिक्के दऊत पट कटार दुसरी करा । आडवलें मनांतुनी विधिविष्णु शंकरा । ठेवुं नका निराळें दादांच्या लेंकरा ॥ चाल पहिली ॥ तुम्हिं सेवक ते धनी होउनि एक आवरा राज्याला । अशानें तरले जाल चिरंजिव रहाल पहायाला ॥ कामि नव्हते० ॥ ३ ॥

वर्तमान कळतांच असें आलि गोष्ट ती निकरास । न ये नानाचे मनास जाहलें विपरीत इतरांस । झिडकारुनि एकांतीं वदती नित्य सरकारास । स्वस्थ असावें आपण जेऊन पंचामृत सुग्रास । बहुत हट्ट जरि कराल तरि तुम्ही मुकाल प्राणांस । त्यांचि अवस्था तीच तुमची पुढें येईल आकारास ॥ चाल ॥ शब्दशरें ताडितां लोचनीं जळबिंदू वाहती । दसऱ्याचे दिशीं अंबारींतुन उडि घालूं पाहती । धरी अप्पा

बळवंत झगा दृढ दडपुन आपुले हातीं ॥ चाल ॥ फिरविलीं निशाणें नाहिं सोनें लुटलें । शहरांत सैन्य चहुं रस्त्यांनीं लोटलें । पुढें भेट घ्यावया किति माणुस दाटलें ॥ चाल पहिली ॥ झालि न झाली नजर उठले एवढ्यांतच जायाला । नवल नविन वाटलें तेथें सकळ समुदायाला ॥ कामि नव्हते० ॥ ४ ॥

प्रवेशतां महालांत अडखळुन पडले खांबाला । त्वरित उतारे करुन देती लोह उडीद डोंबाला । खरी खबर कळतांच एकांतीं बाईसाहेबांला । धांव धांव धावण्यास म्हणती विनवुन सांबाला ॥ घरांत राहू ग्रासुं पाहतो चंद्रबिंबाला । गोत्रपुरुष किड कठिण लागली मुळकुळकोंबाला ॥ चा० ॥ करिं घेऊन पंचारति प्रभुला धनभर ओंवाळुनी । समाचार फुंद फुंदून पुसती नीर नेत्रीं ढाळुनी । पहा पहा नीट मग राव बोलती मुख आगचें न्याहाळुनी ॥ चाल ॥ तुझी आमुची भेट हीच सगुण सुंदरी । रहा खुशाल आपल्या झुलत राजमंदिरीं । ब्राह्मलेख तुझी जन वंदितील आदरीं ॥ चाल पहिली ॥ जड पडल्या करि स्मरण सदोदित संकट-समयाला । अशा परी निरवून धरती कंटाळुन हृदयाला । कामि नव्हते० ॥ ५ ॥

प्रतिउत्तर परिसोन विश्वमाउली मनीं गहिंवरली । नेऊन रंगमहालीं सख्यांनीं चहुंकडून सांवरली । विरक्त झाले श्रीमंत हिकडिल स्नेह ममता सरली । स्नान दान देवपूजा गलबलिंत अगदिंच अंतरली । एकादशीची रात्र बऱ्यांमधिं सहज मात्र सरली । उजाडतां द्वादशीस कुणीकुन कुबुद्धि संचरली ॥ चाल ॥ तिसरे मजल्यावरुन घातली उडि कारंज्यावरी । एकाकीं हाल चाल न होतां गेलि वार्ता दुरवरी । सेवक जन सर्वांग विकळ कडे खांद्यावर आंवरी ॥ चाल ॥ शके सत्राशें भर सत्राच्या अवसरीं । दक्षिणायनामधिं राक्षस संवत्सरीं । आश्वीन शुद्ध पौर्णिमा भौम वासरीं

॥ चाल पहिली ॥ रवि मावळतां वरी मरण झडकरी आलें सखयाला। इथुन आतां प्रारंभ दिसंदिस अद्‌भुत प्रळयाला ॥ कमि नव्हते० ॥ ६ ॥

हाहाकार जाहला प्रगटतां पुकार शहरांत। बंद पडलिं मणभणीत दुकानें भर बाजारांत। वृद्ध तरुण नरनारि बुडाल्या आकांतकहरांत। कुंकु गंध किति सुज्ञ पुसूनी धुळ बांधिती पदरांत। स्वयंभू दीप विझतांच विवशी व्यापली दरबारांत। ठायीं ठायीं थिजले लोक शोक संचारतां अंधेरांत ॥ चाल ॥ बंदोबस्त कडेकोट करूनिया शनवारांतुन अर्धी। अखंड स्वारि रायाची निघाली चौथीच्या अमलामधीं। दुर्लक्ष दर्शन ज्याचें प्रभु तो नदींत निजायचा कधीं ॥ चाल ॥ पसरुनी तुळशी कपुर बेल चंदन। रचियलें सरण त्या शेवटचा स्यंदन। आरुढले वीर वर नारायणनंदन ॥ चाल पहिली ॥ अनेक रिपूचें करुनी कंदन दवडुन विल्याला। दर्भासव घातलें विष्णुलोकास बसायाला ॥ कमि नव्हते० ॥ ७ ॥

बाईसाहेब कल्पान्त जिवाचा तळतळूनी करती। कां ग कुळ-स्वामिणी कोपलिस आजी मजवरती। पतिपूर्वी सौभाग्यवत्या ज्या पुत्रवत्या मरती। इह लोकीं परलोकीं धन्य त्या कुळास उद्धरती। कसें माझें दुर्दैव उपजलें चांडाळिण पुरती। म्हणुन श्रीमंत प्रभुची मजला अंतरली मूर्ती ॥ चाल ॥ निरोगी सात सहस्र उंट न पार स्वामीचे। वीस सहस्र तुरग निवडक भीमथडी ग्रामीचे। सबल दोनशें नव्वद कुंजर विशाल हर-कामीचे ॥ चाल ॥ म्हशी दोन सहस्र कंठिदार वाणीच्या। सहा सहस्र गाई फारतरी वाणीच्या। कांहीं सफेत कापिला व्याघ्रांबर खाणीच्या ॥ चाल पहिली ॥ बैल बारा सहस्र एवढ्या जिवांस खायाला। कोण श्रीमंतांवांचून दुसरा समर्थ धायाला ॥ कमि नव्हते० ॥ ८ ॥

शिकारि चित्ते व्याघ्र पटाइत वृक सांबर हरणें। जंबुक चितळे रोही भेकरें कुरवाळुन धरणें। रीस एडके गेंडे ससांना बनात पांघुरणें। आपण खावें तें त्यांस पुत्रवत् किति माया करणें। सुंदर रूप रायाचें

नाहीं कुणावर रागें भरणें। कलगी तुरा शिरपेंच कंठिचीं पडत होतिं किरणें ॥ चाल ॥ सदयहृदय साक्षात् पितांबर परिधानाचा प्रभु । कृष्ण कुळीं दैदीप्य जसा काय मकरध्वज आत्मभू । तसा करुन दिग्विजय शेवटीं अवघड राचिला विभू ॥ चाल ॥ पाहूं द्या मला तें एक वेळ श्रीमुख । जन्म तो आतां ह्या जिवास होइल दुःख । भोगिलें रमाबाईनें कांहीं तरि सुख ॥ चाल पहिली ॥ हरी जाहला विन्मुख विसरलें पूर्वी पुजायाला । प्रयागीं जावें उठून वाटतें समाधि घ्यायाला ॥ कामि० ॥९॥

अश्व आवडते कुंजर धेनु मृग मैना रडती। मोर खबुतरें तितर सांबरें मूर्च्छागत पडती। स्वर मंजुळ कोकीळ पाक्षि ते पिंजऱ्यामधीं तड-फडती। पोपट भारद्वाज चाप परदुःखानें खुडती। भूकंप उलुका मालु रीत घन विजवा कडकडती। असंख्य तुटती तारे नभमंडळीं किरणें पडती ॥ चाल ॥ ग्रामसिंह दिवसास भयंकर सद्गद भुंकारिती। सवत्स नित अपरात्रीं गाई कितीक हंबरती। भुतें पिशाचें खवीस डाखिणी काय हाका मारिती ॥ चाल ॥ दोहों द्वारीं बसुनी लक्ष्मी पिंपळावरी। करी दीर्घ रुदन मध्यान्ह होतां शनिवारीं। नाहीं राहात आतां होईल आकाशवाणी वरी ॥ चाल पहिली ॥ शक्ति घेऊन श्रीहरी निघुन जातां मूळ ठायाला। सव्यसाचिसारखे लागले मागें पाहायाला ॥ कामि नव्हते० ॥ १० ॥

प्रमुख नानासहित शहाणपण सगळ्यांचें खुटलें। तबीबांनीं वैद्यांनीं रसायण स्वाहिताचें कुटलें ॥ परंतु मंगळसूत्र गळ्यांतील मुळि माझें तुटलें। राजहंस पांखरूं हातांतिल दैवदशें सुटलें ॥ जन्मांतरीं सुदर्शन घेऊन असेल कांहीं लुटलें ॥ सौभाग्याचें तारूं म्हणुन वैधव्य जळीं फुटलें ॥ चाल ॥ मनीं एक एक आठवुन सुशोभित कुरळ केस तोडिती ॥ आतां द्दष्टि कधीं पडाल टाहो करुण स्वरें फोडिती ॥ वदनेंदूवर बिंदु पटपटां डोळ्यांतुनि सोडिती ॥ चाल ॥ सातशें दासी गुणी नाटकशाळा किती। पहातांच प्रभु कांहीं ओवाळुन टाकिती ॥ त्या आतां अजीत अजास दैन्य

भाकिती ॥ चाल ॥ चौदाशें घरगुलाम मुकले ह्या निज पायांला । चाकर तर लक्षानुलक्ष लागतिल फिरायाला ॥ कमि नव्हते० ॥ ११ ॥

परिक्षिताला मरण यावें काय ब्राह्मणशापानें । दंश करावा काय किडीच्या तक्षक सापानें ॥ तसेंच जहालें काय प्रभूंना कोणाचे कोपानें । संकट पडलें काय दिलासेल जिवसंतापानें ॥ जांवई पहाले काय श्रीमंत माझ्या बापानें । वाटे आतां वैराग्य होइल काय ह्या अनुतापानें ॥ चाल ॥ एकवीस वर्षें पूर्णमासावर सवा पांच, अग ॥ दिसंदिवस भाग्याचा उदय हे दयाळु महाराज ग ॥ अंतरले ते मला आतां आण जहर तरी पान ग ॥ चाल ॥ ईश्वरा कशी मजवर आग पाखडलिस ॥ आयुष्य दोरि तूं मधेंच कातरलिस ॥ कां पेशव्यांची ही वंशवेल खुडलिस ॥ चाल ॥ अपार दिधलिस संपदा सुख भोगायाला । शतायु केलेंस नाहीं तसें हरी प्राणविसाव्याला ॥ कमि नव्हते० ॥ १२ ॥

हरिघरचा नाहीं नेम टळाचा परंतु हा टळला । पहा पहिल्या प्रहरांत सूर्यनारायण मावळला ॥ गरिब गाईवर विशाळ पर्वत समूळ कोसळला । वंशवनावर चहुंकडून क्षयदावाग्नी वळला ॥ बाळाजी विश्वनाथ तारक सर्वांना मिळला । रत्नदीप झळझळीत केवळ कुळांत पाजळला ॥ चाल ॥ काशीबाई ती धन्य सती रावबाजी पुत्र प्रसवली ॥ छत्तीस महिने लढून वसई पुढें आपांनीं वसविली ॥ दक्षण साडे सहा सुभ्यांत सरदेशमुखी बसविली ॥ चाल ॥ नानांची कंची वासना नाहिं राहिली । पुरुषार्थ करुन दादांनीं अटक पाहिली ॥ भाऊंनीं कुरुक्षेत्रास कुडी वाहिली ॥ चाल ॥ रणीं जागा विश्वासरायें ती पाहिली निजायाला । जनोबांस मारून मूठ काय मिळालें बायाला ॥ कमि नव्हते० ॥ १३ ॥

दर रिकिबीस तलवार जरब सर्वांवर दाबाची । हुकूम मोडिल कोण कठिण मेहेनत रावसाहेबांची ॥ निवडक चाळिस सहस्र बरोबर फौज कराराची । शौर्य तेज पाहून छाती तडके नवाबाची ॥ कावेरी उत्तर तीर हद

ठरवुन शिवाराची । भोंसल्याची रग जिरवुन धरली आस हेरंबाची ॥चाल॥ थेवरास ते समास होतां वैरी फिरून पोसती ॥ वीर पदरचे दिलगिर सारे रायांविन असती ॥ करून निरवानिरव रमाबाई साहेब गेलि सती ॥ चाल ॥ नंतर नारायणराव तें पद पावले ॥ दहा महिने मात्र सौख्याचे दिवस दावले ॥ गारद्यांस दुपारीं अडचणींत घावले ॥ चाल ॥ घाबरून चुलत्यांचीच गेले पाठ रिघायाला । ढकलुन देतां क्षणीं साधली संध शिपायाला ॥ कामि नव्हते० ॥ १४ ॥

झाला जन्म त्या कुळांत माझ्या बाई राजेंद्राचा । केवळ माधव मूर्ति म्हसोबा नव्हेच शेंदराचा ॥ अणीक मंत्री मर्द मराठा बंद्रोबंद्रांचा । ऐरावत बांधून आणतिल प्रसंगीं इंद्राचा ॥ येथें न चाले यत्न बृहस्पती भार्गव चंद्राचा । उपाय असता तरी न मरता बापू रामचंद्राचा ॥ चाल ॥ हरहर जगन्निवासा, आतां काय करूं ॥ पोटीं जरी एक झालें असतें राजबीज लेकरूं ॥ राज्य न बुडतें मी मात्र मरत्यें शोक सदां कर करूं ॥ चाल ॥ पुढें काळ सख्यांनो कसा मी घालवूं ॥ हिरकणी कुटुन जाऊं पाण्यामधें कालवूं ॥ चाल ॥ जा समया मालवून आपल्या घरास न्हायाला । जिवंत मी असल्यास उद्यां या नेत्र पुसायाला ॥ कामि नव्हते० ॥ १५ ॥

धन्य वंश एकेक पुरुष कल्पवृक्ष पिकले । शत वर्षे द्विज पक्षी आनंदें त्या तरुवर टिकले । जलचर हैदर नबाब सन्मुख रण करितां थकले । ज्यांनीं पुण्याकडे विलोकिलें ते संपत्तिला मुकले । असे प्रभु कसे अमर कराया ब्रह्मदेव चुकले । गहन गती कर्मांची सर्वजण पूर्वी फळ विकलें ॥ चाल ॥ संपविला अवतार धन्यांनीं म्हणे गंगु हैबती । ध्वज पडले उलथुनी थडकल्या सुरु साहेब नौबती । कोण करिल प्रतिपाळ तुर्त मुलुखास लागली बती ॥ चाल ॥ महादेव गुणीराज श्रुती गादिचे । नवे नुतन नव्हती शाईर जादिप वादिचे । पीळ पेच अर्थ अक्षरांत वस्तादिचे ॥ चाल पहिली ॥ प्रभाकराचें कवन प्रतिष्ठित सभेंत गायाला । अशा कवीची बुज नाहीं कोणि करायाला ॥ कामि नव्हते० ॥ १६ ॥

## ७ : निपुत्रिका

भर माहिना लोटेना चुकेना अजुन बाई पाळी। कधिं ग होईन लेंकुरवाळी ॥ घ्रु० ॥ घरंदाज कुळ शुद्ध प्रथम वर सुरूप पैकेपुर ॥ राजमान्य साहेब सुभेसरदार स्वतां रणशुर ॥ परोपकारी रामउपासक लौकिक ज्यांचा दुर ॥ चाल ॥ अति योग्य असे मुळीं पित्यानें स्थळ शोधिलें ॥ पाहुन घटित ठीक मज पदरीं बांधिलें ॥ फार फार पतीला बाहुल्यावर बोधिलें ॥ चाल ॥ केला चार दिवस सोहळा ॥ पुरला त्यांचा डोहळा ॥ जांवई तो धन कोहळा ॥ चाल ॥ उतराई माझीं मायबाप आपुण जाहलीं ॥ सोशितें दुःख मी हिकडे तीं दूर राहिलीं ॥ करमेना मुलाविण सुनि दिसतें माहलीं ॥ चाल ॥ गडे काय कपाळाला करूं ॥ नाहिं घरांत एक लेकरूं ॥ चोपलें खंत करकरूं ॥ चाल ॥ देह झिजलं झुरझुरून घालितें नित जीव जंजाळीं ॥ १ ॥

तऱ्हेतऱ्हेचे उपाय जे जे कुणी कांहीं सांगितले ॥ सर्व करून ते मान्य अनुग्रह साधुन कितीं घेतले ॥ विपुल धन देऊन तपाला पवित्र भट घातले ॥ चाल ॥ ऐकतें परस्पर कठीण बाद्रिकाश्रम ॥ पडे बर्फ तिथें ग कामनिक करती श्रम ॥ धर्मार्थ वसविले काशीस मठ आश्रम ॥चाल॥ उज्जनीमहंकाळ तो ॥ आलें संकट त्वरें टाळतो ॥ कां वृथैव मज जाळतो ॥ चाल ॥ धांवण्या धांव ओंकार ममलेश्वरा ॥ नवशिले नवस वेरुळच्या घृष्णेश्वरा ॥ कधीं हौस पुरवशिल सोरटी सोमेश्वरा ॥ चाल ॥ अरे नागनाथ आंवढ्या ॥ वासना मनीं जेवढया ॥ तूं ताडिस ने तेवढ्या ॥चाल॥ आराधना केवढ्या मांडिल्या जपून तिन्ही काळीं ॥ २ ॥

वैजनाथ परळीचा चंद्रशेखर तो शिव आठवा ॥ भरून भागिरथीच्या कावडी रामेश्वरीं पाठवा ॥ तिळ तांदुळ गहूं तेल मलकार्जुनीं नेउन सांठवा ॥ चाल ॥ कर कृपा गौरिवल्लभा भिमाशंकरा । जा जा हो त्रिंबकेश्वरीं कुणी सेवा करा ॥ नित प्रदक्षिणा सांगतें अकरीं अकरा

॥ चाल ॥ अग सप्तशृंगवासिनी ॥ पहा वरद विघ्ननाशनी ॥ आला राशिस न कळे शनी ॥ चाल ॥ लाजविती मला बोलण्यांत गरोदर स्त्रिया ॥ कोणती सुफल होइना आरंभिली क्रिया ॥ सांगतां नये खुण कुठवर चोरूं प्रिया ॥ चाल ॥ गळ टोंचिनरे हैबती । वाहीन साहेब नौबती ॥ लागली देहा सरबत्ती ॥ चाल ॥ न कळे वांझ पती न कळे वांझ वांचलें मी अग जाळी ॥ ३ ॥

अष्ट विनायक माहोर फिरलें तुळजापुर जातिनें ॥ कोल्हापुर जोतिबा सिंघोबा ओंवाळुन वातिनें । दिवाळिच्या अंवसेस म्हसोबा लिंपुन गुळमातिनें ॥ चाल ॥ राहिलें पंढरीस चतुरमास जाउनी । गाई तुळस पिंपळाप्रति विनंत्या लाउनी । धुंडितें दवा जाणतें लगबग धाउनी ॥चाल॥ साधून साती आसरा । झोटिंग बीर दुसरा । मारुती मुंज्या तिसरा ॥ ॥ चाल ॥ शनवारीं आणिला जरी आवंतुन धोतरा । निर्माल्य गमे नाहीं तेज कुण्या मंतरा । हुरहुर करी जीव धीर नुपुरे अंतरा ॥ चाल ॥ गंगु हैबती कवी गर्जती । संगीन वाद्यें वाजती । महादेव शिष्य साजती ॥ रसिक प्रभाकर म्हणे नार फार पडली शोकजाळीं ॥ ४ ॥

## ८ : गर्भवासिनी

सकल दिवस दुःखाचे भासती आज सखे सरले । आज सखे सरले, मनोरथ पुत्राचे पुरले ॥ ध्रु० ॥ पूर्व सुकृतावरून धांवण्या देव त्वरित धांवला । सकल संकटें निरसुन समयीं गणपती मज पावला । वंशवनामधीं अशोक करतां अक्षय वट लावला ॥ चाल ॥ वळजोर पतीचा सारी रात्र साहिला । पूर प्रेमरसाचा एकांतांत वाहिला । सहजांत सुमुहुर्तीं । गर्भ उदरांत राहिला ॥ चाल ॥ निरी बरिच उंचावली । कुस कंबर रुंदावली । पडेल क्षणिक सांवली ॥ चाल ॥ बाई दिसंदिस मज फार आशा सूटली । श्रीहरीकृपेनें कचणित तूटली । भारी पेट निराशा

आशेनं हातीं लूटली ॥ चाल ॥ झालें निर्मळ माझें मुख । दाव देवा मुलाचें सुख । नको नको मुलीचें दुःख ॥ चाल ॥ आतांच मेली भूक बरोबर पांच मास भरले । पुढें गडे चार मास उरले ॥ १ ॥

कोण पुरुष भाग्यवान् माझ्या उदरीं करी चळवळ । सधन तपस्वी रणशूर जन्मा येतो कुणी केवळ । घडोघडी वाटे हौस कधीं करी सरसाविन जावळ ॥ चाल ॥ परिधान करावें सफेत जरिपातळ । वनीं व्रतस्थ रहावें वन पाहुन शीतळ । जिंकावें स्वतां संपूर्ण रणीं भूतळ ॥ चाल ॥ असे होतात मज डोहाळे । पुरवा ग सकल सोहाळे । द्यावें दान कनक कोहाळे ॥ चाल ॥ सहा सरुन सातवा भर महिना फाल्गुन । पहाचिना सख्यांनो पोटपाठ मागुन । महाफळ मिळविलें रात्रंदिन जागुन ॥ चाल ॥ पुरे पुरे डोहळे जेवणं ॥ नित नवी जिवा वणवण । स्वरुपाची अडस ठेवण ॥ चाल ॥ दृष्ट होइल दारूण म्हणुन मनीं कुतर्क संचरले । सवळग्रह नाहीं अजुन फिरले ॥ २ ॥

सबर घोड्या म्हशी गाभण्या दुर वांधा नेउनी । चतुर स्त्रिया जाणत्या शोध लाउन या कुणी घेउनी ॥ गुज गोष्टि सांगेन तयाला सुखसंग्रहीं ठेउनी ॥ चाल ॥ जेवितां जेवण गमे कडु काढा रासणा । चार चार दिवस नाहीं अन्नावर वासना ॥ जड झालें शरीर ही तळमळ कळ सोसेना ॥ चाल ॥ हा कठिण मास आठवा । मूळ माहेरास पाठवा । गणगोत आप्त गांठवा ॥ चाल ॥ कधीं पुत्र प्रसवशील प्रियकरणी लौकरी । म्हणुन लिंबलोण घरीं भ्रतार तिंदां करी । बैसल्या रुसुन समजाउन धरती करीं ॥ चाल ॥ काय काय सगुण आठवूं । कोणती नजर पाठवूं ॥ कुठें सौख्य सखे साठवूं ॥ चाल ॥ नटुन थटुन कारें घरी उठुन असे पंचप्राण मुरले । उतरले भार शिरावरले ॥ ३ ॥

नऊ मासांवर नऊ दिवस पलेंवर पुरीं पंधरा भोगलीं । तीथ वार नक्षत्र मास शुभ योग सर्व चांगलीं । लवकर जहाला कोन बाळ

बाळंतिण नाहीं भागली ॥ चाल ॥ श्रुत करा उठा प्रियकरास कुणी येक्षणीं । पहा बाळ येउन चिद्रत्नदीप दक्षणी । प्रतिबिंब तुझें लेकरूं वर्त्तासलक्षणी ॥ चाल ॥ दूध-मध मुलास पचविती । आपआपल्या परी रुचविती । राव सभेस गुज सुचविती ॥ चाल ॥ गंगेंत उडी घ्या सुंदर नारायणीं । उसळतां बिंदु बहु पुण्य उत्तरायणीं । गत घेती पितर शूर प्रपंचीं पारायणी ॥ चाल० ॥ पांचवी पूजा प्रियकरा । दणक्यानें बारसें करा । घरोघर वांटा शर्करा ॥ चाल ॥ गंगु हैवती कवी महादेव गुणी जगांत ठरले । प्रभाकर म्हणे वैरी हरले ॥ ४ ॥

## ९ : मोहिनी जसी सुरसभेमधीं

मोहिनी जसी सुरसभेमधीं अमृत वाढी करीं । तशी नार पंगतिंत आग्रह करी ॥ ध्रु० ॥ नटनाटक कलियुगांत ही आली राधा दुसरी । सगुण संपन्न कळा कुसरी । सुखसोहोळे दोहोंकडे होती माहेर सासरीं । हुकूम झेलिती किति एक पासरी । मर्यादेनें राहती उभे घडोघडिच्या अवसरीं । मिटाईन आणि मुंग्यामिसरी ॥ चाल ॥ चौकेर मांडुन पंगती । वाढी सजुन सख्या संगती ॥ पाहुन प्राणी गुंगती ॥चाल॥ पदार्थ जे मागती मुखें पुरवी त्यांस लौकरी । तशी नार० ॥ १ ॥

गर्भश्रीमंतिण सहज जिचा सर्वांवर वारसा । हलवी रूप सुंदर आरसा । चतुर स्त्रियांची धनीन जसी ऐन आली भर रसा । कुणासवें शब्द न करी फारसा । डौलामधीं लाजवी सदां आणुन हरी सारसा । वनलि जणूं हळदिचा नारसा ॥ चाल ॥ दुधीं कांचन झाऱ्या भरून । घ्या घ्या म्हणे आदरें करून । हावभाव दावी पदरावरून ॥ चाल ॥ धरून सितेचें स्वरुप वनीं भुलवी राम शांकरी । तशी नार० ॥ २ ॥

ठाईं ठाईं ठेवि दागिने तळीं लगवगींत नावरी । शरीर सुकुमार कीं गुलदावरी । विशालनयना शुभाननी चाले ठमकत बावरी । कुण्या-

तरी अमिराची नोवरी । पात्र पाहुन उभी राहुन जरा नजर करी ज्यांवरी । उजेड पडे चपळेपरी त्यांवरी ॥ चाल ॥ लेकांस चंद्री लागली । नाहीं शुद्ध मागली । असी फार सुगर चांगली ॥ चाल ॥ स्वच्छंदांमधीं घाली चनीं गुंजारव मधुकरी । तशी नार० ॥ ३ ॥

नभरंगाचें वसन कटीं निरी चोपीव ना फुटे । पदर पल्लेदार मागें सुटे ॥ सतेज सरीं शोभती वरी दाट जरीचे बुटे । चमक जणूं नक्षत्रांची सुटे ॥ धन्य धन्य निर्मिता विधि नाहीं विसरला कुठें । केवळ धगधगीत तारा तुटे ॥ चाल ॥ गंगु हैबती करी गायन ॥ लाविती बिर्देबावन ॥ झाले महादेव गुणी पावन ॥ चाल ॥ प्रभाकराची कवन कडी गुणिजनास प्रिय करी ॥ ४ ॥

## १० : डुलत खुलत चाले

डुलत खुलत चाले, झुलत झुलत बोलतां हले हलकडी । नूतन नारंगी, सजीव सारंगी, फिरवी गर गर गर गर नयन पटे फांकडी ॥ ध्रु० ॥ गंगा यमुना सरस्वती सीरशिखरीं उगम दावती । मार्ग करुन पुढें पाठिपाठ धांवती ॥ सरळ त्रिवेणिस गुंफुन गोंडे त्यावर फूल शेवंती । कुयरि सिताफळ आंवळा ऐरावती ॥ मच्छ कूर्म आणि चोर बोरें चिमण्या मयूर झेंपावती । न कळे भुजंगच बसोनि फोंफावती ॥ चाल ॥ तायतांची जोडी करवंदें कळ्या सुघड ॥ खारका कळस निटस तोरणांचा घड ॥ मूद राखडी केकत चंद्रकोर दुघड ॥ चाल ॥ सुबक केवडा चंद्र सूर्य तळीं बिंदि जडित वांकडी ॥ १ ॥

शनी मंगळ शेजारीं कपाळीं सलक्षणीक असती । स्वच्छ हिऱ्याची टिकली लावुन ठांसती ॥ भृकुटी येक कोदंड येक गांडीव आवाचित भासती । नयन पाहुन मृग सगळे हृदयीं त्रासती ॥ साग्र सरळ नासाग्र विलोकुन शुक चुंचा घासती । इतर मिळुन द्विज पंगती दुरुन हांसती

॥ चाल ॥ टवटवीत, गाल नाहिं पडली कुठें वलवटी ॥ स्वादिष्ट सुटे मकरंद मुखा तलवटीं ॥ कोय आंब्र फळाची अति पातळ हनवटी ॥चाल॥ कर्णफुलें चमकती कर्ण शेवटीं बाळ्या सांकडी ॥ २ ॥

वज्रटिका पानडया मधुन किरकोळ उडया घालती । जडित झळाळित पेट्या नउ नालती ॥ चित्रविचित्रें मंगलसूत्रें रत्नखचित हालती । ठळक ठळक मोत्यांचे सर खालतीं ॥ तनमणी कंठा ताईत पाचूचे गमे गरुड चालती । चंद्रहार पुतळ्यांची माळ लाल ती ॥ चाल ॥ खुले बकुळफुलांचा चंद्रहार सांखळी ॥ जवे चाफेकळ्यांची मोहनमाळ खळखळी ॥ नवरत्न मण्यांचा कंठीं हार मेखळी ॥ चाल ॥ पडलि असेल खळी खचित कुबेर भांडारीं बरीच रोकडी ॥ ३ ॥

पीतवसन कटीं कसून, चोळी वर नगनागिणी वाटल्या । लपुन येउन परिसानें वांकी चाटल्या ॥ दोरे गजरे गोट टिकांच्या पुढें कांकणें पाटल्या । झळक झळक दहा आंगठया खुब थाटल्या ॥ छंद बंद समशेरी जव्यांना घरीं पुतळ्या आटल्या । अडस हिऱ्यांच्या पोहोंच्या मधिं दाटल्या ॥ चाल ॥ रुळ गेंद जोडवीं पायीं पैंजण वाजती ॥ दर्शनें सहज लावण्य स्त्रिया लाजती ॥ कवी गंगु हैबती दक्षणेंत गाजती ॥ चाल ॥ महादेव गुणी गाती प्रभाकर कवी जरबेची कडी ॥ ४ ॥

## ११ : गौर गडे जन्मांतरीं पुजली

एकाग्र चित्तें करून गौर गडे जन्मांतरीं पुजली । म्हणुन स्वरुप संपदा तुला ईश्वरें अचळ दिधली ॥ध्रु०॥ खुब केला शृंगार हिरे–माणिक–मुक्ताभरणीं । उजेड पडे चहुंकडे थेट बनलीस चंद्रकिरणीं ॥ करून प्रातःस्नान अगोदर वंदुनीयां तरणी । पद्मासनीं बसलीस लक्ष ठेवून नामस्मरणीं ॥ डौलदार सोन्याचीं झगझगित बहुत उपकरणीं । दोहों बाजूंस ब्राह्मण सदय वेदान्ती पुरश्चरणीं ॥ चाल ॥ धन्य तो नवरा तूं

नोवरी ॥ देव काढिलेंस जोरावरी ॥ कोणी सखी शालजोडि आंवरी ॥ पदर कोणी पह्लेदार सांवरी ॥ वारी कोणी माशा वरचेवरी ॥ पुढें चौरंग संगमरवरी ॥ मेघडंबरी देव्हारा वरी ॥ लिंग त्यामधें शुद्ध नरवरी ॥ गवई गर्जतात आसावरी ॥ वाद्यें वाजती दिवा शर्वरी ॥ चाल ॥ ऐकुनी आशा उपजली । दर्शन होतां भ्रांत उडाली सहज मनामधली ॥ १ ॥

चार चंबु चहुंकडे चकचकीत गंगोदकें भरले । आगरबत्तीचे सुवासानें सखे पंचप्राण मुरले ॥ जिल्हइदार अपकरे वाटतें आज चरकीं धरिले । बिंब दिसे कलशांत शुद्ध अवयव शरिरावरले ॥ सुरेख चौक्या सुरेख समया मोर सुबक वरले । तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ ताटीं भरून किती उरले ॥चाल॥ कल्पीची साखर लोणी साय ॥ दुधानें हातच पोळले हाय ॥ फुलांस्तव केले कचे उपाय ॥ पाच मखा दौणा याशिवाय ॥ सन्मुख निर्मळ कृष्णा गाय ॥ वसिष्ठें पाठविली काय ॥ अलंकारानें नटली माय ॥ सुशोभित दिसती चारी पाय ॥ वांसरूं दुडदुड चहुंकडे जाय ॥ सदा सुप्रसन्न बाजीराय ॥ चाल ॥ तयांच्या कृपेनें विराजली । थोर तुम्हांला श्रमें साध्य ही पदवी लाधली ॥ २ ॥

गुळगुळित भुई खालीं छताला वर आरसे जडले । वेलबुटी सारखी खांब सरुदार कसे घडले । रंगीत गज झरुक्यास कारागिर अमोल सांपडले । ठिक ताव्या तावदानी अमेरी डौल कोणीकडले ॥ इतर स्त्रिया काजवे तुला ते पाहुनियां दडले । अलंकार छत स्वरूप यांचे पाहा प्रकाश पडले ॥ चाल ॥ भिंतीवर लिहिलीं चित्रें फार ॥ गजानन शंकर पार्वती कुमार ॥ सागरमंथन दशावतार ॥ पुरंधर ऐरावतीवर स्वार ॥ रामरावण युद्ध अनिवार ॥ हे कौरवपांडवांचे दळभार ॥ चतुर्भुज मुरलीधर सुकुमार ॥ गजेंद्र नक्राचा उद्धार ॥ वर्षती अमर सुमन संभार ॥ मांडिला महिषासुर संहार ॥ चाल ॥ अंबिका अती सुंदर सजली । भुतें गोंधळ घालिती हातीं कोणी घेउन पोत बुधली ॥ ३ ॥

जानकिचें सौंदर्य विलोकुन लंकेश्वर भ्रमले । धनुष्यास उचलितां सर्व बळ खर्च करुन दमले । रुक्मिणिच्या स्वयंवरास नृपवर भले भले जमले । असाध्य झाली सती तिनें वैकुंठ पती नमले ।। द्रौपद राजा घरीं भीमार्जुन अधीर ब्राह्मण गमले । शरसंधानें यंत्र भेदितां कैक रिपु शमले ।। चाल ।। काढिलें गोकुळ वृंदावन । द्वारके सभोंवतीं जीवन । अयुध्या मथुरा नंदनवन ।। रमा करी हरीचें पदसेवन ।। जाळी मुचकुंद काळियावन ।। पंढरी संतांचें भुवन ।। अमोलिक जागा हें उपवन ।। पाहवेना दृष्टिनें तव यौवन ।। करो कल्याण पतितपावन ।। गंगु हैबती करी गायन ।। चाल ।। महादेव कवीची मति झिजली । सुगर प्रभाकर म्हणे इमारत खाशी बांधली । एकाग्रचित्तें करून ।। ४ ।।

## १२ : नका जाउं दूर देशीं

नका जाउं दूर देशीं घरीं काय धनद्रव्याला कमी । आलि हो वर्षाची नागपंचमी ।। ध्रु० ।। झिर मिर झिर मिर पर्जन्य वरसे भर महिना श्रावण । काठिण लष्करची हवा दारुण ।। महोत्सव नगरांत मिळाले देशावरिल ब्राह्मण । पाहूं सुखसोहळा दोघेजण ।। नका जाऊं टाकून करा घरीं नागपंचमी सण । किती नित आठवूं तुमचे गुण ।। चाल ।। रहाण्याचा निश्चय करा हो । तुम्ही राजहंस पांखरा ।। नवनिध गौरीशंकरा हो । मम प्राणसख्या प्रियकरा ।। सर्वांत स्वरुपसुंदरा हो । निष्कपट सगुणमंदिरा ।। चाल ।। पसरितें केव्हांची पदर ।। कांहीं पोक्त करा तरी नदर ।। दूर जाणे न सोसे सदर ।। चाल ।। आदरें करुन विनवितां कदर कां काठिण करितां तुम्ही ।। १ ।।

लिहुन भिंतिवर भुजंग भरिला रंग चितार्‍याकडून । सडे घालवितें द्वारापुढून ।। रत्नजडित श्रृंगार करीन मी अतिआदरें आवडून । बसा न्हाउन या सरसें भिडून ।। पूजन करूं जोडयानें यथाविधि शास्त्रमार्गे निवडून । नका करूं जलदी एवढी अडून ।। चाल ।। उतरा जिन

घोडयावरिल हो । दुर देश दुरावा दुरील ।। कोण दुःख श्रमाचें हारिल हो । कोण धाऊन हृदयीं धरील ।। कोण शेज फुलांची करिल हो । कोण चरण तुमचे चुरील ।। चाल ।। मुळीं मुलुख कर्नाटक ।। निर्दई लोक कंटक ।। विश्वासघातकी ठक ।। चाल ।। बिकट झाडी चहूंकडून बाऱ्या काठिण निर्जल भूमी ।। २ ।।

साजुक नाजुक पदार्थ केले शर्करेंत भरभरून । पाक पाजिवला सगळ्यांवरून ।। तळुन मळुन बोटवे वळुन वाढीन पदर सावरून । चंद्र न्याहाळिन मी तुमचा दुरून ।। मर्जिस पडल्या मला पुढें घ्या भोजनास प्रीती करून । घास घाला हो जोबन धरून ।। चाल ।। नाहीं फार दिवस अवधी हो । एक दिवस उद्यांचा मधीं ।। गेल्यावर याल कधिं हो । ते समजुन सांगा अधीं । खडिसाखर मिसळे दुधीं हो । तशी प्रीत तुझी गुणनिधी ।। चाल ।। वर खालीं पाहुन वागतें ।। हितगुज जहालें सांगतें ।। घडोघडी चरणीं लागतें ।। चाल ।। नका करूं कुच हेंच मागतें राहा आपल्या आश्रमीं ।। ३ ।।

परोपरीं विनवून एकांतीं माघारा फिरविला । नेऊन सुखशयनीं सगुण मिरविला ।। हवा तसा सण पंचमिचा घरीं पतीपासुन करविला । हृदयीं कवटाळुनि श्रम हरविला ।। पुढें दिपवाळी करून बेत मग जाण्याचा ठरविला । सकळ सुखसोहळा असा पुरविला ।। चाल ।। करी गंगु हैबती कवन हो । गवसून सारखी गवन । ठेवी कडोविकडिची ठिवण हो । अक्षरीं मोत्यांची वळण । लय लाऊन करिती श्रवण हो । जणूं मिष्टान्नाचें जेवण ।। चाल ।। महादेव कवीश्वर म्हणे ।। विद्येचें माहेर पुणें ।। काय गुणी राजाला उणें ।। चाल ।। पदरचना नित प्रभाकराची सभेस गाइन मी ।। ४ ।।

## १३ : परम परदेश कठिण कान्ते

परम परदेश काठिण कान्ते । कसें ग तुज न्यावें सगुण शांते नाहीं पाहिलें उष्ण कधिं ग आजवर तूं सुकान्ते ॥ ध्रु० ॥ श्रेष्ठ तूं मुखरण नारिंत । तूंवर त्या चवऱ्या वारित । उभ्या कराव्या सर्व अशी ग तूं नाजुक नगरिंत । तुझें रूप सुंदर बहारित । गलुंगे गेंद तयारिंत । असें सौख्य जावें त्यजुन हेंच प्रारंभीं विपरित ॥ नको करूं आग्रह आकरित । फिरुन येऊं माघारें त्वरित । कोण करील सांभाळ होईल तुझी आबळ स्वारींत ॥ चाल ॥ शीत उष्ण अद्भुत प्रभंजन गडे गंगातिरचा ॥ कोमलांग केवळ त्यांत तूं कालिजा अंतरचा ॥ काय आमचें निजद्रव्य सर्व संसार तूंच घरचा ॥ चाल ॥ म्हणून निरवितों चंद्रवदने । चतुर-चातुर्य सुशिलसदने । समज मनिं कुरवाळूं किती मुख शयनीं सौख्य-दाते ॥ १ ॥

घडोघडी हृदयीं तुला धरतों । शांतवन कवटाळुन करतों । क्षण-क्षणां गुण सगुण स्नेहाचे चित्तामधें स्मरतों ॥ परस्थळीं हा काम आवरतो । दुष्ट मानून मागें सरतों । समाधान होइना तुझ्याविण म्हणून भंवता फिरतों ॥ होतां कधीं वियोग मग झुरतों । दुःख तें सोसुन सावरतों । दुजाभाव दूर करुन सदोदित तव मरणीं मरतों ॥ चाल ॥ अंतःकरणापासुन प्रिया तूं आमची आवडती ॥ प्रीतिची प्रियकरिण करूंना कदापि नावडती ॥ तुला त्यजुन शिरीं प्रवास घ्यावा म्हणुन जिव तडफडती ॥ चाल ॥ करावें काय प्रसंगाला । आवडलें मुळीं श्रीरंगाला । तशासारिखे भोग भोगणें प्राप्त सुरुपवंते ॥ २ ॥

विरळ तुजऐसी प्रीतपोष्णा । ऊष्ण ना शीतळ मंदोष्णा । विषय-काळीं समधात सदा सर्वांग चतुर कृष्णा । भोगितां न पुरे मनतृष्णा । सकळ वनितात तूं सहिष्णा । सर्वगुणसंपन्न पंचरत्नांत सगुण लष्णा ।

शब्द शुभदायक अति तुष्णा । पुरे ना तुळितां सुधेष्णा ॥ चाल ॥ चालसी संथ जसी उत्तरपंथीं पयोष्णा ॥ चाल ॥ अमृतवेळा पाहुन ब्रह्म-देवानें मूर्त घडली ॥ फिरत फिरत चौऱ्यांशी गांठ वरी मानवांत पडली ॥ लावण्याची सहज आम्हांला संदुक सांपडली ॥ चाल ॥ स्वस्थ सांवलिंत रहा घरिं तूं । शोकसागर हा दूर करी तूं । तुझ्या गळ्याची आण त्वरित येऊं घरीं भाग्यवंते ॥ ३ ॥

ठेवुन हस्तीवर जरिपटका । निघाले रावसाहेब कटका । नको घालुं आडकाठि साजणी कर आमची सुटका ॥ सोसेना ममतेचा चटका । आदर उपचार आतां लटका । पाहुन तुझें दीन म्लान वदन मारितां नये झटका ॥ एकांतीं बसलों साघटका । बोल बोलसी तरि तुटका । सोड सोड जाउंदे नको धरुं कोमल करीं पटका ॥ चाल ॥ कंबरबस्ता करुन निघे निज मंदिरचा ऐना ॥ आतां कधीं भेटाल फिरुन पहा तरि राजिवनैना ॥ अश्रुपात करीं पुशित चालली बोलवित मैना ॥ चाल ॥ कवन करी गंगु हैबती । झडती नांवाच्या नौबती । महादेव गुणी सुगर प्रभाकर सुमित्र रसवंते ॥ ४ ॥

## १४ : पहाट फारच झाली

उठा उठा हलवितें आतां पहा पहा पहाट फारच झाली । व्हा जाग्रत प्रियकरा कुचाची खरी नौबत वाजुन राहिली ॥ ध्रु० ॥ करुन मधां जिनबंदी सख्या पुढें स्वतांच बिनिवाले सरले । सरंजामि सरकारी एकांडे ठळक ठळक मागें उरले ॥ रंत्र पडली पहा उंट तटें किती सौदागर देशावरले । हाका आरोळ्या देति भयंकर मार्ग चुकुन डोंगरीं शिरले ॥ कठिण घाट आज म्हणुन मुळीं आधीं फकीर आणिक ढाले फिरले । अजुन आपण निद्रिस्त तशामधीं होती मुकाम फारच दुरले ॥ ॥ चाल ॥ पहाटेची झोंप अतिगोड केवळ शरकरा । उठूं नये वाटतें

खरेंच किं हो प्रियकरा ॥ सुखरूप शयन मजलिस गेल्यावर करा ॥ ॥चाल॥ सगुण गुण गंभीरा तुला कशी दुपारचि रे सोसेल कहाली॥१॥

बृहस्पती शशी दैत्यगुरु तिघे तेजहीन तेजीं बुडले । इतर तारे तर लहान केवळ मग दिसातिल कोणीकडले ॥ श्रीमंत प्रभूचे रमणुकीचे तळिं बादल डेरे पडले । नवे मंडप सजदार गजांवर खांब सहित सारे भिडले ॥ ठांई ठांई तासे तबल तुडुम तिनीं तयारिचे मर्फे जडले । आरब रोहिले सिंदी सोरटी कुलतमाम जन गडबडले ॥ चाल ॥ आसवलें व्याघ्र या वनांत वृक हिंडती । दिवसास परस्पर मनिं निर्भय भांडती ॥ ज्या स्थळीं भुतें झोटिंग पिठें कांडती ॥ चाल ॥ अशा गती श्रुत असुन कसे जसे स्वस्थपणें निजलां महालीं ॥ २ ॥

चपळ पंचकल्याण निळे एक एक सुरेख घोडे दिसती । उबार दाण्यासाठिं हुजुरच्या कुमेदनरमाद्या हिंसती ॥ दुध खिरी शिंगरें पिती सुरु अपेट जे जे वक्त असती । चार जामेजिन ठेउन अंधारी देउन गडी बळकट कसती ॥ उमेदवारी निवट गोहो कांहीं तयांत कुणी ब्राह्मण असती । सर्व कर्म सारून अगोदर एव्हांपसुन रोखुन बसती ॥ चाल ॥ जहाले रथारूढ नभांत नारायण ॥ लागलें काल कडकडीत उत्तरायण ॥ कुठवर तरी करूं आर्जव पारायण ... ॥ निबिड अरण्यामधीं अशि कशी निचिंतपणची घडी वाहल ... ॥

दिनदुनयेचे मुगुटमणी ... शुचिन्हमंडित छत्रपती । त्यजुन सौख्य सुख शेज यथाविधी सुरेश्वरा ... तपती ॥ आपआपल्या गुणें शहाणपणें चारी वर्ण शरीरद्वारा खप... दर्शनासाठीं सदोदित लक्ष लावुन चातक जपती ॥ स्वहित हिताचें ... वितें तरी तुम्हांस माझे शर खुपती । धर्मस्वरुप साक्षात ज्याच्या स्मरणें करुन संकटें लपती ॥ चाल ॥ जा जा हो, या हो रायांची भेट घेऊनी । कुच करूं आपण मग पंचामृतीं जेउनी ॥ करी कवन गंगु हैबती जीवन ठेउनी ॥ चाल ॥ महादेव

शब्द शुभदायक अति तृष्णा। पुरे ना तुळितां सुधेष्णा ॥ चाल॥ चालसी संथ जसी उत्तरपंथीं पयोष्णा॥ चाल॥ अमृतवेळा पाहुन ब्रह्मदेवानें मूर्त घडली॥ फिरत फिरत चौऱ्यांशी गांठ वरी मानवांत पडली॥ लावण्याची सहज आम्हांला संदुक सांपडली ॥ चाल॥ स्वस्थ सांवरिंत रहा घरिं तूं। शोकसागर हा दूर करी तूं। तुझ्या गळ्याची आण त्वरित येऊं घरीं भाग्यवंते ॥ ३ ॥

ठेवुन हस्तीवर जरिपटका। निघाले रावसाहेब कटका। नको घालुं आडकाठि साजणी कर आमची सुटका॥ सोसेना ममतेचा चटका। आदर उपचार आतां लटका। पाहुन तुझें दीन म्लान वदन मारितां नये झटका॥ एकांतीं बसलों साघटका। बोल बोलसी तरि तुटका। सोड सोड जाउंदे नको धरुं कोमल करीं पटका ॥ चाल॥ कंबरबस्ता करुन निघे निज मंदिरचा ऐना॥ आतां कधीं भेटाल फिरुन पहा तरि राजिवनैना॥ अश्रुपात करीं पुशित चालली बोलवित मैना ॥ चाल॥ कवन करी गंगु हैबती। झडती नांवाच्या नौबती। महादेव गुणी सुगर प्रभाकर सुमित्र रसवंते॥ ४ ॥

## १४ : पहाट फारच झाली

उठा उठा हलवितें आतां पहा पहा पहाट फारच झाली। व्हा जाग्रत प्रियकरा कुचाची खरी नौबत वाजुन राहिली ॥ ध्रु० ॥ करुन मधां जिनवंदी सख्या पुढें स्वतांच बिनिवाले सरले। सरंजामि सरकारी एकांडे ठळक ठळक मागें उरले ॥ रंत्र पडली पहा उंट तटें किती सौदागर देशावरले। हाका आरोळ्या देति भयंकर मार्ग चुकुन डोंगरीं शिरले॥ कठिण घाट आज म्हणुन मुळीं आधीं फकीर आणिक ढाले फिरले। अजुन आपण निद्रिस्त तशामधीं होती मुकाम फारच दुरले॥ ॥ चाल॥ पहाटेची झोंप अतिगोड केवळ शरकरा। उठूं नये वाटतें

खरेंच किं हो प्रियकरा ॥ सुखरूप शयन मजलिस गेल्यावर करा ॥ ॥चाल॥ सगुण गुण गंभीरा तुला कशी दुपाराचि रे सोसेल कहालीं॥१॥

बृहस्पती शशी दैत्यगुरु तिघे तेजहीन तेजीं बुडले । इतर तारे तर लहान केवळ मग दिसातिल कोणीकडले ॥ श्रीमंत प्रभूचे रमणुकींचे तळिं बादल डेरे पडले । नवे मंडप सजदार गजांवर खांब सहित सारे भिडले ॥ ठांई ठांई तासे तबल तुडुम तिनीं तयारिचे मर्फे जडले । आरब रोहिले सिंदी सोरटी कुलतमाम जन गडबडले ॥ चाल ॥ आसवलें व्याघ्र या वनांत वृक हिंडती । दिवसास परस्पर मनिं निर्भय भांडती ॥ ज्या स्थळीं भुतें झोटिंग पिठें कांडती ॥ चाल ॥ अशा गती श्रुत असुन कसे जसे स्वस्थपणें निजलां महालीं ॥ २ ॥

चपळ पंचकल्याण निळे एक एक सुरेख घोडे दिसती । उबार दाण्यासाठिं हुजुरच्या कुमेदनरमाचा हिंसती ॥ दुध खिरी शिंगरें पिती सुरु अपेट जे जे वळू असती । चार जामेजिन ठेउन अंधारी देउन गडी बळकट कसती ॥ उमेदवारी निवट गोहो कांहीं तयांत कुणी ब्राह्मण असती । सर्व कर्म सारून अगोदर एव्हांपसुन रोखुन बसती ॥ चाल ॥ जहाले रथारूढ नभांत नारायण ॥ लागलें काल कडकडींत उत्तरायण ॥ कुठवर तरी करूं आर्जव पारायण ॥ चाल ॥ निबिड अरण्यामधीं अशि कशी निचिंतपणची घडी वाहली ॥ ३ ॥

दिनदुनयेचे मुगुटमणी राव सुचिन्हमंडित छत्रपती । त्यजुन सौख्य सुख शेज यथाविधी सुरेश्वरापरी तप तपती ॥ आपआपल्या गुणें शहाणपणें चारी वर्ण शरीरद्वारा खपती । चंद्रदर्शनासाठीं सदोदित लक्ष लावुन चातक जपती ॥ स्वहित हिताचें आर्जवितें तरी तुम्हांस माझे शर खुपती । धर्मस्वरुप साक्षात ज्याच्या स्मरणें करुन संकटें लपती ॥ चाल ॥ जा जा हो, या हो रायांची भेट घेऊनी । कुच करूं आपण मग पंचामृतीं जेउनी ॥ करी कवन गंगु हैबती जीवन ठेउनी ॥ चाल ॥ महादेव

गुणीराज म्हणे ही चतुर सुगर कांता पाहिली । प्रभाकरावर मर्जी बहाल दोघांची बहुत जहाली बहाली ॥ ४ ॥

## १५ : वैऱ्याचे दिवस लोटती

वैऱ्याचे दिवस लोटती । कड पोटांतुन उठती ॥ कां मरण नये मजप्रती । अतां कधीं प्राणसखे भेटती ॥ ध्रु० ॥ मेणकरा आरसा सख्यांनो गुलाल भांगीं नका भरूं । वेणिफणी राहुं द्या बोर आणि चंद्रकोर हाता धरूं ॥ येई लोट आवरेना कधिंग तें दृष्टि पडेल तरी पांखरूं ॥ चाल ॥ हौसेनें महाल बांधिला । नाहीं कांहीं दिवस लाधला ॥ वेळ पाहुन वैर साधिला ॥ चाल ॥ आला चैत्र मास दारुण उन्हाळा वृक्ष वनीं फुलती ॥ १ ॥

उष्ण कधिंग पाहिलें तयानें ? दूर पाठविलें तरी कुणी । नको दिपूं विनवितें दुपारीं ऐस ढगामधीं चूडामणी ॥ शरीर फार सकुमार देखणा लक्ष श्रीमंतांमधीं गुणी ॥ चाल ॥ वरुणा तूं वनामधीं खपुन । ठाईं ठाईं जलें ठिव जपुन । श्रीहरी जातिनें आपुण ॥ चाल ॥ सांभाळ करा स्वामिंचा पदोपदीं गहिंवर मज दाटती ॥ २ ॥

फार कठिण परदेश परावा अल्प वयामधीं स्वारी करून । नको म्हणत असतां निघाले नाहीं पाहिलेग मागें फिरून ॥ निष्ठुर मन बाई पहाग तयाचें धाईं धाईं रडतें पोट धरून ॥ चाल ॥ घेऊन मांडिवर उसें । वनवासीं टाकिलें कसें ॥ नळें दमयंतीला जसें ॥ चाल ॥ आज कोणी नव्हे आपलें तुझ्याविण शत्रू शरीर आटती ॥ ३ ॥

काय करूं शृंगार हिऱ्यांचे विंचू फणाणुन झोंबती । चंद्रहार तन्मणी गळ्यामधीं सर्प सुळसुळीत लोंबती ॥ छडीदार पातळें बुट्यांचीं अमोल परि तीं न शोभती ॥ चाल ॥ आणा प्राणसखा जाउनी । द्या धर्म तडीस लाउनी ॥ फळ नाहीं प्राण ठेउनी ॥ चाल ॥ बूट महादू प्रभाकर करी रसिक गुणी गंगाधर वाटती ॥ ४ ॥

## १६ : कंठ तुझा मंजूळ

कंठ तुझा मंजूळ सुसंगित फिरक स्वरामधें स्वर फिरती । क्षणोक्षणीं मेनका विलोकुन अमरपुरीं तारिफ करती ।। ध्रु० ।। ग्रीष्मऋतु नव्हे वसंत ऋतु हा असुन अकाळीं ढग वळती ।। मध्यभागिं आदित्य उन्हें तीं दोन प्रहरचीं टळटळती ।। सूरसंच प्रारंभीं गोड तुझें गीत संगित सारे मिळती ।। अलापितां मल्हार थेंब तळीं मेघ मंडळाहुन गळती ।। उदास धुन सारंग ऐकतां ब्रह्मचारी वेळा चळती ।। शिस्त धरुन वनीं करोळ वधितां हर्णे ठिकाणीं अडखळती ।। अलम उभी रस्त्यांत गवय्ये त्यजुन स्त्रिया गह्लित ठरती ।। १ ।।

दिवा अथवा रात्रौ म्हणाला योग्य सदोदित तो सोहोनी ।। मूर्तिमंत केदार वरून तूं आणिलास जैसा बाहोनी ।। मालकंस हिंदोल अवंतर रागरागिण्यांमधीं पोहोनी ।। ताल ताडिस लाउनी निवडलिस धन्य भूमंडळीं जग मोहोनी ।। पाळी करुन पूर्वीच पाहिली थाप लाउन चौकुन चोहोंनी।। आजपासुन पखवाज न वाजवूं देति मुचल्का करिं लिहुनी ।। विश्ववसू, भ्रतार भासतो पर्णिलास अमृत मुहुर्ती ।। २ ।।

आधींच स्त्रियांचा कंठ तशामधीं पूर्वी खुले तिसरे प्रहरीं ।। हाव भाव प्रत्यक्ष दाविसी नेत्र तुझे केवळ जहरी ।। जाईल वाटतें प्राण मनाला श्रवण होतां गंगालहरी ।। काय काय शिकलीस न लागे अंत कोणाला या शहरीं ।। नको घेऊं तरी तान आतां या परज वसंताची कहरी ।। गुप्तरूपें घरीं सरस्वतीच्या भरल्या असातिल दारीं विहिरी ।। दैव मुळीं प्राधान्य पतीचें लाधलीस वस्तू पुरती ।। ३ ।।

दीप भूप कल्याण तूं गातां प्रकाश साऱ्या स्थळीं पडती ।। छत बांधून रागाचें खुलें धुन रात्र होतां जंब जंज चढती ।। तटस्थ गुणी गाणार बिलिंदे सुखासनीं आपल्या दडती ।। बिभास भैरव ललत मूर्छना

मधुन प्रबंधादिक झडती ॥ होउन राहिली रामकलीची घटा प्रसंगामधें बढती ॥ अरुणोदय होतांच तंबुरी तळीं ठेउन गानी कुडती ॥ रत्न असलें कठिण आम्हांला तपश्चर्येविण नयें आरती ॥ महादु प्रभाकर म्हणे कळुन कां वेड घेतां तुरतातुरतीं ॥ ४ ॥

## १७ : दुसरे बाजीराव पेशवे

यशस्वी झाले श्रीमंत पहिले सवें लढायाला । आतांच आलें अपेश कोठुन बाजीरायाला ॥ ध्रु० ॥

दादासाहेब पुण्यप्रतापी निस्सीम शिवमक्त । स्वारी करुन दरसाल हालविलें दिल्लीचें तक्त । आनंदीबाई सुशील शिरोमणी सुगणसंयुक्त । पतिभजनीं सादर घडोघडी अखंड आसक्त । बाजिरावसाहेब सदोदित जो जीवनमुक्त । जन्मांतरीं तप केलें निराहारीं राहुन एकमुक्त ॥ चाल ॥ शके सोळाशें शहाण्णवीं अति उत्तम जयसंवत्सरीं । पौषशुद्ध दशमीस भरणी नक्षत्र भौमवासरीं । ठीक पहिल्या प्रहरांत जन्मले रात्रीच्या अवसरीं ॥चाल॥ पहा बाईसाहेब धारमुक्कामीं राहुनी । कंठिला काळ कांहीं दिवस दुःख साहुनी । केलें तेथुन कुच सुपुत्रमुख पाहुनी ॥ चाल ॥ गंगातिरीं येऊन राहिली अपूर्व ठायाला । कचेश्वर शुक्रेश्वर सन्निध दर्शन घ्यायाला ॥ १ ॥

समाधान सर्वांस वाटलें कोपरगांवास । स्वारी शिकारीस बरोबर जाती कथा उत्सवास । जें करणें तें पुसून करिती अमृतरावास । एकास नख लागल्या दुःख होई त्रिवर्ग भावांस । असें असुन नानांनीं मांडिला अति सासुरवास । हळुच नेऊन जुन्नरास ठेविलें श्रीमंतरावास ॥ चाल ॥ इतक्या संधींत सवाई माधवराव मरण पावले । तेव्हांपासून नानांनीं राक्षसी कपट डौल दाविले । परशुराम रामचंद्र निरोपुन मग वाटेस लाविले ॥ चाल ॥ आले खडकी पुलावर श्रीमंतांस घेउनी । दर्शनास नाना परिवारें येउनी । दाखविली याद रावास एकांतीं नेऊनी ॥ ( चाल पहिली ) ॥ भय मानून

शिंद्यांचे निघाले वाईस जायाला। साताऱ्यांत राहून लागले भेद करायाला ॥ २ ॥

आपण बाळोबा होउन एक केली खचीत मसलत। चिमाप्पास धनी करून राखिली जुनाट दौलत। करारांत दोघांच्या झाली कांहीं किंचित गफलत। म्हणुनी फिरून नानांनीं उलटी मारुनी केली गल्लत। सूत्रधारी जो पुरुष ज्याच्या गुणास जग भुलत। हातांत सगळे दोर पतंगापरी फौजा हालत ॥ चाल ॥ परशुराम रामचंद्र आणि बाळोबास ठाऊक रण। राज्यकारणीं नव्हेत एक केसरी एक वारण। कठीण गांठ नानांशीं न चाले तेथें जारण मारण ॥ चाल ॥ महाडास बसुनी नानांनीं बेत ठरविले। बाळोबास शिंद्यांकडून कैद करविलें। शिवनेरी गडावर पटवर्धन धरविले ॥ चाल पहिली ॥ रास्ते झाले जामीन प्रसंगीं अवघड समयाला ॥ असा गुजरला वक्त नेले मांडवगण पाहायाला ॥ ३ ॥

घडी बसवून महाडाहुन नाना त्वरितच उलटले। द्वेषबुद्धि विसरून संशय सर्वांचे फिटले॥ शिंदे भोसले होळकर मुश्रुल्मुल्क एकवटले। दलबादल डेऱ्यांत श्रीमंतासन्निध संगटले। बाजीराव राज्यावर बसतां आनंदें जन नटले। तोफांचे भडिमार हजारों बार तेव्हां सुटले ॥ चाल ॥ नंतर नाना एकविसांमधीं समाधीस्त झाले। महाल मुलुख शिंद्यांनीं बावीसामधिं आपले पहिले। यशवंतराव होळकर लढाईस जमुन उभे राहिले ॥ चाल ॥ शिंद्यांनीं करून माळव्यांत खातरजमा। केली फौज गंगेच्या रोखावर खुप जमा। सोडीना कंबर कधीं काढिना पायजमा ॥ चाल पहिली ॥ कुच मुकाम दररोज बनेना पलंगीं निजायाला ॥ घेई जोठाची पचंग समरीं कोण जिंकील याला ॥ ४ ॥

दिला मार पळणास जातिनें पुण्यास येऊनियां। शहर समोंतें वेढुन बसले चौक्या ठेवुनियां। खंडेराव रास्त्यांनीं प्रभुला वसईस नेऊनियां। सुखांत होते स्वस्थ सतत पंचामृत जेउनियां। इंग्रजांस कुमकेस

प्रसंगीं बरोबर घेउनियां। सरंजाम आलिबहादरपैकीं तयास देउनियां ॥ चाल ॥ अगोदर सोजर तुरुक धांवले मप्याशी दक्षिणीं। त्या भयानें होळ्कर परतले नाहीं कोणी संरक्षणीं। भरघोसानें श्रीमंत त्यावर पुण्यास येतां क्षणीं ॥ चाल ॥ झाला बंदोबस्त सर्वही पहिल्यासारखा। परि घरांत शिरला शत्रु सबळ पारखा। लाल शरीर टोपी अंगीं आठ प्रहर अंगरखा ॥ चाल पहिली ॥ धर्म कर्म ना जातपात स्थल नाहीं बसायाला। असें अखुन सम्पूर्ण व्यापला प्राण हरायाला ॥ ५ ॥

फार दिवस आधिं जपत होते या इंग्रज राज्याला। अनायासें झालें निमित्त पंढरपुरास कज्जाला। संकट पडलें कांहिं सुचेना प्रधानपूज्याला। रती फिरली सारांश मिळाले लोक अपूज्याला। भय चिंता रोगांनीं ग्रासिलें काळीज मज्जाला। पदर पसरिती उणाख आणखी नीच निर्लज्जाला ॥ चाल ॥ परम कठिण वाटलें आठवलें त्रिभुवन राव बाजीला। थोर थोर मध्यस्त घातले साहेबांचे समजीला। निरुपाय जाणुनी हवालीं केलें मग त्रिंबकजीला ॥ चाल ॥ ठेविला बंदोबस्तीनें नेउन सार्ष्टीस। एक वर्ष लोटल्यानंतर या गोष्टीस ॥ केलें गच्छ भाद्रपद वद्यांतिल षष्ठीस ॥ चाल पहिली ॥ स्वदेशीं जागा बिकट पाहिली निसुर बसायाला। शोध लावून साहेबांनीं तेथें पाठविलें धरायाला ॥ ६ ॥

इंग्रजाचा अन्यायी निघाला पाठ पेशव्याची। म्हणून साहेब लोकांनीं आरंभिली आगळिक दाव्याची। वसई प्रांत कल्याण गेली गुजराथ पुराव्याची। रायगड सिंहगड बेलाग जागा केवळ विसाव्याची। कर्नाटक दिलें लिहून ठाणीं बैसलीं पराव्यांची। कोणास न कळे पुढील इमारत इंग्रजी काव्याची ॥ चाल ॥ अश्विनमासीं वद्य एकादशी दोन प्रहर लोटतां। श्रीमंत बापुसाहेब एकांतीं पर्वतीस भेटतां। हुकूम होतांक्षणीं रणांगणीं मग फौजा लोटतां ॥ चाल ॥ बैसले राव दुर्बिणींत युद्ध लाक्षित। भले भले उभे सरदारसैन्य राक्षित। लागुन गोळी ठार झाले मोर दीक्षित ॥

॥ चाल ५० ॥ तसाच पांडोबांनीं उशीर नाहीं केला उठायाला । उडी सरशी तरवार करून गेले विल्याला ॥ ७ ॥

आला त्रास वाटतें फार ह्यावरून लक्षुमीस । विन्मुख होऊन श्रीमंत आणिले चहुंकडून स्वामीस । फसले शके सत्राशें एकुण चाळीसच्या रणभूमीस । ईश्वर संवत्सरांत कार्तिक शुक्ल अष्टमीस । प्रहर दिसा रविवारीं सर्व आले आरब गुरमीस । खुप मोर्चा बांधून विनविती श्रीमंत स्वामीस ॥ चाल ॥ दारुगोळी पुरवावी आम्ही आज हटकुन त्यांशीं लढूं । गर्दीस मिळवून देऊन पलटणें क्षणांत डोंगर चढूं । शिपाइ-गिरीची शर्थ करून समशेरी सोन्यानें मढूं ॥ चाल ॥ लाविलें बापुसाहेबांनीं तोंड जाउनी । दीड प्रहर रात्र होते श्रीमंत दम खाउनी । गेली स्वारी मशाला हिलाला मग लावुनी ॥ चाल पहिली ॥ जलदी करुनी साहेबांनीं लाविलें निशाण पुणियाला । खेंचुन वाड्याबाहेर काढलें कदीम शिपायाला ॥ ८ ॥

सकळ शहरचे लोक हजारों हजार हळहळती । सौख्य स्मरून राज्याचें मीनापरी अखंड तळमळती । रात्रंदिवस श्रीमंत न घेतां उसंत पुढें पळती । यमस्वरूप पलटणें मागें एकदांच खळबळती । धडाक्यानें तोफांच्या वृक्ष आणि पर्वत हादळती । त्यांत संधी साधून एकाएकीं दुरून कोसळती ॥ चाल ॥ मणाण झालें सैन्य सोडिली कितीकांनीं सोबत । कितीक इमानी बरोबर झुकले घर टाकुनी चुंबत । कितीक मुकामीं अन्न मिळेना गेली साहेब नौबत ॥ चाल ॥ कोठें डेरे दांडे कोठें उंट तट्टें राहिलीं । कोठें सहज होऊन झटपट रक्तें वाहलीं । कोठें श्रीमंत बाईसाहेब सडी पाहिली ॥ चाल पहिली ॥ बहुत कोमावली पाहवेना दृष्टीनें उभयांला । हर हर नारायण असें केलें सखयाला ॥ ९ ॥

माघ शुद्ध पौर्णिमेस बापुसाहेब रणीं भिडले । जखम करुन जर्नेलास फिरतां जन म्हणती पडले । गोविंदराव घोरपड्याचे दोन हात

भले झडले । आनंदराव बावर ढिगामधीं खुप जाऊन गढले । मानाजी शिंदे मागें फिरतना डोई देऊन अडले । छत्रपती महाराज तळावर समस्त सांपडले ।। चाल ।। घाबरले श्रीमंत सुचेना मन गेलें वेधुनी । बाईसाहेबांना ताशिच घोड्यावर पाठीस बांधुनी । नेले काढुनिया अमृतराव बळवंत ज्येष्ठ बंधुंनीं ।। चाल ।। दहा प्रहर पुरे पंतप्रधान श्रम पावले । नाहीं स्नान शयन नाहीं स्वस्थपणें जेवले । आले आले ऐकतां उठपळ राव धांवले ।। चाल ।। गर्भगाळित जाहले लागले शुष्क दिसायाला । बाईसाहिबांना फुरसद न पडे बसून न्हायाला ।। १० ।।

दिवाळी आणि संक्रांत कंठिला दुःखांत फाल्गुन । रागरंग नाहीं आनंद ठाऊक रायालागुन । सदैव चिंताग्रस्त शब्द बोलती वैतागुन । कर जोडून फौजेस पाहिलें घडोघडी सांगुन । धैर्य धरून कोणी कसून लढेना क्रियेस जागुन । कर्म पुढें प्रारब्ध धावतें लगबग मागुन ।। चाल ।। पांढरकवडयावर रचविल्या धनगारा अद्भुत । थंडीनें मेले लोक उठविले गारगाऱ्यांनीं मुत । बेफाम होतें लष्कर नव्हती कांहीं वार्ता संभुत ।। चाल ।। ओढवलें कसें सर्वांचें समयीं संचित । कडकडून पडलें गगन जसें अवचित । दुःखाचे झाले डोंगर नाहीं सुख किंचित ।।चाल पहिली।। अनुचित घडली गोष्ट दिसेना ठाव लपायाला । कोणे ठिकाणीं नदींत लागलें सैन्य बुडायाला ।। ११ ।।

जे श्रीमंत सकुमार वनांतरीं ते भटकत फिरती । कळेल तिकडे भरादिसास प्रभु काव्यांमधीं शिरती ।। आपला घोडा आपण स्वहस्तें चुचकारुन धरती । खालीं पसरुन उपवस्त्र दिलगिरींत वर निद्रा करती ।। अस्तमानीं कधीं रात्रीं भात भाक्षिती पाटावरती । दरकुच दर मजलीस कृपेंतिल सेवक अंतरती ।। चाल ।। पेशव्यांचे वंशांत नाहीं कोणी असा कहर पाहिला । हत्ती घोडे उंट खजीना जेथील तेथें राहिला । बाजीराव होय धन्य म्हणून यापरी आकांत साहिला ।। चाल ।। नर्मदेस शालिवाहन

शक संपला। त्या ठायीं ठेविला शकपंती आपला। भरचंद्रराहुग्रहणांत जसा लोपला॥ चाल पहिली॥ सांब कसा कोपला लागले गलीम लुटायाला। सिद्ध झाले मालकमास राव राजेंद्र मिळायाला॥ १२॥

समस्त लष्कर दुःखित पाहुनी श्रीमंत गहिंवरले। सद्गत झाला कंठ नेत्र दोन्ही पाण्यानें भरले। आम्हापुढें जे शत्रु रणांगणीं नाहीं क्षणभर ठरले। ते आमच्या जन्मास दुष्ट चांडाळ पुरुन उरले। केवळ असा विश्वासघात केल्यानें कोण तरले। इंद्र चंद्र आदिकरुन आल्या संकटास अनुसरले॥ चाल॥ तुमची आमची हीच भेट आतां राव सर्वांना सांगती। कृपालोभ परिपूर्ण करित जा द्या दर्शन मागती। ऐसें उत्तर ऐकून शतावधी पायीं सेवक लागती॥ चाल॥ महाराज उपेक्षून आम्हांस जाऊं नये। दूर ढकलुन शरणगतास लावूं गये। पहा कसाबाचें घर गाईस दावूं नये॥ चाल पहिली॥ हिंमत सोडूं नये सर्व येईल पुढें उदयाला। कोण काळ कोण दिवस धन्यांनीं पुसावें हृदयाला॥ १३॥

प्राण असुन शरिरांत बुडालों वियोग लोटांत। बरोबर येतों म्हणुन घालिती किती डोयी पोटांत। निराश जाणुन झाली रडारड मराठी गोटांत। निर्दयांनीं लांबिवली पालखी पलटण कोटांत। मातबर लोकांचीं ओझीं चालतात मोटांत। गरीब करी गुजरण प्रसंगीं एक्या जोटांत॥ चाल॥ कुंकावांचुन कपाळ मंगळसूत्रावांचुन गळा। तसा सैन्यसमुदाय उदाशित रंग दिसे वेगळा। धर्म बुडाला अधर्म दुनियेमधिं आगळा॥ चाल॥ कसें प्रभूंनीं ब्रह्मावर्त शहर वसविलें। अगदींच पुण्याच्या लोकांना फसविलें। हुर हुर करीत कां उन्हांत बसविलें॥ चाल पहिली॥ कांहीं तर तोंड पुढें दिसेना जीव जगायाला। कोणास जावें शरण कोण हारि देईल खायाला॥ १४॥

विपरित आला काळ मेरुला गिळलें मुंग्यांनीं। पंडितास जिंकिलें सभेमध्यें मदांध भंग्यांनीं। भीमास आणिलें हारीस रणांगणीं अशक्त

लुंग्यांनीं । कुबेरास पळविलें अकिंचन कसें तेलंग्यांनीं । जळीं राघव माशास अडविलें असंख्य झिंग्यांनीं । जर्जर जाहला विष्णुवाहन बदकांचें दंग्यांनीं ।। चाल ।। ईश्वरसत्ता विचित्र सारें दैवानें घडवीलें । हरिश्चंद्र आणि रामचंद्र नळ पांडवांस रडविलें । फितुर करुन सर्वांनीं असलें राज्य मात्र बुडवीलें ।। चाल ।। म्हणे गंगु हैबती पावेल जर शंकर । तर दृष्टीपुढें पडतील राव लवकर । महादेव गुणीजन श्रीमंतांचे चाकर ।।चाल पहिली।। प्रभाकराची जडण घडण कडकडीत म्हणायाला । धुरू नारो गोविंद वंदी त्या निशिदिन पायांला ।। १५ ।।

× × ×

## —६—

# सगनभाऊ

सगनभाऊ हा जातीनें मुसलमान. त्याचा पिढीजात धंदा शिकलगारीचा—म्हणजे हत्यारें पाजळून त्यांना धार देण्याचा. पण शस्त्राला धार देण्याच्या त्याच्या कौशल्यापेक्षां तुणतुण्याच्या तारेवर कवनें म्हणण्याचें त्याचें कौशल्यच पेशवाईत अधिक लोकप्रिय झालेलें दिसतें. त्याचा जन्म इ. स. १७७८ च्या सुमाराचा. त्याचें मूळ गांव जेजुरी, पण त्याच्या आयुष्याचा पुष्कळ काळ पुण्यांतच गेला. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत सगनभाऊच्या कवित्वाची प्रसिद्धि होऊं लागली. त्यानें आपला एक स्वतंत्र फड काढला होता. बिबिछान, येमा, बाळा, राघु, रामा गोंधळी हे त्याचे प्रमुख साथीदार. रामा गोंधळी हा उत्कृष्ट गायक होता असें म्हणतात. ‘लावणी करावी सगनभाऊनें व ती वाजवून म्हणावी रामा गोंधळ्यानें’ अशी जणूं त्या वेळीं प्रथाच पडली होती. सगनभाऊच्या अनेक लावण्यांच्या शेवटीं रामाचा उल्लेख आहे. ‘भाऊ सगन गुणीजन गाती। रामजी चाल गाइ नखऱ्याची।’ ‘नित्य गाई रामा जसा पट्टयाचा मोहरा’

अशा उल्लेखावरून रामा गोंधळीची त्या वेळची लोकप्रियता लक्षांत येते. बाजीरावाची सगनभाऊवर बरीच मर्जी असावी. बाजीरावाच्या विलासी जीवनावर सगनच्या किती तरी लावण्या आहेत. होनाजी बाळाचा तो प्रतिस्पर्धी होता व त्याच्या होनाजी बाळाशीं अनेकदां झटापटी झाल्या असा त्यांत उल्लेख असे. 'सगनभाऊ म्हणे होनाजी बाळा उत्तर द्यावें रोकडें.' किंवा 'होना गवळ्याचा झाला चुना' अशासारख्या उल्लेखावरून दिसते.

१८१८ पर्यंत सगन पुण्यांत होता. या सालीं खडकीची लढाई होऊनें पेशव्यांचा पराजय झाला. त्यावर सगननें लिहिलेला 'खडकीची लढाई' हा पोवाडा प्रसिद्धच आहे. पेशवाई बुडाली आणि शाहिरांची वाताहत झाली. प्रभाकर–परशरामाप्रमाणें त्याच्याहि कपाळीं वनवास आला. पुण्यांतला त्याचा फड मोडला. रामा गोंधळी बडोद्याला निघून गेला म्हणून सगनभाऊ साताऱ्यास स्थापन झालेल्या छत्रपतीच्या दरबारीं गेला. तेथें त्याला आश्रय मिळाला. पानपतचा पोवाडाहि त्यानें तेथेंच रचला. पेशवाईप्रमाणेंच सातारकर छत्रपतीच्या राज्यनाशाचाहि पोवाडा लिहिणें त्याच्या नशिबीं आलें. पदच्युत प्रतापसिंह महाराज छत्रपतीवर त्याचे दोन पोवाडे उपलब्ध आहेत.

सगनच्या अंगीं इतर शाहिरांच्या मानानें विद्वत्ता कमी असेल पण त्याच्या मराठी भाषेंत जोम आहे. जातीचा मुसलमान असून अनेक प्रसंगीं हिंदु देवदेवतादिकांचे दाखले तो देतो–इतकेंच नव्हे तर मराठमोळ्याचा सगनभाऊला फार अभिमान आहे. मराठी राज्याविषयींची त्याची आत्मीयता तर ठिकठिकाणीं पोवाड्यांतून दिसून येते. त्याशिवाय

'राजा कुणीकडे प्रजा कुणीकडे काय अशी आग पाखडली ।
अन्न विसरलों, पाणी विसरलों वाळवंटीं जशी मासोळी पडली ॥'
असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले नसते.

असा गुणी शाहीर सन १८४० च्या सुमारास वारला. त्याचे आसपास प्रभाकर–परशराम यांचाहि अन्त झाला. आतां पराक्रमाचें व रसिकतेचें युग संपलें–परवशतेची निशा सुरू झाली–आपल्या कवनांना यापुढें पराक्रमाचा आधार नाहीं या जाणिवेनें जणूं पेशवाई अखेरचें जीवन डोळ्यांनीं पाहणाऱ्या या शाहिरांचा अस्त झाला असावा.

* * *

## १ : पानपतचा पोवाडा

भाऊ नाना तलवार धरून । गेले गिलिच्यावर चढाई करून ॥ ध्रु० ॥ सवाई बाजीराव पेशवे पुण्यवान प्रधान । नाना भाऊ गादीवर शूर जन्मले जैसे अर्जुन ॥ शहर पुणें वसविलें मोहरा पुतळ्याला नाहीं कांहीं उणें । चमके नंगी तलवार सैन्य हें सारें लष्कर पाहुन ॥ गर्व कोंदला फार जैसा लंकापति रावण । होणासारखें प्राक्तनीं कैसें लिहिलें ब्रह्मयानें ॥ चाल ॥ बोलवून अवघे वजीर । सजवून या सभा सदरें ॥ मग कैसा केला विचार । पत्रें लिहिलीं एकच तार ॥ अष्टप्रधान मानकरी सारे । जरी पटका ऐशीं हजार ॥ आले मल्हारराव होळकर । फौजेमधें कुलअकत्यार ॥ पलटणी उभ्या तय्यार । शिंदेशाई तोफेचा बहार ॥ बारा हजार बाणांची कतार । चाळीस हजार भोंसले नागपुरकर ॥ वीस हजार आरबसुमार । तीस हजार हपशी बरोबर ॥ अठरा पगड लोक सारे । आपल्याला मिसलीवर ॥ चाल ॥ चाळीस हजार पठाण नित्य तेथें चमकती । अर्बुज जात ही खंदी फिरे भोंवतीं ॥ सिंध जाट रोहिला नाहीं त्याला गणती । घोरपडे नाईक निंबाळकर नौबद वाजती ॥ घाटगे मोहिते माने पाटणकर झुकती । ढालेशीं ढाल भिडे जरिपटक्याच । हत्ती ॥ चाळीस हजार सडक करनाटक चमकती । हे मानकरी भाऊचे ऐसें दुनिया बोलती ॥ एक एका बरोबर ऐसे पतके किती । बारा भाई

जमले नाहीं त्यांची गणती ॥ सांडणी स्वाराची डांक फिरे भोंवती । अशी जमाबंदी करून । भाऊ नाना० ॥ १ ॥

शाण्णवकुळींचे भूपाळ सारे मानकरी बरोबर। धायगुंडे पायगुंडे मोरे शेडगे पांढरे महशूर ॥ खल्लाटे लोखंडे मिसे वाघमोडे आणिक हटकर। शेळके बोळके काळे खचल खराडे नाहीं त्यांला सुमार॥ शिरके महाडिक मिसाळ पिसाळ बोधे बरगे आहेत बरोबर। जाधव धुळवपोळ चवाण डफळे भोंसले गुजर रणशूर ॥ लिंगडे कदम फडतारे घाडगे यादव थोरात भापकर। आंगळे निंगळे सेवाळे शितोळे रणदिवे वाबळे खळदकर ॥ गाढवे रसाळे जगताप जगदाळे काकडे काटकर। हे सारे सुभे भाऊचे उभे आपल्याला बाजूवर ॥ चाल ॥ चाळीस हजार करवल जमले। सोडिले शिरावर समले ॥ रास्ते पटवर्धन गमले। ढमढेरे तळेकर तुमले ॥ आले पंत जागा त्यानीं आंखली। नाना फौज पाहतांना चकले ॥ दलबादल डेरे दिले। नगारखाने झडूं लागले ॥ गोसावी त्यामधिं वायले। फकड ते सोटेवाले ॥ मग लमाण कितीक आले। बावन पागा फारच झाले ॥ चाल ॥ कोतवालघोडे सजविले श्यामकर्ण। भरगची हत्तीवर झुला घाली हौसेनें ॥ हौदे अंबारी आयन्याचें तारांगणें। आघाडिला चालली लगी भडक निशाणें ॥ सूत्रनाळी जंबुरे उंटावर रोंखुन। खंडा पट्टा सुरे तिरकमठा कमान लावून ॥ ढाल फिरंग नवाज-खाणी निशंग गगन लष्केरी खूण। पिस्तुल बंदुक चकमक चमके संगीन ॥ कडाबीन बकमार याची खूण । राहिले एकदील खुण करून ॥ चाले फौज काय पाहतां दुरून। भाऊ नाना० ॥ २ ॥

आंगळे इंगळे शेराळे शिताळे रणदिवे वाखाळे खळटकर। गाढवे रसाळे सोनवणे जगताप जगदाळे काकडे काटकर। बोबडे ढुबल मोहिते सिंगाडे सांवत खिरसागर। गोडसे निकम दुधे फाळके धुमाळ गजरे वाल्कर तोरदळकर ॥ चाल ॥ कितुरकर देसाई हातीं भाले। हैदराबादकर

मोंगल आले ॥ मंत्री चिटणीस नरगंदवाले कोकटकर महाराज खटाववाले ॥ कुडुंकवाल्यांनीं खजिने पाठविले। गोंवेकर फरास पुढें गेले ॥ चाल ॥ जमदाडे सरदार झांबरे शूर अतिरथी। लई धनगर शाण्णव कुळींचे मराठे होती ॥ हत्यार जमई जमदाड माडु घेऊन हातीं। बिचवा ह्या वांगी गुरगुज सांग सोंटा बरची फेंकती ॥ सुरसेप दारूचे केप धुंद लढयेती। फसत बालमपेंच खुबचार मार लई होती। देणें महाराजांचें परिपूर्ण। भाऊ नाना० ॥ ३ ॥

नाना भाऊनीं विचार केला फौजा पहाव्या म्हणून। स्वारी निघाली बाहेर पर्वतीच्या दर्शनाकारणें ॥ डंके झाले चहूंकडून घोड्यावर ठेविले जीन। भले भले सरदार चालती, आपआपल्या मिसलीनें ॥ पेंढार पुढें मागें तोफा चालल्या दारूगोळा बार भरून ॥ हत्तीवर सूत्रनाळ उंटावर बाण भरून ॥ बारा हजार उंटावर बाणांच्या कैच्या मागें चाले दबा धरून ॥ कराबीन बकमार आरब सिंध रोहिले गोलचे गोल भरून ॥ करबळवाले एकांडे पन्नास हजार रहदारी करून ॥ बासडीवाले धनगर निवडक बाजूवर ठरून ॥ चाल ॥ पुढें होळकर चालला। शिंदेशाही नाहीं गणतीला ॥ साडेसातशें कोतवाल सजविला। त्याला भरगच्ची झुला ॥ सहा हजार तोफा बार भरला। पायदळ निशाण कडक पुढें उडाला ॥ चार हजार सोटेवाला। सात हजार बल्लमवाला। गोलचा गोल नाईक आला। मागें फौज करनाटकवाला। बाराभाईचा घोडा मग भरला। बावन पागा बारगीर जमला ॥ माय मोर्तब आले गणतीला। साठ मानकरी मोरचलवाला ॥ चाल ॥ स्वारीचा थाट एकचित्तें झाला बरा। होणार टळेना ब्रह्मयाच्या अक्षरां ॥ रंगविले हत्ती पांखरा भरजरी जरा। अंबारी साडेसातशें मोती झालरा ॥ नाना भाऊनीं करून पोषाग चंदेरी तऱ्हा। गळे कंठीं पाच शिरपेंच मोत्यांचा तुरा ॥ कपाळीं केशर टिळा चंद्र दुसरा। हौद्यांत बसून शाहीचा घेत मुजरा ॥ चाल ॥ तीस

हजार अबदागिर बरोबर चाले ढिगारा। संगें झडती चौघडे शिंगें तुतारा ॥ पर्वतीचें दर्शन घेऊन येत माघारा। फौजेकडे पाहतो भाऊ फिरून माघारा ॥ नऊ लाख सैन्य एकदिल घोडा सारा। शहर पुण्यास मुजरा करून। भाऊ नाना० ॥ ४ ॥

बाण बाळम जिरिटोप बकतारे चाळीस हजार गणतीला। जामदारखाने फोडून पैसा साऱ्या सेनेशीं वांटिला। कडींतोडे पोषाग कंठ्या दिल्या झाडून फौजेला। शांत केली चित्तवृत्ती मग मनसुबा काढिला ॥ हत्ती लढविले गिलचे पेशवे यश आलें शत्रूला ॥ राघोबादादा म्हणे भाऊशीं प्रश्न पाहूं चांगला ॥ नाहीं ऐकलें पुढें होणार न टळे कोणाला। दख्खनची सौभाग्य गळसरीं तुटली त्या समयाला ॥ समस्तांनीं अर्जविलें भाऊ ऐकेना सर्व मंडळीला। चाल केली गिलच्यावर डंके वाजवीत चालला ॥ चाल ॥ धरिली दिल्लीची वाट। सातपुड्याची झाडी दाट। अजिंठ्याचा उतरला घाट। बंडावे मोडले वाट। नऊशें कोस मारवाड नीट। त्यानें जाऊन घेतली भेट। दिल्ली जमाबंदी चट। बादशहानें आणविला जाट। लखनोरचे नबाब जबघाट। दीड लाख फौजेचा थाट। बादशहानें आणविला जाट। सेना जमली आटोकाट ॥ चाल ॥ धारचे पवार जयपूर उदेपुरवाला। रातोरात पोंचली डांक सरंजामाला ॥ नानाभाऊंनीं जाऊन यमुनेवर डेरा दिला। भिडविले मोर्चे लढती किल्ल्याला। किल्लेदार बडा रणशूर मार लाविला। बारा हजार तोफा सरबत्ती दिली तोफेला। मोर्चे गढती फौज लढती केला हल्ला। घेतला किल्ला जबरदस्त बादशहा केला। भाऊची खराबी गणीत नाहीं जखमेला। भाऊ दिलगिर फार दिला हुकूम तोफेला ॥ दिल्लींत माईना मुडदा गंज पडला। धिटाई करून हल्ला चढविला ॥ दिल्ली शहर घेतलें सर करून। भाऊ नाना० ॥ ५ ॥

आटोकाट जमले पठाण कुंजपुऱ्यास साठ हजार। दुहेरी तोफा लाविल्या पुढें कोसाचा मार ॥ कुंजपुरा येईना हातीं भाऊ जाहले मनीं

दिलगिर । बोलावुन पेंढारी मग त्यांनीं काढला विचार ॥ दिल्ली सोडावी डावी उदेपूर वेढावें चहुफेर । होळकराशीं केला हुकूम बाण मग सोडी नागपुरकर । आतां फराशीस पुढें गल बारनाळा भर गोळ्यांचा मार । पेंढाऱ्यांनीं वेठ उठविला तोफखान्यासमोर ॥ चाल ॥ जागोजाग छबिने भाऊचे । राऊत पायदळाचे ॥ तट पाडिले किल्ल्याचे । फार सैन्य पडलें भाऊचें ॥ चढलें निशाण शिंद्यांचें । पाट वाहती बहु रक्ताचे । एक लाख मनुष्य दिल्लेचे घायाळ पडले जखमाचे ॥ बारा हजार पेंढार माल्याचे । लूट मुभा दिल्लीची ॥ चाल ॥ फोडिलें तक्त दिल्लीचें खजिना काढिला । कुमकेस घेतली फौज कुच मग केला ॥ आले नाना भाऊ धावत हिंदुस्थानाला । लखनोरचा नबाब रातोरात पळून गेला ॥ लुटले शहर सारें आग्रयावर ढाला दिल्या । राजा रणजीत जाट लाहोरवाला ॥ चवथाई दिली भरतपुरवाला मिळाला । लिहून धाडिलें पत्र रुमशामाला ॥ चवदाशें कोस घोडा अटकेस पाणी पाजला । रातोरात डाक गेली गिल-चाला ॥ आले वकील सलाम करून । भाऊ नाना० ॥ ६ ॥

वकील उभे हात जोडून बोलती नाना भाऊकारण । लंब धाडली तुम्हां खर्च झाला पैसा देईन ॥ पुण्याप्रती राज्य करावें दिल्ली अटके-पासून । क्रोध आला भाऊशीं नऊ कोट रुपये द्यावे धाडून ॥ चवदाशें कोस आलों पुढें चवदाशें कोस जाईन । इस्तंबूल द्या किल्ला मुलूख रुमशामचा पाहिन ॥ दोन्ही हात बांधून शरण यावें तेव्हां परतून जाईन । गिलचा बोले कोणी आशा ठेविली आलें मरण ॥ फेर पत्र पाठविलें दातीं धरून यावें तृण ॥ चाल ॥ पत्र वाची त्या वेळेशीं । कळविलें अवघ्या फौजेशीं ॥ भाऊ बोले तेव्हां नानाशीं । तीस हजार फौज घ्या खाशी ॥ गोविंदराव बुंदेले बनशी । दोन पतके बरोबर खासे ॥ केला रवाना त्या दिवशीं । दाणा वैरण आणावयाशीं ॥ ढाला दिल्या आग्रयावर त्या दिवशीं । झाला हुकूम खजिना आणावयाशीं ॥ खजिने

भरले छकड्याशीं । रातोरात डाक गिलचाशीं ।। आली चालून मुक्कामाशीं । दहा हजार फौजेशीं ।। शिरें पाठविलीं भाऊशीं । भाऊ म्हणे कोणे एकाशी । नसे नऊं लाख माझेपाशीं ।। चाल ।। गिलचाची फौज आली चालून भाऊवर । भाऊ हटेना लढणार तोही रणशूर ।। झाला हातघाई दिवस पहिला सोमवार । आरबांनीं केली गर्दी गोळी अपार ।। गिलच्याचे पडले मुडदे पळतां बेजार । धाडिलें पत्र रुमाला गलीम शिरजोर ।। बडा खंदा ब्राह्मण नऊ लक्ष फौज रणशूर । पानपतावर छावण्या खंदकाबाहेर । आम्ही तरी ना येऊं हातीं घेतलें शिर । धाडा सडी फौज खाशी करून तय्यार ।। चार दस्ते घोडा पाठवा एकदिल सारे । धाडा खर्ची खजिना भरून । भाऊ नाना० ।। ७ ।।

बादशहानें पत्र वाचतां झाले मनिं दिलगीर । आऊक्ष दोरी तुटली आम्हांवर कोपला ईश्वर ।। इस्तंबुल मागता किल्ला चवथाई द्यावी कोठवर । मरून खरे होऊं परंतु ना जाऊं त्याचे हार ।। सांडणीस्वार फेकिला कंधार पंजाब पंचीन बहादर । वजीर बोलावुन विडे दिले गिलचांस केलीं वस्त्रें ।। फत्ते करा तलवार बाक्षिसा देईन मुलुख महामुरागादीचें नांव राखा सध्यां देईन पैसा मुबलक फार ।। चाल ।। घोडा चार दस्ते बोलाविला । दिला पोषाग पिंवळा शेला ।। दुराण्या राऊत बोलाविला । बादशहानें शिरीं हात ठेविला ।। भले भले शिपाई अघाडिला । शहराबाहेर डेरा दिला ।। सहा हजार तोफ बार भरला । पुढें चालतां कडक उसळला ।। हिरवें निशाण हिरव्या ढाला । फौजेचा ढग जसा वळला ।। त्या दिवशीं मुक्काम केला । बोलविले अस्तरीला ।। आम्ही जातों रणघरला । आतां आलें रांडपण तुजला ।। चाल ।। तोडून गरसळीं फोडून हातचीं कांकणें । झाली निरवानिरवी शिरीं बाशिंग बांधुन ।। पैजेचे विडे उचलीले यश घेऊन । चार दस्त पडतील त्या दिवशीं रूम सोडीन ।। बादशहास बोल्ती कधीं ना येऊं परतून । शंभर कोट रुपये खर्चीं देईन धाडून ।। अथवा जाईन मरून । भाऊ नाना० ।। ८ ।।

अकरा जणांची कुंपीण अकराशेचें एक पलटण ॥ अकरा पलटणाचा एक कंपू अकरा कंपूचे एक दस्तन ॥ अशीं दोन दस्त ठेविलीं रुमाच्या गादीला राखण। चार दस्त सरंजाम नदी समजी आले उतरून ॥ पिवळे करून पोषाक नवरे तळहातांत शिर घेऊन। धाडिले वकील गिलचांनीं मसुदे बोलाया कारणें ॥ नाहीं ठरलें बोलणें भाऊसाहेबाशीं गर्व दारुण। वकील आले माघारे वृत्तान्त कळविला जाऊन ॥ चाल ॥ गिलच्यांनी कावा केला। तीन कोस सोडून भाऊला ॥ भंवता वेढा घातला। रस्ता चालू देइना झाला ॥ वाणी उदमी बंद केला। गौळी माळी तो राहिला ॥ तेली तांबोळी हलवायाला। कोणी जाऊं देइना त्याला ॥ असा तीन महिने दम धरिला। पुढें धारण आली फौजेला ॥ अदपाव दाणे रुपयाला। खरा खोटा घ्या दाखला ॥ तेल तूप मीठ मिरचीचा तोटा पडला। नीर देही अंतकाळ झाला ॥ चाल ॥ नाना भाऊ बसून डेऱ्यांत करती विचार। अन्न दृष्टी पडतां झालें खोबरें ॥ पाण्याची किंमत नऊ रुपयास झालें शेर। निमें अन्न निमी शाडू भक्षिती लोक सारे ॥ पोटाचे महद्दुःख सोसेना तिळभर। पोटाविण ओढून काचा बांधी कंबर ॥ म्हणे भांग तमाखु अफीम राहिली दूर। भाऊशीं बोलुनी मिळुन अवघे लष्कर ॥ नेऊन घाला गिलचांवर झालों निष्ठुर। हत्ती घोडे मरती दाणावर ॥ कां घेतां रांडपण घरीं बसून। भाऊ नाना० ॥ ९ ॥

गिलच्यांनीं हुकमत करून भाऊ वेढिला बहुत युक्तिनें। जठराग्नि चेतला खवळला व्याघ्र पंचानन ॥ झांगड नौबत वाजती दणादण भेरे वाजे संगीन। डंके झाले पताकाच्या घोड्यावरतीं ठेविलें जीन ॥ फौजा झाल्या तयार निष्ठुर कर बळाच्या मैदाना। चोरडांक एकही होती गिलचांशीं नाहीं कळलें संधान। गिलचा झाला घाबरा आणि वेढा उठविला जलदिनें ॥ दोनी दळें झालीं तयार त्यावेळे करतां नारायण ॥ आदितवारीं लढाई नेमलीं दस्ते आले जलदीनें। भाऊस बातमी कळली जरिपटका

गेला चालून ।। चाल ।। गिलच्यांनीं रणखांब पूजिला । भाऊशीं वर्तमान कळला । काय पहातां गलीम सांपडला । एकदांच हरहर केला ।। रोहिले आघाडी जे जाला कडाबिन सुचनाला ।। ऐशी हजार होळकर भाला ।। शिंद्यांना मार खूप दिला ।। बाण सुटती तीरकमानीला । अरब हपशी तो रोहिला ।। गोसावी धुंदकत चालला ।। करबलानें घोडा चमकाविला ।। बाराभाईच्या मंडपावर ढाला ।। फौजेचा बंद मग तुटला ।। भाऊसाहेब अंबारींत डुल्ला । दादु महातानें हत्ती पुढें नेला । आंदु जाडियले हत्तीला ।। तीरकमान हत्ती धरला ।। पांडव दळीं बिभीषण आला ।। का पहातां वीर खवळिला ।। दिली सरवत्ती तोफेला ।। नऊ हजार गोळा उडाला ।।चाल।। तासे मर्फे ते तंबूर किती वाजती । कर्णे किती एक रणबहिरी कर्कती ।। गिलच्यांच्या तोफा कुलपी गोळे गर्जती ।। ध्रु० ।। कोट बाण जशी ढगांत वीज चमकती । दणादण मेरू मंडळ धरणी कांपती ।। बारा हजार पालखी भाऊची झाली रिती । तीन लाख घोडा गर्द जरीपटक्याचा हत्ती ।। ऐशी हजार होळकर गर्दी नाहीं दिसती ।। पायदळाचे गोळे जागोजाग पडले किती । सोकला कंठ मग पाणी पाणी बोलती ।। जखमांची नाहीं गणती कबंध नाचती । स्वर्गाचे देव पाहती वर्णिती अमरावती ।। गगनीं झाकले सूर्य चंद्र भिऊन । भाऊ नाना० ।। १० ।।

गगनीं झाकले सूर्यचंद्र मग पडला अंधकार। गलिमानें पुरविली पाठ भाऊ हटेना तो रणशूर । सोनपतावर लढाई भाऊ अंबारींत कमान तीर ।। बाणे बंदुकिचे फेर झडती तोफेचे गोळे पडे जसे गार ।। गोळ्या-सरसा भाऊ उडाला दादु महात चकाचूर ।। बापलेक ओळखेना धरणीमाय जागा देईना अल्प जर। नानासाहेबाशीं डांक आली ते गेले हामी सादर । झाले घोडयावर स्वार बाईस कळिलें धरला पदर ।। बोले गोपिका-बाई पुण्याचे । राज्य कोण करणार । भाऊसाहेब गेले आम्ही तरी काय राहुन करणार । ब्राह्मणी राज्य पेशवाई बुडाली असें नाहीं होणार ।।...।।

॥ चाल ॥ पैजेचा विडा उचलिला । सारी शाही पाहती नानाला ॥ भाला कटार सूर्य दाबला । दोन लाख घोडा बरोबरीला ॥ रणामधें जाउन शिरला । झाली चकमक एकच हल्ला ॥ चाळीस हजार जिरेटोपवाला । नानापाशीं कत्तल झाला ॥ होळकरानें फितवा केला ॥ हें ठाऊक नाहीं नानाला । वैऱ्यांनीं वैर साधिला । मग जखमा चढल्या नानाला ॥ जसा भीष्म कर्ण युद्धाला ॥ मुरद पाईना धरणीला । अरब हपशीपत्रें रोहिला । तो घारीवाणी उडाला ॥ घोड्याहून खालीं आला । लढण्याचा हेत नाहीं पुरला ॥ नाना पडला धर मग सुटला । गिलच्यानें मार खूप केला ॥चाल॥ खंदकांत माईना लोक उंट घोडे सारे । गिलच्यांचा एक दस्त यश रण-शूर ॥ नऊ लाखांतले सातशें उरले सारे । तोफा बंदुका पडल्या सुने दिसती डेरे ॥ मोहरा पुतळ्या रुपयांचे जागोजाग पडले ढिगारे ॥ पडलेल्या फौजेचे मागें कोण घेणार ॥ हत्ती उंट मोकळे घोड्यांचे खिल्लार । कोणी लूट घेईना पळतां जीव बेजार ॥ गेले दाही दिशावर पळून । भाऊ नाना० ॥ ११ ॥

शके सोळाशें पासष्ट फाल्गुन वद्य षष्ठी आदितवार । नऊ रात्र नऊ दिवस लढाई मग फिरले माघारे ॥ सातशांनीं धरली वाट पुण्याची निर्माल्य लष्कर । बेदड घालती छापे वाट चालेना तिळभर ॥ पुढें बिकट बारी कैसा तारील परमेश्वर । असे सांडाव हेत आले अटक उतरून नऊ कोसावर ॥ चाल ॥ तिथून अवघे फुटले पुण्याचे रस्ते भुलले । फारदिसा भुलीमध्यें गुंगले ॥ नऊ खंड फिरतां चकले । अन्नाविण वाळुन सुकले ॥ भक्षिती झाडांचे पाले । गोसावी किती एक झाले ॥ तंबू हातीं घेतले । किती रामेश्वराकडे झुकले ॥ काशीचे रस्ते धरले । या रीतीनें सैन्य खपलें ॥ दैवांचें पुण्याशीं आलें । लाखोटे सदरेवर पडले ॥ दुःखाचे सागर फुटले । ................. ॥ चाल ॥ लाखोटे वाचिता झाले अवघे घाबरे । नानाभाऊ बुडाले पुण्यास आली खबर ॥ नानाभाऊ बुडाले

परंतु लौकिक दुनियावर। नवलाख बांगडी फुटली असला हाहाकार॥ दक्षिण बुडाला सती पडल्या महामूर। श्रीमंताच्या तक्तापाशीं मलेभले मनसुबीदार॥ स्थापिले गादीवर माधवराव नेणार। सोन्याची जळली भट्टी उरलें खापर॥ शाहु क्षत्रपतिचें देणें सांब अवतार। गातो सगनभाऊ ठिकाणा शाहुनगर॥ गातो फत्तेजंग पवाडा करून। भाऊ नाना॥ १२॥

## २ : खडकीची लढाई

(दक्षणच्या पेशवाशीं घाला कधिं नव्हता आला। गंगाधर शास्त्र्यावरून राज्याचा नाश झाला॥) धृ०॥ गंगाधरशास्त्री मारले पंढरपुरांत। चोरबातमी गेली इंग्रजांच्या घरांत। तेथुनि रचिला कलंकी ऐका आश्चर्याची मात। त्र्यंबकजी डेंगळे हवालीं करून झाले शांत। दोन दिशीं वाद मिटला ठेविले ठाण्यांत। पुढें व्हायाचें पळून गेले सहाव्या महिन्यांत। इंग्रजांच्या पहाऱ्यांतुन असा कोण गेला॥ १॥

कोट किल्ले दिले ओलिला त्रिंबकजीसाठीं। एक महिन्याचा वायदा मसलत केली उफराटी। वसई सुभा दिला रे देवा आडकेली ताटीं। कसा तरी जिव वांचो पडल्या दुष्टांच्या गांठी। बाबासाहेब गेले पंढरिला विठ्ठलाच्या भेटीं। उजवें फुल द्यावें आम्हां माहुलिच्या कांठीं। गोविंदराव काळ्यानें मनसुबा पहा कैसा केला॥ २॥

बापु गोखले मुळींच ऐका बेटावर गेले। बेट जाळून निघुनशानें खडकीवर आले। दोघांचे मोर्चे भिडले आकाश कडकडलें। बापु गोखले जाऊनशानें तोफेवर पडले। टोपीवाल्याची फरडी झाली लढाईवान पडला। लहान थोर जन रणभूमीशीं युद्धास आला। दोहों सैन्यांचा बहुतसा चेंदा तो झाला॥ ३॥

दोन पलटणी येऊन पुण्यावर गारपिरीं भरल्या। युक्तियुक्तिनें

उठवून लावितां खडकीवर ठरल्या । आश्विन महिना एकादशी तलवारी झडल्या । तेराव्या दिसचा समाचार ऐकुन घ्या दाखला । सत्राशें एकुणचाळीस ईश्वरी नाम संवत्सराला ॥ ४ ॥

लाख फौजेचा जमाव झाला श्रीमंतांपाशीं । रणभूमीवर येऊन पडल्या तोफांच्या राशी । आल्पिष्टनसाहेब स्मिथसाहेब आले रागाशीं । सिंधुराच्या टेकडीवर दिल्या तोफांच्या राशी । आल्पिष्टन साहेबाचा हुकूम तो करडा झाला ॥ ५ ॥

करनलसाहेब होते पलटणींत । आले धावून खडकीच्या मैदानांत । लढाई करून बहुत केली मात रंजुक झडत । पाचेचा हिरा दडेना वाटोवाटी चंद्र गगनांत । बापु गोखल्या सकळ सुरवर स्तविती रणांत । तीन लाख फौज पळून गेली बापु गोखला राहिला रणांत । युद्ध केलें त्यानें युद्ध केलें बहुत । बाबासाहेब विश्वास देऊन माहुलीस गेला । बापु गोखला लढतां सवा प्रहर दिवस आला ॥ ६ ॥

दळणासरसे किडे रगडले रडती नरनारी । लेंकराला माय विसरली कसा ईश्वर तारी । आधीं गेले ते पार पडले पुण्याच्या पारीं । पुण्यावरती चढले झेंडे केली वारासारी । जो येतो तो लढतो हातामधीं भाला घेऊनी । सगनभाऊ म्हणे ऐशी ईश्वराची करणी । बिबिछन म्हणे चंद्रसूर्याशीं कलंक लागला ॥ ७ ॥

## ३ : दुसऱ्या बाजीरावाचा पोवाडा

गगन कडकडुन पडलें, पार नाहीं दुःखाला अरे दुःखाला । श्रीशैल्यमल्लकार्जुना आम्ही अंतरलों सुखाला ॥ ध्रु० ॥

शिरीं दुःखाचे डोंगर ग्रहदशा पाठिला । एक वरिस नऊ महिने प्रभुरायाच्या भेटीला । गाया अनाथापरी दिवस वैऱ्याचे लोटिला । जग-

निवासा का अंतरलों रेशिमगांठीला । आनंदांत केलें राज्य सोनें बांधून काठीला । दुनिया बापुडी दिसती, पैसा असून गांठीला । दक्षिणचें सौभाग्य गळसरी कोण्या रोहकाला । अरे रोहकाला ॥ श्रीशैल्य० ॥१॥

रायाच्या मनीं नवते, पडूं नये उपाधीला । चौघांनीं भरी भरून घातली गोष्ट विषादिला । फुटली मुठ आवळ्याची *राव पडला अवकाळीला । फास करुनि केसांचे शत्रूंनीं समया साधिला । लक्षांचें अन्न गेलें राव अंतरलें गादीला । एकटे पक्षावाणी उडाले टाकून मादीला । बंगले, बागबगीचे वस्त्र लाखाचें फुकाला । अरे फुकाला । श्रीशैल्य० ॥२॥

कशी उचलली तळी मिळाले ते बारामाई । परदेशीं पांखरूं कसें केलेंस विठाबाई । तीथवार सण कैचा, जंगल वस्ती कोण्या ठायीं । पंचप्राण शहराकडे वढतील ओस दिशा दाही । आग लागली दर्यांत बुडालें जहाज ठिक नाहीं । वनवास आला राजेंद्राची निजली शेषशाई । ज्याचें होतें त्यास पारखें, काळोखी मुखाला । अरे मुखाला । श्रीशैल्य० ॥३॥

रोजगार सावकार बंद उदम्याचीं दुकानें । केविलवाणें जन आपापल्या राव दुःखानें । नाहीं निखालस उदीम, आठरा बंद कारखाने । फिकीर झाली प्राप्त काळजी ज्याचा तोच जाणे । धड अहेव न रांडकी न कैसें केलें भगवंतानें । निरउपाय झाली गोष्ट कंबर कसली घोरानें । वडला वडली नव्हता बोल लागला हो नखाला । अरे नखाला । श्रीशैल्य० ॥ ४ ॥

भोळा माझा सांब वामन अहो निर्मळ काया । त्याच्या पदरचे चार उठले, बसले बुडवाया । निमकहरामी झाले लक्षपती धन खाया । सात ताल हवेलीचा ज्यांनीं ढासळला पाया । शिकारखाने रमणे ब्राह्मण मोकालिती धाया । एक्या प्राण्यावांचून शहर करिती गायावाया । थानपिते बालक लोटून दिलेंस रघुराया । मी अनाथ माउली कशी नाहीं आली

तुज माया । रयत बिचारी लोल झाली उपटली पराला । अरे पराला । श्रीशैल्य० ॥ ५ ॥

पुण्यासारखें शहर चहुं मुलुखीं दुसरें नाहीं । छत्रपतीचें देणें सवाई श्रीमंत पेशवाई । कृष्ण गोकुळीं नांदत होता तैसी सकळ शाही । नाच तमाशे गायन• कारिती भौती रोषणाई । शेळीनें व्याघ्रास पिटिलें राहिले ठायीं । आधार महा आक्रीत, झाले लागले तत्काला पाय । बाळा बहिरू म्हणे कीं धन्य ईश्वर करणी काय ?। घोर होइल परी हरण चार दिवस स्वस्थ राही । सगनभाऊ म्हणे परिसा विनंति उतरावें तुकाला । अरे तुकाला । श्रीशैल्य० ॥ ६ ॥

## ४ : प्रतापसिंहावरील पोवाडा

मुळापासून चाल झाली कुठें दिसेना अंतर । बाळासाहेब हुशार करकट्टे लढणेवाले फार । इंग्रजांनीं घेतला मुलुख चालुन आले दक्षणेवर। कोलापुरवाल्याशीं जिंकिलें लढण्यास टिकेना कोणी फार । शहरामध्यें द्रव्य फिरविलें राज्य घेतलें हातावर । सारें शहर फिरून आला डेरा दिला पवय नाक्यावर । साहेबलोकांनीं देउनी ताजीमा पहिली खुर्ची केली मोहर । मनामधिं कांहीं भीति आणुं नये आपला चालला एकच विचार । चौदा पेट्याचें राज्य करावें आम्हांस आनंद फार ॥ १ ॥

बुवासाहेब बाळासाहेब मारून टाकावें जलदिनें फार । आपासाहेब मागून बोलता झाला भाऊबंद कसे मी मारूं । आपल्या हातानें घ्यावा प्राण मारा सांगतों किल्यावर । इंग्रजांनीं तयार तोफा आणल्या पवय नाक्यावर । जलदिनें हा बार भरून हल्ला उठविला किल्यावर । शहरामधिं झाली चलबिचल बुवासाहेबास दहशत पडली फार ॥ २ ॥

बाळासाहेबास आला क्रोध लढाईची करून तयारी । सारें लष्कर शिबंदिशीं जलदी फार । बुवासाहेबास कळली बातमी हात जोडून

बाळासाहेब मोहरें । आग लागो द्या लढण्याला इंग्रज येईना हार ॥ सातारकिल्ला प्रताप खूपे जिंकिला इंग्रजांनीं कैद केलें । बाळासाहेब बुवासाहेबास जलदिनें निंबावर नेलें । अंबारींत बंधु बैसले झालरी लाविल्या हत्तीला । इंग्रजांनीं जिंकून सातारा आपला अंमल बसविला । बाळासाहेबास वनवास ईश्वरान दिला । अवघे मानकरी येति भेटिला राजा नाहिं होणार साताऱ्याला ॥ ३ ॥

निंबावरती डेरा दिला बारा दिवस वनवास कंठिला । पुन्हा तेथुन निघून चालले पुण्यक्षेत्र काशिला ॥ ऐन जंगलामधिं राजा जन्मला जंगली राजा नाम पावला । सगन भाऊ गर्जे सभेमध्यें यानें पवाडा केला । मोठ्यामोठ्याची कीर्त करितो अशी चाल होइना कोणाला । बुवासाहेब बाळासाहेब यांनीं धास्ती पाळून व्यर्थ प्राण सोडीला । अवघ्या राज्याची हीच गती पुकार झाला सर्वांना । अवघे राज्य करीना लढाई खंडणी देती बहादुर इंग्रजाला ॥ ४ ॥

## ५ : साळू सासऱ्याला जाते

अर्ज विनंती ऐका लोभ हा साळू सासऱ्याला जाते । सख्या मला मूळ आलें नाहि तरी एक मास आणखी रहातें । मुळारंभींची कथा सांगतें ऐकुनि घ्यावी गुणवंता । सहज आले यात्रेस गांठ अवचित पडली लक्ष्मिकांता । नेत्र भरून न्याहाळिले तुम्हांला आनंदलें चंद्र पाहतां । त्या संगें प्रीत घडो असा कधीं पावशिल पंढरीनाथा ? । नाभीकमळापासुन इच्छिले जेव्हां तुम्हि मजकडे पाहतां । खुशि झालों एकमेकांवरती गांठ कशि पडेल एकांता ? । मरयादा सोडुन विचारिलें नगरामधें तुमच्या राहतें प्रीतीचीं लक्षणें जाणतां प्रीत कराशि वाटतें ॥ १ ॥

आज्ञा वंदुनी आले प्रियकरा चालत अनवाणी पाई । फोड आले तळपायाला सुखलक्ष आहे तुमचा ठाई । दिपवेळीं दिपसमयीं शहरामधें

उतरले गुणग्राही । वरतमान लिहुन पाठविले सांगा सख्याला त्वलाही । ऐकतांच राजश्री उठले आनंद हृदयीं न माई । दृष्टभेट होतां आधिंच फुरफुरली डावी बाही । पहिले दिवशीं रात्रौ समयीं एकांत निर्भीड जेथें । प्रसन्नता मर्जि उभयतां इष्की सागरा आलें भरतें ॥ २ ॥

इतकें असुन साजणीं युक्त बुडली सांग कशी । प्रीतिचें उत्तर कांहीं सुचेना वेधलें या शरिराशीं । ऐकुन घ्यावें राजपुत्रा निच बोलते आपणाशीं । वचन उगवलें तुमचि कल्पना पुढें कशाची गुणराशी । हर प्रयत्नें पडेल प्रियकरा रंग महालीं सुख सेजेशीं । विडा कोणाचे हातचा घ्यावा दुर केलें धरलें स्त्रियेसी । तूं लग्नाचा जोडा जैसा निर्मळ गंगाजळ वाहते । आम्हांसारख्या उदंड मिळतिल भंवताले खाते गोते ॥ ३ ॥

गौरविलें स्वामीला घेतला निरोप विषय आंवरेना । पाकष्नेहा मधें अंतर नाहीं साक्ष पंढरीराणा । तुमचा शहरामधें नांदतो परदेसिं नाहीं सजणा । जेव्हां जिवाला वाटेल तुमचा आतां पाहिजे गुणगहिना । तेव्हां स्वार अश्वावर होऊन दरकुच गेले निजमुखना । बोलवित चालले राज बनसीच्या तुर मोती दाणा । ज्याच्या आंगीं इष्क बिंबला तो समजेल वर्म पुतें । सगनभाऊ म्हणे इतर पुरुष रसभोगी सुज्ञ ज्ञाते ॥ ४ ॥

## ६ : असीं किरे प्रित वाढल

असीं किरे प्रित वाढल किर्त जनांत न होय हासी ॥
सख्या रे अपुली पत अपुल्या पशीं ॥ ध्रु० ॥
मायबापाचा लौकिक राहिल असे कांहीं साधन करा ।
पुढील धूर्त वाजरी कांहीं धरा ॥
परनारीशीं भाषण करितां विचार नाहीं बरा ॥
आधिंच आहे तुमची छबेली तऱ्हा ॥
स्वरूप तुझें चांगलें फिरूं लागतिल तेव्हां गरगरा ॥

झोंबतिल बळं तुमचा पदरा ॥
आबरूस बट्टा होइल थट्टा पडशिल दांत घसीं ॥ १ ॥

भाउबंद सोइरे गणगोतांत असावा ठसा ॥
उगवला सूर्य गगनीं जसा ॥
दुपारची सावली नाहीं धन दौलतिचा भरंवसा ॥
काळ कंठावा चालेल तसा ॥
आली दुनिया उफराटी फार तुम्ही सावधगिरिनें असा ॥
चांगला ठिकाण पाहुन बसा ॥
ह्या रांडा घरघाल्या सख्या तूं पडशी दांत घसीं ॥ २ ॥

मोत्यासारखें तेज आपली आबरू दवडूं नका ॥
भरम चौघामधीं फोडूं नका ॥
वाणी उदमी सावकार दुकानदारी तुम्ही मोडूं नका ॥
कुणाचें कर्ज तुम्हि काढूं नका ॥
श्रीमंताचे दरबारीं येणें जाणें सोडूं नका ॥
जोडला आश्रय तोडूं नका ॥
सत्य बोलावें वचन लागुं नये खोट्याचे संगतीशीं ॥ ३ ॥

पत गेल्यावर लक्षाधिश सावकार असला जरी ॥
कोण इतबार याचा घरीं ॥
ऐसें समजून चित्तीं उमजून शोध करा अंतरीं ॥
पुढला विचार पहावा तरी ॥
बाळा राघु म्हणे खरें त्वां सांगितलें सुंदरी ॥
गोष्ट ही ठसली हृदयांतरीं ॥
सगनभाऊ म्हणे बसुं नये सिंदिचे छायेसी ॥
सख्या रे अपुली पत अपुल्या पशीं ॥ ४ ॥

## ७ : मज पापिणीची दृष्ट

मज पापिणीची दृष्ट सख्याला लागल गे बाई । सीताकांत रघुनाथ पती मज जन्मावर देई ॥ ध्रु० ॥ अधिच रंग सावळा करुन पोषाख भरजरिचा । मुखी सूर्याची कळा जसा कां पुतळा मदनाचा । राज बनसी बावरा मुशाफर उमदा नगराचा । ती उपमा शोभे रायाला सत्य वचनाचा । छेल बटाऊं मोहोना राणी जोडा इष्काचा । तशी प्रित उभयतां आनंद चित्ताचा । मीच अशी दैवाची पार मज भाग्यासी नाहीं ॥ १ ॥

आम्हि कुळीच्या स्त्रिया जातिवंताच्या गुणगहिना । चित्ता जोगा पतिराज बनसी राजिवनयना । पट्टराण्या भंवताल्या मध्यें मी चंचळ मृगनयना । येतां जातां कवळून धरतां मैलागिरि चंदना । चौ प्रहराचे चार करून शृंगार मनमोहना । उभी राहाते सन्मुख मनासी आनंद माईना । माझ्या मनाची आवड सख्याची होऊं कांहीं उतराई ॥ २ ॥

मान्यमान्यता करून मोहिले त्या पतिरायाला । प्रित ठेवाल कीं मजवर लागेन तुमच्या पायाला । नेणतपण आलडपण बसों उभयतां न्हायाला । हात टाका छातीवर लुब्धते तुमच्या पायाला । करा चुनडी पोषाख शुभ्र पातळ नेसायाला । माझ्या मनची आवड असावी पतिच्या सेवेला । मी आपला जिवप्राण करिन खुरबान या ठायीं ॥ ३ ॥

नाना परिचे बिलास करि ते त्या रंगमहालांत । कवटाळून सजनाचा धरिला एकान्तीं हात । जाईजुई मोतिया शेज पुष्पाची खुप वक्त । करून सोळा शृंगार कपाळीं कुंकूं शोभत । वचनीं गोउन सजन मोगिला मोत्याची जात । स्वरूप पतिचें चांगले मिळाली ज्योतिस ज्योत । सगनभाऊ कविराज नित्य प्रसंगांत गाई ॥ ४ ॥

## ८ : चंद्राचें चांदणें सितळ कां उष्ण

चंद्राचें चांदणें सितळ कां उष्ण प्राणपती ॥ तें सांगा मजप्रती कल्पना डोळ्यामधिं खुपती ॥ ध्रु० ॥

चांद रात्रीचा चंद्र पौर्णिमेचा चंद्र गोड ॥ आवड मनाची सांग साजणी नको पडूं देउं कोड ॥ अत्तर अर्गजा केशर कस्तुरी आण लाड लाड ॥ खुल्या चांदण्यामधिं लावा उदबत्त्याचें झाड ॥ निवांत निश्चयपणें राजसे ऐकून घे कोड ॥ शशी तेज पाहातां उभयतां मग होइल फोड ॥ चाल ॥ पाहुन तेज कांती चला मंदिरांत जाऊं ॥ करंगळ्या धरून आदरें बाहेर परतोनी येऊं ॥ खुण मिळल्यावरी अपुली मुख भरूनि विडे घेऊं ॥ शशी तेज उष्ण कां समजुत पडली गुण शांती ॥ १ ॥

आपण सितळ असल्यास प्रभा चंद्राची शीतळ दिसती ॥ आपण उभयतां उष्ण कल्पना मनिं वसती ॥ पर चंचळ बावरी सख्याला अति आदरें पुसती ॥ तीं तांत्रिक लक्षणें प्रितीचीं चतुरा परि वस्ती ॥ राव बाजीचें शहर नमुना पुणें ग्राम वस्ती ॥ अहोरात्र अहो दिवस होती इष्काची कुस्ती ॥ चाल ॥ अर्ज-विनंती पहिली मी उभी कर जोडून ॥ गुणग्राहिक गुण पाहातां आले ब्रह्मपुरीं सोडून ॥ राव सवाई समशेर ठेविले चित्तीं ताडून ॥ लाजून बसते भिडून जडूं दे लाडलीला मोती ॥ २ ॥

समजूत माझी झाली शुभ्र पोषाग करी जरिचा ॥ सिरपेंच तुरा कंठीं चौकडा झोंक भिकबाळिचा ॥ हिरव्या पाचुची सैली पदक तळीं लोलक निळीची ॥ रत्नजडित करीं कंकण झगमगतो चडावाचा ॥ दृष्टी भरून पाहातें छबिला शहर बडोद्याचा ॥ चटकचांदणी बनलें मला घ्या शालु पैठणीचा ॥ चाल ॥ चमकली जसी बीजली अति गर्जना करुनी ॥ तुमचें स्वरूप आगळें उगवला सहस्र तरणी ॥ पेहेराव करिन आगळा निर्मळ वस्त्राभरणी ॥ लंपट स्वरूपावरून पांखरावाणी फिरेन भौती ॥ ३ ॥

चंद्र मध्यासी आला आतां एक विनंती माझी ॥ ख्यालीखुशाली-मधिं सख्या खेळुं चौसर बाजी ॥ डाव सख्याचा आला सखीवर जोबन केला जी ॥ नग्न गंगास्नान कराया न व्हावें वाजी ॥ जशी मोहनानें बटावासंगें केली इष्कबाजी ॥ बोभाटा दक्षिणेंत कळला जन म्हणती वाहवा जी ॥ पचाळ ज्योतिशी ज्योत मिळाली क्षणभर बसते जवळी ॥ तुम्हीं फुल गुलाबाचें मी शेवंती पिवळी ॥ रमतां सुख संतोषेंहि तनु नूतन कवळी ॥ सांभाळ करा माझा सुंदर वचनाला गौती ॥ सगन-भाउच्या कवनावरती फंदी लोक झुरती ॥ ४ ॥

## ९ : कस्तुरीचा सुगंध

कस्तुरी वाळवित होते माडीवरती । बेदरची कामसेना चतुर गुणवंती ॥ ध्रु० ॥ बेदर शहर आदि ठिकाणा । पात्रा नांदे कामसेना ॥ चतुर गुणवंत देखिला वदना । घरिं अमिर द्रव्य खजिना चढती नवती । सहा राग छत्तीस रागिण्या जाणत होती ॥ चाल ॥ सहा राग छत्तीस रागिण्या जाणत होती । कंठांत जसी कोयाळ बोलुन पुरती । ती एके दिवसीं बसली माडीवरती । अंमल अडचा प्रहाराचा दुपार कलथी । कस्तुरी वाळवित होती आपले हातीं । मध्यम सुटला वायु त्याच वक्तीं । त्या कस्तुरीचा श्वास वायु संगतीं । दौलताबादेस गेला राव बाच्छायाप्रती । आज कस्तुरी कोणापसीं श्वास मारिती । याउपर दिवाण बोले बाच्छाया-प्रती ॥ १ ॥

दिवाण म्हणे बाच्छाया अवधारीं । बेदरीं वाळत असे कस्तुरी कामसेनाचे माडीवरी । कीं पवनें श्वास आला येथवरी । कीं सत्य जाणा । बाच्छाय म्हणे सांभाळून बोला वचना ॥ चाल ॥ बाच्छाय म्हणे सांभाळून बोला वचना । हे लटके झाले तरी सिर माराना । ती वेळ लिहिली त्याच दिनमाना । मग जासुदाची जोडी केली रवाना । ती गेली बेदरीं जिथें

कामसेना । ऐकतां पुसूं लागली धुंडती कवणा । जासुद म्हणे बाच्छाये धाडिलें आपणा । पत्र दिधलें तिजपासीं वाची कामिना । विचित्र हास्य कस्तुरी नांव निघतांना । वाळविली कोणे दिवसीं वेळ सांगा ना । लिहुन पाठवा ठिक या अर्थी । मग बहिरी निजामशाहा गणिका पुसती ॥ ३ ॥

अमुक दिवस असुक वेळ । पत्र लिहीता गणिकाचे वेल्हाळ । लखोटे दिले करून त्या वेळ । दिधले जासुदाजवळ । कीं जोडी फिरली दौलताबादेस ताबडतोब गेली ॥ चाल ॥ दौलताबादेस ताबडतोब गेली । बाच्छाई कचेरी होती तेव्हां भरली । खुर्निसा करून जासुदें पत्र अर्पिलीं । साबाजि अनंतानें हुजर वाचिली । तो दिनमान ती वेळ ठीक निघाली । ऐकुन हासे बाच्छाय शाबासकी दिधली । आज पत्र तुझी चतुराई आम्हांस कळली । ही वार्ता दुनियामधें प्रगट झाली । साबाजी रणाळेकर चातुरवल्ली । बेदरी निजामशाहिची जोडी बनली । ती इकडे कामसेना मनांत झुरती । साबाजी अनंताला पाहुन म्हणती ॥ ३ ॥

गणिका तेव्हां कामसेनानें । सर्व शृंगार काढिला तिनें । बिंदि, सिसफूल गळ्यामधें रत्नें । नथनी बुलाख सुढाळ वदने । गळ्यांत चिंचपेट्या मनगट्या मणि । कुसुंबी जरी पिसवाजरेल चरित कंठीं ॥ चाल ॥ कुसुंबी जरी पिसवअवेळ जारित कंठीं । रुणझुण पायिं पोल्हारि जोडवे बोटीं । वरकड डागिन्याची घेतली पेटी । बत्तिस आभरणें अवचळ द्रव्य गांठीं । गाडींत बसुन चालली बाच्छाय भेटी । स्वर्गीहुन आली रंभा सुखाचे साठीं । ही उपमा साजे तिला चतुर मोठी । पोहोंचली दौलताबादेस हर्ष चित्तीं । चांभार टेकडीजवळ घेतली वस्ती ॥ ४ ॥

गायन करी कामसेना पुरती । जंगली हरणें तेथें होतीं । आलाफ केला त्याच ठायाप्रती । गवरी रागिणी झालि बोलती । तो आळविला तिनें । त्या नारिजवळी आलीं जंगली हरणें ॥ चाल ॥ त्या नारिजवळी

आलीं जंगली हरणें । बैसला तिचे सन्मुख रागज्ञानानें । हार गळ्यांतिल काढिला त्या गणीकेनें । हरणाच्या गळा घातला आप हस्तानें । मग बाच्छाया फिर्याद केली त्या नारीनें । तुमच्या नगरामधें मला झालि आठवण रात्रीं । गळ्यांतुन हार नेला चोरून । ह्या ठिकाणीं लावावा मेहरबान । ऐकुन बाच्छाय म्हणे दिवाणाप्रती । हार इचा इजला द्यावा ऐसें म्हणती ॥ ५ ॥

हुकूम बाच्छाय ऐक असा जाहला । सावाजि अनंत तेथून निघाला । संगें घेऊन कामसेनेला । तेव्हां तो तिसी पुसूं लागला । कोणे ठिकाणीं घेऊन गेला चोर त्या रानीं । मग दोघें चाललीं तेव्हां हस्त धरूनी ॥ चाल ॥ मग दोघें चाललीं तेव्हां हस्त धरूनी । हार गेला तेथें बसली दोघे जाउनी । मग काय केलें सावाजि अनंतांनीं । तो सर्वगुणसंपन्न पूर्ण चतुर ज्ञानी । आळवी राग तेव्हां त्याच मैदानीं । हा सर्व मेळ हारिणाचा ऐकुन कानीं । त्या दोघांजवळ आले प्रीति करूनी । त्यामधि नाहीं आला हाराचा धनी । मागुन आला तयाचे पंक्तीं । तो आणिला कचेरीस बाच्छाय तेव्हां पाहती ॥ ६ ॥

फिरयाद झाली त्याच दिनमानीं । हार आणविला तिसऱ्या दिनीं । बाच्छाय खुशी त्यास पाहुनी । धन्य एकाहून एक ज्ञानी । झाली गणिकेसी मेहरबानी । मोहोरा दिधल्या तबकभर । ती म्हणति भोग मजला उभी समोर ॥ चाल ॥ ती म्हणती भोग मजला उभी समोर । माझा हेत आहे सावाजि अनंतावर । एक रात्र द्यावी मजला घटका चार । हें बरें म्हणून बाच्छाये दिल्हें उत्तर । सांगितलें सावाजिला तिचें उजूर । मग सावाजी अनंत गणिका ती नार । अहो कळलें तें तेव्हां माडीवरती । पंजांतिल मदन त्या दिवशीं तिच्या हातीं ॥ ७ ॥

माडीला शिडी होती लाविली । प्रथम पायरी काढिली पहिली चढतां येईना ऐशी केली । चढूं जातां पायरी शेवटली । नाहीं असें

पाहुनी तेथें खुंटली । साबाजीस म्हणे हस्त द्या मज कारण । साबाजि अनंत उठला तेथून ॥ चाल ॥ साबाजी अनंत उठला तेथून । पंजा धरतांना तिचा उतरला मदन । संपूर्ण जाहली भोग भोगिल्याविण । हरला कामसेनेचा गर्व पूर्ण । गुरु गोविंदराव वस्ती वाई ठिकाण । हा नाथसांप्रदाय स्वतः ज्याचें दर्शन । द्वादश पंथाचे आदेश नाथ नमनीं । सिद्धनाथ कविची कविता नाथपंथी ॥ ८ ॥

## १० : निवाडा

सवति सवतिचा कजिया लाउनी तुम्ही देतां स्वामीराया । लाउनी पदर मुखीं आडवा हसता नाहीं तुम्हां तिळभर माया ॥ ध्रु० ॥ मी वचनाची खरी राजसा साक्ष तुझ्या चरणाजवळी । उत्तरासि प्रतिउत्तर दिघलें नाहीं तुम्हां कवणे काळीं । सखीला तुम्ही जवळ घेतां मला ठेवितां दुर महालीं । रोज उठोन पाहाते नित्य बसविली तुम्ही तिजवर पाळी ॥ चाल ॥ काय आवड आहे जिवलगा तुम्हाला तिची जी जी जी । मी गोरी गोमटी आवड तुम्हा सवतिची जी जी जी । मग मागुन केली तीच जाहली प्रीतिची जी जी जी । लावून कडी द्वाराची रावजी बसत गंजिफा खेळाया ॥ १ ॥

दुसरी म्हणे ऐक राजसा गोष्ट सांगतें तुजपाशीं । वडिल जाहले म्हणुन काय तिनदां टाकुन बोले सवत मसीं । ही म्हणती मी फार चांगली इचें गोरेपण इजपासीं । मी अमंगळ ज़र असेल चांगुलपण दावित नाहीं ही कोणासी ॥ चाल ॥ ही मलाच म्हणते स्वामी माझा फितविला जी जी जी । सवतिनें साधला वैर सुतनी सुतविला जी जी जी । काय करूनि चेटक करणी मथविला जी जी जी । बग गुती गुतविला लाविलें मला मंदिरीं झुरवाया ॥ २ ॥

साजव म्हणे ऐक सुंदरी दोघी सारख्या तुम्ही मजला। तुला उणे काय केलें साजणी गडे अन्नपाण्याला। वस्ता थारा एकसारख्या देतों तुम्हाला घालायला। उंच मोलाचीं वस्त्र सारखीं देतों तुम्हा नेसायला। ॥ चाल ॥ कोण्या गोष्टीची कमी नाहीं आजवर जी जी जी। जें मागशील तें देईन भरला अंबर जी जी जी। तुम्ही आपल्यामधीं कां करित किरकिर जी जी जी। किरकिर करितां रोज येतां कपाळ माझें उठवाया ॥ ३ ॥

सगनभाऊ म्हणे निवाडिला न्याय दोघींचा हा जाणा। एकमेकींची चहाडी सांगतिल आपण आणूं नये मना ॥ ४ ॥

## ११ : मुशाफर

आम्हि मुशाफर लोक प्रीत करूं पाहतों साजणी। दीपकळीचा रंग पाहुनी पतंग झुरतो मनीं ॥ ध्रु० ॥ का प्रवासी आम्ही जाहलों सांगतों आहोंत घरचे सुखी। घोर जिवाला लाउन गेली परम जिवाची सखी। जिवंत अथवा मृत्यु पावली आम्हास केलें दुःखी। कारण काय तुम्हा सांगावें जाहला असा घातकी। चळण वळण पाहण्यांत बरी दिसतिस रत्नपारखी। प्रितपरीक्षा करूं नका हाडसी दुसरी जागा चुकी ॥ चाल ॥ या कर्मानें जरजर साजणी। नाहीं येत पुण्याची सर गे साजणी। पाहिले गडे गंगातीर साजणी। पाथ उतारा आलों शरीर घेऊन उभा आंगणीं। लोटुन देऊं नको फिरुन आम्ही जाउं कोणत्या वनीं ॥ १ ॥

आहे मुशाफर बरें बोलता कर ठेवुनिया कटी। कासावीस झाल्याविण कोण करी शितळ अशा संकटीं। या कर्मानें निसुर बैसले घरामधें एकटी। प्रीतीच्या मंत्राची नाहीं दिधली मातेनें घुटी। काळेसावळें स्वरूप माझें राख घेऊन भर मुठी। नित्यकाळी आंगास लाविते काय होईल शेवटीं ॥ चाल ॥ होईल तें होऊं कसें साजणा। नाहीं करीत

कोणाची आस साजणा । औषधास वेडा ऊस साजणा । गोड निघे ना रस कडूपण काढिले वीरळा सुती । ही गोष्ट मोठी कठिण पाहा घर दुसरी जागा निश्चिती ॥ २ ॥

उत्तरास प्रतिउत्तर दिधलें मनिं आमच्या मानिलें । चित्तातिल वर्म कर्म आवघें प्रत्यक्ष जाणिलें । गोड कडू निवाडितां कशानें स्नेहउदकिं नाहले । एक दुःख उभयतां असावें कल्पदोष छाणले । गांवींच्या मजा गांवीं राहिल्या त्यांतुन गुण आणिले । पहिल्यापासून केलें निवेदन इष्कानें तान्हले ॥ चाल ॥ तूं बहुत योग्य चांगली साजणी । तुझ्यापासी वृत्ति रंगली साजणी । विसरावी गोष्ट मागली साजणी । या जर वेडा डागिली जिव्हे देही मात्रा बहुगुणी । जिवंत तोंपर्यंत नाहीं जाणार तुला टाकुनी ॥ ३ ॥

धन्य चतुर सामर्थ्यवान सन्मान करितें अतां । एक वचन राहिलें बसा सेजारीं राव ऐकतां । पार्थविराच्या रथी सारथी श्रीपती रणांत स्वतां । कौरवासहित नागिवली जगीं मानमान्यता । कृपा करून भगवान जानें मुखपाठ शिकविली गिता । मग कां अर्जुन पुन्हा चालिला अभिमन्युकरतां । ॥ चाल ॥ अक्षर धरावें चित्तीं साजणा ॥ या कलियुगाच्या प्रीति साजणा । मागिली कीर्ति आठविती साजणा । धरून मुशाफार हातिं सखे दे इष्काची सरबती । सगनभाऊ म्हणे विघ्न निवारी रुक्मीणीचा पती । तुम्ही मुशाफर लोक प्रीत करू पाहतां कोणत्या रिती । प्रीतीचा आवभाव काय तो सांगावा मजप्रती ॥ ४ ॥

## १२ : नार चंचल मनिं घाबरी

जाते ग बायांनो नार चंचळ मनिं घाबरी ॥ पुरुषाचा पोशाक करुनिया झाले रानभरी ॥ ध्रु० ॥

कर जोडून विनविते सख्यांनो मला न्हाऊं घाला । चर्चुन मैलागिरी उंच स्वासकि अत्तर तेला । पांच पेच अलबेली आणा कोणी

बांधुन पगडीला । आंगिं रेखिला जामा रुंद पट्टीचा बुंद शेला । सजवून तुरुंग खासा वर नखऱ्याचा ठेविला । ढाल लाल गेंड्याचि रंगित हातीं समशेर भाला ।। चाल ।। खंजीर ते गा कंबरेस कसुन फाकडी । तीर कमान दुसरी हातीं फुलाची छडी । अश्वावर स्वार जाहली थेट कानडी । रंगिली बत्तिसी घवघवित मुखी बिडी । मैत्रिणी उभ्या त्या एकाहुन एक चढी । अश्रुपात वाहती हुंदतात घडिघडी । बोळविसी आवडी कां जणूं जाते माहेरीं । लोभ असुं द्या आतां मायबहिणी आम्हांवरी ।। १ ।।

घेउन मुशाफर वेष फाकडी अप्रतिम सजली । मर्दानी दागिने आंगवर चमचमाट बिजली । दाही बोटी आंगठ्या डुबवस्तामध्यें गजबजली । थवथवित शिरीं केस अत्तर चमेलीमधें भिजली । गुप्तरूपी एकांतिं मागल्या द्वारानें धजली । निरवानिरव करून सखी जाते मजलोमजलीं ।। चाल ।। मनिं हेत धरून मार्गानें चालली त्वरें । दरकूच निघाली ती विषयानें त्वरें । मग तृषा लागली व्याकुळ जाहली बरें । करी भरून घेतली झारीं प्राण घाबरे । त्या वनामधें वृक्षावर वनचरें । किजबिज करिताती जातिवंत पांखरें । मृदु उत्तरें बोलतो का परदेश तिरीं । राघु साळुंकीला सांगतो इश्कबाज कुमरी ।। २ ।।

राघू उत्तर करी पद्मिनी ऐका दृष्टान्त । प्रीतिचीं लक्षणें जाणती चतुर गुणवंत । प्रधानकन्या पुत्र सावकाराचा बळिवंत । बाळपणींचा मित्र सखा नित्य रमे एकान्त । कोणे एके दिवशीं उभयतां उदासलें चित्त । वर्तमान कळतां राजाला करि प्राणघात ।। चाल ।। तूं भ्रतार माझा मैलागिरी चंदन । आलें हृदय भरून मुखचंद्राकडे पाहून । शामकर्ण वारु तुजसाठीं सजविन । घेईन सतीचे वाण म्हणे कामिन । त्या रणांगणीं पाणी तुम्हास पाजिन । घालून मुखामधें मुख दिल्हें वचन । असा हेत परिपूर्ण असेल तर जा खुशाल नारी । कार्याकारण केलि निवेदन पुढें कथा भारी ।। ३ ।।

ऐक राघवा बत्तिस लक्षणी मी चतुर मार्यो । तसाच माझा सत्पुरुष तो गुण प्रकाशसूर्या । सर्वसंपन्न गुणसंपन्न गुणातित त्याच्या सौंदर्या । उपमा द्यावया न मिळे पुरुष स्वामि ऐश्वर्या । आज्ञा द्यावी मला पांखरा वळखलीस चर्या । निवडून सांगितला चांगला प्रीतीचा पर्या ॥ चाल ॥ घरिं आणिन उचलून ललकारी वारूला । एक वेळ देउन दमचाक करून फेरिला । हे कंटक वन दारूण ऐक दाखला । चालावे घोड्या दूर पंथ राहिला । घोकणी करित तिथें आसल सखा एकला । यास्तव लौकर भेटावें राजबनसीला । मग जीव संतोषला सुखाची रात्र जाइल सारी । रुसरुसुनि बोलणें बरें केलें हो घरबारी ॥ ४ ॥

सख्याकडिल वर्तमान निर्मळ पंचमीच्या दिवशीं । वृंदावनीं चालले कृष्णाजी द्वारकानिवासी । जे वेळीं सय जाहली प्रियकिरण नाहीं त्यापासीं । उदासले अंतरीं लागला चरका चतुरासी । अकस्मात येऊन पोहोंचली कामिना सुगुण गुणरासी । जवळ नव्हती सुखें लोटल्या रत्नाच्या रासी ॥ ॥ चाल ॥ म्हणे उभे असावें चरणावर लोळतें । घालुनी गळ्यासी मिठी हो कवटाळितें । मुखचंद्र तुमचा आदरें कुरवाळितें । कल्पना घेऊन सांगा माझा पाळितें । आज रंग सख्या रंग बहारिनें खेळतें । मनिं इच्छा पुरवुन घ्यावी कसी टळते । राया वोवाळिते मागली कथा प्राणप्यारी । सगनभाऊ म्हणे रत्नपारखी ऐकतील सारी ॥ ५ ॥

## १३ : आलें माहेरचें पत्र

आलें माहेरचें पत्र सख्याला विनवणी सांगा । कृपा असावी मजवर ऐशी प्रार्थना सांगा ॥ ध्रु० ॥

मोकळे नाहीं पत्र लखोटे करून पाठविले । येतांक्षणीं प्राणविसावा किंचीत जवळ नाहीं ठेविले । दोन्ही कागद वाचुन पाहावें काम आहे लिहीले । आत्मराज तुम्ही माझे तुमच्या इष्कामधें पोहोले । जे हृदयाचे

मित्र त्याला नाहीं सांगितलें । ही शेवटची भेट मी तर मेल्याहुन मेले । फार तुम्हाला छाळिलें जसे बोलिले तागा ॥ १ ॥

आयुष्यमर्यादा माझी काय आहे त्रिनेत्रा । निमे सख्याला द्यावें निश्चयें कमलोद्भवनेत्रा । दरीद्र हारण केलें ठेवीलें चांगले मित्रा । दिले घेतले तुमचे खातें ठावें सर्वत्रा । त्वरा आतां जायाचे घरीं यावें सत्पात्रा । गुणगोविंदें वाटे लावा सीरच्या सीर छत्रा । जे झाले ते बरेच झाले जिवीच्या जीवलगा ॥ २ ॥

काय तुझी उतराई होऊं सीर पदीं ठेवीलें । सारें निरुपण सांगा सख्याला हंसाला पाहीलें । षडरसी पक्कान्न मिष्टान्न सोवळ्यानें केलें । चरचरीत शाखा पात्रावर संतोषें जेवीलें । अमुका समुख भोजन केलें तें आठवले । आतां बरोबर कैसें जेवण प्राणाला मुकले । क्रियाभ्रष्ट झाल्यास धरित्री देइना नागा ॥ ३ ॥

खीसमतदाराच्या हातीं पत्रिका दिल्या भावार्थें । नानापरीचे करुन बोलणें घेउनिया येथें । मुखजबानी सांगितली ऐकिली रायानें तेथें । जमाखर्च मागेंच नाहीं वहीवर खातें । जावें अथवा राहावें गरज नाहीं शोधुन पाहा पुरतें । तुमची क्रिया तुम्हांस लागेल काय जाईल येथें । सगनभाऊ म्हणे जायाचें कोण आहे सखा जोगा । बौद्धयरूपीं पंढरीस हरी तो स्मरा पांडुरंगा ॥ ४ ॥

# टीपा

## रामजोशी :

'रामजोशी केवळ शब्दप्रभु आहे; शब्दाचें औचित्य त्याला कळत नाही.' असा आरोप त्याच्यावर केला जातो. पण रामजोशांच्या लावण्या वाचतांना हा आरोप तितकासा खरा असावा असें वाटत नाही. संस्कृत परंपरा व संस्कृत काव्य यांची छाप रामजोशीच्या काव्यावर बरीचशी पडली आहे हें खरें. पण शब्दप्रभुत्वाबरोबरच अर्थानुसारी शब्दरचना, अनुप्रास आणि पदलालित्य या तीनहि गोष्टी त्याने संभाळल्या असल्याचें स्पष्ट दिसतें. 'सुंदरा मनामधें भरली' या काव्यांतील कोमलता व 'हटातटानें पटा रंगवुन' या काव्यांतील जोम विचारांत घेतला तर रामजोशीच्या शैलींत औचित्य नाही हें तितकेंसें पटत नाही. अनुप्रासाच्या नादीं लागून कांही ठिकाणीं क्लिष्ट व दुर्बोध शब्दरचना आली आहे. पण अशीं ठिकाणें तुलनेने फारच कमी सांपडतील. ऐतिहासिक, सामाजिक, पौराणिक व उपदेशपर अशा चार प्रकारच्या त्यांच्या लावण्या आहेत. पौराणिक लावण्यांत 'कृष्ण-गोपी' च्या लावण्या विशेष उल्लेखनीय आहेत. या पौराणिक व्यक्तींना देखील त्यांनीं महाराष्ट्रीय साज चढविल्याचें दिसेल. त्यांच्या गोपींचीं नांवें उमा, रमा, सखू, साळू अशीच आहेत. त्यांची वेषभूषा महाराष्ट्रीय आहे व त्यांच्या तोंडांतील शिव्याहि महाराष्ट्रीय आहेत. त्यांच्या 'भला जन्म हा तुला लाभला' अशा सारख्या उपदेशपर लावण्यांनी मोरोपंतासारख्या कवीला वेड लावलें असलें व त्यांच्याकडून त्याबद्दल त्यांनी 'कविप्रवर' ही पदवी घेतली असली तरी त्यांच्या 'लौकिक' व 'कृष्ण-गोपीच्या' शृंगारिक लावण्यांतून, त्यांच्या काव्याचें खरें अन्तरंग आपणास दिसून येतें.

( १ ) **तुळजापूर वर्णन** : तुळजापूर हें भवानीचें जागृत स्थान म्हणून महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. सोलापूरपासून जवळच हें गांव निजामच्या हद्दींत आहे व रामजोशी तुळजापुरास उत्सवास दरसाल जात असत अशी माहिती श्री. शाळिग्राम यांनी तळटीपेंत दिली आहे. पदलालित्य व अनुप्रास या जोडीला यांतील भक्तिभावहि उल्लेखनीय आहे.

**भुते-भुत्ये**-देवीचे भक्त. गळ्यांत कवड्यांच्या माळा, हातांत पोत व कपाळीं मळवट असा यांचा अवतार असतो. **विश्वगोळा वी**-विश्वगोलाला जन्म देणारी. **बाला**-आपाला ( ग्राम्य शब्द ).

( २ ) **म्हणे सुभद्रा** : हें कवन म. म. दत्तो वामन पोतदार यांनीं संशोधून प्रकाशित केलें. य. न. केळकर यांच्या 'तंतकवि तथा शाहीर' या पुस्तकांतून हें येथे घेतलें आहे. मध्यंतरीं एखाद्या शब्दाच्या फरकाखेरीज मूळ कवन जसेंच्या तसें छापलें आहे. सुभद्रेच्या भावनांचा विकास या कवनांत अतिशय चांगला दाखविला आहे. पहिल्या कडव्यांत मनाविरुद्ध दुर्योधनाशीं लग्न ठरविणाऱ्या भावाविषयीं राग, दुसऱ्या व तिसऱ्या कडव्यांत अर्जुन कुठे असेल याविषयी कल्पना आणि चौथ्या कडव्यांत अर्जुनाच्या विरहाने झालेली अवस्था व तिला झालेला दृष्टान्त-असे या कवनाचे तीन भाग पडतात. अनुप्रास व श्लेषात्मक रचनेची आवड, संस्कृत शब्दाबरोबर गांवढळ शब्द ताबडतोब वापरण्याची लकब इत्यादि रामजोशांच्या शैलीचीं वैशिष्ट्यें या कवनांत आढळतील.

( ३ ) **रुक्मिणी म्हणे** : ही लावणी म्हणजे दुसरें एक सुंदर नाट्य-गीत आहे. रुक्मिणीच्या भावना व त्यांना शेवटीं मिळालेली कलाटणी यांचें अतिशय सुंदर चित्र यांत काढलेलें आढळेल.

**चैद्यपतीच्या मुला**-शिशुपाळा.

( ४ ) **पुण्याचें वर्णन** : रामजोशींचा हा पोवाडा फार प्रसिद्ध आहे. पुणें व पेशवाई यांच्या पूर्ण वैभवाचें वर्णन यांत केलेलें आहे. पुण्याच्या वैभवाबरोबरच पेशवाईतील पराक्रमाचें यांत आलेलें वर्णन जोरदार आहे.

**महाराजांचे**-शाहू छत्रपति महाराजांचे. **भीकमागा**-भिकारी. **तेहि गेले कोठें-करीना रे जागे** : भिकारी शहरांतून नाहीसे झाले. मग त्यांना

दान देऊन धर्म करण्याची संधि कोठून मिळणार ? **ज्यान बतीस**–जीन बॅपटिस्ट. **लुंगा**–हलकासलका. **शिरकेल कोणता काळ कोरण्या मुंगा**–कोणत्या काळाची असें राज्य पोखरण्याची छाती आहे ? **मुंगा**–गर्व.

| | |
|---|---|
| **सगोपंत**–सखारामपंत बोकील.<br>**देवराव**–देवाजीपंत.<br>**विठ्ठल**–विठ्ठलसुंदर.<br>**नाना**–नाना फडणीस. | } पेशवाईंतील साडेतीन शहाणे |

विठ्ठलसुंदर वास्तविक पेशव्याचा वैरी होता व राक्षसभुवनच्या लढाईत तो पेशव्याकडून मारला गेला. तरी त्याचा उल्लेख पेशव्याच्या बाजूने केला गेला आहे.

( ५ ) **दुष्काळ** : १७९७ चे सुमारास व त्यानंतर महाराष्ट्रांतील राजकारणांत सर्वत्र अंदाधुंदी पसरली होती. ' ब्राह्मणी राज्य जोरदार ' म्हणून ज्या राज्याची रामजोशींनी स्तुति केली त्याच राज्याला निर्नायकीमुळे उतरती कळा लागलेली त्यांना दिसत होती. १८०२ सालापासून मराठी राज्यांत पुष्कळच बंडें उद्भवलीं होतीं. पेंढाऱ्यांच्या टोळ्याहि पुष्कळ उठल्या. या बंडवाल्यांनी व पेंढाऱ्यांनी सर्वत्र लुटालूट करून लोकांना हैराण केलें आणि मुलूख उध्वस्त करून टाकला. १८०३ मध्ये होळकरांनी तर सर्व मुलूख बेचिराख केला. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं या वर्षी पुण्याला मोठा दुष्काळ पडला. शालिग्राम या पोवाड्यासंबंधीं माहिती देतांना म्हणतात, " लॉर्ड व्यालेन्शिया या नांवाचे इंग्रज प्रवासी या वर्षीं मुंबईहून पुण्यास आले होते. ते म्हणतात कीं खंडाळ्याजवळ एका तळ्यावर दुष्काळाने मेलेल्या माणसांचीं सुमारें १०० प्रेतें गिधाडें व कुत्रीं ह्यांनीं खातांना त्यांनीं पाहिलीं. " पोवड्यांतील हें वर्णन व अनंतफंदीच्या ' माधव ग्रंथा ' च्या पांचव्या अध्यायांतील दुष्काळाचें वर्णन वाचत असतांना या दुष्काळाच्या तीव्रतेची कल्पना येते. रामजोशींनी या दुष्काळाच्या भीषणतेचें यथार्थ व परिणामकारक वर्णन केलें आहे. बेबंदशाहीचें वर्णन करतांना बंडवाल्यांनी जनतेच्या केलेल्या छळाचें वर्णन, दुष्काळामुळे लोकांचा झालेला नैतिक अधःपात आणि त्यांची अगतिकता याचें वर्णन रामजोशींनी अत्यंत करुण रीतीने केलें आहे.

रामजोशींच्या भाषेच्या करामतीची साक्षहि आपणांला या पोवाड्यांत पटते.

पृ. ११ **चिकाआंत**–चिकाच्या पडद्या आंत. ज्या निका पढविल्या–ज्यांना चांगल्या रीतीनें संगीताचें शिक्षण दिलें. **पिकाशीं गळ लाविती**–कोकिळेच्या गळ्याशीं गळा मिळवितात. **फास गळ्यामधि बास पाठीवर लोह हडा लाविती**–गळ्याला दावें बांधून पाठी बांबूनें सडकतात किंवा हाडावर लोखंडी कमट्यांनी मारतात. **तोकांचें**–अर्भकाचें. **किती सागर उदकें वाव्हलें**–पळून जात असतां कित्येक समुद्रांत बुडून मेले. **लया रुद्र करी**–रुद्र प्रलय करीत आहे. **घरघाली**–सर्वनाश करणारी. **रुद्रविंशति**–प्रलयकाळ. पृ. १२ **मधुपानें**–मद्यपान करून. **चव धरी**–जोरावर असणें. **भावकी**–बंधुभाव. आपलेपणा. **जराक**–किंचित्. **कणा पावती सणि**–पैशाला धान्याचा एक दाणा मिळूं लागला. पृ. १३ **डाजली**–जाचली, सलली. **काळरीति ठाकली**–प्रलयकाल आला. **सुधी**–शहाणे लोक. **जुना जिन्नस वरी उणा वाटे**–वाईट व जुना जिन्नस मिळाला तरी तो अधिक वाटूं लागला. **शिका कोठडी केली**–( मकेसारख्या धान्याला सुद्धा ) कोठडीमध्ये मोहोर करून ठेवण्याची पाळी आली. **पितळ पुतळि आटली**–जवळचे सुवर्णालंकार मोडण्याची वेळ आली. **वा रे वेळाचि सराफा रे लाभली**–ही सुंदर वेळच सराफांना मिळाली. **फरदा**–एकेरी वस्त्र.

( ६ ) **वसंत** : ‘ होरी ’ याचा अर्थ ‘ होळीच्या सणांत वसंतोत्सवासंबंधीं व इतर शृंगारविषयक गाणें ’. ( शब्दकोश ) शिमग्याच्या सणाच्या वेळीं स्त्री–पुरुषांनी आनंदाने साजरा केलेला वसंतोत्सव असा सामान्यतः ‘ होरी ’ या शब्दाचा अर्थ व्यावयास हवा. राधा–कृष्ण व गोपी यांच्या वसंतोत्सव प्रसंगींच्या क्रीडेचें वर्णन या काव्यांत रामजोशी यांनी बहारीचें केलें आहे. राधेने कृष्णाचें व कृष्णाने राधेचें रूप घेतल्यामुळे निर्माण झालेला संभ्रम, निरनिराळ्या वाद्यांचा नाद, एकमेकींवर रंग टाकण्यांत व व कृष्ण म्हणून राधेचाच अनुनय करण्यांत रंगून गेलेल्या गोपी–या सर्वांचें चित्र एखाद्या कुशल चित्रकाराच्या ऐटीने रामजोशी यांनी आपणापुढे उभें केलें आहे. नाद आणि अर्थ यांचा मेळहि या काव्यांत किती अकृत्रिमपणें बसलेला आहे. पृ. १४ : सुरताल, पखवाज, खंजिरी, मंजरी, बासरी, बिन,

अमृतकुंडली, डफ, सारंगी, मोरचंद, झाजरी–हीं सर्व वाद्यांचीं नांवें आहेत. **फाग**–होळीचा सण. पृ. १५ **मुखामधें हास हिऱ्याची खणी**–चेहेऱ्यावर हास्य असल्याने दिसणारे दांत ही जणूं हिऱ्याची खाणच अशी कल्पना. **वसंतऋतु संतान**–'वसंतऋतूचीं जणूं अपत्यें. फुललेलें कुंज व वृक्ष हीं जणू वसंतऋतूचीं अपत्येंच' अशी कल्पना. **लाखुली**–लाख संख्या. पृ. १६ **कोण गाण गोपी कांपती**–( इतकी धुम उडाली होती. ) कीं गोपी कोणतें गाणें म्हणत आहे हें कळत नव्हतें.

( ७ ) **छेकापन्हुति अलंकार** : रामजोशांची नावाजलेली अशी ही दुसरी लावणी. छेकापन्हुति अलंकाराचा यांत चांगला उपयोग केला आहे. प्रथम राधिका व तिची सखी यांचा संवाद आहे. द्व्यर्थी शब्द वापरून कृष्णावरील आपल्या प्रेमाच्या खुणा ती सखीला सांगत आहे व सखीने 'तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया तरी।" असा प्रश्न विचारल्यावर ती मिष्किलपणें तिला हुलकावणी देत आहे. दुसऱ्या भागांत कृष्ण व त्याचा मित्र यांचा संवाद असून राधिकेवरील प्रेमाच्या खुणा कृष्ण अशाच द्व्यर्थी शब्दांनी प्रगट करीत आहे व आपल्या मित्राला हुलकावणी देत आहे. अर्थ-चमत्कृतीच्या दृष्टीनें ही लावणी अतिशय चांगली आहे. पृ. १६ : **अंबर**–( १ ) आकाश, ( २ ) वस्त्र. **पयोधर**–( १ ) मेघ, ( २ ) स्तन. पृ. १७ **सुवर्ण**–( १ ) सोनें, ( २ ) चांगला वर्ण. **गुणवंत**–( १ ) दोरीने युक्त. दोरींत ओवलेला, ( २ ) गुणवान्. **व्यसन**–( सं. ) वारा. **सुवंशातीला**–चांगल्या वेळूं ( बांबू ) तून निर्माण झालेला. **वंशसंभवा**–( १ ) वेळूपासून बनविलेली, ( २ ) चांगल्या कुळांत जन्मलेली.

( ८ ) **विरहातुर गोपी** : कृष्णाला अक्रूराने मथुरेंत नेल्यानंतर गोपींची गोकुळांत कृष्णविरहाने जी अवस्था झाली त्याचें अतिशय उत्कट वर्णन या लावणींत आढळेल. शेवटच्या कडव्यांतील नवस करण्यासंबंधींच्या किंवा जाणता जोशी किंवा पंचाक्षरी आणण्यासंबंधींच्या कल्पना तत्कालीन समजुतीच्या द्योतक आहेत. कृष्ण मथुरेंत कुब्जेच्या नादीं लागला आहे अशी वार्ता कळल्याने त्यांच्या मनांत जागृत झालेल्या असूयेचें चित्रहि

परिणामकारक रीतीने रेखाटलें आहे. ‘ रांड ’ हा पुन्हा पुन्हा लावणीत येणारा शब्द मात्र कानाला खटकल्यावांचून राहात नाही.

( ९ ) **श्रीरंग गोपिकोत्संग** : श्रीकृष्ण व गोपी यांच्या वसंतोत्सवांतील रासक्रीडेची ही दुसरी लावणी. पदलालित्य, अनुप्रासाची आवड व वर्णनाचा थाट पूर्वीच्या लावणीसारखाच आहे.

पृ. १९ : उत्संग–सान्निध्य. कंज–कमल. पुंज–झुबका, गुंज ( ? )–गोला–बिंडा. विड्या–विडे. पृ. २०.

(१०) **झाली तरुणपणाची धूळ** : रामजोशांनी लिहिलेल्या लौकिक विषयांवरील लावण्यांत उत्कटतेच्या दृष्टीने ही उत्कृष्ट ठरेल. अगदीं थोड्याच ओळींत विरहभावनेचें चित्र त्यांनी फार चांगलें रंगविलें आहे. ‘ सर्पापरि गमती गडे गळ्यामध्यें हार ’ किंवा ‘ सजणाविण झालें दीन । जसा तप्त वाळूमध्यें तळमळतो मीन ’ या कल्पना भावनेच्या उत्कटतेची साक्ष देतात. लावणीचा शेवट ठराविक पद्धतीने नायिकेला शकुन होण्यांत व सजणाचा जासूदाकरवीं निरोप येण्यांत झालेला आहे. ‘ नारि पतिविण कशि बरी दिसल । परपुरुष घरामधि घुसल ।। ’ या ओळींतून व ‘ नातरि तो परनारीसी गुंतुन फसल ’ या ओळीवरून तत्कालीन नैतिक शैथिल्याची थोडीशी कल्पना येते.

(११) **तुम्ही सजणा–सुजणा** : या लावणीच्या कर्तृत्वासंबंधीं बरीच अनिश्चितता आहे. ही लावणी रामजोशांच्या संग्रहांत श्री. शालिग्राम यांनी घातली आहे व होनाजी बाळच्या ‘संग्रहांत’हि घातली आहे. लावणीच्या शेवटीं कविराजाचें नांव आहे व बाळा बहिरूचेंहि नांव आहे. श्री. य. न. केळकर यांच्या मतें ही लावणी बाळा बहिरूची आहे. पण या बाबतींत निश्चित असें कांही सांगणें कठीण आहे.

(१२) **सुंदरा मनामधें भरली** : रामजोशांची ही एक उत्कृष्ट ठरलेली लावणी आहे. स्त्री-सौंदर्याचें अत्यंत मोहक व त्याचप्रमाणे उन्मादक वर्णन यांत केलेलें आढळेल. हें वर्णन करतांना स्त्री-सौंदर्याच्या संस्कृत काव्यांतील कल्पनेचा ठिकठिकाणीं त्यांनी आधार घेतला असला तरी हें वर्णन सांकेतिक नाही. मराठमोळा स्त्रीच्या सौंदर्याचीं सर्व वैशिष्ट्यें त्यांत प्रगट झालीं आहेत.

तिचा साज शृंगार सर्व महाराष्ट्रीय आहे. ही सोनचांफ्याची कळी झुमकेदार पैंजण घालून नाकांत बुलाख, वेणींत मूद व राखडी घालून कंबरेला सोन्याचा कंबरपट्टा घालून आपल्या सौंदर्याच्या तरवारीने जणूं प्रत्येक वाचकाचें अन्तःकरण घायाळ करीत जात असल्याचा भास कविता वाचतांना निश्चित होईल. कवितेंत साधलेल्या अनुप्रासामुळे काव्याला एक गति मिळाली आहे; पण अनुप्रास साधण्याच्या भरांत क्लिष्ट व दुर्बोध शब्दरचनाहि आली आहे.

(१४) **कोण्या ग सुभगाची :** 'सुंदरा मनामधें भरली' या लावणीचीच ही छोटी आवृत्ति आहे. अतिशय थोडया शब्दांत नायिकेचें अतिशय उठावदार वर्णन करण्याचें रामजोशांचें कौशल्य या लावणींत प्रतीतीला येतें.

(१५) **ते (२०) :** या सर्व लावण्या उपदेशपर आहेत. रामजोशी कथा-कीर्तनेंहि करीत असत. त्यामुळे 'दो दिवसाची तनु ही साची' किंवा 'भला जन्म हा तुला लाभला' अशासारखा वैराग्यपर उपदेश त्यांच्या कांही कवनांतून येणें अपरिहार्य होतें. किंबहुना अशा उपदेशपर लावण्यांनीच मुग्ध होऊन मोरोपंतांनी त्यांना 'कविप्रवर' ही पदवी दिली. पण या लावण्यांतील निवृत्तिपर उपदेश सांकेतिक स्वरूपाचा आहे. रामजोशांच्या अनुभूतींतून तो निघाला नाही. त्यांची ती प्रकृति नव्हे. वैराग्याच्या नांवावर माजलेलें स्तोम व थोतांड यांचा रामजोशींनी बराच समाचार घेतलेला आहे. सुब्राव बुवा नांवाच्या साधूचा मठ रामजोशांच्या बैठकीच्या जागेजवळच होता. त्या बुवांचें प्रस्थ पाहून 'इटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि का शिरीं । मठाची उठाठेव का करी' असा त्यांना रोखठोक सवाल करण्यासहि त्यांनी कमी केलें नाहीं. या कवनांतून रामजोशांची अनुप्रासाची आवड, अर्थचमत्कृति साधण्याकडे प्रवृत्ति हे विशेष ज्याप्रमाणे दिसून येतात, त्याच-प्रमाणें साधे साधे वाक्प्रचार, रोजच्या व्यवहारांतील उदाहरणें देऊन आपलें म्हणणे पटविण्याचें कौशल्य हेंहि विशेष या कवनांतून विशेषत्वानें आढळतात.

(२१) **दैवें ही गांठ बयाबाईची :** ही अगदी वैयक्तिक स्वरूपाची लावणी आहे. बयाबाईची गांठ ही (रामजोशींच्या जीवनांतील) अतिशय महत्त्वाची घटना होती. 'कविता इजसंगें रंगा आली' अशी रामजोशी

स्वतःच कबुली देतात. तिच्या आवाजाला रामजोशींनी वाहिलेला हा काव्यमय नजराणाच समजावयास हवा.

**(२२) पेशव्यांचा शुक्रवारवाडा :** हा पोवाडा श्री. शंकरराव जोशी यांनी सोलापुरास मिळविला आणि भारत-इतिहास-संशोधकमंडळाच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध केला. ' शनिवारवाडा-वर्णन ' असें त्यांनी या पोवाड्यास नांव दिलें होतें. श्री. य. न. केळकर यांच्या मतें हा पोवाडा शुक्रवार-वाड्या-संबंधीं आहे व त्यासाठीं पुरावा म्हणून ' रामजोशी सोलापूरकर यांणीं गोकुला अष्टमीस शुक्रवारचे वाड्यांत कथा केली. सन्नत्र पारण्याचे दुसरे दिवशीं त्यास भोजनास बोलावून १०० रु. दक्षिणा दिली ' अशी बाजीरावाने स्वहस्तें लिहिलेल्या खासगी जमाखर्चांतील अस्सल नोंदहि प्रसिद्ध केली आहे.

पृ. २१ : **वसुदेव**—वसु—संपति. **वसुदेव**—कुबेर. **कृतमंदिर—चातुरी**—राजवाडा बांधण्याचें कौशल्य. **कटाडी**—कठडा. **बिछोने**—बिछाने. **जरबावी**—भरजरी १० वें **कडवें** : ' जर कवीने हें नगर सरोवर मानलें तर हें मंदिर कमळ म्हणावयास हवें. आणि लक्ष्मी कमलामध्येच निवास करते हें प्रसिद्धच आहे ' असा अभिप्राय. **रुबाब**—याबद्दल ' रबाब ' हा शब्द हवा. **रबाव**—एक प्रकारचें तंतुवाद्य.

## अनंतफंदी :

' फंदी अनंत कवनाचा सागर ' म्हणून ज्याचें होनाजी बाळने वर्णन केलें आहे त्याची फार थोडी कविता आज उपलब्ध असावी ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. जी कांही थोडीच कविता उपलब्ध आहे त्यावरून अनंत फंदींच्या काव्याविषयीं निश्चित अशीं कांही विधानें करणें कठीण आहे. ' माधव-ग्रंथ ' हें त्यांचें ओवीबद्ध असें महत्त्वाचें काव्य. त्यांतील पहिल्या पांच अध्यायांत सवाई माधवरावांच्या मृत्यूपासून ते बाजीराव गादीवर येईपर्यंतच्या घटना वर्णन केल्या आहेत. सहाव्या अध्यायांत पेंढार व दुष्काळ याचें वर्णन आहे. त्यांचे जवळजवळ सात पोवाडे उपलब्ध आहेत. त्यांत खड्यांच्या

लढाईवरील पोवाडा विशेष उल्लेखनीय आहे. दुष्काळ, पेंढार व बेबंदशाही यावर त्यांनी बऱ्याच लावण्या लिहिल्या आहेत. पण लोकांत त्यांची विशेष प्रसिद्धि त्यांच्या फटक्यामुळे आहे. त्यांचीं हीं उपदेशपर कवनें तडफदार व निर्भीड अशीं आहेत व त्यामध्ये आलेला व्यावहारिक उपदेश मोठा मौलिक आहे. त्यांच्या शृंगारविषयक लावण्यांत ‘ चंद्रावळ ’ विशेष लोकप्रिय दिसते. बाकी इतर लावण्यांत वैशिष्ट्य असें नाही.‘ फंदी अनंताची कविता । सवाई सोटा रे सोटा । ’ असें अनंतफंदीनें स्वतःच्या कवितेचें केलेलें वर्णन त्यांच्या फटक्यांना यथार्थ लागू पडतें. इतर लौकिक विषयावर त्यांच्या इतक्या थोड्या लावण्या उपलब्ध आहेत कीं त्यावरून अनंतफंदींच्या योग्यतेचें मोजमाप करणें कठीणच आहे.

( १ ) **खर्ड्याची लढाई** : ‘ खर्ड्याच्या लढाईवर जवळ जवळ दहा पोवाडे उपलब्ध आहेत. पेशवाईच्या पडत्या काळांतील हा अगदीं महत्त्वाचा विजय. नाना फडणीसांची सद्दी या लढाईच्या वेळीं कळसास पोहोंचली होती. निजामानें पेशवे व नाना फडणीस यांचीं सोंगें दरबारांत आणवून मराठेशाहीचा उपमर्द केला. तेव्हा नानांनी सर्व सरदार एकत्र जमवून निजामावर स्वारी केली. खर्ड्यानजीक ही लढाई होऊन निजामाचा पराजय झाला. अनंतफंदीच्या या पोवाड्याचे दोन चौक आहेत. पहिल्या चौकांत नाना फडणीसांच्या करामतीचें वर्णन आहे व दुसऱ्या चौकांत लढाईचें कारण, सरदारांची नांवनिशी, युद्धाचें वर्णन व विजयाची हकीकत हा भाग आला आहे. दुसरा चौक त्या मानानें फार त्रोटक वाटतो. वीर-रसाचा पुरेसा आविष्कार व्हावयास त्यांत वावच मिळाला नाहीं.

पृ. ३७ : **अवले**–पा. भे. आवले = वल्हें. **अति रतिकुल**–पा. भे. अतिरथि कुल. **तपसामर्थ्यें**–पा. भे. तप सामर्थ्यें. **येश**–पा. भे. अपेश. **झाकले**–पा. भे. धाकले. **महाभाव**–कारस्थान. **बुद्धीबळ**–‘ बुद्धीबळें ’ असें हवें. पृ. ३८ **धनुवर**–पा. भे धनवर. **सवार**–‘ सवारी ’ असा शब्द हवा. **महान**–‘ महाजन ’ असा शब्द हवा. **खिन्न**–छिन्न (?) **श्रीमंतांना**–पा. भे. श्रीमंतांनीं. **अजुरदा**–दुःखी, कष्टी, त्याचे पदरचे

जिवबा दादा, सुद्धां आणविले, परशुराम भाऊ मिरजवाले—ही ओळ अशी असावयास पाहिजे : ‘त्याचे पदरचे जिवबा दादा सुद्धा, आणविले परशुरामभाऊ मिरजवाले ।’ पृ. **सवाई माधवराव सवाई**—सवाई माधव सवारी.

(२) **शेवटचे बाजीराव** : या पोवाड्यांतील बाजीरावाची निंदा ‘माधवग्रंथांतील’ किंवा ‘फत्तेसिंग गायकवाडा’ वरील पोवाड्यांतील बाजीरावाच्या स्तुतीशीं विसंगत दिसते. यशवंतराव होळकरांचा गौरव केल्यामुळे अनंतफंदीचें व दुसऱ्या बाजीरावाचें पुढे बिनसलें असावें’ या श्री. य. न. केळकर यांच्या तर्काला या पोवाड्यावरून पुष्टिच मिळते. बाजीरावाला हा पोवाडा फंदींनी म्हणून दाखविला व त्यामुळें रावबाजी त्याच्यावर रुष्ट झाला अशीहि एक आख्यायिका ‘अनंतफंदी’च्या लावण्या व पोवाडे संपादन करणारांनी ‘चित्रशाळा प्रतींत’ दिली आहे. मात्र हा ‘पोवाडा’ म्हणून जरी म्हटलें असलें तर या ओव्या आहेत व ‘माधव–ग्रंथा’ मधील हा कुठला तरी भाग असावा असें वाटतें.

(३) **यशवंतराव होळकर** : यशवंतराव होळकर हे तुकोजी होळकराचे पुत्र. बाजीरावांनी आपला बंधु विठोजी यास मारलें म्हणून त्याबद्दल सूड उगविण्यासाटीं १८०२ सालीं त्यांनी पुणें लुटलें. या वेळीं बाजीराव पुण्यांतून पळून गेला व त्याने इंग्रजांचा आश्रय घेतला. या प्रसंगावर अनंतफंदीने केलेल्या पोवाड्यांत यशवंतराव होळकरांची केलेली स्तुति लक्षांत घेतां वेळ येईल तशी स्तुति करणें हा अनंतफंदीचा शिरस्ता होतो हें श्री. वर्दे यांचें विधान पटूं लागतें. या पोवाड्याच्या संपादनांत शाळिग्राम व य. न. केळकर यांच्या आवृत्तींत जी चूक झाली आहे तीच या ठिकाणीं झाली आहे. पहिल्या चौकांतील ३,४,५,६ व ७ या ओळी चौथ्या चौकांत पुन्हा जशाच्या तशा आल्या आहेत. त्याचप्रमाणे पहिल्या चौकांत ‘जे सावध’ या ऐवजीं ‘बेसावध’ आणि ‘बनकस’च्या ऐवजीं ‘बंक’ असे शब्द हवेत. **कुलकल्ला**—सर्वाधिकारी. **खटमार**—‘खाटमार’ असा शब्द हवा. खाटेला बांधून घालून दिलेला मार. ‘**खंड्या**’—या शब्दा-ऐवजीं ‘खंडण्या’ असा शब्द हवा. **जुरा**—रंगेल.

( ४ ) **फत्तेसिंग गायकवाड :** या पोवाड्यांत बाजीराव व फत्तेसिंग गायकवाड, व बडोदें आणि पुणें यांची गंमतीने तुलना केली आहे. पृ. ४२ पहिल्या दोन ओळींत ' महाराजे ' व ' साजे ' असा फरक हवा. तिसऱ्या चौकांतहि ' गाजे ' ऐवजीं ' गाज ' चुकून पडलें आहे. पृ. ४३ **उशाजवळ अमदाबाज**—ज्याप्रमाणे पुण्याला पैठणचे लफ्फे प्रसिद्ध आहेत, त्याप्रमाणे बडोद्याजवळ अहमदाबादचें कापड प्रसिद्ध आहे. **फत्तेसिंगाजी दाही दुराई**—' फत्तेसिंगाची द्वाहीदुराई ' असें हवें. **दुराई**—दवंडी. **मिजाज**—' मिजास ' असा शब्द हवा. **हारफेर**—फरक.

( ६ ) **चंद्रावळ :** अनंतफंदींच्या लावण्यांत ' चंद्रावळ ही लावणी विशेष लोकप्रिय आहे. चंद्रावळीचें कथानक कुठून घेतलें असावें यासंबंधीं निश्चितता नाही. हें कथानक केवळ मराठी असावें ' असें श्री. वर्दे यांचें मत दिसतें. मात्र ही चंद्रावळ पूर्णपणें मराठी दिसते. चंद्रावळीचें वर्णन वाचलें म्हणजे त्या वेळच्या स्त्रीसौंदर्याच्या काय कल्पना होत्या याची कल्पना येते. कृष्णाने राहीचें रूप घेतलें त्या वेळीं त्याने अंगावर जे अलंकार घातले त्यांचीं नांवेंहि आज परिचित नाहीत. दुसऱ्या कडव्यांत या सर्व अलंकारांचीं नांवें दिलीं आहेत. या लावणींतील कांही वर्णनें मात्र सदभिरुचीचें उल्लंघन करणारीं आहेत.

( ७ ) **उपदेशपर फटका :** हा अनंतफंदीचा अतिशय लोकप्रिय झालेला फटका. यामधील प्रत्येक ओळ व्यवहारज्ञानाची साक्ष देणारी आहे. ' विडा पैजेचा उचलुं नको ' ' असल्यावर भीक मागुं नको ' ' बरी खुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्रि नको ' बारीकसारीक तपशीलांतहि त्याने आपणांस नेलें आहे व संसारी माणसाला वर्तनक्रमाचा आदर्श घालून दिला आहे.

( ८ ) **ते (११) :** या चार लावण्यांतून दुष्काळाचें, बेबंदशाहीचें व जनतेच्या नैतिक अधःपाताचें वर्णन आहे. आठव्या लावणींत पेंढारांनी व बंडखोरांनी जनतेला किती हैराण केलें याचें चित्र आहे; नवव्या लावणींतहि रावबाजीच्या कारकीर्दीतील अनागोंदी कारभाराचें वर्णन आहे व ' येतील टोपीवाले अशी कांही दिवस झुलुक वाहील ' असें राज्यक्रांतीचें भविष्यहि

आहे. त्यावरून ही लावणी १८१८ नंतरची असावी असा श्री. वर्दे यांचा तर्क आहे. या लावणीचें दुसरें व पांचवें कडवें हिंदींत लिहिलें आहे. दहाव्या व अकराव्या लावणींत सामाजिक व कौटुंबिक जीवनांत सुरू असलेल्या अनाचाराचें वर्णन आहे. या चारहि लावण्यांतून व माधवग्रंथाच्या सहाव्या अध्यायांतील वर्णनांतून तत्कालीन हलाखीची व अंदाधुंदीची चांगलीच कल्पना येते.

(१२) **हे मूर्खा खूण तुर्का** : अनंतफंदीच्या उपरोधिक लावण्यांपैकीं ही एक आहे. ‘ जसें दिसतें तसें नसतें ’ हें अतिशय भेदक असें टीकेचें अस्त्र वापरून त्यांनी दाखविलें आहे. ‘ फंदी आनंदाचे छंद जिव्हारीं शस्त्र भोस्कीतसे ’ ही अनंतफंदीची उक्ति यथार्थ आहे असेंच लावणी वाचल्यावर वाटेल.

## होनाजी बाळ :

इतर शाहिरांप्रमाणेच होनाजीच्या लावण्यांचें स्वरूप त्रिविध आहे. पण होनाजीचे ऐतिहासिक पोवाडे तितकेसे गाजले नाहीत. पौराणिक व विशेषतः लौकिक विषयांवरील लावण्यांतूनच होनाजीने आपल्या प्रतिभेचे विशेष पैलू प्रगट केले आहेत. त्यांत ज्या भूपाळीने होनाजीला कमालीची लोकप्रियता मिळवून दिली ती ‘ घनःशाम सुंदरा...’ ही भूपाळी तर प्रसिद्धच आहे. पण होनाजीच्या काव्याचा विशेष जर कोणता असेल तर तो म्हणजे त्याच्या कवनांतून व्यक्त होणारी भावनेची उत्कटता. त्याच्या लौकिक जीवनावरील लावण्यांतून प्रेमभावनेच्या विविध छटांचें त्याने इतकें सूक्ष्म व उत्कट वर्णन केलें आहे कीं त्यांतील विविधता व वैचित्र्य पाहून त्याच्या प्रतिभेचें कौतुक वाटूं लागतें. शृंगाराच्या उत्तान भावनेपासून ते निपुत्रिकेच्या करुण भावनेपर्यंत स्त्रीच्या अन्तःकरणांतील विविध भावनांचें चित्रण अत्यंत उठावदार रीतीने होनाजी करतांना आढळेल. ‘ जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ’ अशासारखें प्रेमाचें तत्त्वज्ञानहि तो बोलून जातो. त्याची भाषाशैलीहि त्याच्या भावनेला साथ देणारी आहे. ‘ त्याच्या

काव्यांत भावना आहेत, पण ती व्यक्तपणानें उठविण्याइतपत भाषा-प्रभुत्व नाहीं.' हें श्री. य. न. केळकर यांचें विधान चुकीचें ठरविणारीं कितीतरी उदाहरणें होनाजीच्या काव्यांतून काढून दाखवितां येतील. मानवी मनाचें व विशेषतः स्त्रीहृदयाचें सूक्ष्म विश्लेषण हा होनाजीच्या काव्याचा महत्त्वाचा विशेष आहे. श्री. वर्दे यांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे होनाजी बाळाच्या काव्यांत वैचित्र्याबरोबर वर्णनाचा विलास, प्रसादासह प्रतिभा, आणि भावनेसह भाषेचें सौंदर्य आहे हें सहज पटेल.' त्याची या संग्रहांत निवडलेलीं कवनेंच या विधानाची साक्ष देतील.

( १ ) **भाळलोचना नागभूषणा :** या लावणींत शंकराच्या जटेंतील गंगा ही स्त्री आहे असें पार्वतीने वर्णन करावें व ती स्त्री नसून पाण्याची नदी आहे असें शंकराने पटवून देण्याचा प्रयत्न करावा असें वर्णन आहे. अपह्नुति अलंकाराचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

( २ ) **घनःश्याम सुंदरा :** 'या एकाच लावणीने मराठी वाङ्मयांत होनाजीचें नांव अजरामर होईल' असें श्री. वर्दे जें म्हणतात तें अगदीं खरें आहे. सहजरम्य वर्णनें, कोमल भावना आणि प्रसादपूर्ण भाषा यामुळे या भूपाळीने सर्व मराठी बोलणाऱ्या रसिकांचें हृदय काबीज केलें आहे. पहाटेच्या उजळत्या प्रकाशाने भूपाळीला सुरुवात होते, पहाटेच्या वेळचीं एक एक दृश्यें हळू हळू आपल्या नजरेसमोरून तरळूं लागतात आणि त्याबरोबर कृष्णाला उठविणाऱ्या यशोदेचें चित्र आपणापुढे उभें राहतें. यशोदा अनेक रीतीने कृष्णाला जागे करण्याचा प्रयत्न करते. 'पूर्व दिशेनें तोंड धुतलें; तूं देखील तोंड धुवून भाकरकाला खा' अशी लालूच दाखविते—वासरें गाईच्या स्तनपानासाठी खोळंबली असल्याची जाणीव त्याला देते—'पंच पंच उषःकालीं रवि-चक्र निघों आलें' तरीहि तूं झोपून राहिलास तर नंदाला कळेल अशीहि भीति घालते आणि शेवटीं 'हे माझे पाडसे सावळे उठ कृष्णाबाई' अशा ममतेच्या हाकेने त्याला जागे करते. यशोदेच्या वत्सल अन्तःकरणाचें चित्र अतिशय विलोभनीय वाटतें. 'पंच पंच उषःकालां'तील पावित्र्य व सौंदर्य या भूपाळींत भरलें आहे.

( ६ ) **फंदी अनंत कवनाचा सागर :** एका शाहिराने दुसऱ्या शाहिराला केलेला हा मानाचा मुजरा आहे. फंदीचा पोषाख, त्याचें कवन, त्याची लोकप्रियता याचें मोठ्या रसिकतेने होनाजी बाळने वर्णन केलें आहे 'पद्दा रत्न पंधरावें माता धन्य जन्मली हो त्याशी' अशासारखी यांतील अतिशयोक्ति सोडून दिली तरी अनंतफंदी त्या काळीं किती लोकप्रिय होता याची कल्पना या कवनावरून आपणाला येईल.

( ७ ) **सवाई माधवराव :** हा खर्ड्यांच्या लढाईवरील दुसरा पोवाडा. सवाई माधवरावांच्या यशोगानापासून याला सुरुवात झाली व युद्ध संपल्यावर पुण्यांत थाटाने श्रीमंत परत आले–त्या वर्णनाने शेवट केला आहे. युद्धाचें वर्णन फक्त तिसऱ्या चौकांत आहे आणि तेंहि सामान्यच आहे. पृ. ७० : **फरशधरें**–परशु धारण करणाऱ्याने; परशरामाने पृ. ७१ **यंत्र**–तोफ. **उरवे**–शिल्लक राहिले. **बुद्धिशस्त्र न धरवे**–बुद्धिशस्त्र, मनसुब्रीची तलवार. **बस्ता–वस्ता ( ? )**–वस्तु. **आदर्श अंबारी**–आरसे जडलेली अंबारी. **रणखंदाळी**–रणकंदन. **निराळीं**–आकाशांत. **धुमराई**–'धुमराई' असा शब्द हवा. **विपुलता शाई**–सैन्य. **आशिलता**–तलवार. **तैनामी**–तैनामी. **सव्यवामी**–डाव्या उजव्या हाताला. **श्रीशांत**–साताप्पाची समाधि पुणें येथें संगमाजवळ एका घाटावर आहे व समाधीवर पिंडी आहे त्यास शांतलिंग म्हणतात. ऐतिहासिक पोवाडे–टीप–२७१. श्री. य. न. केळकर.

( ८ ) **महादजी शिंदे :** रंगाचे दोन पोवाडे दोन प्रसिद्ध शाहिरांनी रचलेले आहेत. एक प्रभाकराने रचलेला 'रंगाचा दरबार' व दुसरा होनाजीचा महादजी शिंद्यांनी केलेल्या रंगाच्या समारंभावरचा पोवाडा. पोवाडा रचल्यानंतर थोड्याच दिवसांनी त्या दोघांनी हे पोवाडे दरबारांत गाऊन दाखविले. या पोवाड्यांतील रंगाचा समारंभ १७९३ मध्ये महादजी शिंद्यांनी कराविला. रंगपंचमीच्या समारंभाचा तपशील त्या वेळच्या चालीरीतींवर प्रकाश टाकणारा आहे. पृ. ७५ **पात्रा नाचती**–कलावंतिणी नृत्य करीत होत्या.

( ९ ) व ( १० ) **:** हीं दोन्ही विरहिणीचीं गीतें आहेत. दोन्हींमधील भावनेची उत्कटता उल्लेखनीय आहे. दहाव्या लावणींत नायिकेने काढलेले

'निजघर सोडून सखे पारखे घरीं। जावें वाटे पद ठेवणें आहिफणारी' हे उद्गार तिची सात्त्विक भूमिका प्रगट करतात.

( ११ ) **गुणीजन गुणमंडीता** : पतिनिष्ठ नायिकेच्या भावना या कवनांत अतिशय परिणामकारक रीतीने रंगाविल्या आहे. पार्थिव प्रेमापेक्षा वरच्या पातळींतील प्रेमभावनेचा यांत प्रत्यय येईल. या लावणींतील नायिकेला पतीमुळे आपलें जीवन सफल झाल्यासारखें वाटतें– पतीने आपलें जीवन पवित्र केल्यावर इतर व्रतवैकल्याची व तीर्थांची तिला गरज वाटत नाही. ' भागीर्थींत घडलें स्नान मग कारण काय इतर जलाशी। " अशी तिची भावना आहे. पतीवर निष्ठा असणारी होनाजीची ही नायिका म्हणजे सात्त्विक प्रेमाचें प्रतीकच आहे. पृ. ७८–ओळ२– ' अहिल्या ' ऐवजीं ' आदित्य ' हा शब्द हवा.

( १२ ) **हिण माझें प्रारब्ध** : अपत्यहीन स्त्रीच्या भावना होनाजी, परशराम व प्रभाकर या तिघांहि शाहिरांनी रंगविल्या आहेत. पण त्या सर्वांत होनाजीची ही लावणी सर्वोत्कृष्ट ठरेल. निरपत्य स्त्रीच्या अन्त:करणांत प्रवेश करून तिच्या व्याकुळ भावनांचें चित्रण होनाजीने यांत मोठ्या हळुवारपणें रंगाविलें आहे. त्या स्त्रीचें मानसशास्त्र होनाजीला चांगलें कळलें आहे. या लावणींतील भावनांचा विकासहि अगदीं पायरीपायरीने कसा होत गेला हेंहि लावणी वाचतांना सहज लक्षांत येतें.

( १३ ) व ( १४ ) : या दोन्ही लावण्यांतील नायिका बिरहिणी आहेत. दोघींचे पति प्रवासाला गेले आहेत–त्यामुळे दोघींनीहि सुखोपभोग वर्ज्य केले आहेत व झुरून झुरून दोघीहि पाञ्जर झाल्या आहेत. दोघींनाहि दूरदेशीं गेलेल्या पतीबद्दल काळजी वाटत आहे आणि अशा विरहावस्थेने पोळून निघाल्या असतांना दोघींचा साजण अकस्मात् घरीं येतो. दोन्ही लावण्यांतील नायिकेच्या विरह–व्यथा अतिशय परिणामकारक रीतीने वर्णन केल्या आहेत. पण भावनाविष्काराची पद्धत प्रत्येक लावणींत निराळी आहे. पहिली नायिका पतीच्या वाटेकडे लक्ष देत झुरते आहे–सुखोपभोग तिला विषासमान वाटत आहेत, पक्ष्यांचे पंख लावून सजणाजवळ जावें व त्याला पाहावें अशी तिला उत्कट इच्छा झाली आहे. दुसरी नायिका विरहावस्थेंत वियोगपूर्व रात्रीचे सुखोपभोग आठवून अधिकच व्याकुळ झाली आहे;-

पतीच्या मार्गांत येणाऱ्या संभाव्य संकटाच्या कल्पनेने ती व्याकुळ झाली आहे. भावनांचें स्वरूप एकच—पण त्याच्या आविष्कारांतील निराळेपणा विलोभनीय वाटतो.

( १५ ) **सहज मनामधें आलें** : या लावणींतील नायिकाहि विरहव्याकुळ आहे. पण आपल्या पतीची भेट व्हावी अशी तिच्या मनांत उत्कट इच्छा होतांच जासूद येऊन स्वारीचा मुक्काम गंगेकडे आहे असें सांगतो. नंतर त्याच्या स्वागताच्या व भेटीच्या तयारींत त्या नायिकेची उडालेली धांदल लावणींत वर्णन केली आहे.

( १६ ) व ( १७ ) : या दोन लावण्यांतून मराठमोळा स्त्रीच्या लावण्याचें मोठें बहारीचें वर्णन आहे. पहिल्या लावणींत पहिल्या दोन कडव्यांत त्या लावण्यवती नायिकेचें चित्र आपणापुढे कवीने उभें केलें आहे. दुसऱ्या लावणींत त्या सौंदर्याला डौलदार गतीची साथ मिळाली आहे. नादमय शब्दांच्या साहाय्याने, व शब्दांच्या पुनरुक्तीने व समर्पक उत्प्रेक्षांनीं मराठमोळा सौंदर्याचा सर्व नखरा साकार झाल्याचा भास होतो.

( १८ ) **तुझ्या प्रीतीचें दुःख** : प्रीतीचें सामर्थ्य व प्रीतीचा परिणाम व्यक्त करणारी ही छोटी लावणी त्यांतील आशयामुळे अधिक महत्त्वाची आहे. 'जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ...' या होनाजी बाळच्या महत्त्वाच्या ओळी याच लावणींत आहेत.

( १९ ) **या सृष्टींत दैवाची** : निपुत्रिका म्हणून यातना सहन करणाऱ्या स्त्रीला पुष्कळ वर्षांनी दिवस राहिल्यावर होणारा आनंद या लावणींत फार चांगल्या रीतीने व्यक्त झाला आहे. पुत्रप्राप्ति होणार म्हणून आनंद, या प्रसंगांतून कशी पार पडेन याची काळजी, निरनिराळ्या डोहाळ्यांमुळें मनाला येणारी तुष्टि—या विविध भावनांचें गोड चित्रण या कवनांत आढळेल.

( २० ) **हीरवी बनलीस प्राणसखये** : रंगाची आसक्ति हा शाहिरांच्या प्रतिभेचा एक विशेष आहे. आपल्या नायिकांना एका विशिष्ट रंगाचाच साज चढवावयास लावण्याची आवड होनाजीला आहे व प्रभाकरालाहि आहे. या ठिकाणीं सर्व हिरवा साज होनाजीने नायिकेला बहाल केला आहे.

( २१ ) आलीप्रळयंगता : या लावणीच्या कर्तृत्वासंबंधीं निश्चित मत नाहीं. य. न. केळकरांच्या मतें ही लावणी बाळा बहिरूची आहे. ‘ कवि म्हणे बाळा बहेरु ’ ही शेवटची ओळ त्या मताला पुष्टि देते. शालिग्रामांनी ही होनाजीच्या संग्रहांत छापली आहे. शिवाय शेवटचा उल्लेख कर्तृत्वासंबंधी निर्णायक पुराव्याचा होऊं शकतो का हाहि प्रश्न आहे. पण कुणाचीहि लावणी असली तरी यांतील आशय चांगला आहे. धन्याचीं पत्रें आल्याबरोबर स्त्रीचा मोह सोडून मुलुखगिरीला निघणाऱ्या मर्द मराठ्याची ही लावणी आहे.

## परशराम :

इतर शाहिरांपेक्षा परशरामांच्या काव्याचें वैशिष्ट्य अगदी निराळें आहे. रामजोशीचा भाषाविलास किंवा होनाजीचें भावनासौंदर्य त्याच्या ठिकाणीं नाहीं. पण त्याचें अवलोकन मोठें सूक्ष्म आहे. आपल्या भोंवतालच्या सामाजिक जीवनांतील विसंगति त्याला जाणवली—विशेषतः पेशवाई अखेरच्या काळांतील लोकांची अगतिक स्थिति व इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर सामाजिक व आर्थिक जीवनांत झालेला फरक त्याच्या नजरेला आला; लोकांच्या चालीरीतींतील, दररोजच्या जीवनांतील विसंगति व कारुण्य त्याला जाणवूं लागलें. त्यामुळें त्याने आपल्या कवनांत उपरोधाचा आश्रय केला. त्याच्या विनोद—दृष्टीनेहि जीवनांतील निराळीं विसंगत दृश्यें टिपून घेतलीं व तीं विनोदपूर्ण रीतीने रंगविलीं. त्यामुळे त्याच्या काव्यांत विषयांची विविधता आहे व भावनांचेंहि वैचित्र्य आहे. सामान्य जनतेची राहाणी, नवसांचे प्रकार, लोकांच्या समजुती व चालीरीति इत्यादि तत्कालीन गोष्टींबद्दल परशरामाच्या कवनांतून जितकी माहिती मिळते तितकी इतर शाहिरांच्या कवनांतून मिळत नाही. अव्वल इंग्रजी अंमलांतील देशस्थितीचें चित्र तर त्यानें हुबेहूब रंगविलें आहे. त्याच्या इतका उत्कृष्ट विनोद इतर कोणत्याच शाहिराला साधला नाही. त्याच्या काव्याचें वैशिष्ट्य व निराळेंपण तें हेंच.

( १ ) **उठ झाला प्रातःकाळ** : ' घनःश्याम सुंदरा ' या भूपाळीची ही दुसरी आवृत्ति आहे. मात्र फरक इतकाच कीं ' घनःश्याम सुंदरा ' ही भूपाळी सर्व यशोदेच्या तोंडीं घातली आहे तर यांत पहिलीं दोन कडवींच फक्त यशोदेच्या तोंडचीं आहेत. तिसऱ्या कडव्यांत उठलेल्या श्रीकृष्णाला प्रेमभराने आलिंगन देऊन त्याच्यावरून लिंबलोण उतरवून टाकणाऱ्या यशोदेचें चित्र आहे तर चौथ्यांत श्रीकृष्णाच्या वनक्रीडेचें वर्णन आहे.

( २ ) **सती सुलोचना** : हें एक सुंदर कथाकाव्य आहे. इंद्रजिताच्या मृत्यूची व सुलोचनेच्या पातिव्रत्याच्या कसोटीची ही कथा अगोदरच चमत्कृतिपूर्ण आहे. त्यांत परशरामाने ती अतिशय चांगल्या रीतीने रंगविली आहे.

( ३ ) **मानवी जीवनाची कहाणी** : परशरामाच्या कांहीं लावण्या वेदान्तपर आहेत. वेदान्तांतील पारिभाषिक शब्द वगैरे वापरून चमत्कृति निर्माण करण्याचा प्रयत्न अनेक काव्यांतून त्याने केला आहे. ' मानवी जीवनाची कहाणी ' रंगवतांना जन्मापासून मृत्यूपर्यंत मानवी जीवनाचें विदारक चित्र त्याने आपणांपुढे उभें केलें आहे.

पृ. १०० : '**त्रिगुण**—सत्त्व, रज व तम' हे त्रिगुण. **तीन पण केले** (?)—त्रिगुणांचा उपभोग घेतला. **सोऽहं शब्द**—सोऽहम्—' मी तो आहें ! परब्रह्म व आपण एकच आहोंत ही जाणीव. पृ. १०१ : **मूळबीज**—परब्रह्म.

( ४ ) **काळी–गोरीचें भांडण** : हें भांडणहि आध्यात्मिक पातळीवरूनच आहे. विशेषतः पहिल्या दोन कडव्यांत व्यापक कल्पना आल्या आहेत. तिसऱ्या व चौथ्या कडव्यांत आपल्या भोंवतालच्या पार्थिव गोष्टींवरून काळीने व गोरीने आपापला मोठेपणा सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटीं सांवळी येऊन दोघींचाहि समझोता घालते आहे. कल्पनाचमत्कृति हाच या काव्याचा विशेष. पृ. १०२ : आहे व पण—' आहेवपण ' असा एक शब्द हवा.—सौभाग्य.

( ५ ) **सतीची कथा** : हें एक उत्कृष्ट विनोदी काव्य आहे. एका पतिव्रतेचें अनुकरण करणाऱ्या एका बाष्कळ स्त्रीच्या कपाळीं मुसळाचा प्रहार कसा आला हें परशरामाने मोठ्या विनोदी रीतीने रंगविलें आहे.

( ६ ) ( ७ ) ( ८ ) हे तीनहि पोवाडे देशस्थितिपर आहे. पेशवाई अखेरच्या व अव्वल इंग्रजीच्या काळांत एकंदर बेबंदशाही व अनाचार कसे माजले होते, नैतिक मूल्यें कशी चिरडलीं जात होतीं व एकंदर जमानाच कसा उलटा आला होता याचें अतिशय यथार्थ वर्णन या कवनांतून आढळेल. सहाव्या पोवाड्यांत एकंदर धर्म कसा बुडाला, शूर सरदार दीनवाणे कसे झाले, हत्ती, उंट यांना कशी कांहीच किंमत उरली नाही याचें वर्णन आढळेल. मात्र 'फिरावें काठीस लावून सोनें' अशी सुरक्षितताहि अव्वल इंग्रजीच्या काळांत आली होती. सातव्या पोवाड्यांत जुने कायदे मोडून इंग्रजी कायदे आल्यावर मोठे मोठे उमराव, धारकरी हे पोपटाप्रमाणें पिंजऱ्यांत कसे कोंडले गेले, रथ, गाडया, अंबाऱ्या या आढ्याला कशा टांगल्या गेल्या, आणि 'राजधान्या अगदींच बुडाल्या, राजाचे झाले फर्जी' अशी अवस्था कशी झाली याचें वर्णन आढळेल. आठव्या पोवाडयांत याच संधिकाळांतील बेबंदशाहीचें वर्णन केलेलें आहे. या तीनहि कवनांतून महाराष्ट्राचें अव्वल इंग्रजी अमदानींतील जीवन अतिशय परिणामकारक व वास्तव रीतीने रंगविलेलें आढळेल.

( ९ ) **समाजास्थितिपर पोवाडा** : या पोवाडयांतील उपरोध मोठा बोचक आहे. योग्यता नसतांना किंवा सामर्थ्य नसतांना विनाकारण भलतीच फुशारकी मारणाऱ्या घमेंडखोरांचा समाचार यांत घेतलेला आढळेल. शीलहीनाचा गर्व कसा असतो हें शेवटीं 'येसू परशराम म्हणे आशिलाचा पोकळ ताठा । साऱ्या गांवचे ओहोळ मिळुनी गंगेची करिती थट्टा' या उपरोधिक वचनाने चांगलें दाखविलें आहे.

(१०) **सवतीचें भांडण** : हा परशरामाचा एक आवडता विषय आहे व त्यावर त्याच्या दोन तीन लावण्या आहेत. या कवनांतील थोरल्या व धाकट्या सवतीचें नवऱ्यावरील आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी रंगविलेलें भांडण मोठें मनोरंजक आहे.

(११) **लष्करचें सुख** : परशरामाची ही दुसरी उत्कृष्ट विनोदी लावणी. लष्करांतून पळून आलेला एक माणूस लष्करांत आपण केवढे मोठमोठे पराक्रम केले याचें मोठ्या फुशारकीने आपल्या बायकोजवळ वर्णन करतो—बायकोला तें सर्व खरें वाटतें आणि तीहि त्याचें अतिशय कौतुक करते. पण नंतर

लष्कराच्या त्यांच माणसाच्या तुकडींतून येणाऱ्या दुसऱ्या सैनिकाकडून तिला कळत कीं आपला नवरा लष्करांत फक्त पाणक्या होता आणि उठतां लाथ व बसतां बुक्की असा अहेर त्याला सैन्यांतील लोकांकडून मिळत होता. हें ऐकल्यावर त्या नारीची व तिच्या नवऱ्याची काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच करणें बरें. या सर्व प्रसंगाचें चित्रण परशरामाने मोठ्या कुशलतेने केलेलें आढळेल.

( १२ ) **दुघड नार** : आपल्या नवऱ्याला भावांपासून वेगळे निघून संसार करण्याचा सल्ला देणाऱ्या दुघड नारीचें हें चित्रण तितक्याच विनोदपूर्ण रीतीनें या कवनांत केलेलें आढळेल. नवऱ्यानें तिचा हट्ट पुरवला पण त्यामुळे त्याची अवस्था काय झाली याचेंहि वर्णन मोठें विनोदपूर्ण आहे.

(१३) **पातिव्रतेची कहाणी** : यांतील कथाहि चमत्कृतिपूर्ण आहे. या लावणींतील पतिव्रतेला तिच्या पतीने घातलेल्या अटी तिने आपल्या पातिव्रत्याला बाध न आणतां पुऱ्या करून दाखविल्या. खंजिराला प्रतिनिधि करून त्याच्याशीं लग्न लावण्याच्या चालीचाहि यांत उल्लेख आहे.

(१४) **निपुत्रिका** : होनाजीच्या लावणीप्रमाणें ही लावणी पण करुणरम्य आहे. पुत्रप्राप्तीसाठी जे नवससायास किंवा जीं व्रतवैकल्यें करावीं लागतात तीं सर्व या कवनांत आलीं आहेत. तत्कालीन समजुतींची यामुळे कल्पना येते.

(१५) **गर्भवासिनी** : हा वरील कवनाचा दुसरा भाग. गर्भवती झाल्यावर आलेल्या साफल्याच्या भावनेचें वर्णन यांत चांगलें आलें आहे. प्रत्येक महिन्यांत शरीरांत होणारा बदल व त्यामुळे वृत्तींत होणारा बदल परशरामाने इतक्या सूक्ष्मपणें वर्णन केला आहे कीं एका पुरुषाने या भावना इतक्या परिणामकारक रीतीने व्यक्त कराव्या याचें खरोखर कौतुक वाटतें.

(१६) **लेकुरवाळी** : हा वरील दोन कवनांचाच तिसरा भाग असें म्हणावयास हरकत नाही. नव्यानवसाने झालेल्या लेकराचें कौतुक व त्याला थोडें बरें वाटेनासें झालें कीं आईच्या जीवनाची होणारी उलघाल याचें हें चित्रण आहे. या तीनहि कवनांतून नवससायास, देवदेवकी, व इतर अनेक चालीरीति यांचें अतिशय वास्तव असें दर्शन घडतें.

**(१७) नयन सुरेख दोन्ही :** मर्दानी सौंदर्याचें वर्णन या दृष्टीनें ही लावणी उल्लेखनीय आहे. अबलख घोडा, त्याच्या पायीं थैथै वाजणारे पैंजण, त्या घोडयावर टाकलेले ' जडाव ' जीण व त्यावर बसलेला वय सोळा सतरांत असणारा शिपाई गडी—हें वर्णन आपल्या डोळ्यासमोर त्या काळांतील मर्दानी 'देखणेपणा' स्पष्टपणें उभें करतें.

## प्रभाकर :

इतर शाहिरांपेक्षा प्रभाकराचे पोवाडे जास्त उपलब्ध आहेत आणि ते वैशिष्टयपूर्ण आहेत. त्याच्या एकंदर तेरा पोवाड्यांपैकीं तीन सवाई माधवरावांवर आहेत, दोन दुसऱ्या बाजीरावावर आहेत, दोन पेशवे वंशाचें वर्णन करतात व बाकीचे किरकोळ स्वरूपाचे आहेत. सवाई माधवरावांवरील सर्वच पोवाडे अतिशय चांगले आहेत. रंगाचा पोवाडा हा त्यांत सर्वांत उत्कृष्ट ठरेल. खड्यांच्या लढाईवरील पोवाड्यांत त्याच विषयावरील इतर शाहिरांच्या पोवाड्यांपेक्षां वीररस निश्चित जास्त साधला आहे. सवाई माधवरावाच्या मृत्यूचा पोवाडा करुणरसपूर्ण आहे. ' दुसऱ्या बाजीरावा ' वरील पोवाड्यांतहि करुण-रस व विषाद यांचें मोठें मनोहर मिश्रण आढळेल. त्याच्या पौराणिक कवितांतून चमत्कृति व वर्णनाचा विलास अधिक प्रमाणांत आढळतो. ' गणपती-पंचायतन ' ' लक्ष्मी गर्वें निंदा बोलुन...' ' मुरली ' इत्यादि त्याच्या लावण्या उल्लेखनीय आहेत. प्रभाकराच्या सामाजिक लावण्यांतून मात्र शृंगार-रसाचा उत्तान आविष्कार अधिक प्रमाणांत आढळतो. शृंगाराच्या विविध छटा त्यानें मोठ्या कुशलतेने रंगविलेल्या असल्या तरी सदभिरुचीच्या मर्यादा त्यानें पुष्कळच ठिकाणीं ओलांडल्या आहेत. कांहीं वर्णनें तर बीभत्स आहेत. हें वैगुण्य सोडलें तर त्याचें सूक्ष्म अवलोकन, सुंदर दृष्टान्त, प्रसादपूर्ण भाषा आणि भावनांचा उत्कट आविष्कार आपल्या मनाला मोह पाडल्या-शिवाय राहात नाहींत.

**( १ ) लक्ष्मी–पार्वती संवाद :** प्रभाकराच्या विनोद–दृष्टीचा ही लावणी म्हणजे चांगला नमुना आहे. आपला नवरा श्रेष्ठ आहे हें

ठरविण्यासाठीं दुसरीच्या नवऱ्याचे दोष काढणाऱ्या भांडखोर शेजारिणींची भूमिका लक्ष्मी व पार्वती यांनीं या लावणींत घेतली आहे. एकमेकींला टोचून बोलतांना व एकमेकींच्या नवऱ्याच्या उखाळ्या पाखाळ्या काढतांना त्या आपली पातळी विसरतात व सामान्य स्त्रीच्या पातळीवर येतात. त्यामुळे यांतील भावना संसारांत पडलेल्या सामान्य स्त्रीला प्रिय होतील अशाच रंगविल्या गेल्या आहेत.

( २ ) **मुरली** : श्रीकृष्णाच्या मुरली–वादनाचा परिणाम केवळ गोकुळवासी जनावरच नव्हे तर चराचर विश्वावर कसा होत होता याचें वर्णन या लावणींत आलें आहे. वर्णनांतील आशय ठराविक पद्धतीचा आहे. पण आविष्कार मात्र परिणामकारक आहे. विशेषत: नादमय शब्दरचना करून मुरलीचा नाद शब्दांत पकडण्याचा कवीचा प्रयत्न विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे.

( ३ ) **पंढरीवर्णन** : महाराष्ट्रांतील सर्वमान्य अशा या तीर्थावर रामजोशी, होनाजी, परशराम व प्रभाकर या चौघांनींहि लावण्या केल्या आहेत. त्या सर्वांत पदलालित्य व वर्णनशैली या दृष्टीने प्रभाकराची लावणी उत्कृष्ट आहे. पहिल्या तीन कडव्यांत विठ्ठल व रखुमाई पंढरपूरच्या क्षेत्रीं कशीं आलीं याचें वर्णन केलें आहे व शेवटच्या तीन कडव्यांत भीमातट, वाळवंट, यात्रा व वारकरी यांचें वर्णन केलें आहे. पांचव्या कडव्यांतील पांडुरंगाच्या मूर्तीचें वर्णन सुंदर आहे.

( ४ ) **रंगाचा दरबार** : हा प्रभाकराचा एक उत्कृष्ट पोवाडा गणला जातो. ‘ जसा रंग श्रीरंग खेळले. वृंदावनिं द्वापारांत । तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगांत अति आदरांत ॥ हें या पोवाड्याचें तोंडच मुळीं अतिशय पकड घेणारें आहे. त्यानंतरचे श्रीमंतांच्या स्वारीचें, लाल कुसुंबी रंगांत रंगलेल्या जनतेचें, घोड्यावर जाणाऱ्या बारगीरांचें वर्णन त्या वेळच्या गुलजार पुण्याचें दृश्य आपणांपुढें उभें करतें.

( ५ ) **खर्ड्याची लढाई** : खर्ड्याच्या लढाईवरील पोवाड्यांत हा पोवाडा विस्तृत, तपशीलवार व शुद्ध असा आहे. पहिल्या दोन चौकांत बारभाईंचीं कारस्थानें, दादासाहेब व इंग्रज यांचा पराजय,

माधवरावाचा जन्म, मुंज, लग्न, टिपूवरील मोहिमा, शिंद्याचें आगमन इत्यादि घटना आल्या आहेत. तिसऱ्या, चौथ्या व पांचव्या निम्म्या चौकांत पेशव्यांच्या सैन्यांतील सरदारांच्या शिलेदारांची नांवें आलीं आहेत; पांचव्या चौकाचा राहिलेला भाग लढाईच्या वर्णनांनी व्यापला आहे आणि सहाव्यांत विजयोत्सवाचें वर्णन आहे. एकंदर पोवाड्याच्या लांबीच्या मानानें फक्त वीस ओळींतच प्रत्यक्ष युद्धाचें वर्णन आलें आहे. युद्धाचें आहे तें वर्णन परिणामकारक आहे यांत शंका नाही. युद्धाच्या ऐन धुमाळीचें चित्र त्यानें आपणापुढे उभें केलें आहे. पण एकंदर इतर विस्तार त्या मानाने फार झाला आहे. ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने हा पोवाडा अधिक शुद्ध आहे.

**( ६ ) सवाई माधवरावांचा मृत्यु :** ‘ हा पोवाडा म्हणजे मराठी भाषेचा एक बहुमोल अलंकार आहे. कलेच्या दृष्टीने तो अप्रातिम आहे. भाषेच्या दृष्टीनें तो अननुकरणीय आहे ’ ही य. न. केळकर यांनीं केलेली या पोवाडयाची स्तुति अगदीं यथार्थ आहे. यांतील करुण-रस हृदयाला चटका लावणारा आहे. पहिल्या दोन चौकांत सवाई माधवरावांचा जन्म व त्यांच्या कारकीर्दीचा चढता उत्कर्ष याचें वर्णन आहे. तिसऱ्या चौकांत गैरसमजाचें विष कालविलें जातें. चौथ्या व पांचव्या चौकांत नानांनीं केलेल्या अपमानामुळें माधवरावांना आलेल्या विषण्णवृत्तीचें वर्णन आहे व सहाव्या चौकांत सवाई माधवरावांच्या मृत्यूचें वर्णन आहे. त्यानंतरचा सर्व पोवाडा शोकरसानें भरलेला आहे. विशेषतः यशोदाबाईचा शोक हृदयाला पीळ पाडणारा आहे. एकंदर सोळा चौकांचा हा पोवाडा उत्कट भावनेनें भरला आहे. सवाई माधवरावाच्या मृत्यूने महाराष्ट्रांतील सर्व जनता दुःखानें कशी बधिर झाली होती याचें अत्यंत परिणामकारक दर्शन प्रभाकरानें या पोवाड्यांतून आपणांला घडविलें आहे. पृ. १४४–**जळामधिं परि जलचर अडविला**–१७८२ त रेंजर नामक इंग्रजांच्या लढाऊ जहाजाशीं धुळपांची लढाई व इंग्रजांचा पराभव. **जलचर**–इंग्रज. **शिक्के दऊत पट करार दुसरी करा**–माझीं प्रधानकीचीं वस्त्रें त्याला द्या. **त्यांची अवस्था ... येईल आकारास**–‘त्याच्या वडिलानें तुमच्या वडिलास मारलें त्याप्रमाणें तो तुम्हांला ठार करील ’ हा भावार्थ. पृ. १४५ **मुळकुळकोंब**–औरस संतति. ‘पेशवाईच्या या औरस संततीला बाजीरावाची

कीड लागली ' हा भावार्थ. पृ. १४७ **मकरध्वज आत्मभू**–स्वयंभू मदन. पृ. १४७-**भालुरीत घन विजवा कडकडती**–कोल्हीं रडत होती व रिकामे ढग व विजा कडकडत होत्या. **लक्ष्मी पिंपळावरी**–दुर्दशेची देवता आक्काबाई. पृ. १४८ **काशीबाई**–काशीबाई ही बाजीरावाची बायको. बाजीरावाच्या आईचें नांव राधाबाई.

( ७ ) व ( ८ ) **निपुत्रिका आणि गर्भवासिनी**–मागील दोन शाहिरांप्रमाणेंच या विषयावर प्रभाकराने कवन रचलें आहे. ' निपुत्रिका ' या लावणींत पुत्रप्राप्तीसाठीं करावयाच्या अनेक उपायांचें वर्णन आहे. ' गर्भवासिनी ' मध्ये गरोदर स्त्रीच्या भावना रंगविल्या आहेत. दोन्ही कवनांतून स्त्रीसुलभ भावनांचा आविष्कार असला तरी होनाजीची कोमलता व हळुवारपणा प्रभाकरच्या या लावण्यांतून आढळत नाही.

( ९ ) **मोहिनी जसी सुरसभेमधीं**–खानदानी स्त्रीच्या सौंदर्याचें व रुबाबाचें मोठें डौलदार वर्णन या कवनांत आढळेल.

( १० ) **डुलत खुलत चाले**–जनानी सौंदर्याचें हें दुसरें वर्णन. पहिल्यापेक्षांहि हें अधिक उठावदार आहे. शब्दांची निवडहि अतिशय कसोशीने केली आहे. ' नूतन नारंगी, सजीव सारंगी ' धनुष्याकृति भुवया, सरळ नाक, आंब्याच्या कोयीसारखी अतिपातळ हनुवटी–इत्यादि सौंदर्याचा तपशील तर यांत आहेच. पण मराठमोळा स्त्रीच्या अंगावर असणाऱ्या सर्व अलंकारांचीहि यांत नोंद आहे.

( ११ ) **गौर गडे जन्मांतरीं पुजली**–या लावणींतील एकंदर वैभवाचें वर्णन विशेष डोळ्यांत भरतें. नायिकेच्या शृंगाराबरोबरच, संगमरवरी चौरंग, मेघडंबरीयुक्त देव्हारा, आगरबत्तीचा सुवास, सुवर्णकलश, पंचपक्वान्नांनीं युक्त अशी ताटें–इत्यादि वैभवाचा थाट डोळे दिपविणारा आहे. भिंतीवर काढलेल्या चित्रांचें वर्णनहि चमत्कृतियुक्त आहे.

( १२ ) ( १३ ) ( १४ ) नागपंचमीचा सण आला म्हणून पतीला मोहिमेवर जाऊं नका म्हणून विनविणारी नायिका बाराव्या लावणींत आढळते, तर पतीबरोबर मोहिमेवर येण्याचा हट्ट धरून बसलेली नायिका आपणाला तेराव्या लावणींत आढळेल. चौदाव्या लावणींतील नायिका

कुचाची नौबत वाजूं लागल्याने पतीला जागे करीत आहे आणि त्याला मोहिमेला जाण्याची घाई करीत आहे. तीन निरनिराळ्या–प्रवृत्तींच्या नायिकांचें दर्शन आपणाला यांत होते. या लावण्यांतील मोहिमेच्या उल्लेखाच्या आधारें श्री. य. न. केळकर यांनी प्रभाकरांच्या जन्मशक ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. ( पृ. ९०,९१,९२ ऐतिहासिक पोवाडे भा. १ प्रस्तावना )

( १६ ) **कंठ तुझा मंजुळ :** प्रभाकराच्या संगीताच्या ज्ञानाची कल्पना या लावणीवरून येते. कोणता राग कोणत्या वेळीं म्हणावयाचा यासंबंधीचे संकेत रागांचें वर्णन व त्यांचे परिणाम–याविषयींचा तपशील प्रभाकर संगीत शास्त्रांत किती पारंगत होता याची कल्पना देतो.

(१७) **दुसरे बाजीराव पेशवे :** दुसऱ्या बाजीरावाच्या दुर्दशेचा हा अतिशय करुणरम्य असा पोवाडा आहे. १८१८ मध्यें झालेल्या राज्य-क्रान्तीचें हें चित्र पाहात असतांना मनाची कालवाकालव होते. हे सर्व शाहीर बाजीरावाचे आश्रित होते. त्यामुळें आपल्या स्वामीचा राज्यत्याग, त्याला मोठ्या नामुष्कींत काढावे लागलेले दिवस आणि त्याच्या अभावीं प्रजेची झालेली विकल अवस्था या साऱ्यांचें वर्णन प्रभाकराने अतिशय करुणपूर्ण रीतीने केलें आहे. विशेषतः सातव्या चौकापासून पुढे बाजीरावाच्या धांवपळीचें जें वर्णन आलें आहे तें वाचतांना पोटांत कालवाकालव होते. बाजीरावाच्या वियोगाने प्रजेची काय अवस्था झाली याचेंहि वर्णन प्रभाकरानें चांगलें केलें आहे. ‘ विपरीत आला काळ मेरूला गिळलें मुंग्यांनीं ’ असें त्याला बाजीरावाची ही अवस्था पाहून वाटतें. होनाजी म्हणतो त्याप्रमाणें ‘ कुंकुमहीन दक्षिण वनितेचें वदन दैन्यवाणें ’ झालें होतें. दाक्षिणचें सौभाग्य हरपलें होतें. त्यामुळे दिवस असूनसुद्धा आकाशांत अंधार पडला होता. पृ. १६८ : **पांढरकवड्यावर रचविल्या घनगारा**–गारांचा पाऊस पाडण्यासाठी चेटुक करणें. **गारपगार**–मंत्रसामर्थ्यानें गारांचा पाऊस पाडणारे.

## सगनभाऊ :

सगन हा जातीचा मुसलमान. इतर शाहिरांच्या मानानें त्याच्या ठिकाणीं विद्वत्ता कमी असेल. पण त्याच्या मराठी भाषेंत जोम आहे. मराठी राज्याशीं व मराठी संस्कृतीशीं तो एकरूप झाला होता. आणि म्हणून देवादिकांचे दाखले अनेक ठिकाणीं सहजतेने तो देतो, मराठमोळ्याच्या चालीरीति अभिमानानें वाखाणतो, पंढरपूर व विठ्ठल यांच्याविषयींच्या भक्तिभावांतहि तो रंगून जातो. महाराष्ट्र-भूमीवरील त्याची निष्ठा अनेक कवनांतून व्यक्त होते. सगनचे ऐतिहासिक पोवाडे थोडे आहेत. त्यांत 'पानपतचा पोवाडा' व 'खडकीची लढाई' हे पोवाडे विशेष उल्लेखनीय आहे. पण त्याच्या लौकिक विषयावरील लावण्यांत कल्पनाविलास आहे. 'सगनच्या लावण्यांत शृंगार फार आहे; कांही कांही ठिकाणीं तो उत्तान शृंगारांत फारच रमतो' अशी श्री. भावे यांची तक्रार इतर शाहिरांच्या लावण्यांचा याच्या लावण्याशीं तुलनात्मक विचार करतां तितकीशी रास्त वाटत नाहीं. शृंगाराच्या बाह्य वर्णनापेक्षा प्रेमाच्या मनोभावने-लाच सगन जास्त महत्त्व देतो. होनाजी बाळचा तो प्रतिस्पर्धी होता. यावरूनच त्याच्या योग्यतेची थोडी कल्पना येईल. दुर्दैवाने त्याची फार थोडी कविता उपलब्ध आहे. पण आहे त्या कवनांवरूनहि 'सगनभाऊच्या कवनावरती फंदी लोक झुरती' या त्याच्या आत्म-विश्वासपर उद्गाराची सत्यता पटल्यावाचून राहात नाही.

( १ ) **पानपतचा पोवाडा** : पानपतच्या लढाईवर फारच थोडे पोवाडे उपलब्ध आहेत. सगनभाऊचा हा पोवाडा त्या विषयावरील एक महत्त्वाचा पोवाडा समजावयास हवा. हा पोवाडा १८ चौकांचा आहे. पण शालि-ग्रामांना त्यांतील बाराच चौक मिळालेले दिसतात. काव्य या दृष्टीने हा पोवाडा सरस आहे. पण ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने मात्र त्यांत पुष्कळच ढोबळ चुका राहिल्या आहेत. य. न. केळकर यांनी त्यांत दाखविलेल्या कांहीं प्रमुख चुका अशा : ( १ ) शाहिराने पानपतावर विश्वासरावांना भाऊसाहेबां-बरोबर न पाठवितां खुद्द नानासाहेबास रवाना केलें—इतकेंच नव्हे तर दहाव्या

चौकांत नानासाहेबांची कत्तल झाल्याचें दाखविलें आहे. ( २ ) सबंध पोवाड्यांत विश्वासरावांचा उल्लेख नाही. ( ३ ) होळकर, शिंदे वाटेंत गंभीरा नदीच्या जवळ भाऊस मिळाले असतां सगनने पुण्यासच त्यांची गोटगणती केली आहे. ( ४ ) दिल्ली किल्ला घेऊन ' बादशाह जेरदस्त केला ' असा उल्लेख आहे. पण बादशाह नव्हताच. ( ५ ) ' गोळ्यासारखा भाऊ उडाला ' पण भाऊसाहेबांचा मृत्यु कुणींच पाहिला नाहीं...अशा अनेक चुका यांत आहेत. तारखा, वार चुकलेत, वर्णनांत विसंगति आहे. त्यामुळे इतिहास म्हणून या पोवाड्याला कांहीच किंमत नाही. पण यांतील वर्णनाची ऐट, ऐन लढाईचें वर्णन व निरनिराळ्या प्रसंगांचें निवेदन विचारांत घेतां काव्य म्हणून हा पोवाडा तडफदार आहे यांत शंका नाही.

( २ ) **खडकीची लढाई** : १४ जुलई १८१५ रोजीं पंढरपूरला गंगाधरशास्त्र्यांचा खून झाला. तो बाजीरावाच्या संमतीनें झाला असें इंग्रज म्हणूं लागले. खून करविणाऱ्या त्र्यंबकजी डेंगळ्यांची इंग्रजांनी बाजीरावाजवळ मागणी केली. बाजीरावानें प्रथम टोलवाटोलवी केली. पण इंग्रजाची तंबी येतांच त्याने त्र्यंबकजी डेंगळ्याला त्यांच्या हवाली केलें. पण पुढे तो इंग्रजांच्या कैदेंतून निसटला. ५ नोव्हेंबरला खडकीच्या लढाईला सुरुवात झाली व पेशव्यांचा पराजय झाला. बाजीराव पळून गेला. पुण्यांतील लोक मात्र, कुणीच त्राता न उरल्याने, हवालदील झाले. या पोवाड्यांतील शेवटच्या कडव्यांतील वर्णन या बेबंदशाहीला उद्देशूनच आहे.

( ३ ) **दुसऱ्या बाजीरावाचा पोवाडा** : दुसरा बाजीराव ब्रह्मावर्ताला जाऊन राहिल्यानंतर दक्षिणेच्या प्रजेची कशी हवालदील अवस्था झाली याचें अतिशय करुण वर्णन या पोवाड्यांत आढळेल.

( ४ ) **छत्रपति प्रतापसिंह** : यांच्यावर सगनचे दोन पोवाडे आहेत. प्रतापसिंह पदच्युत झाल्याचें वर्णन त्यांत आढळेल. त्यांतील भावना मराठी राज्याशीं सगन किती एकजीव झाला होता याची कल्पना देते.

( ६ ) **असीं किरे प्रीत वाढल** : यांतील नैतिक उपदेश विशेष महत्त्वाचा आहे. प्रियतमेनें आपल्या सख्याला केलेल्या या उपदेशांत व्यावहारिक व नैतिक गोष्टींवर कसा भर दिला आहे हें सहज दिसेल.

‘ परनारीशीं भाषण करितां विचार नाहीं बरा ’ अशी धोक्याची सूचना ज्याप्रमाणें ती त्याला देते, त्याचप्रमाणें ‘ दुनिया उफराटी आली आहे; तुम्ही सावधगिरीनें वागा ’ असा व्यावहारिक उपदेशहि ती करते. ‘ दुपारची सावली नाहीं धन दौलतीचा भरंवसा ’ हें शाश्वत सत्यहि ती त्याला ऐकवते. सगनची ही नायिका मोठी व्यवहारचतुर वाटते.

( ८ ) **चंद्राचें चांदणें सीतळ का उष्ण :** या कवनाची सुरुवात कल्पनाप्रचुर आहे. पण नंतरचें सर्व वर्णन ठराविक शृंगार–रसात्मक आहे. पाहिला सगनच्या नायिकेचा प्रश्नच चमत्कृतिपूर्ण आहे व साजणाने त्या प्रश्नाला दिलेलें उत्तरहि काव्यमय आहे. त्यानंतर या कवनाचा विकास विशेष परिणामकारक झाला नाही असें वाटतें.

( ९ ) **कस्तुरीचा सुगंध :** बेदरची कामसेना व दौलताबादेचा साबाजी अनंत यांची ही चमत्कृतिपूर्ण कथा सगननें मोठ्या रसाळपणें सांगितली आहे. कामसेनेने साबाजी अनंत याची प्रीति मिळावी म्हणून अवलंबिलेल्या कृत्यांचें वर्णन मोठें छान आहे. गायनाने जंगली पशूंना वश करण्याची कल्पना सांकेतिक आहे.

( १० ) **निवाडा :** सवतीसवतीचें भांडण लावून आपण ती गंमत पाहात हसत बसणारा सगनचा हा नायक परशरामाच्या दोन बायकांच्या दादल्यापेक्षा अगदी निराळा आहे. दोघींच्याहि परस्परांबद्दलच्या चहाडया ऐकून शांतपणें तो निवाडा करतो–‘ दोघींनाहि सारख्याच तऱ्हेची वागणूक देत असतां, सारख्याच मोलाचीं उंची वस्त्रें नेसावयास देत असतां तुम्ही आपापसांत कां किरकिर करतां व माझें डोकें उठवितां–’ असें जरी तो म्हणत असला तरी त्या दोघींत भांडणें लावून गंमत पाहणारा हा नायक अधिक मिष्किल आहे. पृ. १९६–साजव–‘ साजण ’ असा शब्द हवा.

( ११ ) **मुशाफर :** या लावणींतील साजण एक मुशाफिर आहे–त्याच्या जिवाची सखी त्याच्या जिवाला घोर लावून गेल्याने तो प्रवासी झाला आहे आणि या तरुणीच्या सौंदर्याची कीर्त ऐकून तिच्या दारीं आला आहे. त्या दोघांचीं उत्तर–प्रत्युत्तरें मोठी चमत्कृतिपूर्ण आहेत. पृ. १९६–पाथ उतारा–‘ पायउतारा ’ असा शब्द हवा. ‘ पायीं ’.

( १२ ) **नार चंचल मनिं घाबरी :** इतर लावण्यांतील परंपरागत नायिकेपेक्षा मर्दानी पोशाख परिधान करून आपल्या प्रियकराला भेटावयास जाणाऱ्या या नायिकेचा थाट कांहीं निराळाच आहे. त्यांत सुद्धां राघु-साळुंखीचा संवाद घालून त्या संवादांतून साजणीला प्रीतीचा मार्ग दाखविण्याच्या चमत्कातिपूर्ण क्लृप्तीचा उपयोग सगनने या लावणींत केला आहे. पृ. १९८ **तुरुंग**–' तुरग ' असा शब्द हवा. **बिर्डी**–' विडी ' ( विडा ) असा शब्द हवा.

# शब्दार्थ

## अ

**अघमर्षण**–पापनाशक स्तोत्रें म्हणणें = पाप नाहींसें करणें.

**अर्जी**–विनंति.

**अजीज**–दीन.

**अजुरदा**–दुःखी, कष्टी.

**अटकर**–बांधेसूत, नीटनेटका.

**अंदु**–साखळी; हत्तीच्या पायाला बांधावयाचा साखळदंड.

**अनाड**–अडाणी.

**अपेट**–अंड न बडविलेला; सांड.

**अफ्तरी**–(१) कारकीर्द; (२) बिघाड, नुकसान.

**अबलक**–चित्रविचित्र रंगाचा

**अबीर**–चंदन, केशर, कापूर, कस्तुरी यांच्या मिश्रणानें केलेला पदार्थ.

**अमा**–अमावास्या.

**अरबा**–नाजुक.

**अरळ**–सैल; ढिला.

**अवकाळ**–दुर्दशा.

**अवडंबर**–भपका; डौल.

**अवा**–स्त्री.

**अवाई**–प्रख्याती.

**असकारा (अस्कारा)**–नांवलौकिक; ख्याति.

**आसिवार**–तरवार.

**अस्ता**–रहस्य; मैत्री.

**अहेव**–सौभाग्य.

## आ

**आगळे**–अधिक.

**आदर्श**–आरसा.

**आप**–पाणी.

**आयना**–आरसा.

## इ

**इनसाफ**–निर्णय; निवाडा.

## उ

**उजुर**–(१) सबब; (२) अधिकार.

**उणाख**–नीच.

**उदीत**–उद्युक्त.

**उबार**–बाकी; अधिक.

**उष्टरखाना**–उंटखाना.

## क

**कटक**–सैन्य

**कडिये**–कडवे.

**कतार**–उंटांची रांग.

**कदन**–युद्ध; कंदन.

**कदीम**–जुने; पुरातन.

**कन्हैया**–(१) कृष्ण; (२) देखणा.

**कबंध**–मस्तकविरहित धड.

**कंपू**–जमाव.

**कमलोदरी**–लक्ष्मी.

**कंबरबस्त**–सिद्ध; तयार.

**करबाल**–तरवार.

**करभार**–खंडणी.

**करवल**–बंदुकस्वार.

**करोल**–बंदुकवाला (करवल).

**कराबिन (कार्बाइन)**–रुंद तोंडाची; आखुड बंदुक.

**कलगी**–पागोट्यावर बांधावयाचें रत्नखचित भूषण.

**कलमजारी**–विनंति; पत्रलेखन.

**कस्त**–कमताई, झीज, नुकसान.

**कांची**–कमरपट्टा.

**कापडी**–यात्रेकरू.

**किराणे**–धिंगाणा घालणें; उडी.

**किल करणें**–आनंदानें खिंकाळणें.

**कीलवाणें**–केविलवाणें.

**कुंद**–चमेलीच्या वेलीसारखा वेल व त्याचें फूल.

**कुंवरू ( कुंबारू )**–एक प्रकारचा मासा.

**कुंभिनी**–पृथ्वी.

**कुमेद**–( कुमाइत )–सारंग रंगाचा ( घोडा ).

**कुर्निसा**–मुजरा.

**कुलकुला**–सर्वाधिकार

**कुलअकत्यार**–सर्व सत्ता.

**कुलकल्ला**–सर्वाधिकारी.

**कुक्षीं**–कंबरेवर.

**कूल**–सर्व.

**केकत**–केतकी.

**केवा**–प्रौढी.

**कैची**–आगीच्या बाणाचा भाता.

**कोतवाल घोडा**–मिरवणुकीच्या पुढें ठुमकत नाचणारा घोडा.

**कोमावणें**–कोमेजणें.

## ख

**खटलेखोर**–भांडखोर.

**खंजन**–सुंदर डोळे असलेली.

**खवाशींत**–अंबारीच्या मागें असलेल्या जागेंत.

**खळ**–दुष्ट.

**खाटमार**–खाटेला बांधून दिलेला मार.

**खांडा**–रुंद पात्याची दुधारी सरळ तलवार.

**खामी**–वाईट अवस्था.

**खुरशी**–खुर्ची; आसन.

**खुलास**–मनमोकळेपणा.

**ख्यालतमाशा**–नाचरंग.

## ग

**गजरातीचे**–कडाक्याचे.

**गडणी**–मैत्रीण.

**गफलत**–घोटाळा.

**गभस्ती**–सूर्य.

**गरति**–कुलीन स्त्रिया.

**गरीबनवाजे**–गरिबांचा कैवारी.

**गर्नाळ**–लहान तोफ.

**गलोल**–गोफण.

**गुंज**–बिंडा.

**गुणगाहिना**–गुणवती व रूपवती स्त्री.

**गुदराण**–उपजीविका ( गुजराण ).

**गुरगुज**–गदा.

गुर्की—वचक; दाब.

गुलजार—नाजुक.

गुलदावरी—एक फूल व झाड.

गुलालगोटा—गुलाल भरलेला असा पातळ कागदाचा किंवा अभ्रकाचा चेंडू.

गेंद—(१) गेंदेबाज वस्तु; (२) तुरा, झुबका.

गोल—जमाव.

गोष्पद—चिखलांत उमटलेलें व पाण्यानें भरलेलें गाईचें पाऊल.

घ

घटाव—(१) डौलदार; (२) घटना.

घरधाली—सर्वनाश करणारी.

घसरा—जोर.

घुमराई—विपुलता.

घोडका—स्वाराबरोबर घोड्याच्या तैनातींत असलेला मनुष्य.

च

चक—चकचकीत.

चहूटा—चव्हाटा.

चाटक—सौंदर्य.

चाटा—पल्ला; अंतर.

चांगट—सुंदर.

चितळ—ठिपक्यांचा काळवीट.

चीर—वस्त्र.

चुंगा—टोळया.

चोखडी—चांगली; शुद्ध.

चोथवा—एक माप ( पायलीचें ).

चौफुला—पानसुपारीचा डबा.

छ

छबिने—चौक्या.

ज

जंगी—(जंग)—लढाऊ.

जंबुरा—एक प्रकारची लहान तोफ.

जमई—एक प्रकारचें शस्त्र.

जमदाड—मोठी तरवार.

जमाबंदी—जमवाजमव.

जरब—तोफ.

जबरदस्त—काबीज.

जरबाबी—भरजरी.

जवा—स्त्रियांच्या हातांतील सुवर्णकंकण. त्यांत जवाच्या आकाराच्या कळ्या बसविलेल्या असतात.

जवेरखाना—रत्नशाळा.

जहामर्दी—शौर्यानें; धाडसानें.

जळज—कमळ.

जामदारखाना—पोषाख ठेवण्याची जागा.

जिन्नसखाना—कोठार.

जिलिब—परिवार.

जिलेवंत—शोभिवंत.

जुग—युग.

जुदा—वेगळा; निराळा.

जुरत—धाडस.

जुरा—रंगेल.

जोट—खादीचें जाड पांघरूण.

जोबन—(१) स्तन; (२) तारुण्य.

### झ

**झांगड**—अनेक वाद्यांचा आवाज.

**झिंगा ( जिंगा )**—खेकड्यासारखा पाण्यांतील क्षुद्र प्राणी.

### ठ

**ठाका**—नादयुक्त आवाज.

**ठाकेठोके**—दंगा.

**ठेगाई**—ठगाई; लुच्चेगिरी.

### ड

**डाजणें**—सलणें.

**डिंभ**—गर्व.

### त

**तक्तराव**—गाड्यावरील फिरत्या चाकावर नाचणाऱ्या कलावंतिणींचा ताफा.

**तबीब**—शस्त्रवैद्य.

**तंबुर**—लढाईंतील ढोलासारखें चर्मवाद्य.

**तमणें**—तळपणें; आवेशानें लढणें.

**तमाळनीळ**—तमालपत्राप्रमाणें निळे.

**तलख**—धमकावणीचें पत्र.

**तक्षीर**—अपराध; गुन्हा.

**ताल**—मजला.

**ताहादार**—ताजा; ताजातवाना.

**तितर**—कवडा पक्षी.

**तुक**—महत्त्व.

**तुका**—तुलना.

**तेघे ( तेगा )**—रुंद पातीची तरवार.

**तेजी**—घोडा.

**तोडा**—हजार रुपयांची थैली.

**तोशक**—गादी.

**त्रिशुद्धि**—निश्चितता.

### द

**दर्द**—दुःख.

**दस्त ( दस्ता )** सैन्याची तुकडी.

**दस्यु**—चोर.

**दल**—पान.

**दहशत**—भीति.

**दाम**—पुष्पहार.

**दामोदरा**—ऐश्वर्यसंपन्न महाल;दालन.

**दार**—स्त्री.

**दिठोणा**—तीळ.

**दुघड**—हट्टी; मूर्ख.

**दुराई**—दवंडी; द्वाही.

**दुरस्ता**—(रस्त्याच्या) दोन्ही बाजूंस.

**दुशाला**—शालजोडी.

### ध

**धनत्तर**—श्रीमंत.

**धारण येणें**—भाव येणें.

### न

**नर**—घोडा.

**नवखणी**—नऊ खणाची.

**नवाजखाणी**—एक प्रकारची तरवार.

**नागरी**—नगरांतील स्त्री.

**नाबद**—साखर; खडिसाखर.

**नारसा**—जुनाट झाडाच्या लाकडाचा आंतील गाभा.

नालकी–हत्तीवरील अंबारीसारखी रचना असलेलें आसन.

नाशिक–नाक.

निढळ–कपाळ.

निपट–सर्वस्वीं; पूर्णपणें.

निबरा–वृद्ध कळा आलेला.

निरंजन–परब्रह्म.

निराळ–आकाश.

निर्जरी–देवी.

निर्भर–(१) भरपूर; (२) भरंवसा, आधार.

निशंग–तरवार किंवा भाता.

न्यहाल–कृपा.

प

पंकज–कमल

पंच पंच उषःकाल–सूर्योदयापूर्वी पांच घटिकाचा काळ.

पंचीन–पक्षी.

पर्व–पर्वणी.

पराई–दुजाभाव.

परावा–परका.

पाखडी–किंमत.

पांजर ( पञ्जर )–पिंजरा.

पांगूळ–पिंगळा.

पापपुत्र–कुपुत्र.

पाळी–समूह.

पिचुमंद–कडुनिंब.

पिलखाना–हत्तीखाना.

पिसवाजरेल–पिसवाज (पेशवाज) पुढें खुला असलेला झगा.

पुकार–वार्ता.

पुंज–ढीग; समुदाय.

पुरखे–वयस्क; प्रौढ.

पोल्हरी–पायाच्या अंगठ्यांत घालण्याचें बायकांचें एक चांदीचें भूषण.

प्रभंजन–वारा.

फ

फरद–एकेरी वस्त्र; शाल.

फर्मा–नमुना.

फरशधर–परशु धारण करणारा-परशराम.

फरासखाना–राहुट्या, डेरे वगैरे ठेवण्याचें स्थळ.

फाकडा–फक्कड, चलाख, सुंदर.

फाग–होळीचा सण.

फाणस–कंदील.

फिरवान–उलटलेला.

फिरंग–तरवार.

ब

बकवा–भांडण.

बक्मार–लहान बंदुक.

बंक–चौकी.

बख्तर–लोखंडाचें चिलखत.

बगाडे–नवसाचा गळ.

बंद–नियम.

बनशी–उमदा.

अनुक्रम
विभाग
क्रमांक

**बनोट**—अलंकारिक रचनेचा विलास.

**बंब**—वेळूची मोठी पिचकारी.

**बस्त**—एडका.

**बाज**—भीति.

**बाडा**—थापा.

**बास**—वेळू, कळक, बांबू.

**बिचवा**—विंचवाच्या आकाराची कट्यार.

**बिछोने**—बिछाने.

**बिट्टा वासणें**—जीव नकोसा होणें.

**बिनडाकिल**—डाग नसलेले; बिन-जोडाचे.

**बिलिंद**—श्रेष्ठ; पहिल्या प्रतीचे.

**बिल्ली**—भाटी; मांजरी.

**बीन**—आघाडी.

**बुंद**—सुरेख.

**बुलाख**—नाकपुड्यांतील पडद्यास भोक पाडून त्यांत घालावयाची मुसलमान स्त्रियांची एक मोत्याची नथ; लोलक.

**बूट**—नवी कल्पना.

**बेदड**—लुटारू.

**बेलाग**—अवघड; बळकट.

**बैदा**—तंटा, गोधळ, अंदाधुंदी.

**बैरख**—निशाण; झेंडा.

**बोटवा**—गव्हाच्या पिठाचा तांदळाच्या आकाराचा केलेला गव्हला.

## भ

**भटी**—भट्टी; तयार करण्याची युक्ति.

**भणभणीत**—ओकीबोकी; शून्य.

**भरमुष्टि**—बडोद्याच्या हेकारापैकी एक प्रकार.

**भरातब**—( मरातिब ) नांवलौकिक; बहुमान.

**भाकणें**—बोलणें; भविष्य सांगणें.

**भावकी**—बंधुभाव.

**भालू**—कोल्हा.

**भाणें**—पात्र.

**भीतरीं**—आंत.

**भोत**—थैला; पिशवी.

## म

**मगनमस्त**—मस्त.

**मतंगज**—हत्ती.

**मधुप**—मधुकर; भुंगा.

**मन्मथ**—मदन.

**मर्फा**—एक प्रकारचा नगारा.

**मनसुबी**—हेतु; विचार.

**मरातब**—बहुमानाची पदवी.

**मसुदे**—मुद्दे.

**महिताबा**—चंद्रज्योति; दारूकाम.

**माडु**—काळविटाच्या शिंगाचीं दोन टोकें असलेलें शस्त्र.

**मांदी**—जमाव, समूह.

**मिजास**—डौल.

**मिलिंद**—भुंगा; भृंग.

मिसल–अधिकाराच्या दर्जाप्रमाणें कुणी कुठें उभें राहावें या व्यवस्था.

मुखरण–प्रमुख.

मुखोटा–मुखवटा.

मुखड–प्रमुख.

मुंगा–गर्व.

मुऱ्हाळी–बरोबर; सांगाती.

मूद–स्त्रियांच्या वेणींत घालावयाचा अलंकार.

मेण करणें–वस्त्रांनीं झांकून टाकणें.

मेहेरप–हत्तीवरील अंबारीची कमान.

मैरफगिरी–अंबारीची कमान.

मैद–घातकी; ढोंगी.

मोकलणें–पाठविणें; धाडणें.

मोदीखाना–लष्कराच्या धान्याची कोठी.

य

यामिनी–रात्र.

र

रणखंदाळी–रणकंदन.

रणफंदी–रणशूर.

रणशौंड–युद्धकलानिपुण.

रमणुक–विहार.

रव पडणें–रहदारी चालणें.

राजीक–बेबंदशाही; एक राजा गादीवरून जाऊन दुसरा येईपर्यंतचा काळ.

रातणें–अनुरक्त होणें.

रामा–सुंदर स्त्री.

रावा–पोपट.

रासणा–एक औषधी वनस्पति.

रांडकी–वैधव्य.

रीस–अस्वल.

रुंडमाळ–मुंडक्यांची माळ.

रुसुम–देशमुख व देशपांडे यांच्या उत्पन्नांतील एक भाग.

रोपण–आरोपण, बीजसंभव.

रोहक–भूत; ब्रह्मराक्षस.

रोही–हरणाची एक जात.

ल

लहज–क्षण; पळ.

लाखुली–लाख संख्या.

लाटा–चिपा.

लिभास–वेष.

व

वंचक–चोर; फसविणारा.

वळवटी–सुरकुती.

वाजी–(१) घोडा; (२) कंटाळा.

वामा–सुंदरी.

विद्रुम–पोवळें; प्रवाळ.

विचुक–असंबद्ध.

विरलें–झालें.

विवशी–विघ्नदेवता, राक्षसी, डाकीण.

वृंदारक–देव.

व्यसन–वारा.

श

शकलं–(१) तुकडे; (२) कारस्थान, युक्ति.

शर्वाणी–पार्वती. ( शर्व–शंकर ).
शाही ( शाई )–पृथ्वी.
शिखंड–मयूर-पुच्छ.
शिदड–गांढूळ.
शिधोट–सरळ लांब.
शिन्नळ–बदफैली; छिनाल.
शिरताज–शिरोभूषण.
शिरस्ता–वहिवाट.
शिराणी–किंमत; मातबरी.
शिलक ( सलक )–फेर.
शिलेटोप } चिलखत.
शिलेपोस }
शूर्पकर्ण–सुपासारखे कान असलेला-गणपती.
श्री–शोभा.

स

सगट–सारखे; भेदाभेद न करतां.
संगठणें–एकवटणें.
संगीन–अखंड; एकसारखी.
सणग–उंची वस्त्र.
सणाणी–बाण; किंवा बंदुकीची गोळी यांचा आवाज.
सत्राण–जोर; सामर्थ्य.
सद्दी–दरारा.
संदुका–पेट्या.
सदर–कचेरीची जागा.
सपुत–सुपुत्र; शूर.
सबर–धीर; सबुरी.
सभल–सबल–सामर्थ्यवान्; जोरदार
सभांगना–कलावंतिणी.
समीर–वारा.
सरुदार–सुरूच्या झाडाप्रमाणें सरळ.
सहेली–सखी.
सहोदर–भाऊ.
सांग–भाला.
साजिरी–सुंदर; गोजिरवाणी.
सांड–बेवारशी;रस्त्यांत पडलेली.
साहेबजादा–राजपुरुष.
सिलेखाना–शस्त्रशाळा.
सुगर–चतुर; कुशल.
सुभग–दैववान्; नशीबवान्.
सुरसेप–स्फोटक द्रव्य भरलेला गोळा.
सूत्रनाळी ( सुतरनाला )–उंटावरची तोफ.
सेव–भाजीपाला विकावयास आला असतां त्यावर द्यावयाचा ऐनजिनसी कर.
सौदामिनी–वीज.
स्यंदन–रथ.

ह

हटातटानें–हटयोगाचा अभ्यास करून.
हरप–अक्षर, वर्ण.
हरिद्रा–हळद.
हरी ( हारी )–रांग.
हलकारा–जासूद.
हाट–बाजार.

हातखंडा–निष्णाती.

हारफेर–फरक.

हिल्लाळ–(१) दिवटी, टेंबा; (२) चंद्रज्योत ( हिलाल )

हीर–हिरा: रत्न.

हुताशनी–अग्नि.

हेवड–हेकट.

होड–पैज.

## क्ष

क्षिप्रा–खीर.

अनुक्रम ७०७०४५
विभाग
क्रमांक ९२०५
नों. दि. २०/५
वाचनालय

# शुद्धिपत्र

( महत्त्वाचीं अशुद्धेंच फक्त दिलीं आहेत. )

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १७ | १७ | मला | भला |
| २० | ५ | रंगे | रंगें |
| २१ | ११ | सखाची | सुखाची |
| २३ | २ | वाकळा | वा कळा |
| २६ | ७ | रसन | रस न |
| ४३ | ७ | फत्तेसिंगाजी | फत्तेसिंगाची |
| ४३ | ७ | दाही दुराई | द्वाही दुराई |
| ६५ | २ | रुक्मिणी वराशी | रुक्मिणीवराशी |
| ६६ | १३ | भक्षाभक्षा | भक्षा भक्षा |
| ७८ | २ | आहिल्या | आदित्य |
| ८० | २६ | नसून | नेसून |
| ८३ | २० | ब्राणह्म | ब्राह्मण |
| ८६ | ३ | सकुमार | सुकुमार |
| १०२ | ३ | आहे वपण | आहेवपण |
| १०५ | ५ | हेवट | हेवड |
| ११९ | २३ | दाव लमलकी | दावलमलकी |
| १३० | १४ | महा नगिरींना | महान गिरींना |
| १३१ | १ | टेउनी | ठेउनी |
| १३२ | ९ | सुमा | सुभा |
| १५९ | २३ | वनितात | वनितांत |
| १६२ | ४ | मेणकरा | मेण करा |
| १७४ | ८ | जरी पटका | जरीपटका |
| १९१ | १९ | चडावाचा | जडावाचा |
| १९६ | १ | साजव | साजण |
| १९६ | १७ | पाथउतारा | पायउतारा |
| १९८ | २ | तुरुंग | तुरंग |
| १९८ | ५ | बिडी | विडी |
| २०० | १४ | घेउनिया | घेउनि या |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. क्र.
संदर्भ शाखा
REFBK-0008360
REFBK-0008360

किंमत चार रुपये

चित्रशाळा
पुणें